# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.१०/२०१७** **दिनांक २५.०९.२०१७**
**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- सकाळी ११.०० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा शुक्रवार दिनांक २२.०९.२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये आयोजित करण्यात आली असलेबाबत, इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ ३१६७/ २०१७, दिनांक १४ सप्टेबर, २०१७ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानंतर काही अपरिहार्य कारणास्तव सदरहू सभा शुक्रवार दिनांक २२.०९.२०१७ रोजी सकाळी ११.०० ऐवजी सोमवार दिनांक २५.०९.२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित करणेत आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ ३२९६/ २०१७, दिनांक २१ सप्टेबर, २०१७ रोजीचे पत्रान्वये कळविणेत आले होते. त्यानुसार सदरहू सभा सोमवार दिनांक२५.०९.२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

०१. मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष
०२. मा.श्री.चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष
०३. मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य
०४. मा.श्री.बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य
०५. मा.डॉ.राजेंद्र राजाबाली सिंग, सदस्य
०६. मा.सौ.योगिता अभय शेळकेपाटील, सदस्या

मा.श्रीमती रुबल अग्रवाल, भा.प्र.से.
मुख्यकार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत, समिती सदस्य मा.ॲड. मोहन मोतीराम जयकर व मा.श्री.प्रताप सखाहारी भोसले व यांनी दूरध्वनीद्वारे कळविले होते.

त्याचप्रमाणे मा.डॉ.मनीषा कायंदे, सदस्या व मा.श्री.अमोल गजानन कीर्तिकर, सदस्य यांनी यांनी ईमेलव्दारे कळविले आहे की, श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीच्या दि.२५.०९.२०१७ रोजी होणाऱ्या बैठकीचे पत्र मिळाले. परंतु या बैठकीस मी हजर रहाणार नाही. हया संदर्भात शिवसेना सचिव श्री.अनिल देसाई व मा.पर्यावरण मंत्री श्री.रामदास कदम यांनी मा.मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केली होती व मा.मुख्यमंत्र्यांनी शिवसेनेला व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष पद देण्यास संमती दिली होती. परंतु याबाबत कोणतीही कार्यवाही झालेली नसल्याने, त्याचा खेद वाटत आहे. त्यामुळे या बैठकीत उपस्थित राहण्यास मला स्वारस्य नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

मा.श्री.रविंद्र गजानन मिर्लेकर, सदस्य यांनी ई-मेलव्दारे कळविले आहे की, श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीच्या बैठकीचे पत्र मिळाले. या बैठकीस शिवसेनेचे तीनही सदस्य हजर राहणार नाहीत. कृपया याची नोंद घ्यावी.

याची समितीने नोंद घेऊन, त्यांना अनुपस्थित राहण्याची अनुमती दिली.

सभेस आवश्यक गणपुर्ती नसल्यामुळे विधी व न्याय विभागाकडील दि.१३ जुलै, २०१७ रोजीचे अधिनियम दुरुस्तीतील कलम ३ (क) पोटकलम (२) मधील तरतूदीनुसार तीस मिनीटाकरीता सभेचे कामकाज तहकुब करणेत येऊन, त्यानंतर दुपारी १२.३० वाजता मा.अध्यक्ष महोदय यांनी विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु केली.

---

**विषय नं.०१** **दिनांक ०८.०९.२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.७९२** दिनांक ०८.०९.२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करत असताना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या, त्यास मान्यता देण्यात आली.

**(१) निर्णय क्र.७५४-**

यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवास दि.०१ ऑक्टोबर पासून प्रारंभ होत आहे. मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखालील कृती आराखडा समितीने दि.३१.०३.२०१७ रोजी या महोत्सवासाठी एकूण रु.३०२३ कोटी मात्रच्या कृती आरखडयास मान्यता दिलेली आहे. परंतु सदरहू निधी अद्याप प्राप्त नाही. या महोत्सवामध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करणे व साईभक्तांना पायुभूत सोयी-सुविधा पुरविणेकामी संस्थानचा मोठया प्रमाणावर खर्च होणार असून संस्थानला निधीची कमतरता भासू शकते. अशा पार्श्वभूमीवर अहमदनगर जिल्हा परिषद, प्राथमिक शाळांना बेंचेस (बाक) देणेकामी अंदाजे

रु.९,२३,४३,२४१/- मात्र आर्थिक निधी देणे उचित होणार नाही. सबब समाधी शताब्दी महोत्सवाची सांगता होईपर्यंत सदरहू विषय स्थगित ठेवण्यात यावा. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

**<u>याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.</u>**

**यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवास दि.०१ ऑक्टोबर पासून प्रारंभ होत आहे मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखालील कृती आराखडा समितीने दि.३१.०३.२०१७ रोजी या महोत्सवासाठी एकूण रु.३०२३ कोटी मात्रच्या कृती आरखडयास मान्यता दिलेली आहे. परंतु सदरहू निधी अद्याप प्राप्त नाही. या महोत्सवामध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करणे व साईभक्तांना पायुभूत सोयीसुविधा पुरविणेकामी संस्थानचा मोठया प्रमाणावर खर्च होणार असून संस्थानला निधीची कमतरता भासू शकते अशा पार्श्वभूमीवर अहमदनगर जिल्हा परिषद, प्राथमिक शाळांना बेंचेस (बाक) देणेकामी अंदाजे रु.९,२३,४३,२४१/- मात्र आर्थिक निधी देणे उचित होणार नाही.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**(२) निर्णय क्र.७५५-**

यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवास दि.०१ ऑक्टोबर पासून प्रारंभ होत आहे. मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखालील कृती आराखडा समितीने दि.३१.०३.२०१७ रोजी या महोत्सवासाठी एकूण रु.३०२३ कोटी मात्रच्या कृती आरखडयास मान्यता दिलेली आहे. परंतु सदरहू निधी अद्याप प्राप्त नाही. या महोत्सवामध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करणे व साईभक्तांना पायुभूत सोयी-सुविधा पुरविणेकामी संस्थानचा मोठया प्रमाणावर खर्च होणार असून संस्थानला निधीची कमतरता भासू शकते. अशा पार्श्वभूमीवर अहमदनगर जिल्हा परिषद, प्राथमिक शाळांना नविन वर्ग खोल्या इमारती बांधकामांसाठी रक्कम रु.३६ कोटी मात्र आर्थिक अनुदान देणे उचित होणार नाही. सबब समाधी शताब्दी महोत्सवाची सांगता होईपर्यंत सदरहू विषय स्थगित ठेवण्यात यावा. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

**<u>याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.</u>**

**यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवास दि.०१ ऑक्टोबर पासून प्रारंभ होत आहे मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखालील कृती आराखडा समितीने दि.३१.०३.२०१७ रोजी या महोत्सवासाठी एकूण रु.३०२३ कोटी मात्रच्या कृती आरखडयास मान्यता दिलेली आहे. परंतु सदरहू निधी अद्याप प्राप्त नाही या महोत्सवामध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करणे व साईभक्तांना पायुभूत सोयीसुविधा पुरविणेकामी संस्थानचा मोठया प्रमाणावर खर्च होणार असून संस्थानला निधीची कमतरता भासू शकते. अशा पार्श्वभूमीवर अहमदनगर जिल्हा परिषद, प्राथमिक शाळांना नविन वर्ग खोल्या इमारती बांधकामांसाठी रक्कम रु.३६ कोटी मात्र आर्थिक अनुदान देणे उचित होणार नाही.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**(३) निर्णय क्र.७५६-**

यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवास दि.०१ ऑक्टोबर पासून प्रारंभ होत आहे. मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखालील कृती आराखडा समितीने दि.३१.०३.२०१७ रोजी या महोत्सवासाठी एकूण रु.३०२३ कोटी मात्रच्या कृती आराखडयास मान्यता दिलेली आहे. परंतु सदरहू निधी अद्याप प्राप्त नाही. या महोत्सवामध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करणे व साईभक्तांना पायुभूत सोयी-सुविधा पुरविणेकामी संस्थानचा मोठया प्रमाणावर खर्च होणार असून संस्थानला निधीची कमतरता भासू शकते. अशा पार्श्वभूमीवर अहमदनगर जिल्हा परिषद, प्राथमिक शाळांना संरक्षण भिंतींचे बांधकाम करणेसाठी रक्कम रु.४२.७८ कोटी मात्र आर्थिक अनुदान देणे उचित होणार नाही. सबब समाधी शताब्दी महोत्सवाची सांगता होईपर्यंत सदरहू विषय स्थगित ठेवण्यात यावा. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

**<u>याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.</u>**

**यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवास दि.०१ ऑक्टोबर पासून प्रारंभ होत आहे मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखालील कृती आराखडा समितीने दि.३१.०३.२०१७ रोजी या महोत्सवासाठी एकूण रु.३०२३ कोटी मात्रच्या कृती आरखडयास मान्यता दिलेली आहे. परंतु सदरहू निधी अद्याप प्राप्त नाही या महोत्सवामध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करणे व साईभक्तांना पायुभूत सोयीसुविधा पुरविणेकामी संस्थानचा मोठया प्रमाणावर खर्च**

**होणार असून संस्थानला निधीची कमतरता भासू शकते अशा पार्श्वभूमीवर अहमदनगर जिल्हा परिषद, प्राथमिक शाळांना संरक्षण भिंतींचे बांधकाम करणेसाठी रक्कम रु.४२.७८ कोटी मात्र आर्थिक अनुदान देणे उचित होणार नाही.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**(४) निर्णय क्र.७५८-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाचा विचार करता, प्रस्तावित जमीन शेतजमीन स्वरुपाची असून तिचा शासनाच्या बाजारमुल्य दरतक्त्यामध्ये बिनशेती गटात समावेश असल्यामुळे तो दर बिनशेती जमीनीचा आहे. तथापि, सदरची जमीन भविष्यामध्ये संस्थानच्या उपयोगाची असल्यामुळे व सद्य:स्थितीत जमिनीचे स्वरुप शेतजमीन असल्याने उपरोक्त जमिनीच्या गट नंबरच्या लगतच्या शेतजमिनीच्या दराप्रमाणे खरेदी करणेस हरकत नाही, असे समिती सदस्यांचे मत झाले. याकरीता सदरहू जमीनीच्या परिसरातील शेतजमिनींच्या बाजारमूल्य दरतक्त्यातील दराप्रमाणे खरेदी करणेकामी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेणेसाठी प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

**<u>याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.</u>**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, तत्कालीन त्रीसदस्य समितीच्या दि.०३/०८/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.६३० अन्वये प्रस्तावित जमीन खरेदी करणेस मान्यता देण्यात आलेली आहे. या त्रीसदस्य समितीच्या निर्णयास अधीन राहून श्री.बाबासाहेब बाबुराव गोंदकर, रा.शिर्डी यांचे मालकीची मौजे कनकुरी, ता.राहाता येथील गट नं.१४३/अ/१ (जुना गट नं.१४३/५) शेत जमीन क्षेत्र १.५१.५० आर खरेदी करणेत यावी, असे ठरले. आजचे सभेत अर्जदार श्री.बाबासाहेब बाबुराव गोंदकर, रा.शिर्डी व इतर उपस्थित होते. त्यांनी सन- २०१७ मधील रेडीरेकनरप्रमाणे जमीनीची किंमत मिळावी, अशी विनंती केली. परंतु सदरहू जमीन खरेदी करावयास मान्यता मिळाली, त्या वेळेसच्या म्हणजेच सन- २०१४ च्या शासकीय दराने सदरहू जमीनीची खरेदी करणेत यावी, असे समितीचे मत झाले, त्यास अर्जदार यांनी संमती दिली. तसेच याकामी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेणेसाठी प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**(५) निर्णय क्र.७८४-**

मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दि.२८ जुलै, २०१७ रोजी पारित केलेल्या शासन निर्णयानुसार संस्थानकडे देणगी रुपाने जमा झालेल्या सोने-चांदींच्या वस्तुपैकी, वितळविणे योग्य असलेल्या वस्तु वितळविणेत येऊन, त्यापासुन शुध्द सोने-चांदी प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही पुर्ण करणेत यावी. त्यानंतर या शुध्द सोने-चांदीपासून संस्थानसाठी आवश्यक असलेली नाणी तयार करुन घेण्यात यावी.

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

**<u>याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.</u>**

मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दि.२८ जुलै, २०१७ रोजी पारित केलेल्या शासन निर्णयानुसार संस्थानकडे देणगी रुपाने जमा झालेल्या सोने-चांदींच्या वस्तुपैकी, वितळविणे योग्य असलेल्या वस्तु वितळविणेत येऊन, त्यापासुन शुध्द सोने-चांदी प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही पुर्ण करणेत यावी. त्यानंतर या शुध्द सोने-चांदीपासून संस्थानसाठी आवश्यक असलेली नाणी तयार करुन घेण्यात यावी **व उर्वरित सोने-चांदी विशेषत: सोने हे मा.पंतप्रधान यांनी प्रस्तावित केलेल्या सुवर्ण ठेव योजनेमध्ये गुंतविणेकामी शासनाकडे प्रस्ताव सादर करणेत यावा.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**(६) निर्णय क्र.७८९-**

श्री.संजय काळे, कोपरगाव यांनी दीनदयाल बहूउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ या संस्थेस आत्महत्याग्रस्तांच्या कुटूंबीयांचे पुनर्वसनासाठी संस्थानमार्फत देण्यात येणाऱ्या निधीबाबत, मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये पी.आय.एल. एस.टी नं. ३००६०/२०१७ दाखल केलेली असलेची सभेस माहिती देण्यात आली.

यावर अशी चर्चा झाली की, या पी.आय.एल.वर मा.न्यायालयाने निधी देण्यास मनाई आदेश दिलेला नाही. याकरीता पंडीत दिनदयाल संस्था, यवतमाळ यांना निधी देणेस हरकत नाही. परंतु त्यापुर्वी पुढील सभेसमोर यावर चर्चा करणेत यावी. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

उपरोक्तप्रमाणे झालेल्या निर्णयावर आजचे सभेत विस्तृत चर्चा झाली व या पी.आय.एल.वर मा.उच्च न्यायालयाचा दीनदयाल बहूउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ या संस्थेस निधी देण्यास मनाई आदेश नाही. तसेच सदर निधी देण्यास शासनाने देखील मंजुरी दिलेली आहे. या बाबींचा विचार करता, दीनदयाल बहूउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ यांना निधी देणेस हरकत नाही. असे समिती सदस्यांचे मत झाले व हा निधी वितरण करणेची पुढील कार्यवाही प्रशासनाने सुरु करावी, असे ठरले. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.०२** **श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षानिमित्त पादुका दर्शन सोहळा नियमावली अंतीम होणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ तरतुद-**

| अ.क्र | कलम/ तरतूद क्र. | कलम/ तरतूदीचे शीर्षक | पोटकलम/ उपकलम क्र. | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग | १(ख) | रुढीव प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे. |
| ०२ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग | १ (ग) | भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे |

**प्रस्तावना-** माहे-ऑक्टोबर-२०१७ ते ऑक्टोबर-२०१८ या कालावधीमध्ये संस्थानमार्फत श्रीसाईबाबा समाधी शताब्दी महोत्सव साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त जे साईभक्त शिर्डी येथे दर्शनासाठी येऊ शकत नाही अशा साईभक्तांचे सोईसाठी समाधी शताब्दी महोत्सवाचे पार्श्वभूमीवर श्रींच्या मुळ पादुका देश-विदेशात ठिकठिकाणी नेण्याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २८/०४/२०१७ रोजीचे सभेमध्ये निर्णय झालेला आहे. मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८.०४.२०१७चे सभेपुढे विषय नं.०३ सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्र.२८० मध्ये नमूद केल्यानुसार मंदिर विभागाने या संबंधीची नियमावली तयार करावी असा निर्णय पारीत करणेत आलेला आहे. त्यानुसार मंदिर विभागामार्फत नियमावली तयार करुन मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०.०८.२०१७ चे सभेमध्ये ठेवण्यात आली होती. मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०.०८.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६८६ नुसार साईपादुका दर्शन सोहळा विविध राज्यांमध्ये आयोजित करण्यासंदर्भात प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी समिती सदस्य मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे, मा.श्री.बिपीनदादा कोल्हे व मुख्य कार्यकारी अधिकारी यांची समिती गठीत करणेत आली. या समितीने साईपादुका दर्शन सोहळयासाठीची नियमावली ८दिवसांमध्ये अंतीम करावी असे ठरले आहे.

प्रस्ताव- मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०.०८.२०१७चे निर्णयानुसार मंगळवार, दि.०५.०९.२०१७ रोजी सकाळी ११:०० वा लेंडीबागेतील साईनिवास अतिथीगृह 0 नंबर येथे छाननी समिती सदस्य मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे, मा.श्री.बिपीनदादा कोल्हे, मा.श्रीमती रुबल अग्रवाल (भा.प्र.से), मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी एकत्रीतपणे याबाबत सविस्तर करुन सदर नियमावलीमध्ये काही दुरुस्त्या सूचित केल्या आहेत. त्यानुसार खालीलप्रमाणे दुरुस्ती केलेली नियमावली अंतीम करणेबाबत निर्णय होणेस विनंती आहे.

**विभागाचा अभिप्राय-** वरील निर्णयास अनुसरुन श्रीसाईबाबांच्या मुळ पादुका व चांदीच्या पादुका देशा-विदेशामध्ये विविध ठिकाणी दर्शनासाठी उपलब्ध करुन देणेसाठी खालीलप्रमाणे निकष व नियमावली निश्चित करणेबाबत निर्णय व्हावा.

**अ) देशा-विदेशातील पादुका दर्शन कार्यक्रमासाठी आयोजकांकडून खालीलप्रमाणे व्यवस्था होणे अपेक्षित आहे-**

| अ.नं. | श्रींचे पादुका दर्शन कार्यक्रमासाठी आवश्यक असलेल्याव्यवस्थेबाबत तपशील. |
|---|---|
| **१)** | **कार्यक्रमाचे ठिकाणी श्रींच्या मुळ पादुका व्यतिरिक्त इतर प्रतिकात्मक पादुका व प्रतिकात्मक समाधी नसावी.** |
| | १.संस्थानचे श्रीसाईबाबा समाधी शताब्दी महोत्सवानिमित्त होणा-या पादुका दर्शन सोहळयाकरीता श्रीसाईबाबांच्या म्युझियम हॉलमध्ये ठेवण्यातआलेल्या श्रींच्या मुळ पादुकांपैकी एक पादुका भारतात व भारताबाहेर (परदेशात) समाधी मंदिरातील वापरात नसलेल्या जुन्या चांदीच्या पादुका नेण्यात याव्यात. या पादुकांसोबत संस्थानची दक्षिणा पेटी व देणगी पुस्तक ठेवण्यात यावे. (मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/०४/२०१७चे सभेतील विषय नं.०३, निर्णय क्र.२८०नुसार) |

| | |
|---|---|
| | २.पादुका दर्शन सोहळ्याकरीता ज्या ठिकाणी जाण्याचे नियोजन आहे, अशा ठिकाणी श्रीसाईबाबांची प्रतिकात्मक समाधी नसावी. |
| | ३.पादुका दर्शनासाठी नेण्यापुर्वी संस्थानचे लेखाशाखेमार्फत संस्थान खर्चाने पादुकांचा वर्षभराकरीता विमा उतरविण्यात यावा. |
| | ४.श्रींच्या पादुका कोणत्या ठिकाणी न्याव्यात व कोणत्या ठिकाणी नेऊ नये याबाबत निर्णय घेणेचा अधिकार पुर्णपणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा राहील. |
| | ५.पादुका कोणत्याही परिस्थितीत नियोजित ठिकाण सोडून इतरमंदिर अथवा कोणाच्या घरी नेऊ नयेत. |
| २) | **कार्यक्रमासाठी शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी जागा उपलब्ध करावी. (मैदान किंवा स्टेडीयम)** |
| | १. पादुका दर्शन कार्यक्रमासाठी पुरेसेस्टेज आयोजकाने तयार करावयाचे आहे. |
| | २. दर्शनरांगेसाठी पुरेशी रेलींग व्यवस्था आयोजकाने करावयाची आहे. |
| | ३. भजनसंध्या कार्यक्रमासाठी स्टेजची व्यवस्था आयोजकांनी करावयाची आहे. |
| | ४. दर्शकांची बैठक व्यवस्था आयोजकांनी करावयाची आहे. |
| | ५. महाप्रसाद व त्याकरीता आवश्यक बैठक व्यवस्था आयोजकांनी करावयाची आहे. |
| | ६. दर्शनार्थी भक्तांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आयोजकांनी करावयाची आहे. |
| | ७. संस्थान प्रकाशनांसाठी आवश्यकतेप्रमाणेस्टॉल व्यवस्था आयोजकांनी करुन द्यावयाची आहे. |
| | ८. भक्तांसाठी खाद्यपदार्थांचे स्टॉल व्यवस्था आयोजकांनी करावयाची आहे. |
| | ९. जागोजागी डस्टबीनची व स्वच्छतागृहांची व्यवस्था आयोजकांनी करावयाची आहे. |
| | १०. स्टेजवर लाईट व फॅन व्यवस्था योग्य त्या सुरक्षीततेसह आयोजकांनी करावयाची आहे. |
| | ११. स्टेज डेकोरेशन (शताब्दी लोगोसह, संस्थानचे बॅनरसह), तसेच ध्वनीक्षेपणव्यवस्था आयोजकांनी करावयाची आहे. |
| | १२.कार्यक्रमाचे ठिकाणी आवश्यक ती सुरक्षीततेची अग्निशमनची उपकरणे,इ. ची व्यवस्था आयोजकांनी करावयाची आहे. |
| | १३.संस्थानचेदेणगी काऊंटर असावे. तसेच पादुकांचे जवळ संस्थानमार्फतदक्षिणा पेट्या ठेवण्यात येतील व त्यामध्ये जमा होणारी रक्कम श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडे जमा होईल. |
| ३) | शिर्डी येथून येणा-या मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष,मा.विश्वस्त, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.उपजिल्हाधिकारी, मा.उपकार्यकारी अधिकारी यांची स्वतंत्र निवास व्यवस्था व इतर कर्मचारी वृंदांसाठी स्वतंत्र निवासव्यवस्था व नाष्टा, जेवण, चहापानाची व्यवस्था आयोजकांनी करावयाची आहे. |
| ४) | श्रींच्या पादुकांचे संरक्षणाकरीता आयोजकांमार्फत सुरक्षित जागा असावी व सदर ठिकाणी २४तास सी.सी.टि.व्ही. कॅमे-याची व्यवस्था असावी. तसेच आवश्यक व परिपुर्णसुरक्षा रक्षकांची नेमणूक आयोजकाने करावयाची आहे. |
| ५) | प्रचार व प्रसिद्धी (शताब्दी लोगो व शिर्डी मंदिर कळस) इत्यादीचे आयोजकांनी संस्थानकडुन प्रसिद्धीचे मॅटर तपासून केबलद्वारे,होर्डींग्ज/बॅनर तयार करुन,पॅम्प्लेटस् छापुन,सोशल मिडीया, व्हाट्सॲप व फेसबुक,इ व वृत्तपत्रातुन कार्यक्रमाची प्रसिद्धी आपले स्तरावर नियोजन करावयाचे आहे. |
| ६) | वाहन व्यवस्था करणे. |
| | १. विमानतळ/रेल्वे स्टेशनपासून निवासव्यवस्थेपर्यंत मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष, मा.समिती सदस्य यांची वाहनव्यवस्था व कार्यक्रम स्थळाचे जवळ निवासव्यवस्था आयोजकांनी करावयाची आहे. |
| | २. विमानतळ/रेल्वे स्टेशन ते निवासव्यवस्थेपर्यंत कर्मचारीवर्गासाठी वाहनव्यवस्था तसेच अधिकारी/ कर्मचारी यांना कार्यक्रम स्थळाचे जवळ निवासव्यवस्था आयोजकांनी करावयाची आहे. |
| | ३. श्रींचे पादुकांसाठी सुरक्षारक्षकांसहीत तीन वाहनाचे नियोजन करावयाचे आहे. मधल्या वाहनामध्ये श्रींच्या पादुका असतील त्यातीलपुढे व मागे सुरक्षा वाहन असावे. तसेच आवश्यक त्याठिकाणी पादुका विमानाने नेण्यात याव्यात. |
| | ४. पादुका मिरवणूकीकरीतागाडयांचीव्यवस्था सुरक्षा यंत्रणेसह आयोजकाने करावयाची आहे. |
| ७) | संबंधीत प्राधिकरणाकडून आवश्यक परवानगी घेणेत यावी. |
| | १.पोलिस परवानगी घेणेव गर्दीचे नियोजनाकरीता पुरेसा बंदोबस्त ठेवणेची कार्यवाही आयोजकांनी करावयाची आहे. |

| | |
|---|---|
| | २. नगरपालिका किंवा तत्सम कार्यालयाची परवानगी |
| | ३. पादुका दर्शन सोहळा, मिरवणूक, श्रीसाई भजन संध्या व इतर कार्यक्रम यांच्या तत्सम परवानग्या संबंधीत आयोजकाने विहीत वेळेत घ्यावयाच्या आहेत. |
| ८) | निमंत्रण व सत्कार समारंभबाबत कार्यवाही करणे. |
| | स्थानिक आमदार, खासदार, मंत्री, स्थानिक मान्यवर, लोक प्रतिनीधी व इतर महत्वाचे व्यक्तींना आयोजकांनी निमंत्रणद्यावयाचे आहे. |
| ९) | दर्शनार्थीची सुरक्षा व्यवस्था उत्कृष्ट असावी. याकरीता आयोजकांनी दर्शन सोहळयाचे ठिकाणी प्रथमोपचार केंद्र, ॲम्ब्युलन्स सुविधा, अग्निशमन व्यवस्था असावी. तसेच पादुका दर्शन सोहळयाचे ठिकाणी गर्दीचे नियोजन करण्यात यावे व आपत्कालीन परिस्थीतीची उपाययोजना आयोजकांमार्फत व्हावी. |
| १०) | विमा |
| | १) श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या लेखाशाखा विभागामार्फत शिर्डी येथुन श्रींच्या पादुकांचा विमा उतरविण्यात येईल. तसेच संस्थानमार्फत कार्यक्रमाकरीता संस्थानचे अधिकारी, पदाधिकारी व कर्मचारी यांचा प्रवासासह विमा उतरविण्यात यावा. |
| | १) आयोजकाने इच्छेप्रमाणे आवश्यकता असल्यास पादुका दर्शन सोहळयाकरीता येणा-या भक्तांचा योग्य तो अपघात विमा त्यांचे स्तरावर उतरविण्यात यावा. |
| **११)** | **कार्यक्रमाची रुपरेषा व नियोजन योग्य पध्दतीने करणेत यावे.** |
| | १.कार्यक्रम दोन ते तीन दिवसीय असेल. त्यापेक्षा अधिक नसेल. त्यामध्ये कार्यक्रमाचे ठिकाणी काकड आरती व शेजारती करता येणार नाही. कार्यक्रमाचे ठिकाणी शिर्डी माझे पंढरपुर,माध्यान्ह आरती व धूपारतीची वेळ शिर्डी येथील वेळेप्रमाणे असावी व त्याचे पालन काटेकोरपणे केले जावे. |
| | २. तसेच कार्यक्रमाची रुपरेषा व कार्यक्रमाचे नियोजन संस्थानचे मंदिर विभाग व शताब्दी कक्ष हे एकत्रीत करतील. |
| | ३. कार्यक्रमाचे सुत्रसंचलनाकरीता स्थानिक प्रादेशिक भाषा व मराठी अथवा हिंदीयापैकी एक भाषेचे ज्ञान असलेल्या जाणकार व्यक्तीस आयोजकाने नेमावयाचे आहे. |
| | ४. पादुकांचे मिरवणूकीसाठी बॅण्ड, ढोलपथक वा तत्सम स्थानिक कलापथकेइ. स्थानिक परवानगी आयोजकाने घ्यावी. |
| | ५. आयोजकाने दर्शनार्थी भक्तांना दर्शनानंतर शक्य असल्यास वितरणासाठी प्रसाद उपलब्ध करुन द्यावा. |
| १२) | संस्थानचे नावलौकीकास बाधा येणार नाही याबाबत संबंधीत आयोजकाची जबाबदारी असेल व त्याबाबतची खबरदारी व दक्षता आयोजकांनी घ्यावयाची आहे. |
| १३) | श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे नावाचा इतर खाजगी कामासाठी अथवा उद्दिष्टांसाठी वापर करता येणार नाही. तसेच संस्थानचे नावाचा वापर करुन कोणत्याही प्रकारे आर्थिक फायदा आयोजकांनी करु नये. |
| १४) | श्रीसाईबाबा समाधी शताब्दी महोत्सव कालावधीमध्ये भारताचे बाहेर श्रींच्या पादुका दर्शन सोहळयाकरीता संस्थानमार्फत जाणारे मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष, मा.समिती सदस्य,मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.उपजिल्हाधिकारी, मा.उपकार्यकारी अधिकारी, संस्थानचे पदाधिकारी व कर्मचारी यांचे VISA व तिकीटाचा खर्च संस्थानमार्फत करण्यात यावा. |
| १५) | पादुका दर्शन कार्यक्रमाचे ४ ते ५ दिवस अगोदर संस्थानमार्फत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे सूचनेनुसार कार्यक्रमाची पुर्वतयारी व इतर माहिती घेण्यात यावी. |

ब) संस्थान मार्फत पादुका दर्शन व साईभजन संध्या कार्यक्रमासाठी आवश्यक मनुष्यबळाचे नियोजन शताब्दी कक्षामार्फत करण्यात येईल व कार्यक्रमाचे नियोजनाचे वेळी शताब्दी कक्षाचे आदेशानुसार संबंधीत विभागामार्फत आवश्यकतेनुसार विविध विभागांमार्फत मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यात येईल.

तसेच श्रींच्या मुळ पादुका श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या कार्यक्षेत्राचे बाहेर नेऊ नये, असे नम्र मत आहे.

दि.२०.०८.२०१७ चे ठरावानुसार मा.छाननी समिती सदस्यांची दि.०५.०९.२०१७ रोजी चर्चा करुन श्रीसाईबाबा समाधी शताब्दी वर्षाकरीता पादुका दर्शन सोहळा कार्यक्रमाकरीता नियमावलीमध्ये उपरोक्तप्रमाणे दुरुस्ती करण्यात आलेली आहे. त्यानुसार सदरची श्रीसाईबाबा समाधी शताब्दी पादुका दर्शन सोहळा नियमावली अंतीम होणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७९३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षानिमित्त देश-विदेशामध्ये आयोजित करावयाच्या पादुका दर्शन सोहळयाची नियमावलीचे अवलोकन करणेत येऊन, त्यामध्ये भारतामधील पादुका दर्शन सोहळयासाठी श्रींच्या मुळ पादुका व परदेशामधील पादुका दर्शन सोहळयासाठी चांदीच्या पादुका उपलब्ध करुन देण्यात याव्यात, या दुरुस्तीसह त्यास मान्यता देण्यात आली. तसेच पादुका दर्शन सोहळयासाठी श्रींच्या पादुकांची मागणी करणेसाठी प्राप्त होणाऱ्या अर्जांची छाननी करणेसाठी तयार करणेत आलेल्या समितीमध्ये व्यवस्थापन समिती सदस्य मा.ॲड.मोहन जयकर यांचा समावेश करणेत यावा, असे ठरले.**

**यावेळी पादुका दर्शन सोहळयासाठी खरेदी करणेत आलेली भारतबेंच कंपनीची नवीन वातानुकूलीत बस सप्टेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवडयामध्ये अथवा ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या आठवडयामध्ये ताब्यात मिळण्याची शक्यता आहे, अशी माहिती सभेस देण्यात आली.**

**यावर सभेने अशी चर्चा केली की, पादुका दर्शन सोहळयासाठीची नवीन बस संस्थानच्या ताब्यात मिळाल्यानंतर सदरहू बसचे आर.टी.ओ. पासिंग करणेसाठी ३ ते ४ दिवसांचा कालावधी लागणार आहे व पासिंग झाल्यानंतर समाधी शताब्दी वर्षामधील पहिल्या पादुका दर्शन सोहळयासाठी दि.११ ऑक्टोबर, २०१७ रोजी गोवा येथे ही बस पाठवावयाची आहे. त्यामुळे पादुका दर्शन सोहळयासाठी या बसमध्ये आवश्यक फेरबदल करणेकामी ४ ते ५ दिवसांचा कमी कालावधी असल्यामुळे प्रचलित पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबवून, काम करुन घेणे शक्य होणार नाही. याकरीता या बसच्या फेरबदलाचे काम ND's Art World Pvt. Ltd., Mumbai यांचेकडून करुन घेण्यास व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.८,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख/ प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

**विषय नं.०३** **श्री.वाल्मिक केंद्रे, डायरेक्टर, एअर एलोरा एविएशन प्रा.लि., पुणे यांना प्रायोगिक तत्वावर मुंबई-शिर्डी आणि शिर्डी दर्शन हेलिकॉप्टर सेवा सुरु करणेसाठी परवानगी देणे.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद-** महाराष्ट्र शासनाने पुनर्घटीत केलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे अधिनियमात "समितीची कर्तव्य व अधिकारी" या शिर्षकाखाली अधिनियिम नंबर १७ (१) मध्ये "राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील." अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक-** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २३.०५.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३६४.

**प्रस्ताविक–** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २३.०५.२०१७ रोजीचे सभेतील निर्णयान्वये श्री.वाल्मिक केंद्रे, डायरेक्टर, एअर एलोरा एविएशन प्रा.लि., पुणे यांना संदर्भ क्रमांक२ ने साईभक्तांच्या सोईसाठी प्रायोगिक तत्वावर एक महिन्यासाठी, सध्याच्या संस्थान नियमावलीच्या अधिन राहून, मुंबई-शिर्डी हवाईसेवा सुरु करणेस तत्वतः मान्यता देण्यात आली असून संस्थान हेलीपॅड वापराबाबतची सध्याची नियमावली खालीलप्रमाणे आहे असे कळविण्यात आले होते.

१) हेलीकॉप्टर लॅण्डींगसाठी आवश्यक सर्व स्थानिक/शासकीय/निमशासकीय परवानग्या हेलीकॉप्टर कंपनीला घेणे बंधनकारक राहील.

२) एका लॅण्डींग/ टेकऑफसाठी रुपये ५०००/- व नाईट हॉल्ट असल्यास रुपये २,०००/- अधिकची रक्कम लॅण्डींग झाल्यावर जनसंपर्क कार्यालयात रोखीने जमा करावी.

३) रुग्णवाहीका वापर आकार रुपये १,५००/- प्रतितास याप्रमाणे रुग्णवाहीका चालकास हेलिपॅडवर रोखीने आदा करावा.

४) अग्निशमन वापर आकार पहिल्या तीन तासासाठी रुपये ४,०००/-, त्यापुढील प्रत्येक तासासाठी रुपये १,०००/- तसेच सी.ओ.टू. चा वापर झाल्यास नियमाप्रमाणे अग्निशमन चालक सांगेल त्याप्रमाणे आकार अग्निशमन चालकास हेलिपॅडवर रोखीने आदा करावा लागेल.

५)    प्रत्येक लॅण्डींगपुर्वी किमान दोन दिवस आगोदर जनसंपर्क विभागाकडे हेलीकॉप्टर लॅण्डींगबाबत फॅक्स पाठवून कळविणे, परवानगी घेणे हेलीकॉप्टार कंपनीस बंधनकारक राहील.

६)    लॅण्डींग रद्द करावयाचे असेल तर एक दिवस आधी तसे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) यांना लिखीत कळविणे आपणास बंधनकारक राहील.

७)    हेलीकॉप्टर लॅण्डींग व टेक ऑफ करतांना अपघात होऊन जिवित हानी अथवा इतर प्रकारची कोणतीही हानी झाल्यास त्यास संबंधीत हेलिकॉप्टर कंपनी जबाबदार राहील. याबाबत संस्थानची कोणतीही जबाबदारी राहणार नाही.

८)    अति महत्वाचे व्ही.आय.पी.चे शिर्डी भेटीच्या दरम्यान अथवा आपतकालीन परिस्थितीत सदर हेलीपॅडचा वापर करणे आवश्यक असेल त्यावेळेस लॅण्डींग रद्द करणे किंवा वेळ बदलणे ही बाब कंपनीवर बंधनकारक राहील. तशी पुर्व सुचना संस्थान कंपनीस देईल.

९)    संरक्षण विभागामार्फत हेलीपॅडवर सुरक्षा रक्षकची नेमणूक करण्यात येते. याव्यतिरिक्त इतर वाढीव सुरक्षा व्यवस्था संबंधीत कंपनीने करावी.

१०)   हेलीकॉप्टर लॅण्डींगसाठी परवानगी देणे अथवा रद्द करणेबाबतचे सर्व अधिकारी संस्थान राखून ठेवत आहे.

११)   आपल्या हेलिकॉप्टरला मंदिरावर घिरटया घालता येणार नाही, याबाबत पायलटला सुचना देण्याची जबाबदारी आपली राहील.

सदरचे पत्रातील अटीस अनुसरुन श्री केंद्रे यांनी दिनांक ०७.०९.२०१७ रोजीचे पत्राने त्यांचा खुलासा कळविलेला आहे. उपरोक्त पत्रातील अट नंबर १, ५, ६, ७, ८, ९, १० मान्य असलेबाबत कळविलेले आहे. अट नंबर ३ व ४ रुग्णवाहीका व अग्निशमन यंत्रणा कंपनीकडे उपलब्ध आहे. तसेच अट नंबर २ बाबत शिर्डी दर्शन, आम्ही प्रति तास ६/७ लॅण्डींग/टिकऑफ करतो. त्यामुळे प्रति लॅण्डींग/टिकऑफ चार्ज न लावता आपण प्रति २४ तासाची एक ठराविक रक्कम ठरवून आम्हास द्यावी करण आमचे एक हेलिकॉप्टर नेहमी हॉल्ट राहणार आहे व अट नंबर ११ बाबत ही अट मान्य आहे पण आम्हाला मंदिर परिसराच्या १ की.मी.बाहेरुन (लांबुन) घिरट्या घालण्यास संस्थानची काही हरकत नसावी. शिर्डी दर्शन साठी कंपनीला संस्थानकडून नाहरकत प्रमाणपत्र मिळावे त्यात नमुद असावे की, १ की.मी.लांबीहून घिरट्या घालण्यास संस्थान समितीची कोणतीही हरकत नाही. वरील सर्व अटी व नियमांचे पालन करुन कंपनी तत्वतः काम करण्यास तयार आहे आणि ह्याबाबत दिनांक १२.०९.२०१७ पर्यंत करार करुन घ्यावा असे कंपनीस वाटते, तसे आम्हास कळवावे असे कळविलेले आहे.

श्री.केंद्रे यांनी अट नंबर २ मध्ये नमुद केलेले दर हे प्रति लॅण्डींगचे आहे सदरचे दर २४ तासाकरीता एक ठराविक रक्कम ठरवून द्यावे असे कळविले आहे. तथापि संदर्भ क्रमांक २ चे पत्राने श्री.केंद्रे यांना कळविलेले दर हे मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने ठरलेले असून त्याप्रमाणे संस्थान हेलीपॅड वापरासाठी आजतागाय परवानग्या देण्यात आलेल्या आहेत. यासाठी मा.व्यवस्थापन सिमितीची मान्यता घेणे योग्य होईल. तसेच अट नंबर ११ बाबत मंदिर परिसराच्या १ की.मी.बाहेरुन घिरट्या घालणेस परवानगी मिळणेबाबत संस्थानकडून नाहरकत प्रमाणपत्र मिळावे असे कळविलेले आहे. याबाबत मंदिरावर पुष्पवृष्टी करणेबाबत श्री साईबाबा पालखी सोहळा समिती, पुणे यांनी केलेली विनंती माव्यवस्थापन समितीचे दिनांक १७.०७.२०१४ चे निर्णय क्रमांक ५८३ अन्वये सुरक्षिततेच्या दृष्टीने अमान्य करण्यात आली होती. मंदिर परिसराच्या १ की.मी. बाहेरुन घिरट्या घालणेसाठी श्री.केंद्रे यांनी जिल्हा पोलिस प्रमुख यांची परवानगी घेणे उचित होईल कारण संस्थानमार्फत फक्त संस्थानचे हेलिपॅड वापरास परवानगी देण्यात येते. तसेच याबाबत दिनांक १२ सप्टेबर २०१७ पर्यंत करार करणेबाबत श्री.केंद्रे यांनी कळविले आहे. तरी श्री.केंद्रे यांचे मागणीनुसार त्यांना संस्थानचे हेलीपॅड वापरास परवानगी द्यावयाची झाल्यास सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णयासाठी सादर करणे उचित होईल.

**विभागाची मागणी-** श्री.वाल्मिक केंद्रे, डायरेक्टर, एअर एलोरा एविएशन प्रा.लि., पुणे यांना प्रायोगिक तत्वावर साईभक्तांसाठी मुंबई-शिर्डी आणि शिर्डी दर्शन हेलीकॉप्टार सेवा सुरु करणेसाठी परवानगी देणेबाबत.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय –** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २३.०५.२०१७ रोजीचे सभेतील निर्णयानुसार श्री. वाल्मिक केंद्रे, डायरेक्टर, एअर एलोरा एविएशन प्रा.लि., पुणे यांना मुंबईशिर्डी हवाईसेवा सुरु करणेबाबत जा.नं.एसएसएस/पीआरओ/२१८२/२०१७ दिनांक २२.०७.२०१७ चे पत्राने कळविण्यात आले होते. याबाबत श्री.केंद्रे यांनी अट नंबर २ मध्ये नमुद केलेले दर हे प्रति लॅण्डींगचे आहे सदरचे दर २४ तासाकरीता एक ठराविक रक्कम ठरवून द्यावे असे कळविले आहे. तथापि संदर्भ क्रमांक २ चे पत्राने श्री.केंद्रे यांना कळविलेले दर हे मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने ठरलेले असून त्याप्रमाणे संस्थान हेलीपॅड वापरासाठी आजतागाय परवानग्या देण्यात आलेल्या आहेत. यासाठी मा.व्यवस्थापन सिमितीची मान्यता घेणे योग्य होईल. तसेच अट नंबर ११

बाबत मंदिर परिसराच्या १ की.मी.बाहेरुन घिरट्या घालणेस परवानगी मिळणेबाबत संस्थानकडून नाहरकत प्रमाणपत्र मिळावे असे कळविलेले आहे. याबाबत मंदिरावर पुष्पवृष्टी करणेबाबत श्री साईबाबा पालखी सोहळा समिती, पुणे यांनी केलेली विनंती माव्यवस्थापन समितीचे दिनांक १७.०७.२०१४ चे निर्णय क्रमांक ५८३ अन्वये सुरक्षिततेच्या दृष्टीने अमान्य करण्यात आली होती. मंदिर परिसराच्या १ की.मी. बाहेरुन घिरट्या घालणेसाठी श्री.केंद्रे यांनी जिल्हा पोलिस प्रमुख यांची परवानगी घेणे उचित होईल कारण संस्थानमार्फत फक्त संस्थानचे हेलिपॅड वापरास परवानगी देण्यात येते. तसेच याबाबत दिनांक १२ सप्टेबर २०१७ पर्यंत करार करणेबाबत श्री.केंद्रे यांनी कळविले आहे. श्री.केंद्रे यांनी त्यांच्या उपक्रमाचा विस्तृत तपशील दिलेला नाही. त्यांचेकडून प्रति व्यक्ती किती भाडे आकारले जाईल? दिवसातून किती फे-या मारल्या जातील? सदर उपक्रमात संस्थानची जबाबदारी काय राहील? इत्यादी माहिती मागवून निर्णय घ्यावा असे मत आहे. त्यास मान्यता मिळावी, ही विनंती.

**निर्णय क्र.७९४** **श्री.वाल्मिक केंद्रे, डायरेक्टर, एअर एलोरा एविएशन प्रा.लि., पुणे हे सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित राहू शकले नाही, याकरीता सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.** (कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी)

---

**विषय नं.०४** **सोनी वाहिनीवर दशमी क्रिएशन्सतर्फे मेरे साई- श्रध्दा और सबुरी या सुरु होणाऱ्या मालिकेसाठी संस्थानची परवानगी व सहकार्य मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद–** सन २००४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र. १४ मधील ३५७ – (ठ).

श्री साईबाबांचे जिवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालविल व त्याचा विस्तार करील.

**मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. –** दि. २३-२४/०५/२०१७ रोजीचे सभेतील विषय क्र. ०८, निर्णय क्र. ४२६.

<u>**प्रास्ताविक–**</u> दि. १३/०९/२०१७ रोजीचे ई-मेलद्वारे श्री निनाद वैद्य, दशमी क्रिएशन्स यांनी सोनी वाहिनीवर दि.२५ सप्टेंबर २०१७ रोजी पासुन सुरु होणा-या मेरे साई– श्रद्धा और सबुरी या मालिकेसाठी खालीलप्रमाणे संस्थानची परवानगी व सहकार्य मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

१) मेरे साई – श्रद्धा व सबुरी या मालिकेत दाखविण्यासाठी शिर्डी येथील साईबाबा मंदिर आणि परिसराची दृश्ये असलेले फुटेज आम्हांस हवे आहे.

२) २१ सप्टेंबर २०१७ रोजी होणा-या पत्रकार परिषदेला उपस्थित राहणा-या देशभरातील विविध न्युज चॅनेल्सला मंदिराच्या आवारात सदर मालिकेतील प्रमुख कलावंतांच्या मुलाखती चित्रीत प्रस्तुत मालिका बहुसंख्य प्रेक्षकांपर्यंत पोहोचविण्यासाठी उपरोक्त गोष्टी गरजेच्या असुन आपण आम्हांस या परवानग्या द्याल, याबद्दल आम्हाला खात्री वाटते. मुलाखती चित्रणा दरम्यान आपल्या सहकार्याबद्दल आणि या प्रोजेक्टला असलेल्या आशिर्वादाबद्दल आम्ही आपले ऋणी आहोत.

तसेच दि. २३-२४/०५/२०१७ रोजीचे सभेतील विषय क्र. ०८, निर्णय क्र. ४२६ अन्वये "श्री साईबाबांच्या जिवनावर प्रसारीत करण्यात येणा-या टि.व्ही. मालिकेस श्री साईबाबा संस्थानचे नाव देणेस परवानगी देणेत यावी व संबंधीतांबरोबर करारनामा करणेबाबत" निर्णय घेण्यात आलेला आहे.

तरी, दि. १३/०९/२०१७ रोजीचे ई-मेलद्वारे श्री निनाद वैद्य, दशमी क्रिएशन्स यांनी सोनी वाहिनीवर दि. २५ सप्टेंबर २०१७ रोजी पासुन सुरु होणा-या मेरे साई – श्रद्धा और सबुरी या मालिकेसाठी उपरोक्त केलेल्या मागण्यांबाबत निर्णय होणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करता येईल.

<u>**मागणी–**</u> उपरोक्त प्रास्ताविकेत नमुद केल्याप्रमाणे दि. १३/०९/२०१७ रोजीचे ई-मेलद्वारे श्री निनाद वैद्य, दशमी क्रिएशन्स यांनी सोनी वाहिनीवर दि. २५ सप्टेंबर २०१७ रोजी पासुन सुरु होणा-या मेरे साई – श्रद्धा और सबुरी या मालिकेसाठी उपरोक्त केलेल्या मागण्यांबाबत निर्णय होणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर करत आहे.

<u>**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान-**</u> तांत्रिक व आर्थिक.

<u>**विभागाचा स्पष्ट अभिप्राय-**</u> उपरोक्त प्रास्ताविकेत व मागणीमध्ये नमुद केल्याप्रमाणे दि. १३/०९/२०१७ रोजीचे ई-मेलद्वारे श्री निनाद वैद्य, दशमी क्रिएशन्स यांनी सोनी वाहिनीवर दि. २५ सप्टेंबर २०१७ रोजी पासुन सुरु होणा-या मेरे साई– श्रद्धा और सबुरी या मालिकेसाठी उपरोक्त केलेल्या मागण्यांबाबत निर्णय होणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.७९५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सोनी वाहिनीवर दशमी क्रिएशन्सतर्फे मेरे साई- श्रध्दा और सबुरी या सुरु होणाऱ्या मालिकेमुळे श्रींचे शिकवणूकीचा व समाधी शताब्दी महोत्सवाचा प्रचार व प्रसार होण्यास निश्चितच मदत होणार आहे. परंतु त्यासाठी संस्थानमार्फत या मालिकेस परवानगी देणे उचित होणार नाही. परवानगी दिल्यास या मालिकेची व त्यामधील दृष्यांची जबाबदारी संस्थानवर राहील, असे समिती सदस्यांचे मत झाले. याकरीता सदरहू मालिकेसाठी संस्थानचा आशिर्वाद व शुभेच्छा सोनी वाहिनीस देण्यात याव्या. तसेच त्यांनी मागणी केलेप्रमाणे साईबाबा मंदिर व परिसराची दृश्य असलेली फुटेज त्यांना उपलब्ध करुन देण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- सीसीटीव्ही कंट्रोल सेलप्रमुख)

---

**विषय नं.०५** **आरती/ दर्शन पासच्या गैरवापरास आळा बसविणेकामी ऑनलाईन सर्व्हिसेस व जनसंपर्क कार्यालयातील कार्यप्रणालीमध्ये आवश्यक बदल/ सुधारणा करणे.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद :- कलम २१ (१) ग नुसार भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य/समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :- मा.व्यवस्थापन समितीचे दि. ०७/११/२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७९९.

प्रास्ताविक :- साईभक्तांना संस्थानमार्फत पुरविणेत येत असलेल्या सेवा-सुविधांचा लाभ इंटरनेटद्वारे उपलब्ध करुन देणेसाठी साईटेक प्रकल्पाअंतर्गत "ऑनलाईन सर्व्हिसेस" हि कार्यप्रणाली विकसीत करुन कार्यान्वीत करणेतआलेली आहे. सदर कार्यप्रणालीद्वारे साईभक्तांना शिर्डी येथे येण्याचे अगोदर आरती/दर्शन पास, रुम बुकींग याबरोबरच देणगी, साईलीला, भक्तमंडळ सभासद यासारख्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. सदर कार्यप्रणालीस साईभक्तांचा लक्षणीय प्रतिसाद मिळत आहे. तसेच शिर्डी येथे आलेनंतर साईभक्तांना तात्काळ दर्शन घ्यावयाचे असल्यास सशुल्क दर्शनपास वितरीत करणेकामी जनसंपर्क कार्यालयात कार्यप्रणाली कार्यान्वीत करणेत आलेली आहे.

"ऑनलाईन सर्व्हिसेस" कार्यप्रणालीद्वारे साईभक्तांना शिर्डी येथे येण्याचे ६० दिवस अगोदरपासून नियोजीत दिवसापर्यंत उपलब्धतेनुसार आरती/दर्शन पास आरक्षीत करता येतात. ऑनलाईन सर्व्हिसेस या कार्यप्रणालीद्वारे उपलब्ध सुविधांचा लाभ घेणेकामी साईभक्तांना प्रथम कार्यप्रणालीमध्ये नोंदणी (Registration) करावी लागते. नोंदणी केलेले साईभक्त त्यांचेसह त्यांचेबरोबर त्यांचे कुटुंब अथवा मित्रांसाठी(जास्तीत जास्त ९ व्यक्ती) आरती/दर्शन पास आरक्षीत करु शकतात. तसेच शिर्डी येथे आलेनंतर आरती/दर्शन पास घ्यावयाचा झाल्यास साईभक्त थेट जनसंपर्क विभागात जाऊन स्वत:चा फोटो व बोटांचे ठसे देऊन पास घेऊ शकतात. जनसंपर्क विभागातून वितरीत होणारे एका पासवर जास्तीत जास्त ९ व्यक्ती आरती/दर्शनास जाऊ शकतात. सदर दोन्ही कार्यप्रणालीत पास आरक्षीत करणेसाठी काकड आरतीसाठी प्रतिव्यक्ती रक्कम रुपये ६००/- मात्र व इतर आरतींसाठी प्रतिव्यक्ती रक्कम रुपये ४००/- मात्र तसेच दर्शनसाठी प्रतिव्यक्ती रक्कम रुपये २००/- मात्र अशी रक्कम आकारली जाते.

सद्यस्थितीत दोन्ही कार्यप्रणालीमध्ये एका व्यक्तीस जास्तीत जास्त ९ व्यक्तींसाठी आरती/दर्शन पास संबधतींची माहिती न देता घेता येतो. अनेक वेळेस असे निदर्शनास आलेले आहे की, कमीशन एजंट अथवा व्यावसायिक हे सदर कार्यप्रणालीद्वारे अनेक व्यक्तींसाठी आरती/दर्शन पास आरक्षीत करतात व घाईत असलेल्या साईभक्तांशी संपर्क साधून सदरचे पास मनमानी किंमतीस त्यांना विकतात. सबब, साईभक्तांची फसवणूक होऊन संस्थानचे नावलौकीकास बाधा येते. अशा प्रकारच्या अनेक तक्रारी साईभक्तांमार्फत संस्थानचे संरक्षण विभागामध्ये केल्या जातात. आरती/दर्शन पासचा अवैध व्यक्तींकडून होणारा दुरुपयोगास आळा बसणेसाठी पुढीलप्रमाणे कार्यवाहीकरता येईल.

अ. "ऑनलाईन सर्व्हिसेस" या कार्यप्रणालीद्वारे आरती/दर्शन पास आरक्षीत करणा-या सर्व साईभक्तांसाठी कार्यप्रणालीमध्ये नोंदणी करुण प्रत्येक साईभक्तास पास घेणे बंधनकारक करता येईल. आरती/दर्शन पासवर साईभक्तांचा फोटो प्रिंट होत असल्याने व प्रत्येक साईभक्तास पास बंधनकारक केल्याने पास पडताळणीचे वेळी पास घेतलेल्याच साईभक्तास आरती/दर्शनास प्रवेश देणे सुलभ होईल.

आ. मोफत दर्शन पास (टाईम बेस) काऊंटर शेजारी जनसंपर्क कार्यालयातून वितरीत होणारे सशुल्क आरती/दर्शन पास काऊंटरप्रमाणेच काऊंटर सुरु करुन या ठिकाणी प्रत्येक साईभक्ताचा फोटो व बोटाचे ठसे घेऊन एका व्यक्तीस एक सशुल्क आरती/दर्शन पास वितरीत करता येईल.

इ.	शासनाचे तसेच संस्थानचे विविध विभागांकडून अथवा इतर ठिकाणांहून येणाऱ्या शिफारशींद्वारे द्यावयाचे सशुल्क आरती/दर्शन पास जनसंपर्क कार्यालयातून वितरीत करता येतील. तसेच मा. मंत्री महोदय, मा.न्यायालय, मा.खासदार, मा.आमदार व इतर मान्यवरांसाठी पास घेण्यासाठी येणारे व्यक्तीसही जनसंपर्क कार्यालयातून पास वितरीत करता येतील. सदरचे प्रणालीद्वारे पुर्वीप्रमाणेच एका पासवर अनेक साईभक्तांना आरती/ दर्शनास प्रवेश देण्याची सुविधा सुरु ठेवता येईल.

उपरोक्तप्रमाणे कार्यवाही केल्यास आरती/दर्शन पाससंदर्भात साईभक्तांची होणारी फसवणूक थांबून गरजवंत साईभक्तांनाच सदर सुविधेचा लाभ परिनामकारकरित्या घेता येईल. सबब,"ऑनलाईन सर्व्हिसेस" व जनसंपर्क कार्यालयातील आरती/दर्शनपासकार्यप्रणालीमध्ये "अ","आ" व "इ" प्रमाणे बदल/सुधारणा करणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

**मागणी :-** आरती/दर्शन पासचा अवैध व्यक्तींकडून होणारा गैरवापरटाळणेकरीता व साईभक्तांची होणारी फसवणूक थांबविणेकरीता,"ऑनलाईन सर्व्हिसेस" व जनसंपर्क कार्यालयातील आरती/दर्शन पास वितरण कार्यप्रणालीमध्ये पुढीलप्रमाणे बदल/सुधारणा करणे प्रस्तावीत आहे.

अ.	"ऑनलाईन सर्व्हिसेस" या कार्यप्रणालीद्वारे आरती/दर्शन पास आरक्षीत करणा-या सर्व साईभक्तांसाठी कार्यप्रणालीमध्ये नोंदणी करुण प्रत्येक साईभक्तास पास घेणे बंधनकारक करता येईल. आरती/दर्शन पासवर साईभक्तांचा फोटो प्रिंट होत असल्याने व प्रत्येक साईभक्तास पास बंधनकारक केल्याने पास पडताळणीचे वेळी पास घेतलेल्याच साईभक्तास आरती/दर्शनास प्रवेश देणे सुलभ होईल.

आ.	मोफत दर्शन पास (टाईम बेस) काऊंटर शेजारी जनसंपर्क कार्यालयातून वितरीत होणारे सशुल्क आरती/दर्शन पास काऊंटरप्रमाणेच काऊंटर सुरु करुन या ठिकाणी प्रत्येक साईभक्ताचा फोटो व बोटाचे ठसे घेऊन एका व्यक्तीस एक सशुल्क आरती/दर्शन पास वितरीत करता येईल.

इ.	शासनाचे तसेच संस्थानचे विविध विभागांकडून अथवा इतर ठिकाणांहून येणाऱ्या शिफारशींद्वारे द्यावयाचे सशुल्क आरती/दर्शन पास जनसंपर्क कार्यालयातून वितरीत करता येतील. तसेच मा. मंत्री महोदय, मा.न्यायालय, मा.खासदार, मा.आमदार व इतर मान्यवरांसाठी पास घेण्यासाठी येणारे व्यक्तीसही जनसंपर्क कार्यालयातून पास वितरीत करता येतील. सदरचे प्रणालीद्वारे पुर्वीप्रमाणेच एका पासवर अनेक साईभक्तांना आरती/दर्शनास प्रवेश देण्याची सुविधा सुरु ठेवता येईल.

उपरोक्त प्रमाणे कार्यप्रणालीमध्ये बदल/सुधारणा करणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्तावमा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

**संस्थान अधिनियम / ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :-** तांत्रिक, प्रशासकीय व आर्थिक

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत:-** आरती/दर्शन पासचा अवैध व्यक्तींकडून होणारा गैरवापरटाळणे करीता व साईभक्तांची होणारी फसवणूक थांबविणेकरीता,"ऑनलाईन सर्व्हिसेस"व जनसंपर्क कार्यालयातील आरती/दर्शन पास वितरण कार्यप्रणालीमध्ये पुढीलप्रमाणे बदल/सुधारणा करणे प्रस्तावीत आहे.

अ.	"ऑनलाईन सर्व्हिसेस" या कार्यप्रणालीद्वारे आरती/दर्शन पास आरक्षीत करणा-या सर्व साईभक्तांसाठी कार्यप्रणालीमध्ये नोंदणी करुण प्रत्येक साईभक्तास पास घेणे बंधनकारक करता येईल. आरती/दर्शन पासवर साईभक्तांचा फोटो प्रिंट होत असल्याने व प्रत्येक साईभक्तास पास बंधनकारक केल्याने पास पडताळणीचे वेळी पास घेतलेल्याच साईभक्तास आरती/दर्शनास प्रवेश देणे सुलभ होईल.

आ.	मोफत दर्शन पास (टाईम बेस) काऊंटर शेजारी जनसंपर्क कार्यालयातून वितरीत होणारे सशुल्क आरती/दर्शन पास काऊंटरप्रमाणेच काऊंटर सुरु करुन या ठिकाणी प्रत्येक साईभक्ताचा फोटो व बोटाचे ठसे घेऊन एका वूयक्तीस एक सशुल्क आरती/दर्शन पास वितरीत करता येईल.

इ.	शासनाचे तसेच संस्थानचे विविध विभागांकडून अथवा इतर ठिकाणांहून येणाऱ्या शिफारशींद्वारे द्यावयाचे सशुल्क आरती/दर्शन पास जनसंपर्क कार्यालयातून वितरीत करता येतील. तसेच मा. मंत्री महोदय, मा.न्यायालय, मा.खासदार, मा.आमदार व इतर मान्यवरांसाठी पास घेण्यासाठी येणारे व्यक्तीसही जनसंपर्क कार्यालयातून पास वितरीत करता येतील. सदरचे प्रणालीद्वारे पुर्वीप्रमाणेच एका पासवर अनेक साईभक्तांना आरती/दर्शनास प्रवेश देण्याची सुविधा सुरु ठेवता येईल.

उपरोक्त प्रमाणे कार्यप्रणालीमध्ये बदल/सुधारणा करणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.७९६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमार्फत वितरीत करण्यात येत असलेल्या आरती/ दर्शन पासचा अवैध व्यक्तींकडून होणारा गैरवापर टाळणे व साईभक्तांची होणारी फसवणूक थांबविणेकरीता, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली. परंतु त्यामध्ये प्रत्येक साईभक्तास असा शब्द असलेल्या ठिकाणी प्रत्येक साईभक्तास (१२ वर्षाखालील मुले वगळता) असा बदल करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.०६** **दर्शनरांग व्यवस्थापन (Time Base) कार्यप्रणाली अंतर्गत वितरीत करणेत येणाऱ्या पासचे गैरवापर टाळणेसाठी करावयाचे कार्यवाहीबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद:-** कलम २१ (१) ग नुसार भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

**मा.व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६.०२.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५८०

**प्रास्ताविक :-** साईभक्तांच्या होणा-या गर्दीचे नियोजन करणेसंदर्भात दर्शन रांग व्यवस्थापन (Time Base) कार्यप्रणाली कार्यान्वीत करणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.५८० नुसार जा.नं.एसएसएसटी/ वशी-आयटी/२४६५/२०१६ ने दि.१७ ऑगष्ट,२०१६ रोजी मे. त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीम इंडिया लि., तिरुपती यांना पुढील ५ वर्षाकरीता कार्यादेश देणेत आलेला आहे.

उपरोक्त कार्यादेशानुसार सदरची कार्यप्रणाली दि.१२.१२.२०१६ रोजी पासून कार्यान्वीत करणेत आलेली आहे. कार्यप्रणाली अंतर्गत संस्थानचे परीसरामध्ये विविध ठिकाणी पास वितरण काऊंटर सुरू करणेत आलेले आहेत. सदरचे पास घेऊन साईभक्त पासवर नमुद केलेल्या प्रवेशद्वारावर निर्धारित वेळेत दर्शनासाठी येतात. प्रवेशद्वारावर कंपनीचे कर्मचा-यांमार्फत पास पडताळणी करुन साईभक्तांना दर्शनासाठी प्रवेश दिला जातो.

सद्यस्थितीत साईभक्तांना वितरीत करणेत येणारे पास दर्शन झालेनंतर जमा करणेत येत नसल्याने साईभक्त सदरचे पास दर्शन झालेनंतर मंदिर परीसरामध्ये कोठेही टाकून देतात. गर्दीचे वेळी अवैध व्यक्तींकडून सदर पास साईभक्तांना मनमानी रक्कमेत विकून साईभक्तांची फसवणूक करणेत येत असल्याचे अनेक वेळेस निदर्शनास आलेले आहे. अशाप्रकारच्या अनेक तक्रारी साईभक्तांकडून वेळोवेळी करणेत आलेल्या आहेत.

सध्या दर्शनरांग प्रवेशद्वारावर पास पडताळणी झालेनंतर सदरच्या पासची लगेचच पेपर श्रेडर (PaparShreddar) च्या सहाय्याने विल्हेवाट लावल्यास सदर पासद्वारे अवैध व्यक्तींकडून साईभक्तांची होणारी फसवणूक थांबून मंदिर परीसर स्वच्छ राहणेस मदत होईल.

मोफत दर्शन पासची विल्हेवाट लावणेकामी प्रवेशद्वार नं.०१, ०२ व ०३ याठिकाणी उच्चत्तम क्षमतेचे पेपर श्रेडर (PaparShreddar) मशीन कार्यान्वीत करता येतील. साईभक्त दर्शनरांग प्रवेशद्वारावर आलेनंतर त्यांचेकडील मोफत दर्शन पास पडताळणी झालेनंतर त्यांना परत न करता तेथिल कर्मचारी सदरचा पास पेपर श्रेडर (PaparShreddar) मशीनमध्ये टाकतील, वापर झालेल्या मोफत दर्शनपासद्वारे अवैध व्यक्तींकडून साईभक्तांची होणारी फसवणूक थांबून मंदिर परीसर स्वच्छ राहणेस मदत होईल.

साईभक्तांची होणारी फसवणूक थांबून मंदिर परीसर स्वच्छ राहणेकामी व साईभक्तांना वितरीत करणेत येणा-या मोफत दर्शनपासची विल्हेवाट लावणेकामी दर्शनरांग प्रवेशद्वार नं.०१, ०२ व ०३ या ठिकाणी ०५ नग पेपर श्रेडर (PaparShreddar) मशीन खरेदी करुन कार्यान्वीत करणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेस सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

**मागणी :-** दर्शन रांग व्यवस्थापन (Time Base) कार्यप्रणालीअंतर्गत साईभक्तांना वितरीत करणेत येणा-या मोफत दर्शनपासची विल्हेवाट लावणेकामी व साईभक्तांची होणारी फसवणूक थांबून मंदिर परीसर स्वच्छ राहणेकामी दर्शनरांग प्रवेशद्वार नं.०१, ०२ व ०३ या ठिकाणी ०५ नग पेपर श्रेडर (PaparShreddar) मशीन खरेदी करुन कार्यान्वीत करणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेस सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

**संस्थान अधिनियम/ ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** तांत्रिक, प्रशासकीय व आर्थिक

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** दर्शन रांग व्यवस्थापन (Time Base) कार्यप्रणालीअंतर्गत साईभक्तांना वितरीत करणेत येणा-या मोफत दर्शनपासची विल्हेवाट लावणेकामी व साईभक्तांची होणारी फसवणूक थांबून मंदिर परीसर स्वच्छ राहणेकामी दर्शनरांग प्रवेशद्वार नं.०१, ०२ व ०३ या ठिकाणी ०५ नग पेपर

श्रेडर (Papar Shreddar) मशीन खरेदी करुन कार्यान्वीत करणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेस सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सविनय सादर.

**निर्णय क्र.७९७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दर्शन रांग व्यवस्थापन (Time Base) कार्यप्रणालीअंतर्गत साईभक्तांना वितरीत करणेत येणाऱ्या मोफत दर्शनपासची विल्हेवाट लावणेकामी व साईभक्तांची होणारी फसवणूक थांबून मंदिर परीसर स्वच्छ राहणेकामी दर्शनरांग प्रवेशद्वार नं.०१, ०२ व ०३ या ठिकाणी ०५ नग पेपर श्रेडर (PaparShreddar) मशीन खरेदी करुन कार्यान्वीत करणेस व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.०७** **श्रींचे समाधी शताब्दी वर्षात साईभक्तांच्या होणाऱ्या संभाव्य गर्दीचे अनुषंगाने साईभक्तांसाठी इंटरनेटद्वारे मोफत दर्शन पास आरक्षण सुविधा प्रायोगिक तत्वावर उपलब्ध करुन देणे.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद:-** कलम २१ (१) ग नुसार भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

**मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :-**

०१. मा.व्यवस्थापन समितीचे दि. ०७/११/२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७९९.

०२. मा.व्यवस्थापन समितीचे दि. १६/०८/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५८०.

**प्रास्ताविक :-** साईभक्तांना संस्थानमार्फत पुरविणेत येत असलेल्या सेवा-सुविधांचा लाभ इंटरनेटद्वारे उपलब्ध करुन देणेसाठी साईटेक प्रकल्पाअंतर्गत "ऑनलाईन सर्व्हिसेस" हि कार्यप्रणाली विकसीत करुन कार्यान्वीत करणेतआलेली आहे.तसेच,मा.व्यवस्थापन समितीचे दि. १६/०८/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५८० अन्वये, साईभक्तांसाठी बायोमेट्रीक आधारीत मोफत दर्शन पास (टाईम बेस) कार्यप्रणाली कार्यान्वीत करणेत आलेली आहे.

"ऑनलाईन सर्व्हिसेस" कार्यप्रणालीद्वारे साईभक्तांसाठी आरती/दर्शन पास, रुम बुकींग, देणगी, भक्तमंडळ व साईलीला सभासद, पुस्तक विक्री इ. सुविधा उपलब्ध करुन देणेत आलेल्या आहेत. सदरचे सुविधा इंटरनेटद्वारे आरक्षीत करणेत येत असल्याने, साईभक्तांना शिर्डी येथे येण्याचे नियोजन करणेस सुलभ होऊन वेळेची बचत होणेस मदत होते.

सद्यस्थितीत "ऑनलाईन सर्व्हिसेस" या कार्यप्रणालीद्वारे आरक्षीत होणा-या आरती/दर्शन पाससाठी, जनसंपर्क कार्यालयातून वितरीत होणा-या आरती/दर्शन पासप्रमाणे शुल्क आकारले जाते. सदरची सुविधा आरती/दर्शनचे नियोजीत तारखेच्या ६० दिवस अगोदरपासून नियोजीत तारीख व वेळेपर्यंत उपलब्धअसते. श्रींचे समाधी शताब्दी वर्षात होणारे साईभक्तांचे संभाव्य गर्दीचे अनुषंगाने साईभक्तांचे सोयीसाठी सशुल्क आरती/दर्शन पासप्रमाणेच मोफत दर्शन पास (टाईम बेस) आरक्षीत करणेची सुविधा इंटरनेटव्दारे उपलब्ध करुन देणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये निर्देशीतकरणेत आलेले आहे.

उपरोक्त निर्देशानुसार सदरची सुविधा इंटरनेटवर उपलब्ध करुन देणेबाबत मे. त्रिलोक सिक्युरिटी सिस्टिम यांचेशी चर्चा केली असता त्यांनी त्यास असमर्थता दर्शविलेली आहे. सबब, मोफत दर्शन पास आरक्षण सुविधा सध्या साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत असलेल्या ऑनलाईन सर्व्हिसेस या कार्यप्रणाली मध्ये सशुल्क आरती/ दर्शन पास प्रमाणेच उपलब्ध करुन देता येईल. सदरकामी कार्यप्रणालीमध्ये पुढीलप्रमाणे कार्यवाही करता येईल.

१. ऑनलाईन सर्व्हिसेस या कार्यप्रणालीमध्येसदर सुविधेसाठी सशुल्क आरती/दर्शन पासचे पर्यायाप्रमाणेच "मोफत दर्शन पास" असा पर्याय उपलब्ध करुन देता येईल, तसेच त्यांचे पासवरही "मोफत दर्शन पास" असा उल्लेख करता येईल जेणेकरुन साईभक्त आरतीसाठी आग्रह धरणार नाहीत.

२. सशुल्कआरती/दर्शन पासप्रमाणेच मोफत दर्शन पास (टाईम बेस) आरक्षीत करणेची सुविधा नियोजीत तारखेच्या ६० दिवस अगोदरपासून दर्शनाचे वेळेचे १२ तास अगोदरपर्यंत उपलब्ध करुन देता येईल. यामुळे दर्शनरांगेत होणा-या गर्दीचे नियोजन करणे सुलभ होईल.

३. इंटरनेटद्वारे आरक्षीत करावयाच्या पासची संख्या शिर्डी येथुन वितरीत होणा-या मोफत दर्शन पास (टाईम बेस) चे एकुण संख्येच्या १०% इतकी ठेवता येईल.

४. आरक्षीत केलेल्या एका पासवर एका साईभक्तास दर्शनास प्रवेश देता येईल.

५. पास आरक्षीत करतेवेळी साईभक्तांना ओळखपत्र अपलोड करणे बंधनकारककरता येईल, जेणेकरुन सदर सुविधेचा गैरवापर होणार नाही.

६.	इतर सुविधेप्रमाणेच सदर सुविधेसाठी १० रु. इंटरनेट चार्जेस ऑनलाईन आकारण्यात येईल,जेणेकरुन सदर सुविधेचा लाभ साईभक्त आवश्यक असेल तरच घेतील.

७.	आरक्षण प्रक्रिया पुर्ण झालेनंतर प्रिंट होणा-या पासवर आवश्यक मार्गदर्शक सुचनांचा समावेश करता येतील.

८.	इंटरनेटद्वारे आरक्षीत केलेला मोफत दर्शन पास घेऊन साईभक्त शिर्डी येथे आलेनंतर पासवर नमुद प्रवेशद्वारावर जातील. या ठिकाणी उपस्थित कर्मचारी शिर्डी येथून वितरीत झालेल्या मोफत दर्शन पास प्रमाणेच सदर पासची पडताळणी करुन साईभक्तांना दर्शन रांगेत प्रवेश देतील.

उपरोक्तप्रमाणे इंटरनेटव्दारे मोफत दर्शनपास आरक्षण प्रणाली सुरळीत सुरु झालेनंतर साईभक्ताकडुन त्यांचे प्रवासाचे माध्यम, प्रवासाचा कालावधी, प्रवासाची सुरुवात वेळ इत्यादी सारखी माहिती घेऊन नियोजनासाठी आवश्यक असलेल्या मार्गदर्शक सुचना त्यांना एसएमएसव्दारे देता येतील.

नमुद केलेप्रमाणे श्रींचे समाधी शताब्दी वर्षात होणारे साईभक्तांचे संभाव्य गर्दीचे अनुषंगाने साईभक्तांचे सोयीसाठी इंटरनेटव्दारे मोफत दर्शनपास(टाईम बेस)आरक्षण सुविधा प्रायोगिक तत्वावर उपलब्ध करुन देता येईल, सदर सुविधेस साईभक्तांकडून मिळणारा प्रतिसाद पाहून भविष्यात याबाबत धोरनात्मक निर्णय घेता येईल, असे नम्र मत आहे. सबब,साईभक्तांचे सोयीसाठी इंटरनेटव्दारे मोफत दर्शनपास(टाईम बेस)आरक्षण सुविधा प्रायोगिक तत्वावर उपलब्ध करुन देणेसाठी मान्यता मिळणेस्तव सदरचाप्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

**मागणी :-** प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे श्रींचे समाधी शताब्दी वर्षात होणारे साईभक्तांचे संभाव्य गर्दीचे अनुषंगाने साईभक्तांचे सोयीसाठीदर्शनरांग व्यवस्थापन कार्यप्रणाली अंतर्गत उपलब्ध मोफत दर्शन पास कोट्यापैकी १०%कोटाइंटरनेटवर ऑनलाईन सर्व्हिसेस या कार्यप्रणालीव्दारे साईभक्तांनाआरक्षीत करणेसाठी प्रायोगिक तत्वावर उपलब्ध करुन देणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करण्यास मान्यता असावी, हि विनंती.

**संस्थान अधिनियम/ ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** तांत्रिक, प्रशासकीय व आर्थिक

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** प्रास्ताविकेत व मागणीमध्ये नमुद केलेप्रमाणे श्रींचे समाधी शताब्दी वर्षात होणारे साईभक्तांचे संभाव्य गर्दीचे अनुषंगाने साईभक्तांचे सोयीसाठी दर्शनरांग व्यवस्थापन कार्यप्रणाली अंतर्गत उपलब्ध मोफत दर्शन पास कोट्यापैकी १०% कोटा इंटरनेटवर ऑनलाईन सर्व्हिसेस या कार्यप्रणालीव्दारे साईभक्तांना आरक्षीत करणेसाठी प्रायोगिक तत्वावर उपलब्ध करुन देणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्तावमा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सविनय सादर.

**निर्णय क्र.७९८**	**यावर सविस्तर चर्चा होऊन, नाममात्र रु.१०/- इंटरनेट चार्जेस आकारणेत येऊन, श्रींचे समाधी शताब्दी वर्षात होणाऱ्या संभाव्य गर्दीच्या अनुषंगाने साईभक्तांचे सोयीसाठी दर्शनरांग व्यवस्थापन कार्यप्रणाली अंतर्गत उपलब्ध मोफत दर्शन पास कोट्यापैकी १०% कोटा इंटरनेटवर ऑनलाईन सर्व्हिसेस या कार्यप्रणालीव्दारे साईभक्तांना आरक्षीत करणेसाठी, प्रायोगिक तत्वावर उपलब्ध करुन देणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.०८**	**साईआश्रम भक्तनिवास विभागातील निवासव्यवस्थेच्या सेवाआकारात वाढ करणे.**

**प्रस्ताव-**	**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४:-** २१ (१) (ग) "भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धर्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे." व (२) पोट-कलम (१) (ख) "भक्तांना राहण्याकरिता व वापर करण्याकरिता विश्रामगृहे बांधणे व त्याची देखभाल करणे."

**प्रस्तावना:-**श्री साईचे दर्शनासाठी शिर्डीस येणा-या भक्तांच्या संख्येत दिवसेंदिवस होणारी वाढ लक्षात घेता भक्तांचे निवासव्यवस्थेसाठी श्री साई ट्रस्ट, चेन्नई यांनी दिलेल्या देणगीतुन संस्थानने साईआश्रम भक्तनिवास या भव्य वास्तुचे बांधकाम केलेले असुन सदर विभागात देण्यात येत असलेल्या निवासव्यवस्थेचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.नं | एकुण इमारती | एकुण मजले | प्रत्येक इमारती मधील रुम संख्या | एकूण रुम संख्या | एका रुममध्ये भक्तनिवास क्षमता | एकूण होणारी निवास व्यवस्था |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | इमारती-०९(नॉन एसी) | तळमजला + ३ (G+३) | १२८ रुम | ११५२ | ३+२=५ | ५,७६० |
| २ | इमारती-०३(एसी) | तळमजला + ३ (G+३) | १२८ रुम | ३८४ | ३+२=५ | १,९२० |
| **एकूण** | **इमारती-१२** | | | **१,५३६** | | **७,६८०** |

उपरोक्त प्रमाणे एकुण १५३६ खोल्या असुन पुर्ण क्षमतेने निवासव्यवस्था केल्यास एकुण ७,६८० साईभक्तांची निवासव्यवस्थाकरण्यात येते. प्रत्येक रुम मध्ये तीन कॉटची व्यवस्था असुन भक्तांचे मागणीनुसार जादा दोन गाद्या प्रत्येकी रु ५०/- सेवाआकार आकारुन पुरविल्या जातात. या शिवाय रुम मध्ये दिल्या जाणा-या विविध सुविधा पुढील प्रमाणे.

| अ.नं | सुविधा तपशील | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रत्येक रुम मध्ये खालील प्रमाण साहीत्य पुरविण्यात येते. | | | | | | | | |
| | **अ.नं** | वस्तुचे नाव | नग | **अ.नं** | वस्तुचे नाव | नग | **अ.नं** | वस्तुचे नाव | नग |
| | **१** | कॉट | ३ | **७** | मग | १ | **१३** | बेडशीट (३+२) | ५ |
| | **२** | क्वायर मेट्रेस फोम गादी | ३ | **८** | डस्टबीन | १ | **१४** | चादर (३+२) | ५ |
| | **३** | रबर राईज्ड टू फोल्ड गादी (मागणीनुसार) | २ | **९** | अंघोळीचे स्टुल | १ | **१५** | आरसा | १ |
| | **४** | फायबर उशी (३+२) | ५ | **१०** | बादली | १ | **१६** | रॉड | १ |
| | **५** | स्टील ग्लास | २ | **११** | प्लास्टीक खुर्ची | २ | **१७** | स्वच्छता गृहात बादली | १ |
| | **६** | वॉटर जग | १ | **१२** | उशीकव्हर (३+२) | ५ | **१८** | साईबाबा फोटो | १ |
| २ | सौरऊर्जा प्रणालीव्दारे रुम मध्ये २४ तास गरम पाणी. | | | | | | | | |
| ३ | भक्तांना पहील्या, दुस-याव तिस-या मजल्यावर जा ये करण्यासाठी २४ तास स्वयंचलित लिफ्ट सुविधा. | | | | | | | | |
| ४ | २४ तास विद्युत पुरवठा. | | | | | | | | |
| ५ | एसी रुम मध्ये टर्किश टॉवेल व हात धुणेसाठी साबण. | | | | | | | | |
| ६ | परिसरामध्ये प्रसाद भोजनाची व्यवस्था. | | | | | | | | |
| ७ | श्रींच्या दर्शनासाठी भक्तांना जाणे-येणेसाठी मोफत बससेवा. | | | | | | | | |
| ८ | भक्तांचे सामान रुम पर्यंत नेणेसाठी लगेज ट्रॉलीची मोफत सुविधा. | | | | | | | | |
| ९ | जेस्ठ नागरीक अपंग, आजारी इ. साईभक्तांसाठी बॅटरी कारची मोफत सुविधा. | | | | | | | | |
| १० | ऑनलाईन रुम आरक्षण सुविधा. | | | | | | | | |
| ११ | साईभक्तांना साईबाबांवर आधारीत भजन/किर्तन इ. कार्यक्रम करावयाचे असल्यास ॲम्फीथिएटरची सुविधा. | | | | | | | | |
| १२ | साईभक्तांसाठी सकाळी अल्पदरात अल्पोपहाराची सुविधा. | | | | | | | | |
| १३ | विभागातील दोन इमारतीत चहा, कॉफी, दुध इ. सुविधा अल्पदरात उपलब्ध. | | | | | | | | |
| १४ | गर्दीचे काळात प्रथमोपचार केंद्र. | | | | | | | | |
| १५ | निसर्गरम्य वॉटर फॉल | | | | | | | | |
| १६ | साईभक्तांचे औषध ठेवणेकामी फ्रीजची व्यवस्था. | | | | | | | | |

उपरोक्त प्रमाणे पुरविणेत येत असलेल्या सेवा-सुविधा व अत्यल्प दरात निवासव्यवस्था उपलब्ध असल्याने या विभागात नेहमीच साईभक्तांची मोठ्या प्रमाणात निवासासाठी खोल्यांची मागणी असते. सदर

निवासस्थानातील १५३६ खोल्यापैकी ९०% खोल्या ऑनलाईन बुकींग पद्धतीने उपलब्ध करुन देण्यात येत असुन उरलेल्या १०% खोल्या स्पॉट बुकिंग पद्धतीने देण्यात येतात.

**प्रस्तावः-** साईआश्रम भक्तनिवास विभागात भक्तांसाठी निवासव्यवस्था चालु करण्यापुर्वी सदर इमारतींचे बांधकामासाठी श्री साईट्रस्ट, चेन्नईचे देणगीदार साईभक्त श्री.के.व्ही.रमणी यांनी आर्थिक सहाय्य केल्याने संस्थानमार्फत दि.०४/०२/२००६ रोजी करारनामा करण्यात आला सदर करारनाम्यात साईभक्तांना निवासासाठी देण्यात येणा-या खोल्यांसाठी आकारणेत येणा-या सेवाआकाराबाबत पुढील प्रमाणे काही तरतुदी करण्यात आल्या.

The Sansthan will provide the accommodation to the devotees at a concessional cost, without any profit.

The Sansthan specifically agrees to provide accommodation in Sai Ashram buildings, to the needy and deserving poor devotees at a subsidized cost including the cost of all facilities and amenities, as follows.

1. At least 10 % of the accommodation in Sai Ashram will be given at a cost not exceeding 10 Rs. per person per day of stay.
2. At least 40 % of the accommodation in Sai Ashram will be given at a cost not exceeding 50 Rs. per person per day of stay.
3. The balance accommodation in SaiAshram, may be given at any nominal cost as decided by the Sansthan.

परंतु मा.व्यवस्थापन समिती दि.२५/०८/२०१२ चे सभेमधील निर्णय क्र.७०२ अन्वये सदर करारनाम्याप्रमाणे सेवाआकार निश्चित केल्यास, सारख्याच आकाराच्या व टाईपच्या खोल्यांसाठी वेगवेगळा सेवा आकार घेतल्यास भक्तांचे निवासासाठी खोल्या देतांना मोठ्या प्रमाणात अडचणी निर्माण होतील तसेच कमी जास्त सेवाआकार घेतांना भक्तांचे मध्ये गैरसमज निर्माण होईल.

उपरोक्त परिस्थिती विचारात घेऊन दि.२०/०८/२०१२ रोजी श्री शिर्डी साईट्रस्ट, चेन्नईचे कार्यकारी विश्वस्त श्री रमणी सो. यांचेशी साईआश्रम भाग १ व २ मधील खोल्या व हॉलचे सेवाआकाराबाबत चर्चा करण्यात आली असुन त्यानुसार मा.व्यवस्थापन समिती सभेमध्ये निर्णय क्र.७०२ अन्वये खालील प्रमाणे सेवा आकार निश्चित करण्यात आला होता.

| | | |
|---|---|---|
| १ | साईआश्रम भाग २ मधील ४०९६ बेड प्रती व्यक्ती रुपये | १०/- |
| २ | साईआश्रम भाग १ मधील ११५२ नॉन ए.सी खोली, प्रती खोली रुपये | ५००/- |
| ३ | साईआश्रम भाग १ मधील ३८४ ए.सी खोली, प्रती खोली रुपये | ९००/- |
| ४ | साईआश्रम भाग १ मधील जादा व्यक्तींसाठी (प्रत्येकी) | ५०/- |

साईआश्रम भक्तनिवास विभाग दि.११/०४/२०१३ रोजी सुरु करण्यात आला तेव्हा मा.व्यवस्थापन समिती दि.२५/०८/२०१२ चे सभेतील निर्णय क्र.७०२ प्रमाणे ए.सी खोलीसाठी (०३ व्यक्तींकरीता) रु ९००/- व नॉन ए.सी खोलीसाठी (०३ व्यक्तींकरीता) रु ५००/- तसेच प्रत्येकी जादा व्यक्तीस रु.५०/- मात्र सेवाआकार आकाण्यात येत होता.

परंतु साईआश्रम भक्तनिवास विभाग नव्याने सुरु झाला असल्याने, निवासासाठी खोल्यांची मागणी करणा-या साईभक्तांची संख्या कमी होती सुरवातीच्या कालावधीत जास्तीत जास्त ४०% खोल्याचा वापर साईभक्त करीत होते व उर्वरित खोल्या रिकाम्या राहत होत्या पण सर्व खोल्यांचा मेंटनन्स व इतर खर्च पुर्णपणे द्यावा लागत असल्याने संस्थानचे आर्थिक नुकसान होत होते.

त्यामुळे, दि.१३/१२/२०१३ रोजीच्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेतील निर्णय क्र.९८८ अन्वये तत्कालीन परिस्थितीचा विचार करुन निर्णय घेण्यात आला त्यात,

"साईआश्रम भक्तनिवास येथील निवासव्यवस्थेचा जास्तीत जास्त साईभक्तांनी लाभ घ्यावा व संस्थानचे आर्थिक नुकसान टाळावे या हेतुने खोल्यांचे दर कमी करणे आवश्यक आहे. त्यामुळे दि.०१ जानेवारी २०१४ पासुन साईआश्रम भक्तनिवासमधील प्रती ए.सी खोलीसाठी (०३ व्यक्तीं) रु ९००/- याऐवजी रु ५००/- व प्रती नॉन ए.सी खोलीसाठी (०३ व्यक्तीं) रु ५००/- याऐवजी रु.२००/- तसेच जादा व्यक्तीस प्रत्येकी रु.५०/- मात्र

सेवाआकार आकारण्यात यावा जेणेकरुन जास्तीत-जास्त साईभक्त या खोल्यांचा लाभ घेतील व गोर-गरीब भक्तांची निवासाची सोय होईल.

सदरहू निर्णय प्रायोगिक तत्वावर असून साईआश्रम भक्तनिवासमध्ये निवास करणा-या साईभक्तांना सर्व सोयी-सुविधा मिळाल्यानंतर समिती याचा फेरविचार करु शकेल." असा निर्णय घेण्यात आला.

उपरोक्त निर्णय प्रायोगिक तत्वावर असून हा निर्णय घेण्यामागे निवासव्यवस्थेचा जास्तीत जास्त साईभक्तांनी लाभ घ्यावा व निवासव्यवस्था पुर्ण क्षमतेने भरली जावी हा हेतु होता. व सदर निर्णयानुसार सेवा आकार कमी केल्यामुळे निवासव्यवस्था मागणी करणा-या भक्तांच्या संख्येत उल्लेखनीय वाढ होऊन सदर हेतु साध्य झाल्याचे दिसते.

सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात एसी खोलीसाठी रु ५००/- व नॉन एसी खोलीसाठी रु २००/- सेवाआकार आकारण्यात येत असुन, ऑनलाईन व स्पॉट बुकींग दोन्ही मिळून संस्थानला त्यातून एकूण १३ कोटी ५४ लाख ७१ हजार ९३२ मात्र उत्पन्न झाले आहे. त्याचबरोबर सदर वर्षातील निवासव्यवस्थेसाठी आलेल्या खर्चाचा तपशील पुढील प्रमाणे.

| अ.नं | अंदाजे खर्चाचा तपशील (सन २०१६-१७) | रक्कम |
|---|---|---|
| १ | विद्युत | २,३७,२२,७४९/- |
| २ | पाणीपुरवठा | ९९,३१,२३१/- |
| ३ | बांधकाम | ५,३३,२६०/- |
| ४ | कर्मचारी वेतन (कायम) | ३६,१२,७६९/- |
| ५ | संरक्षण विभाग | १,४२,१४,४६१/- |
| ६ | हाऊसकिपींग | ४,६५,३५,३१९/- |
| ७ | किटकनाशक औषध फवारणी | २,८६,६७६/- |
| ८ | वाहन विभाग | १७,८५,३१७/- |
| ९ | लॉन्ड्री चार्जेस | २८,६०,५६६/- |
| १० | बगीचा | ६,९०,२००/- |
| ११ | गादी, बेडशीट, उशी, उशीकव्हर, चादर, इ. | २,७३,२५,६१४/- |
| | एकूण खर्च रु. | १३,१४,९८,१६२/- |

सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात निवासव्यवस्थेतुन एकुण १३ कोटी ५४ लाख ७१ हजार ९३२ मात्र उत्पन्न झाले असुन त्यातुन उपरोक्त १३ कोटी १४ लाख ९८ हजार १६२ मात्र खर्च वजा करता एकूण झालेले उत्पन्न रु.३९ लाख ७३ हजार ७७० मात्र आहे.

**विभागाचे स्पष्ट मत/अभिप्रायः-** मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.७०२ अन्वये, ए.सी खोलीसाठी (०३ व्यक्तींकरीता) रु ९००/- व नॉन ए.सी खोलीसाठी (०३ व्यक्तींकरीता) रु ५००/- तसेच प्रत्येकी जादा व्यक्तीस रु.५०/- मात्र सेवाआकार निश्चित करण्यात आला होता, परंतु निवासव्यवस्थेचा पुर्ण क्षमतेने साईभक्तांनी लाभ घ्यावा व संस्थानचे आर्थिक नुकसान टाळावे या हेतुने सदर सेवाआकार कमी करण्यात येऊन, मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.९८८ अन्वये, प्रती ए.सी खोलीसाठी (०३ व्यक्तीं) रु ९००/- याऐवजी रु ५००/- व प्रती नॉन ए.सी खोलीसाठी (०३ व्यक्तीं) रु ५००/- याऐवजी रु.२००/- तसेच जादा व्यक्तीस प्रत्येकी रु.५०/- मात्र सेवाआकार करण्यात आला. सदर निर्णय निवासव्यवस्थेचा जास्तीत जास्त साईभक्तांनी लाभ घ्यावा या हेतुने प्रायोगिक तत्वावर घेण्यात आला असुन त्यामुळे सद्यस्थितीत निवासव्यवस्थेचा पुर्ण क्षमतेने वापर होत आहे.

प्रस्तावित वाढीव सेवाआकारामुळे खालीलप्रमाणे उत्पन्नात वाढ होईल, त्याचा सविस्तर तपशील खालील प्रमाणे.

| अ.नं | खोल्याचा तपशील | वाढीव प्रस्तावित सेवाआकार | प्रतिदिन सेवाआकार | एकावर्ष कालावधी | वाढीव सेवाआकारापासुन मिळणारे उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|
| १ | ए.सी ३८४ खोल्या | रु ३००/- | रु १,१५,२००/- | ३६५ दिवस | रू ४,२०,४८,०००/- |
| २ | नॉन.ए.सी११५२ खोल्या | रु २००/- | रु २,३०,४००/- | ३६५ दिवस | रू ८,४०,९६,०००/- |
| **एकुण** | **१५३६ खोल्या** | **---** | **३,४५,६००/-** | **---** | **रू १२,६१,४४,०००/-** |
| **अक्षरी रुपये बारा कोटी एकसष्ट लाख चौवेचाळीस हजार मात्र.** | | | | | |

तथापी, वाढती महागाई, विद्युत आकार, साईभक्तांना देण्यात येणा-या सेवा-सुविधा, साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव इत्यादीचा विचार करता उपरोक्त कोष्टकाप्रमाणे सेवाआकारात वाढ करणे क्रमप्राप्त आहे. परंतु सध्या संस्थान अधिनस्त विविध भक्तनिवास जसे व्दारावती, साईप्रसाद निवासस्थान (अतिथीगृह) इत्यादी निवासव्यवस्थेच्या तुलनेत इकडील विभागातील निवासव्यवस्था सर्वसाधारण असल्याने साईआश्रम भक्तनिवास मधील ए.सी खोलीचे २४ तासांकरीता (०३ व्यक्तींसाठी) रु ८००/- व नॉन ए.सी खोलीचे २४ तासांकरीता (०३ व्यक्तींसाठी) रु ४००/- तसेच जादा व्यक्तीस प्रत्येकी रु.५०/- मात्र याप्रमाणे सेवा आकार आकारता येईल.

सदरचा प्रस्ताव धोरणात्मक असल्याने सदरचा विषय मा.व्यवस्थापन समिती सभेत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७९९** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, साईआश्रम भक्तनिवासचा सेवाआकार कमी असल्यामुळे तेथील निवासव्यवस्थेचा जास्तीत जास्त साईभक्तांना लाभ होत आहे व सर्वसामान्य साईभक्तांची निवासाची सोय होत आहे. याकरीता सध्या साईआश्रम भक्तनिवासच्या सेवाआकारामध्ये कोणतीही वाढ करु नये.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास)

---

**विषय नं.०९** **अकुशल, कुशल व तांत्रीक पदे आऊटसोर्स पध्दतीने भरण्याबाबतची नियमावली- २०१७.**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागाचे शासन निर्णय क्र. सासंवि- २००९/४३३/(३७/०९) का.सोळा, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दि. ७/८/२००९ रोजीच्या आदेशान्वये श्री साईबाबि संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे आस्थापनेवरील स्थायी २९०८ व कंत्राटी १९१८ असे एकूण ४८२६ पदांचे कर्मचारी आकृतीबंधास(३४ विभागांना) मान्यता दिलेली आहे. तथापी, सन २००९ नंतर पुढील काळात मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार नवीन वाढीव विभाग व्दारावती भक्त निवास, नवीन प्रसादालय, साई आश्रम भक्तनिवास, साईआश्रम धर्मशाळा, श्री साईबाबा हॉसिपटल, नवीन १०० खाटांची वाढ, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना, श्री साईनाथ हॉस्पीटल, नवीन १०० खाटांची वाढ, बुंदी प्रसाद वाटप, चप्पल स्टॅंड, दर्शन रांगेत भक्तांना गंध लावणे, साई समाधी शताब्दी कक्ष नवीन विभाग कार्यान्वित करण्यात आलेले असुन, विभागनिहाय सध्या कमी असलेल्या ३१९ कुशल, अकुशल कंत्राटी कर्मचा-यांचा तपशिल सोबतच्या तक्त्यात जोडलेला आहे.

वरीलप्रमाणे कमी/आवश्यकता असलेली ३१९ व पुढील काळात आवश्यकतेनुसार अकुशल, कुशल व तांत्रिक पदे ठेकेदारामार्फत कंत्राटी/आऊटसोर्स पध्दतीने भरण्याबाबतची नियमावली खालीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

**<u>नियम</u>**

१. दैनंदिन चालणा-या कामाचे स्वरुप विचारात घेऊन आऊटसोर्स कर्मचारी भरती करतांना कुशल व तांत्रिक पदांसाठी संस्थान निश्चित करुन देईल त्याप्रमाणे शैक्षणिक पात्रता, वयोमर्यादा, कामाचा अनुभव व इतर पात्रता ग्राहय धरण्यात यावी.

२. ठेकेदारामार्फत नव्याने पदनिहाय भरती करतांना उमेदवारांची लेखी व तोंडी परिक्षा घेणेची जाबाबदारी संबंधीत ठेकेदाराची राहील. व पात्र उमेदवारांची लेखी व तोंडी परिक्षा घेणेची जबाबदारी संबधीत ठेकेदाराची राहील. व पात्र उमेदवारांची मेरीट यादी संस्थानला सादर करावी लागेल. उमेदवारांची त्रयस्त नामांकित संस्थेमार्फत लेखी व तोंडी परीक्षा पारदर्शक पधदतीने घेणे संबंधीत ठेकेदारास बंधनकारक राहील

३. तसेच अकुशल कंत्राटी कर्म-यास कुशल करावयाचे झाल्यास त्यास संस्थानने निश्चित करुन दिलेली शैक्षणिक पात्रता, अनुभव, वयोमर्यादा व विभाग प्रमुखाची शिफारस विचारात घेऊन लेखी व तोंडी परीक्षा घेणेची जबाबदारी संबंधीत ठेकेदराची राहील, व पात्र उमेदवारांची मेरीट यादी संस्थानला सादर करावी लागेल.

४. मेरीट यादीनुसार आपणास संस्थानला ११ महिनेचे कराराने कर्मचारी पुरविणे बंधनकारक राहील. तसेच संस्थानने निश्चित करुन दिलेल्या पॉईंटवर आवश्यक तेवढे कर्मचारी पुरविणे बंधनकारक राहील. उत्सवाचे कालावधीत संसथानला अतिरिक्त कर्मचा-यांची गरज भासल्यास संस्थानचे मागणीनुसार आवश्यक जादा कर्मचारी पुरविणे ठेकेदारास / कंत्राटदारास बंधनकारक राहील.

५. संस्थानने निश्चित करुन दिलेली कर्मचारीसंख्या संबंधीत ठेकेदार / कंत्राटदाराने न पुरविल्यास संस्थान निश्चित करील तो दंड अनामत रक्कमेतुन वजावट करुन घेण्याची हक्क संस्थानला राहील.

६. ठेकेदार / कंत्राटदारास संस्थानचे लेखी परवानगीशिवाय परस्पर कर्मचारी भरती करता येणार नाही. तसे आढळून आल्यास संबंधीत ठेकेदाराचा करार रद्द करणेचा / दंड आकारण्याचा हक्क संस्थान राखुन ठेवत आहे.

७. अकुशल, कुशल व तांत्रिक पदांसाठी पात्र उमेदवारांपैकी शिर्डी परिसरातील व राहाता तालुक्यातील उमेदवारांस प्रथम प्राधान्यक्रम व त्या नंतर इतर उमेदवारांस व्दितीय प्राधान्यक्रम देण्यात यावा.

८. सर्व अकुशल, कुशल व तांत्रीक कर्मचाऱ्यांना संबंधित ठेकेदार/ ठेकेदारांनी शासनाकडून वेळोवेळी लागु करण्यात येणा-या किमान वेतनदरानुसार किमान वेतन, स्पेशल अलाऊंस अदा करणे, पीएफ, व्यवसाय कर व इतर शासकीय कर भरणे, तसेच, कर्मचा-यांची वर्कमेन कॉम्पेनसेशन अॅक्ट अंतर्गत विमा पॉलिसी घेणे, हप्ता भरणे इ. संबंधित ठेकेदार/ ठेकेदारांना बंधनकारक राहिल.

९. सर्व अकुशल, कुशल व तांत्रिक कर्मचाऱ्यांना संबंधित ठेकेदार/ठेकेदारांनी, कर्मचा-यांनी प्रत्यक्ष काम केलेल्या दिवसांनुसार ८.३३%, इतके सानुग्रह अनुदान दिपावली सणाच्या पुर्वी किमान १५ दिवस अगोदर अदा करणे संबंधित ठेकेदार/ ठेकेदारांना बंधनकारक राहिल.

१०. कंत्राटी / आऊटसोर्स पध्दतीने नेमण्यात आलेल्या कर्मचा-यांना विना परवानगी गैर हजेरी, गैर शिस्त वर्तन, वरिष्ठांच्या सुचना न पाळणे, सुरक्षा उपाय योजनांचे उल्लंघन करणे, गणवेष परिधान नकरणे, ओळखपत्र न लावणे इ. कोणत्याही गैरशिस्त वर्तनाबाबत, संबंधित कर्मचा-यास तात्काळ कामावरुन कमी करणे संबंधित ठेकेदार/ ठेकेदारांना बंधनकारक राहिल.

११. सर्व अकुशल, कुशल व तांत्रिक कर्मचा-यांना ८ तास डयुटीच्या कालावधीत, डयुटीवर हजर होताना १ वेळा, चार तासांच्या नंतर मधल्या सुट्टीत २ वेळेस व डयुटी संपल्या नंतर १ वेळ, असे ४ वेळेस बायोमेट्रीक थंब पंचींग करणे बंधनकारक राहील, बायोमेट्रीक थंब पंचींगनुसारच संबंधित ठेकेदार/ठेकेदारांनी किमान वेतन अदा करणेबंधनकारक राहिल.

१२. ठेकेदारामार्फत अकुशल, कुशल कंत्राटी/ आऊटसोर्स पध्दतीने नेमणुकीस असलेल्या कर्मचा-यांना संस्थान नियमाप्रमाणे संस्थान हॉस्पीटल्समध्ये वैद्यकीय सेवा सुविधा मोफत पुरविणेत यईल.

१३. ठेकेदारामार्फत अकुशल, कुशल, कंत्राटी/ आऊटसोर्स पध्दतीने ११ महिने कालावधीसाठी नेमण्यात आलेल्या कर्मचा-यांचे निधन झाल्यास त्याचेवर अवलंबित/ नातेवाईकांना श्री साईबाबा संस्थानमध्ये कायम अथवा कंत्राटी पध्दतीने नोकरी मागण्याचा हक्क सांगता येणार नाही.

१४. ठेकेदारामार्फत कंत्राटी/ आऊसोर्स पध्दतीने नेमण्यात आलेल्या अकुशल, कुशलकर्मचारी व श्री साईबाबा संस्थानमध्ये थेट नोकर व मालक असा कोणताही संबध, हक्क सांगता येणार नाही.

उपरोक्तप्रमाणे अकुशल, कुशल व तांत्रिक पदे आऊटसोर्स पध्दतीने भरण्याबाबतच्या नियमावलीस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.८००** **यावर सविस्तर चर्चा होऊन, अकुशल, कुशल व तांत्रीक पदे आऊटसोर्स पध्दतीने भरण्याबाबतच्या उपरोक्त प्रस्तावित नियमावलीचे अवलोकन करणेत येऊन, त्यास मान्यता देण्यात आली. तसेच आकृतीबंधास अधीन राहून संस्थान रुग्णालयांकडील आवश्यक पदे तात्काळ भरणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

**विषय नं.१०** **संस्थान अधिनस्त सर्व निवासस्थानांच्या निवासव्यवस्था वितरणाच्या नियमावलीबाबत.**

**निर्णय क्र.८०१** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास)

---

**विषय नं.११** **संस्थान कर्मचारी "गृहकर्ज व्याज सवलत योजना" नियमावलीबाबत.**

**निर्णय क्र.८०२** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.१२** **विशिष्ट स्वरुपाची देणगी देणाऱ्या साईभक्तांकरीता गोल्डन कार्डसारखी योजना सुरु करणेबाबतचा प्रस्ताव फेरसादर.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद-** महाराष्ट्र शासनाने पुनर्घटीत केलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे अधिनियमात "समितीची कर्तव्य व अधिकारी" या शिर्षकाखाली अधिनियिम नंबर १७ (१) मध्ये "राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील." अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक-** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २२.१२.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९०५ व मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २५.०२.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१३.

**प्रस्ताविक–** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २२.१२.२०१६ चे सभेत विशिष्ट स्वरुपाची देणगी देणा-या साईभक्तांस तहयात विनापास/मोफत दर्शन/आरतीसाठी प्रवेश देण्यात यावा. यासाठी मुल्य निश्चित करणेत येऊन, गोल्डन कार्डसारखी योजना राबविणेत यावी. याबाबतचा प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा अशा सुचना केल्या होत्या. उपरोक्त सुचनानुसार मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २५.०२.२०१७ रोजीचे सभेत खालीलप्रमाणे विषय सादर केला होता.

श्री साईबाबांच्या दर्शनासाठी देशाच्या कानाकोप-यासह जगभरातून साईभक्त शिर्डीत येत असतात. श्री साईबाबांच्या दर्शनासाठी आलेले हे साईभक्त आपआपल्या इच्छाशक्तीप्रमाणे बाबांना देणगी अर्पण करतात. कोणी देणगीपेटीत देणगी टाकतात तर कोणी देणगी काऊंटरकडे देणगी देतात. साईभक्तांनी दिलेल्या देणगी मधूनच श्री साईबाबा संस्थान साईभक्तांसाठी विविध सुविधा पुरवित आहे. तथापि श्री साईबाबा संस्थानला मोठया देणग्या देणा-या देणगीदार साईभक्तांना वेगळया सुविधा उपलब्ध करुन दिल्यास देणगी देण्याचे प्रमाण वाढेल असे वाटते.

याबाबत सिध्दीविनायक देवस्थान, मुंबई यांचेकडे माहिती घेतली असता त्यांनी उत्सवाच्या दिवशी व इतर महत्वाच्या दिवशी कोणत्याही मंदिरामध्ये भाविकांना दर्शन देण्याबाबत मार्गदर्शक सुचना, महाराष्ट्र शासन विधि व न्याय विभाग क्र.संकीर्ण २०१०/३५/(प्र.क्र.८५)/का.सोळा, मंत्रालय, मुंबई दिनांक ०७.०९.२०१० च्या शासन निर्णयानुसार सिध्दीविनायक मंदिरात सुरु असलेली गोल्डनकार्ड योजना बंद केलेली आहे. उपरोक्त शासन निर्णय खालीलप्रमाणे-

शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, राज्यातील महत्वाच्या मंदिरांमध्ये उत्सवाच्या वेळी व इतर महत्वाच्या दिवशी काही भक्तांना नियमित प्रवेशव्दारातून न सोडता इतर प्रवेशव्दारातून दर्शनासाठी प्रवेश दिला जात असल्याने गर्दीच्या वेळी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असल्याच्या अनेक तक्रारी प्रसारमाध्यमांव्दारे व प्रत्यक्ष प्राप्त होतात. अनेक देवस्थानांमध्ये उत्सवाच्या दिवशी अथवा इतर महत्वाच्या दिवशी व्ही.आय.पी.दर्शन तसेच काही ठिकाणी शुल्क, देणगी इ. आकारुन दर्शन दिले जाते. सर्व महत्वाच्या देवस्थानांमध्ये सर्वसामान्य भाविकांना समानतेने व शांततेने दर्शन दिले जावे व कोणत्याही भाविकास अन्य मार्गाने दर्शन देण्यात येऊ नये तसेच रांगेचे सुयोग्य पध्दतीने नियोजन करणे आवश्यक आहे.

**शासन निर्णय-** वरील परिस्थितीत पुढील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१) देवस्थानातील उत्सवाच्या दिवशी तसेच इतर महत्वाच्या दिवशी कोणत्याही व्यक्तीस नियमित रांगेव्यतिरिक्त अन्य कोणत्याही मार्गाने दर्शन घेण्यास परवानगी देण्यात येऊ नये व तशी कोणतीही स्वतंत्र व्यवस्था करण्यात येऊ नये.

२) कोणत्याही देवस्थानामध्ये उत्सवाच्या दिवशी व इतर महत्वाच्या दिवशी कोणत्याही मार्गाने (शुल्क, देणगी, फी इ.) रक्कम आकारुन दर्शनासाठी प्रवेश देण्यात येऊ नये.

३) प्रत्येक देवस्थान समितीने संबंधित देवस्थानातील महत्वाचा उत्सवाचा दिवस व गर्दीचा दिवस कोणता आहे याबाबत दर्शनी भागावर स्पष्टपणे दिसेल अशा प्रकारे ठळक अक्षरात फलक लावणे बंधनकारक राहील. तसेच याबाबत समितीने संबंधित सहायक धर्मादाय आयुक्तांना माहिती देणे आवश्यक राहील.

४) कोणत्याही देवस्थान समितीने महत्वाच्या सणाच्या दिवशी व इतर केव्हाही दर्शनाकरीता पासेस वा प्रवेश पत्रिका वितरीत करु नयेत.

५) कोणत्याही देवस्थानमध्ये उत्सवाच्या व इतर महत्वाच्या दिवशी सर्व भाविकांना समानतेने एकाच रांगेतून प्रवेश देण्यात यावा, जेणे करुन सर्वसामान्य भाविकांमध्ये अन्याय झाल्याची भावना निर्माण होणार नाही. तसेच विश्वस्त, अधिकारी व पोलिस यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग करुन भक्तांना सामान्य रांगेव्यतिरिक्त इतर कोणत्याही मार्गाने प्रवेश देऊ नये.

उपरोक्त सूचनांचे काटेकोरपणे पालन करुन महत्वाच्या दिवशी तसेच इतर दिवशीही रांगेचे सुयोग्य नियोजन करुन सर्वसामान्य भाविकांना शांततेने दर्शन घेण्याची व्यवस्था सर्व देवस्थान समित्यांनी करणे आवश्यक आहे. सदर सूचनांचे उल्लंघन झाल्यास त्याची शासनाकडून गंभीर दखल घेण्यात येईल व संबंधितांवर आवश्यक कारवाई करण्यात येईल. याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी, असा आहे.

तसेच याबाबत आंध्रप्रदेशातील तिरुपती देवस्थान देणगीदार भक्तांना कोणत्या सुविधा देते याबाबत माहिती घेतली असता खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली आहे.

**अ)** आंध्रप्रदेशातील तिरुपती देवस्थान देणगीदार साईभक्तांना देणगीच्या प्रमाणावर विशेष दर्शन /आरती, प्रसाद (भोजन), निवास आदि सुविधा उपलब्ध करुन देतात.

❖ **रुपये १ कोटी व त्यापेक्षा जास्त रक्कम देणा-या देणगीदारासाठी देण्यात येणा-या सवलती खालील प्रमाणे.**

१. प्रत्येक देणगीदार व त्यांचे कुटुंब (कुटुंबाची संख्या ५ पेक्षा जास्त नसावी) यांना व्ही.आय.पी सुट (रु २५००/- शुल्क असलेले) प्रती वर्षी केवळ ०३ दिवस निवासासाठी देण्यात येते.

२. देणगीदार व त्यांचे कुटुंबास वर्षातून ०३ वेळेस ब्रेक दर्शनासाठी व्हि.आय.पी रांगेतून निशुल्क सोडले जाते.

३. याव्यतिरिक्त देणगीदार व त्यांच्या कुटुंबास ०३ दिवस निशुल्क सुप्रभात दर्शनास सोडले जाते.

४. देणगीदारास कोणत्याही एका तारखेस (देणगीदार ठरवेल त्या तारखेस) देणगीदाराला वर्षातून फक्त एकदाच वेद आर्शीवचनम पूजावेदपंडीतांव्दारे रंगनायकुला मंडपातदिले जाईल.

५. देणगीदारास भेटी दरमान्य १० मोठे लाडू प्रसादरुपाने दिले जातील.

६. देणगीदारास भेटी दरम्यान दुपट्टा व ब्लाऊजपीस बहुमान म्हणून भेट देण्यात येईल.

७. देणगीदाराच्या केवळ पहिल्या भेटी दरम्यान ५ ग्रॅमचे सोन्याचे नाणे व एक सोन्याचा लेप दिलेले चांदीचे तबक (मेडल) त्यावर श्रीवरु व देवी पद्मावती यांची चित्र छापलेली असेल ते दिले जाते.

८. उपरोक्त सवलती हया वैयक्तीक देणगीदारास आजीवन बहाल करण्यात येतात. तर फर्मच्या /कंपनीच्या नांवे केवळ २० वर्षाची मर्यादा आहे.

९. दिलेली देणगी ही करसवलतीस पात्र असते.

१०. देणगीदाराच्या भेटी दरमान्य त्यास १० महाप्रसाद पाकीटे वर्षातून एकदा देण्यात येतात.

❖ **रुपये १० लाख व त्या वरील देणगीदारांसाठी देण्यात येणा-या एक समान सवलती खालील प्रमाणे.**

१. रुपये ५००/- भाडे असलेल्या व्ही.आय.पी सुटमध्ये निशुल्क वर्षीतून एकदा ३ दिवसासाठी निवासासाठी देण्यात येते.

२. देणगीदार व त्यांचे कुटुंबास वर्षातून ०३ वेळेस ब्रेक दर्शनासाठी उपलब्धतेनुसार सोडले जाते.

३. देणगीदारास भेटी दरम्यान वर्षातून एकदा २० लहान लाडू प्रसादरुपाने दिले जाते.

४. देणगीदारास भेटी निमित्ताने दुपट्टा व ब्लाऊजपीस बहुमान म्हणून भेट देण्यात येतात.

५. देणगीदाराच्या केवळ पहिल्या भेटी दरमान्य ५ ग्रॅमचे सोन्याचे नाणे व एक सोन्याचा लेप दिलेले चांदीचे तबक (मेडल) त्यावर श्रीवरु व देवी पद्मावती यांची चित्र छापलेली असेल ते दिले जाते.

६. उपरोक्त सवलती हया वैयक्तीक देणगीदारास आजीवन बहाल करण्यात येतात. तर फर्मच्या /कंपनीच्या नावे केवळ २० वर्षाची मर्यादा आहे.

७. दिलेली देणगी ही करसवलतीस पात्र असते.

८. देणगीदाराच्या भेटी दरम्यान त्यास १० महाप्रसाद पाकीटे वर्षातून एकदा देण्यात येते.

❖ **५ लाख व त्यावरील देणगीदारांना देण्यात येणा-या सवलती खालील प्रमाणे**

१. देणगीदार व त्यांचे कुटुंबास ARP काऊंटरव्दारे ०३दिवस मोफत निवासाची सोय व व्हि.आय.पी. व्यवस्था उपलब्धतेनुसार रक्कम भरुन उपलब्ध करुन देण्यात येते.

२. देणगीदारा व त्यांच्या कुटूबिय यांना वर्षातील ०३ दिवस दर्शनव्यवस्था उपलब्धतेनुसार करण्यात येते.

३. वर्षातून एका वेळेस प्रसाद म्हणून देणगीदारास १० लहान लाडू प्रसादरुपाने दिले जाते.

४. देणगीदार भक्ताला एक दुप्पट्टा व ब्लाऊज पीस वर्षातून एकदा बहूमान म्हणून दिला जातो.

५. एक सोन्याने मढवलेले श्रीवरु व देवी पद्मावतींचे चांदीचे तबक (मेडल) देणगीदाराच्या प्रथम भेटीच्या वेळेस दिले जाते.

६. उपरोक्त सवलती हया वैयक्तीक देणगीदारास आजीवन बहाल करण्यात येतात. तर फर्मच्या /कंपनीच्या नावे केवळ २० वर्षाची मर्यादा आहे.

७. दिलेली देणगी ही करसवलतीस पात्र असते.

८. देणगी दिलेल्या वर्षात दिलेल्या भेटीत ५ महाप्रसाद पाकिटे प्रसाद म्हणून दिले जातात.

तिरुपती देवस्थानामार्फत उपरोक्त प्रमाणे सवलती देणगीदार भक्तांना दिल्या जातात. या सवलती ज्या देणगीदार भक्तांना देण्यात येतात त्यांना देणगी देतांना देवस्थानकडून एक पुस्तिका देण्यात येते, त्या पुस्तिकेमध्ये त्यांना दिल्या जाणा-या सवलतींच्या वेळोवेळी नोंद घेण्यात येते.

**ब)** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १४/११/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९०७ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी मार्फत श्री साईबाबा संस्थानला रुपये २५०००/- किंवा त्यापेक्षा अधिक देणगी देणा-या (वस्तूरुपाने किंवा रोख रक्कमेच्या स्वरुपात) देणगीदार साईभक्तांना त्याच दिवसाकरीता ०१ वेळेस दर्शन व ०१ वेळेस आरतीची व्यवस्था मोफत करण्यात येते. त्याच प्रमाणे देणगीदार साईभक्तांने प्रसाद भोजनाची मागणी केल्यास त्यांची साईप्रसादालयात एकदा प्रसाद भोजनाची व्यवस्था करण्यात येते तसेच देणगीदार साईभक्तांचा शॉल, श्रीफळ व उदीप्रसाद देवून सत्कार करण्यात येतो.

तिरुपती देवस्थान देणगीदारांना देत असलेल्या सुविधांचा विचार करता श्री साईबाबा संस्थानमार्फत रुपये १ कोटी व त्यापेक्षा जास्त देणगी देणा-या साईभक्तांना पुढील सुविधा द्याव्यात असे वाटते. सदर सुविधाबाबतची माहिती व प्रत्येकवेळी कोणत्या सुविधांचा लाभ घेतला याची नोंद घेणेकामी तिरुपती देवस्थानप्रमाणे संस्थानचे लेखाशाखा विभागाने मराठी व इंग्रजी भाषेचा समावेश असलेली पुस्तिका देणगीकाऊंटरवर देणगी देतेवेळी देणगीदार भक्तांस उपलब्ध करुन द्यावी. सदर पुस्तिकेमध्ये देणगीदारासह त्यांच्या कुटूंबातील ०५ अशा एकूण ०६ व्यक्तींचे फोटो, पत्ता, मेल-आयडी, दुरध्वनी क्रमांक, आधार क्रमांक आदिच्या नोंदी घेण्यात याव्यात. पुस्तिकेमध्ये नमुद विभागांनी त्यांचे अखत्यारीतील सुविधा देणगीदारास देवून तशा नोंदी सदर पुस्तिकेत कराव्यात. देणगीनुसार देणगीदार साईभक्तांची दर्शन/आरतीची व्यवस्था जनसंपर्क विभागामार्फत करणेत येईल. संस्थानला मोठया देणग्या देणा-या देणगीदारांची प्रामख्याने दर्शन/आरतीची मागणी मोठया प्रमाणावर असते. मोठया देणग्या देणारे देणगीदार नेहमीच दर्शनासाठी येत नाहीत.

**I) श्री साईबाबा संस्थानला रुपये १ कोटी व त्यापेक्षा जास्त देणगी देणा-या देणगीदार भक्तांस खालीलप्रमाणे सुविधा संस्थानमार्फत देता येतील.**

१) एका वर्षात २४ वेळा मोफत आरती/ दर्शन (एका दिवसात फक्त ०१ आरती व ०१ दर्शन) व्यवस्था नंदीगेटने करता येईल. सदरची सवलत वैयक्तीक देणगीदारास आजीवन बहाल करण्यात येईल. तर फर्मच्या /कंपनीच्या नांवे २० वर्षाची मर्यादा राहील.

२) एका वर्षात २४ वेळेस सलग ०२ दिवसांसाठी देणगीदारास संस्थानचे निवासस्थान निवासासाठी निशुल्क उपलब्ध करुन देता येईल. यासाठी साईआश्रम निवासस्थान विभागाकडील ०१ इमारतीचे ऑनलाईन बुकींग बंद करण्यात येवून सदर इमारतीत चांगले फर्निचरसह चांगल्या प्रकारचे रुम्स तयार करुन देणगीदार साईभक्तांना देता येतील. मात्र याबाबत देणगीदार साईभक्ताने आगाऊ सुचना देणे संबंधीतांवर बंधनकारक राहील

३) देणगी दिलेल्या दिवशी देणगीदार भक्तांस सहकुटूंब एकदा पाद्यपूजा करता येईल. तसेच त्यापुढे कमी गर्दीच्या कालावधीत वर्षात एकदा अशी ५ वर्ष पाद्यपूजा करता येईल.

४) देणगी रक्कम ज्या प्रोजेक्टसाठी/वस्तूसाठी देण्यात आली आहे त्या प्रोजेक्टला देणगीदाराचे नांव देण्यात येईल.

५) देणगीदाराचा देणगी देते दिवशी शॉल, उदीप्रसाद देऊन सत्कार करण्यात येईल.

६) देणगीदारांस देणगी देतेवेळी २५ लाडूप्रसाद पाकीटे प्रसाद रुपाने देता येतील.

७) देणगीदारांची संस्थानचे प्रसादालयात तहहयात (ज्या दिवशी दर्शन/आरतीसाठी येतील त्यावेळी) व्ही.आय.पी.कक्षात विनामुल्य प्रसाद भोजन व्यवस्था करण्यात येईल.

८) देणगीदारानी शिफारस केलेल्या व्यक्तीची दर्शन/आरतीची व्यवस्था प्राधान्याने नियमानुसार सशुल्क करण्यात येईल.

**II) श्री साईबाबा संस्थानला रुपये ५० लाख व त्यापेक्षा जास्त देणगी देणा-या देणगीदार भक्तांस खालीलप्रमाणे सुविधा संस्थानमार्फत देता येतील.**

१) एका वर्षात १२ वेळा मोफत आरती/ दर्शन (एका दिवसात फक्त ०१ आरती व ०१ दर्शन) व्यवस्था नंदीगेटने करता येईल. सदरची सवलत वैयक्तीक देणगीदारास आजीवन बहाल करण्यात येईल. तर फर्म /कंपनीच्या नांवे २० वर्षाची मर्यादा राहील.

२) एका वर्षात १२ वेळेस सलग ०२ दिवसांसाठी देणगीदारास संस्थानचे निवासस्थान निवासासाठी उपलब्ध करुन देता येईल. यासाठी साईआश्रम निवासस्थान विभागाकडील ०१ इमारतीचे ऑनलाईन

बुकींग बंद करण्यात येवून सदर इमारतीत चांगले फर्निचरसह चांगल्या प्रकारचे रुम्स तयार करुन देणगीदार साईभक्तांस देता येतील. मात्र याबाबत देणगीदार साईभक्ताने आगाऊ सुचना देणे संबंधीतांवर बंधकारक राहील.

३) देणगी दिलेल्या दिवशी देणगीदार भक्तांस सहकुटूंब एकदा पाद्यपूजा करता येईल.

४) देणगीदाराचा देणगी देते दिवशी शॉल, उदीप्रसाद देऊन सत्कार करण्यात येईल.

५) देणगीदारांस देणगी देतेवेळी २० लाडूप्रसादपाकीटे प्रसाद रुपाने देता येतील.

६) देणगीदारांचीसंस्थानचे प्रसादालयात तहहयात (ज्या दिवशी दर्शन/आरतीसाठी येतील त्यावेळी) व्ही.आय.पी.कक्षात विनामुल्य प्रसाद भोजन व्यवस्था करता येईल.

७) देणगीदारानी शिफारस केलेल्या व्यक्तीची दर्शन/आरतीची व्यवस्था प्राधान्याने नियमानुसार सशुल्क करण्यात येईल.

**III) श्री साईबाबा संस्थानला रुपये १० लाख व त्यापेक्षा जास्त देणगी देणा-या देणगीदार भक्तांस खालीलप्रमाणे सुविधा संस्थममार्फत देता येतील.**

१) एका वर्षात ०४ वेळेसमोफत आरती/दर्शन (एका दिवसात फक्त ०१ आरती व ०१ दर्शन) व्यवस्था नंदीगेटने करता येईल. सदरची सवलत वैयक्तीक देणगीदारास व फर्म /कंपनीच्या नांवे केवळ १० वर्षाची मर्यादा राहील.

२) एका वर्षात ०४ वेळेस सलग ०२ दिवसांसाठी देणगीदारास संस्थानचे निवासस्थान निवासासाठी उपलब्ध करुन देता येईल. यासाठी साईआश्रम निवासस्थान विभागाकडील ०१ इमारतीचे ऑनलाईन बुकींग बंद करण्यात येवून सदर इमारतीत चांगले फर्निचरसह चांगल्या प्रकारचे रुम्स तयार करुन देणगीदार साईभक्तांना देता येतील. मात्र याबाबत देणगीदार साईभक्ताने आगाऊ सुचना देणे संबंधीतांवर बंधकारक राहील

३) देणगीदाराचा देणगी देते दिवशी शॉल, उदीप्रसाद देऊन सत्कार करण्यात येईल.

४) देणगीदारांस देणगी देतेवेळी १० लाडूप्रसादपाकीटे प्रसाद रुपाने देता येतील.

५) देणगीदारांची संस्थानचे प्रसादालयात एका वर्षात १४ वेळा(ज्या दिवशी दर्शन/आरतीसाठी येतील त्यावेळी) व्ही.आय.पी.कक्षात विनामुल्य प्रसाद भोजन व्यवस्था करता येईल.

**IV) श्री साईबाबा संस्थानला रुपये ०५ लाख व त्यापेक्षा जास्त देणगी देणा-या देणगीदार भक्तांस खालीलप्रमाणे सुविधा संस्थानमार्फत देता येतील.**

१) एका वर्षात ०४ वेळेसमोफत आरती/ दर्शन (एका दिवसात फक्त ०१ आरती व ०१ दर्शन) व्यवस्था नंदीगेटने करता येईल. सदरची सवलत वैयक्तीक देणगीदारास व फर्म /कंपनीच्या नांवे केवळ ०५ वर्षाची मर्यादा राहील.

२) एका वर्षात ०४ वेळेस सलग ०२ दिवसांसाठी देणगीदारास संस्थानचे निवासस्थान निवासासाठी उपलब्ध करुन देता येईल. यासाठी साईआश्रम निवासस्थान विभागाकडील ०१ इमारतीचे ऑनलाईन बुकींग बंद करण्यात येवून सदर इमारतीत चांगले फर्निचरसह चांगल्या प्रकारचे रुम्स तयार करुन देणगीदार साईभक्तांना देता येतील. मात्र याबाबत देणगीदार साईभक्ताने आगाऊ सुचना देणे संबंधीतांवर बंधकारक राहील

३) देणगीदाराचा देणगी देते दिवशी शॉल, उदीप्रसाद देऊन सत्कार करण्यात येईल.

४) देणगीदारांस देणगी देतेवेळी ०५ लाडूप्रसाद पाकीटे प्रसाद रुपाने देता येतील.

५) देणगीदारांची संस्थानचे प्रसादालयात एका वर्षात १० वेळा (ज्या दिवशी दर्शन/आरतीसाठी येतील त्यावेळी) व्ही.आय.पी.कक्षात विनामुल्य प्रसाद भोजन व्यवस्था करता येईल.

**(वरील I ते IV करीता आयकर खात्यातील तरतुदीमध्ये होणा-या बदलास अनुसरुन सवलत अनुज्ञेय होईल. तसेच रोख रक्कम स्विकारणेबाबत आयकर कायद्यातील तरतुदी लागू होतील.)**

**श्री साईबाबा संस्थानला रुपये ५० लाख पेक्षा जास्त रक्कमेच्या (वस्तू/रोख स्वरुपातील) देणग्या देणारे देणगीदार/कंपन्या खालीलप्रमाणे-**

१) मे.महिंद्रा ॲण्ड महिंद्रा लि., यांनी संस्थानला सुमारे ०२ कोटी रुपये किंमतीचा पाणी साठवण तलाव संस्थानला देणगीदाखल दिलेला असून संस्थानने सुरु केलेल्या ॲम्ब्युलन्स योजनेसाठी २५ ॲम्ब्युलन्स देणगी देण्याची घोषणाही केली आहे. तसेच त्यांच्या कंपनीचे पहीले वाहन संस्थानला देणगी दाखल देत असून आजतागायत त्यांनी १३ वाहने संस्थानला देणगीदाखल दिलेली आहेत.

२) श्री.सुधीर प्रभू, मुंबई यांनी श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी सुमारे ०१ कोटी रुपये किंमतीचे आय.सी.यु.युनिटचे साहित्य देणगी दिलेले आहे.

३) श्री.मुकेश गुप्ता दिल्ली यांनी साईबाबा मंदिरासाठी सुमारे ९० लाख रुपये किंमतीची वातानुकुलीत सिस्टीम देणगी दिलेली आहे.

४) मॉन्टोकार्लो लि. अहमदाबाद यांनी पावती नं.३५ सीडी-एसी-९२४ दिनांक २२.०५.२०१३ ने रुपये ५२,३५,०००/- व पावती नं.३५ सीडी-एसी-१२३२ दिनांक०५.११.२०१५ ने रुपये ७०,००,०००/- देणगी दिलेली आहे.

५) श्रीमती.हंसा बाकारु मुंबई यांनी पावती नं.३५ सीडी-एसी-९६५ दिनांक ०९.१०.२०१३ ने रुपये ५०,००,०००/- देणगी दिलेली आहे.

६) अनघा संथानम मुंबईयांनी पावती नं.सीसीडीडी-एमयु-१३० दिनांक १०.०६.२०१५ ने रुपये ५०,००,०००/- देणगी दिलेली आहे.

७) स्वर्गीय नामदुराई कनका दुर्गा हैद्राबाद यांनी पावती नं. सीएचडीडी-एसी ९५७१ दिनांक ११.०१.२०१६ ने रुपये १,००,०१,१३३/- देणगी दिलेली आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) यांस रुपये ०५ लाख व त्यापेक्षा जास्त रकमेची देणगी रोख किंवा वस्तुस्वरुपात देणा-या देणगीदारांना I ते IV प्रमाणे सुविधा संस्थानमार्फत विनाशुल्क देता येतील. तसेच वर निर्देशीत केलेल्या देणगीदारांनी संस्थानला मोठया रकमेच्या रोख किंवा वस्तू स्वरुपात देणगी दिलेल्या असून त्यांनाही उपरोक्त सुविधा देण्यात याव्यात असे वाटते.

तथापि, मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २५.०२.२०१७ रोजीचे सभेमध्ये उपरोक्त विषयावर, "विशिष्ट स्वरुपाची देणगी देणा-या साईभक्तांसाठी गोल्डन कार्डसारखी योजना सुरु केल्यामुळे भक्तांमध्ये भेदभाव होऊ शकतो, असे समितीचे मत झाले. तसेच सर्व महत्वाच्या देवस्थानांमध्ये सर्वसामान्य भाविकांना समानतेने व शांततेने दर्शन दिले जावे व कोणत्याही भाविकास अन्य मार्गाने दर्शन देण्यात येऊ नये, अशा सुचना विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी यापुर्वी दिलेल्या आहेत. परंतु मोठया स्वरुपातील देणगी देणा-या भक्तांचा सन्मान करायला पाहिजे, असेही समितीस वाटते. याकरीता रुपये ५ लाख मात्र रोख अथवा वस्तु स्वरुपात तसेच साई रुग्णवाहिका प्रकल्पासाठी ०१ पेक्षा जास्त रुग्णवाहिका देणगी स्वरुपात देणा-या भक्तांना प्रस्तावातील IV मध्ये नमुद केलेप्रमाणे सुविधा देण्यात याव्या व याबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन समितीसमोर फेरसादर करणेत यावा, असे ठरले." असा निर्णय झालेला आहे.

**मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार सदरच्या विषयामध्ये खालील मुद्दयांवरही विचार व्हावा असे वाटते.**

**अ)** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २५.०२.२०१७ रोजीचे निर्णयानुसार श्री साईबाबा संस्थानला रुपये ०५ लाख मात्र रोख अथवा वस्तु स्वरुपात तसेच साई रुग्णवाहिका प्रकल्पासाठी ०१ पेक्षा जास्त रुग्णवाहिका देणगी स्वरुपात देणगी देणा-या भक्तांना खालीलप्रमाणे सुविधा संस्थानमार्फत देता येतील.

१) एका वर्षात ०४ वेळेसमोफत आरती/ दर्शन (एका दिवसात फक्त ०१ आरती व ०१ दर्शन) व्यवस्था नंदीगेटने करता येईल. सदरची सवलत वैयक्तीक देणगीदारास व फर्म /कंपनीच्या नांवे केवळ ०५ वर्षाची मर्यादा राहील.

२) एका वर्षात ०४ वेळेस सलग ०२ दिवसांसाठी देणगीदारास संस्थानचे निवासस्थान निवासासाठी उपलब्ध करुन देता येईल. यासाठी साईआश्रम निवासस्थान विभागाकडील ०१ इमारतीचे ऑनलाईन बुकींग बंद करण्यात येवून सदर इमारतीत चांगले फर्निचरसह चांगल्या प्रकारचे रुम्स तयार करुन देणगीदार साईभक्तांना देता येतील. मात्र याबाबत देणगीदार साईभक्ताने आगाऊ सुचना देणे संबंधीतांवर बंधकारक राहील

३) देणगीदाराचा देणगी देते दिवशी शॉल, उदीप्रसाद देऊन सत्कार करण्यात येईल.

४) देणगीदारांस देणगी देतेवेळी ०५ लाडूप्रसाद पाकीटे प्रसाद रुपाने देता येतील.

५) देणगीदारांची संस्थानचे प्रसादालयात एका वर्षात १० वेळा (ज्या दिवशी दर्शन/आरतीसाठी येतील त्यावेळी) व्ही.आय.पी.कक्षात विनामुल्य प्रसाद भोजन व्यवस्था करता येईल.

**६) आयकर खात्यातील तरतुदीमध्ये होणा-या बदलास अनुसरुन सवलत अनुज्ञेय होईल. तसेच रोख रक्कम स्विकारणेबाबत आयकर कायद्यातील तरतुदी लागू होतील.**

**ब)** उपरोक्त सुविधामधील अ.न.२ च्या सुविधेसाठी साईआश्रम भक्तनिवास विभागाकडील ०१ इमारती मध्ये देणगीदार साईभक्तांची व्यवस्था करणेबाबत नमुद केले होते. त्याऐवजी देणगीदार साईभक्तांची व्दारावती भक्तनिवासस्थान मध्ये विनाशुल्क निवासाची व्यवस्था करावी असे वाटते.

**क)** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ३०.११.२०१६ रोजीचे सभेत रक्कम रुपये २५,०००/- व त्यापुढील रकमेची/वस्तु, साहित्याची देणगी देणा-या साईभक्तांस २० ग्रॅम वजनाच्या चांदीच्या श्री साई पादुका तसेच साईचरित्र ग्रंथ व एक श्रीडी फोटो प्रसादरुपाने देण्यात यावा असे ठरले. उपरोक्त निर्णयामध्ये संस्थानला ५ लाख रुपये किंवा त्यापेक्षा जास्त देणगी देणा-या साईभक्तांनाही सदरची भेट द्यावी लागणार असल्याने वरील १ ते ६ मुद्दामध्ये त्यांचा सामावेश करावा किंवा कसे याबाबत निर्णय व्हावा.

**ड)** याबाबत गजानन महाराज देवस्थान शेगांवचे श्री.भट साहेब यांचेकडे माहिती घेतली असता त्यांनी देणगीदार भक्तांने दिलेल्या देणगीच्या १० टक्के रक्कम ते देणगीदार भक्तांस (सोन्याच्या पादुका, चांदीच्या पादुका, साडी, ब्लाऊज पीस, शर्ट पीस आदि साहित्य) प्रसाद रुपाने देतात असे सांगितले आहे. तरी शेगांव देवस्थानच्या धर्तीवर श्री साईबाबा संस्थानमार्फत देणगीदार भक्तांना काही सुविधा देता येतील का याबाबतही विचार व्हावा ही विनंती.

**इ)** तसेच जनसंपर्क विभागामार्फत वितरीत करण्यात येणा-या पासेसला व्ही.आय.पी.पास ऐवजी स्पेशल दर्शन पास म्हणून संबोधण्यात यावे.

तसेच रुपये ०१ कोटी, ५० लाख व १० लाख यापेक्षा जास्त देणगी देणा-या साईभक्तांसाठी पुर्वीच्या टिपणीत नुमद केलेल्या I, II, III बाबतही पुनश्च विचार व्हावा ही विनंती.

**विभागाची मागणी-** विशिष्ट स्वरुपाची देणगी देणा-या साईभक्तांकरीता गोल्डन कार्डसारखी योजना सुरु करणेबाबतचा प्रस्ताव फेरसादर करणेबाबत.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) यांस रुपये ५ लाख व त्यापेक्षा जास्त रक्कम रोख अथवा वस्तु स्वरुपात तसेच साई रुग्णवाहिका प्रकल्पासाठी ०१ पेक्षा जास्त रुग्णवाहिका देणगी स्वरुपात देणा-या भक्तांना श्री साईबाबा संस्थानमार्फत वरील 'अ' प्रमाणे सुविधा मोफत देण्यात याव्यात. देणगीदार भक्तांना देण्यात येणा-या सुविधाबाबतची माहिती व प्रत्येक वेळी कोणत्या सुविधांचा लाभ घेतला याची नोंद घेणेकामी मराठी व इंग्रजी भाषेचा समावेश असलेली पुस्तिका देणगीकाऊंटरवर देणगी देतेवेळी लेखाशाखा विभागाकडून देणगीदार भक्तांस देण्यात यावी. सदर पुस्तिके मध्ये देणगीदारासह त्यांच्या कुटूंबातील एकूण ०६ व्यक्तींचे फोटो, पत्ता, मेल-आयडी, दुरध्वनी क्रमांक, आधारक्रमांक आदिच्या नोंदी घेण्यात येऊन यापुर्वी देणगी दिलेल्या देणगीदार साईभक्तांस तसेच यापुढे देणगी देणा-या साईभक्तांस वरील नमुद सुविधा (उदा. दर्शन/आरती व्यवस्था जनसंपर्क विभाग, निवास व्यवस्था व्दारावती भक्तनिवास, प्रसाद भोजन व्यवस्था श्री साईप्रसादालय विभाग, लाडू प्रसाद व्यवस्था कॅन्टीन विभाग) संस्थानमार्फत विनाशुल्क देता येतील. सदरच्या सुविधांचा लाभ देणगीदारांनी देणगी देतांना पुस्तिकेत नमुद केलेल्या व्यक्तींनाच घेता येईल. तसेच उपरोक्त सुविधा देणगीदारांना देणेबाबत माहिती तंत्रज्ञान विभागाकडून योग्यती संगणक कार्यप्रणाली तयार करुन संबंधीत विभागांकडे कार्यान्वित करता येईल. श्री साईबाबा संस्थानला रुपये ०१ कोटी, ५० लाख व १० लाख यापेक्षा जास्त देणगी देणा-या साईभकृतांसाठी पुर्वीच्या टिपणीत नुमद केलेल्या I, II, III नंबरच्या सुविधाबाबत पुनश्च विचार व्हावा. तसेच फेरसादर केलेल्या 'ब', 'क', 'ड' व 'इ' या मुद्यावरही विचार व्हावा असे वाटते. तरी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८०३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, विशिष्ट स्वरुपाची देणगी देणाऱ्या दानशुर साईभक्तांकरीता गोल्डन कार्डसारखी योजना सुरु करणेकामीची नियमावली अंतीम करणेसाठी व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष मा.श्री. चंद्रशेखर कदम यांचे अध्यक्षतेखाली मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे, मा.ॲड.मोहन जयकर, माश्री.बिपीनदादा कोल्हे व मा.श्री.प्रताप भोसले या सदस्यांची समिती गठीत करणेत आली. या समितीने उपरोक्त नियमावली अंतीम करावी, असे ठरले.** (कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी)

---

**विषय नं.१३** **सोने, चांदी व इतर मौल्यवान धातूच्या वस्तू/ साहित्य देणगी म्हणून स्विकारणेकामी मार्गदर्शक तत्वे-वजा-नियमावली निश्चित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ) विषयाची पूर्वपीठीका- (०१)** श्री क्षेत्र शिर्डी येथे श्री साईंचे समाधी दर्शनासाठी देश-विदेशातून दररोज हजारो भक्त येत असतात. श्री साईबाबांवर असलेल्या श्रध्देपोटी शिर्डी येथे येणारे भक्त संस्थान व्यवस्थापनास विविध स्वरुपात देणगी/ दान देत असतात, यामध्ये विशेषतः रोख रक्कम, सोने-चांदीचे मौल्यवान अलंकार/ वस्तू,

रुग्णालयांशी संबंधीत साहित्य, विविध स्वरुपातील यंत्रे/ उपकरणे यांचा समावेश होतो. यातही प्रामुख्याने समाधी मंदिरासाठी आवश्यक असणारी नित्य वापरातील सोने-चांदीची भांडी/ वस्तू / अलंकार देणेकडे भक्तांचा मोठा कल असतो. यापैकी बरेचसे भक्त आपले दान दानपेटीत अर्पण करीत असतात. तर काही भक्त समक्ष देणगी कार्यालयात येऊन वर उल्लेख केलेले सोने-चांदीच्या मौल्यवान वस्तू–अलंकार देणगी म्हणून देतात.

अशा रितीने प्राप्त होणारे सोने-चांदी वस्तू/ साहित्य / अलंकार देणगी म्हणून स्वीकारणेकामी मार्गदर्शक तत्वे-वजा-नियमावली निश्चित करणेसाठी लेखाशाखेकडील दिनांक १५ एप्रिल, २०१७ रोजीचे मंजूर टिपणीनुसार, मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे प्रस्ताव विचारार्थ सादर करणेत आला होता.

**(०२)** सदरहू प्रस्तावावर, मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २८ एप्रिल, २०१७ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक २८३ खालीलप्रमाणे पारित करणेत आलेला आहे -

" .. .. संस्थानला साईभक्तांकडून देणगी स्वरुपात प्राप्त होणा-या सोने-चांदी व इतर मौल्यवान धातूच्या वस्तु / साहित्य देणगी म्हणून स्वीकारणेकामी या क्षेत्रातील तज्ञांचे मार्गदर्शनानुसार नियमावली तयार करणेत येऊन, ती मान्यतेस्तव समितीसमोर सादर करणेत यावी, असे ठरले. "

**(०३)** मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार, संस्थान व्यवस्थापनाने नियुक्त केलेल्या ०३ सोने-चांदी मुल्यांकनकार अनुक्रमे, (१) श्री. गणेश दत्तात्रय नागरे, शिर्डी/ (२) श्री. सुधीर रमण वडनेरे, संगमनेर व (३) श्री. बाळासाहेब माधवराव नागरे, शिर्डी यांना लेखाशाखेमार्फत दिनांक २९ जून, २०१७ रोजी विषयांकित प्रस्तावाचे अनुषंगाने, संस्थान प्रशासनामार्फत प्रस्तावित मार्गदर्शक तत्वे-तथा-नियमावलीचामसुदा सोने-चांदी वस्तू देणगी म्हणून स्वीकारुन त्याचे मुल्यांकन करणेकामी उचित आहे किंवा कसे याबाबत लेखी अभिप्रायासाठी पाठविणेत आला होता.

**(ब)** वर परिच्छेदांत नमुद केलेनुसार, उपरोक्त ०३ (तीन) सोने-चांदी मुल्यांकनकार यांनी दिनांक ११ जुलै, २०१७ रोजीचे पत्रानुसार विषयांकित प्रस्तावाचे अनुषंगाने खाली नमूद केलेप्रमाणे लेखी अभिप्राय सादर केला आहे -

" .. .. आपलेकडील दिनांक २९ जून, २०१७ रोजीचे पत्रासोबत जोडलेल्या परिशिष्टात नमूद केलेली प्रस्तावित नियमावली आम्ही वाचली आहे.

जे साईभक्त निव्वळ सोने-चांदीपासून बनविलेल्या वस्तू देणगी रुपाने देतात, त्याचे मुल्यांकनासाठी सध्या कुठलीही अडचण येत नाही. परंतु जे भक्त सोने-चांदीसह इतर धातू वापरुन, उदा. तांबे, पितळ किंवा लाकूड अथवा मौल्यवान खडे / रत्न वापरुन वस्तू देणगी देऊ इच्छितात त्यांचेसाठी आपले कार्यालयाने प्रस्तावित केलेली नियमावली उचित व योग्य आहे, असे आमचे मत आहे."

थोडक्यात, सोने-चांदी मुल्यांकनकारांनी संस्थान प्रशासनामार्फत सोने-चांदी वस्तु / साहित्य / अलंकार देणगीरुपाने स्वीकारणेकामी प्रस्तावित करणेत आलेली मार्गदर्शक तत्वे-तथा-नियमावली उचित व योग्य असलेबाबत अभिप्राय दिलेला आहे.

**(क)** वर नमुद केलेल्या सर्व विवेचनास अनुसरुन, एखाद्या भक्ताने सोने-चांदी वस्तू/ साहित्य देणगी म्हणून देणेची इच्छा व्यक्त केल्यास अशी सोने-चांदीसह इतर मौल्यवान वस्तू / साहित्य स्वीकारणेसाठी काही मार्गदर्शक तत्वे-वजा-नियमावली असणे हितकारक व गरजेचे आहे.

यामध्ये खालील मार्गदर्शक बाबींचा समावेश करता येईल –

**०१.** जे साईभक्त सोने-चांदी या मौल्यवान धातूपासून बनविलेल्या वस्तू / साहित्य देणगी रुपाने देऊ इच्छितात अशा साईभक्तांना उपजिल्हाधिकारी / उपकार्यकारी अधिकारी / प्रशासकीय अधिकारी / जनसंपर्क अधिकारी / मंदिर विभाग प्रमुख यांचेकडेस आपली संकल्पना मांडणेकामी आमंत्रित करावे.

**०२.** भक्त देणगी देऊ इच्छित असलेल्या सोने-चांदी वस्तू/ साहित्यात इतर धातूंचा समावेश होणार असेल तर त्यासाठी स्थानिक सोने-चांदी मुल्यांकनकारांसह तो भक्त ज्यांचेकडून अशी वस्तू बनवून घेऊ इच्छित आहे त्यांचे प्रतिनिधीसह सविस्तर चर्चा करणेत यावी.

**०३.** संबंधित भक्ताकडून देणगी बाबतचा प्रस्ताव लेखी स्वरुपात घेऊन, त्याबाबत प्रथम संस्थान प्रशासनास व प्रशासनाचे सुचनेनुसार व्यवस्थापनासही अवगत करावे. आवश्यकता भासल्यास याबाबत प्रस्ताव सादर करुन, रितसर मान्यता घेणे हितावह राहिल. यामध्ये प्रामुख्याने देणगी म्हणून देणेत येणारी वस्तू / साहित्य कोण-कोणते धातू वापरुन बनविणेत येणार आहे, याचा स्पष्ट उल्लेख असावा.

०४. वर नमुद केलेप्रमाणे, प्रत्यक्ष काम सुरु होईल त्यावेळेस त्यामधील घटकांचे स्वतंत्र वजन (उदा. सोने, चांदी, तांबे, लाकूड अथवा इतर) स्थानिक मुल्यांकनकारांसह संबंधित विभागाचे प्रतिनिधी व भक्त अथवा त्याचे प्रतिनिधीसमोर करणेत येऊन त्याच्या नोंदी ठेवणेत याव्यात.

०५. अशा देणगी रुपाने द्यावयाचे वस्तूचे काम पूर्ण झालेनंतर, बाकी रहाणारे / उरलेल्या साहित्याचेही स्वतंत्र वजन व स्थानिक मुल्यांकनकारांसह संबंधित विभागाचे प्रतिनिधी व भक्त अथवा त्यांचे प्रतिनिधी समोर करणेत येऊन त्याच्या नोंदी ठेवणेत याव्यात.

अशा विविध धातू / घटक एकत्र असलेल्या वस्तूचे / साहित्याचे बनविणेचे संपूर्ण कामकाज शिर्डी येथेच करणेत यावे, जेणेकरुन त्यामध्ये असलेल्या घटक धातूंचे / घटकांचे स्वतंत्र वजन करुन, त्यांच्या उचित नोंदी करणे व त्यानुसार मुल्यांकन करणे सोयीचे होईल.

०६. प्रत्यक्षात ज्या दिवशी वर नमुद केलेली वस्तू / साहित्य देणगी रुपाने संस्थान प्रशासनाचे अथवा संबंधित विभागाचे ताब्यात मिळाले त्यादिवशी, अ.नं. ०४ व ०५ मध्ये नमूद केलेल्या नोंदी लक्षात घेऊन, प्रत्यक्ष वजनाप्रमाणे व त्यादिवशी असणारे बाजारभावाप्रमाणे हिशोब करुन देणगी पावती देणेत यावी.

०७. बहुतांशी भक्त सुवर्णलेप असलेल्या चांदीच्या वस्तू देणगी रुपाने देतात, या वस्तूंची देणगी पावती ही त्यामध्ये वापरलेल्या चांदीचे टंचनुसार चांदी वस्तू म्हणून करणेत यावी

०८. बहुतांशी भक्त खडे (Stones)असलेले मुकूट व इतर वस्तू देणगी रुपाने देतात, या वस्तूंची देणगी पावती खड्यांचे अंदाजे वजन वस्तूचे एकूण वजनातून वजा करुन निव्वळ सोने-चांदीचे मुल्यांकन करुन, त्यानुसार देणगी पावती देणेत यावी.

०९. देणगी म्हणून देणेत येणारी वस्तू / अलंकार समाधी मंदिरात सर्वप्रथम श्री साईंचे चरणी ठेवून नंतर ती संस्थान प्रशासनाकडे जमा करणेची देणगीदार भक्ताची इच्छा असते. अशा देणगीदार भक्तांना समाधी मंदिरात यथायोग्य पध्दतीने जनसंपर्क कार्यालय / देणगी कार्यालय / संरक्षण विभाग यांनी समन्वयाने दर्शनासाठी पाठवावे. तद्नंतर संबंधित भक्तांचे इच्छेनुसार,लेखा विभागामार्फत देणगी पावती देणेकामी स्थानिक सोने-चांदी मुल्यांकनकार यांना बोलावून, त्यांचेकडून विहित पध्दतीने तपासणी करुन देणगी पावती देणेची व्यवस्था करावी.

१०. देणगी पावतीप्रमाणे तसेच वेळोवेळी करणेत आलेल्या नोंदीप्रमाणे संबंधित विभागांनी अशा वस्तूंची चल-अचल मालमत्ता नोंदवहीत उचित नोंदी घेणेची कार्यवाही त्वरीत पूर्ण करावी व कार्यपूर्तता अहवाल मा. कार्यकारी अधिकारी यांचे अवलोकनार्थ सादर करावा.

**(क)** उपरोक्तप्रमाणे सोने-चांदी वस्तू/ साहित्य देणगी रुपाने स्वीकारणेकामी मार्गदर्शक तत्व-वजा-नियमावली निश्चित करुन कार्यवाही करणेकामी उपरोक्त प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.८०४** **सोने-चांदी वस्तू/ साहित्य देणगी रुपाने स्वीकारणेकामी मार्गदर्शक तत्व-वजा-नियमावली निश्चित करणेसाठी सदरहू प्रस्ताव उपरोक्त निर्णय क्र.८०३ अन्वये गठीत करणेत आलेल्या समितीसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.१४** **साक्री, जि.धुळे येथील अपुर्ण जलसंधारण कामासाठी रक्कम रु.५० लाख निधी देणे.**

**प्रस्ताव-** साक्री तालुक्यातील पांझरा नदीवरील काकसेवड- चिंचपाडा येथील कोल्हापूर टाईप बंधाराचे काम ८० टक्के पुर्ण झाले असून उर्वरीत २० टक्के काम मागील ४ वर्षापासून अपूर्ण आहे. सदर काम पुर्ण करणेसाठी सुमारे ५० लाख रुपयांची आवश्यकता आहे. काम पुर्ण झालेवर जवळपास ३०० एकर जमिनीला सिंचनाचा फायदा होणार आहे त्यासाठी आवश्यक असणारा ५० लाख इतका निधी श्री साईबाबा संस्थान शिर्डी व श्री सिद्धीविनायक गणपती न्यास, मुंबई यांनी उपलब्धकरून देणेची विनंती मा. श्री डी. एस. अहिरे, विधानसभा सदस्य, साक्री यांनी पत्राद्वारे मा. मुख्यमंत्री महोदयांकडे केली आहे त्यावर मा. मुख्यमंत्री महोदयांनी 'मदत करावी' असे निर्देश दिलेले आहेत.

त्यास अनुसरून, विधी व न्याय विभाग यांनी उपरोक्त संदर्भीय पत्र इकडील कार्यालयास पाठविले असून त्यामध्ये त्यांनी साक्री तालुक्यातील पांझरा नदीवरील काकसेवड - चिंचपाडा येथील कोल्हापूर टाईप बंधा-याचे काम पुर्ण करण्यासाठी आवश्यक असणारा रु. ५० लाख इतका निधी श्री साईबाबा संस्थान शिर्डी व श्री सिद्धीविनायक गणपती मंदीर न्यास, मुंबई यांच्याकडून उपलब्ध करून देण्याची विनंती मा. श्री अहिरे यांनी केली असून त्यावर मुख्यमंत्री महोदयांनी मदत करावी असे निर्देश दिलेले आहेत, असे नमूद करून सदर पत्र पुढील कार्यवाहीस्तव पाठविले आहे.

**अर्थ साहाय्य करणेबाब संस्थान अधिनियमातील तरतुद:-**

**१)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिडी अधिनियम २००४ कलम १७ मधील (२)(ण) "मानव जातीचे कल्याण करणा-या किंवा आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल." अशी तरतुद आहे.

**२)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिडी अधिनियम २००४ कलम २१ (१क) पोटकलम १ च्या तरतुदीस अधीन राहुन विश्वस्तव्यस्थेस राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने, आणि राज्य शासनाकडून राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कमाल मर्यादेच्या आणि अटी शर्तीच्या अधीन राहून, भक्तांना पायाभुत सुविधा पुरविणे किंवा त्या वाढवण्यासाठी शासकीय विभागांना, शासकीय महामंडळांना, शासकीय कंपन्यांना किंवा शासकीय उपक्रमांना सहायक अनुदान देता येईल.

कलम २१ (२) पोट-कलमे (१) आणि (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर, विश्वस्तव्यस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रक्कमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्यांपेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईल मात्र यासाठी प्रथम शासन नियुक्त छाननी समितीची शिफारस घेणेआवश्यक आहे.

(एक) राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने, एखाद्या नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून कोणतीही शैक्षणिक संस्था, किंवा इतर धर्मादाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अथवा अन्य कोणत्याही बिगर वाणिज्यिक सांस्कृतिक संघटनेची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अनुदान देण्याची तरतुद आहे." मात्र यासाठी प्रथम शासन नियुक्त छाननी समितीची शिफारस घेणेआवश्यक आहे.

**विभागाचा अभिप्राय:-**

**अ)** श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांनी २०१५-१६ या वर्षात महाराष्ट्र शासनाच्या जलयुक्त शिवार योजनेत सहभाग घेऊन राज्यातील ३४ जिल्हयांना १ कोटी प्रति जिल्हा प्रमाणे एकूण ३४ कोटी रक्कम अनुदान केलेले आहेत. त्यामध्ये धुळे जिल्हयासाठी रक्कम रु. १ कोटी दिलेली आहे.

**आ)** दररोज शासकीय/निमशासकीय कार्यालयाकडुन, नोंदणीकृत संस्थांचे, वैयक्तीकरित्या, वेगवेगळया कारणासाठी अनेक प्रकारचे अनुदान मागणी प्रस्ताव येत असतात. त्यामध्ये एकाच प्रस्तावाचा विचार करता येणार नाही.

**इ)** आक्टोंबर २०१७ ते आक्टोंबर २०१८ या कालावधीत श्री साईशताब्दी वर्ष साजरे करण्याचा निर्णय व्यवस्थापन समितीने घेतलेला आहे. त्यासाठी विविध विकास कामांकरिता रु.३१८६ कोटी रुपयांचा कृतीआराखडा शासनास सादर केलेला आहे. संस्थानचा स्वतःचा निधीही त्यासाठी खर्च होणार असल्याने साक्री जि. धुळे येथील अपुर्ण जलसंधारण कामासाठी मागणी केलेप्रमाणे रु.५० लाख निधी उपलब्ध करून देणे योग्य होणार नाही.

तरी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीसमोर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८०५** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवास दि.०१ आक्टोबर पासून प्रारंभ होत आहे मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखालील कृती आराखडा समितीने दि.३१.०३.२०१७ रोजी या महोत्सवासाठी एकूण रु.३०२३ कोटी मात्रच्या कृती आरखडयास मान्यता दिलेली आहे. परंतु सदरहू निधी अद्यापप्राप्त नाही. या महोत्सवामध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करणे व साईभक्तांना पायुभूत सोयीसुविधा पुरविणेकामी संस्थानचा मोठया प्रमाणावर निधी खर्च होणार असून संस्थानला निधीची कमतरता भासू शकते अशा पार्श्वभूमीवर साक्री, जि.धुळे येथील अपुर्ण जलसंधारण कामासाठी रक्कम रु.५० लाख निधी देणे उचित होणार नाही. सबब उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.१५** **छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालयास ५० बेड अनुदानस्वरुपात देणे.**

**प्रस्ताव-** मा.श्री अमल महादेवराव महाडिक, विधान सभा सदस्य, दक्षिण कोल्हापूर यांनी दि. १७.०६.२०१७ रोजी मा. ना. श्री.चंद्रकांत पाटील यांना पत्र लिहून छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालयास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडून५० बेड मिळणेबाबत शिफारस व्हावी असे सुचविले आहे. त्यानुसार मा. मंत्री महोदय यांनी दि. २१.०६.२०१७ रोजी, मा.श्री सुरेश हावरे, अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,

शिर्डी यांना पत्र पाठविले असून त्यात त्यांनी छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालयास संस्थानमार्फत ५० बेड मिळणेबाबत शिफारस केली आहे. सदर पत्रात आ. श्री महाडीक यांनी खालीलप्रमाणे विनंती केली आहे

कोल्हापूर शहरातील छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालय हे पश्चिम महाराष्ट्रातील एकमेव अग्रगण्य रुग्णालय असून, या ठिकाणी कोल्हापूर, सातारा, सांगली सिंधुदुर्ग, रत्नागिरी तसेच कर्नाटक सलग्न बेळगांव जिल्ह्यामधून अनेक रुग्ण उपचाराकरिता येतात तसेच हे रुग्णालय छत्रपती शाहू महाराज वैद्यकीय महाविद्यालयाशी सलग्न आहे.

या रुग्णालयामध्ये उपचाराकरिता येणा-या रुग्णांची संख्या ही दिवसेंदिवस वाढत असून या ठिकाणी मध्यमवर्गीय लोक मोठया प्रमाणात सेवेचा लाभ घेत आहेत. परंतु रुग्णांचा वाढता कल पाहता सध्य स्थितीत रुग्णालयामध्ये ४०० पेक्षा जास्त बेड हे सुयोग्य स्थितीत नसल्याने रुग्णांची मोठया प्रमाणात गैरसोय होत आहे.

तरी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडून ५० बेड मिळणेबाबत त्यांनी विनंती केलेली आहे. मात्र ५० बेडसाठी किती रक्कम आवश्यक आहे. याचा उल्लेख केलेला नाही.

**अर्थ साहाय्य करणेबाबत संस्थान अधिनियमातील तरतुद:-**

कलम २१ (२) पोट-कलमे (१) आणि (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर, विश्वस्तव्यस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रक्कमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्यांपेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईल मात्र यासाठी प्रथम शासन नियुक्त छाननी समितीची शिफारस घेणेआवश्यक आहे.

(एक) राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने, एखाद्या नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून कोणतीही शैक्षणिक संस्था, किंवा क्रिडा अकादमी वा संस्था सार्वजनिक वाचनालय, रुग्णालय, दवाखाना, निरीश्रित अथवा शारीरिक दृष्टया विकलांग व्यक्तीसाठी आधारगृह किंवा इतर धर्मादाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अथवा कला वा साहित्य क्षेत्राशी संबंधित असलेली एखादी नोंदणीकृत सार्वजनिक विश्वसुतव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांचेकडून अन्य कोणत्याही बिगर वाणिज्यिक सांस्कृतिक संघटनेची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अनुदान देण्याची तरतुद आहे." मात्र यासाठी प्रथम शासन नियुक्त छाननी समितीची शिफारस घेणे आवश्यक आहे.

**विभागाचा अभिप्राय :-**

अ) दररोज शासकीय/निमशासकीय कार्यालयाकडुन, नोंदणीकृत संस्थांचे, वैयक्तीकरित्या, वेगवेगळया कारणासाठी अनेक प्रकारचे अनुदान मागणी प्रस्ताव येत असतात. त्यामध्ये एकाच प्रस्तावाचा विचार करता येणार नाही.

आ) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी मार्फत रुग्णालयात स्वतंत्र अनुदान कक्ष स्थापन करण्यात आलेला आहे. त्या विभागामार्फत गरजू रूग्णांना वैद्यकीय मदत केली जात आहे. मात्र अशा प्रकारे एकाच हॉस्पिटला मदत केल्यास महाराष्ट्रातील अनेक हॉस्पिटला मदत मागण्याची शक्यता नाकारता येत नाही.

इ) आक्टोंबर २०१७ ते आक्टोंबर २०१८ या कालावधीत श्री साईशताब्दी वर्ष साजरे करण्याचा निर्णय व्यवस्थापन समितीने घेतलेला आहे. त्यासाठी विविध विकास कामांकरिता रु.३१८६ कोटी रुपयांचा कृतीआराखडा शासनास सादर केलेला आहे. संस्थानचा स्वतःचा निधीही त्यासाठी खर्च होणार असल्याने सबंधीतांना मदत देणे योग्यहोणार नाही. असे वाटते.

तरी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८०६** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवास दि.०१ आक्टोबर पासून प्रारंभ होत आहे मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखालील कृती आराखडा समितीने दि.३१.०३.२०१७ रोजी या महोत्सवासाठी एकूण रु.३०२३ कोटी मात्रच्या कृती आरखडयास मान्यता दिलेली आहे. परंतु सदरहू निधी अद्यापप्राप्त नाही. या महोत्सवामध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करणे व साईभक्तांना पायुभूत सोयींसुविधा पुरविणेकामी संस्थानचा मोठया प्रमाणावर निधी खर्च होणार असून संस्थानला निधीची कमतरता भासू शकते अशा पार्श्वभूमीवर छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालयास अनुदान स्वरुपात ५० बेड देणे उचित होणार नाही. सबब उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.१६** **सामान्य रुग्णालय, खामगाव, जि.बुलढाणा यांना रुग्णांचे नातेवाईकांकरिता निवारा इमारत बांधकामासाठी रक्कम रु.६४.३५ लाख मात्र अनुदान देणे.**

**प्रस्ताव-** मा.ना.श्री पांडुरंग फुंडकर मंत्री कृषी व फलोत्पादन, महाराष्ट्र राज्य यांनी दि. १७.०७.२०१७ रोजी मा. श्री सुरेश हावरे, अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांना पत्र पाठवून खालीलप्रमाणे विनंती केलेली आहे.

बुलढाणा जिल्हयातील खामगाव येथील, सामान्य रुग्णालय येथे मोठया प्रमाणात, आजुबाजुच्या खेडेगावातील गोर-गरीब रुग्ण वैद्यकीय उपचारासाठी येत असतात. त्यांचे सोबत त्यांचे नातेवाईक देखील येत असतात. त्यांना येथे निवा-यासाठी सामान्य रुग्णालयाच्या परिसरात एखादे निवारा बांधकाम करणे आवश्यक आहे. त्याकरिता सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत रु. ६४.३५ लाख किंमतीचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदरचा निधी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांचेकडून उपलब्ध करून दिल्यास रुग्णांसोबत येणा-या नातेवाईकांची तात्पुरत्या स्वरुपात निवासाची सोय करता येईल त्यासाठी रक्कम रु. ६४.३५ लाख मात्र निधी संस्थानकडून अनुदान स्वरुपात मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

**<u>अर्थ साहाय्य करणेबाबत संस्थान अधिनियमातील तरतुद</u>:-**

कलम २१ (२) पोट-कलमे (१) आणि (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर, विश्वस्तव्यस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रक्कमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्यांपेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईल मात्र यासाठी प्रथम शासन नियुक्त छाननी समितीची शिफारस घेणेआवश्यक आहे.

(एक) राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने, एखाद्या नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून कोणतीही शैक्षणिक संस्था, किंवा क्रिडा अकादमी वा संस्था सार्वजनिक वाचनालय, रुग्णालय, दवाखाना, निरीश्रित अथवा शारीरिक दृष्टया विकलांग व्यक्तीसाठी आधारगृह किंवा इतर धर्मादाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अथवा कला वा साहित्य क्षेत्राशी संबंधित असलेली एखादी नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांचेकडून अन्य कोणत्याही बिगर वाणिज्यिक सांस्कृतिक संघटनेची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अनुदान देण्याची तरतुद आहे." मात्र यासाठी प्रथम शासन नियुक्त छाननी समितीची शिफारस घेणे आवश्यक आहे.

**<u>विभागाचा अभिप्राय</u>:-**

अ) दररोज शासकीय/निमशासकीय कार्यालयाकडुन, नोंदणीकृत संस्थांचे, वैयक्तीकरित्या, वेगवेगळया कारणासाठी अनेक प्रकारचे अनुदान मागणी प्रस्ताव येत असतात. त्यामध्ये एकाच प्रस्तावाचा विचार करता येणार नाही.

आ) आक्टोंबर २०१७ ते आक्टोंबर २०१८ या कालावधीत श्री साईशताब्दी वर्ष साजरे करण्याचा निर्णय व्यवस्थापन समितीने घेतलेला आहे. त्यासाठी विविध विकास कामांकरिता रु.३१८६ कोटी रुपयांचा कृतीआराखडा शासनास सादर केलेला आहे. संस्थानचा स्वतःचा निधीही त्यासाठी खर्च होणार असल्याने सबंधीतांना मदत देणे योग्यहोणार नाही. असे वाटते.

तरी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८०७** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवास दि.०१ आक्टोबर पासून प्रारंभ होत आहे मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखालील कृती आराखडा समितीने दि.३१.०३.२०१७ रोजी या महोत्सवासाठी एकूण रु.३०२३ कोटी मात्रच्या कृती आरखडयास मान्यता दिलेली आहे. परंतु सदरहू निधी अद्यापप्राप्त नाही. या महोत्सवामध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करणे व साईभक्तांना पायुभूत सोयींसुविधा पुरविणेकामी संस्थानचा मोठया प्रमाणावर निधी खर्च होणार असून संस्थानला निधीची कमतरता भासू शकते अशा पार्श्वभूमीवर सामान्य रुग्णालय, खामगाव, जि.बुलढाणा यांना रुग्णांचे नातेवाईकांकरिता निवारा इमारत बांधकामासाठी रक्कम रु.६४.३५ लाख मात्र अनुदान देणे उचित होणार नाही. सबब उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.१७** **संस्थान आस्थापनेवरील सर्व स्थायी कर्मचाऱ्यांना भरपाई सुट्टी देणेकामी सेवाविनियमामध्ये दुरुस्ती करणे.**

**निर्णय क्र.८०८** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.१८** **संस्थान निधीतून शिर्डी नगरपंचायत हद्दीतील प्रथम प्राधान्य गटातील सहा रस्त्यांपैकी रस्ता क्र.९ (नगर-मनमाड रस्त्यापासून लक्ष्मीनगर वसाहतीतुन पुर्वेकडे जाणारा १८ मी. वळण रस्ता) चे उर्वरीत कामांबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:** अधिनियम कलम २१(२) अन्वये खालीलप्रमाणे तरतुद आहे.

*"...पोटकलम (१) आणी (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनासाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रकमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्यापेक्षा अधिक नसेल एवढा भाग समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरता व खर्च करता येईल :-*

*(दोन) स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयीमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डीनगरपंचायतीस सहाय्य करण्यासाठी."*

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय :** नि.क्र.२५९ दि.२७/०३/२०१७

**मा. शासन निर्णय :**

१) क्र. सासंवि-२००६/८७६/का.सोळा दि.०४/०९/२०१४ (अन्वये रु.८८ कोटी खर्चास मान्यता)

२) क्र.सासंवि-२००६/८७६/प्र.क्र.१३१/का.१६ दि.०८/०६/२०१७ (अन्वये रु.३०.७५ कोटी खर्चास मान्यता)

**प्रस्ताविक**: शिर्डी नगरपंचायतीने तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीस दि.२००६ मध्ये शिर्डी शहरातील रस्ते विकसीत करणेबाबत विनंती केली होती. त्यानुसार शिर्डी एकात्मिक रस्ते विकास योजनेतील प्रथम प्राधान्य गटातील ११ रस्त्यांपैकी ०५ रस्त्यांची कामे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, पुणे / मुंबई यांचेमार्फत जून, २०१२ अखेर विकसीत करणेत आले आहे. तसेच सदर प्रकल्पातील उर्वरीत ०६ रस्त्यांचे कामासाठी संस्थानमार्फत ठेकेदार मे. रोमन टारमॅट लि., नवी मुंबई यांना रु३३,८३,२६,१९९/- चा कार्यादेश देणेत आला होता. सदरहू रस्त्यांपैकी ०४ रस्त्यांची कामे सन २०१४ अखेर पूर्ण करण्यात आली असून, या प्रकल्पातील रस्ता क्र.०५ या रस्त्याचे सुरु असलेल्या कामास लगतच्या मालमत्ताधारकांनी घेतलेल्या हरकतींचे नगरपंचायतीकडून निवारण न झाल्याने व काही भागातील न्यायालयीन बाबींमुळे ठेकेदार यांना काम पूर्ण करता आले नाही. सदर रस्त्याचे एकुण १८०० मीटर लांबीपैकी सुमारे ९०० मीटर काम पूर्ण असून, उर्वरीत ९०० मीटर अंतरातील खडीकरण पूर्ण असून, डांबरीकरण व इतर अनुषंगीक कामे बाकी आहेत. रस्ता क्र.०९ चा लक्ष्मीनगरचा भाग व रस्ता क्र.०९ अ या रस्त्यांची भूसंपादन कार्यवाही पूर्ण होऊन, शिर्डी नगरपंचायतीमार्फत कामासाठी रस्ते उपलब्ध न झाल्याने ठेकेदार यांना सदरचे काम करता आलेले नाही. सदर प्रकल्पासाठी भूसंपादन व विकसनासाठी आजपावेतो एकुण रु.७०,०७,८४,४९९/- इतका खर्च झालेला आहे.

वरीलपैकी रस्ता क्र.०५ चे उर्वरीत काम पूर्ण करुन घेणेकामी ई-निविदा मागविणेस मा. व्यवस्थापन समितीचे समितीचे दि.२७/०३/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.२५९ अन्वये मान्यता देणेत आली. त्यानुसार सदर रस्त्याचे उर्वरीत कामासाठी (डांबरीकरण व इतर अनुषंगीक काम) विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून, रु.१,४२,६२,६५५/- मात्रचे कामासाठी निम्नतम दराचे ठेकेदार अमोल कन्स्ट्रक्शन अॅड कं. देवळाली प्रवरा यांना दि.०१/०९/२०१७ अन्वये कार्यादेश देण्यात आला आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील विविध निर्णयानुसार शासनमान्यतेसाठी सादर करणेत आलेल्या प्रस्तांवानुसार शिर्डी एकात्मिक रस्ते विकास योजनेतील प्रथम प्राधान्य गटातील उपरोक्त एकूण ११ रस्ते संस्थान निधीतुन विकसित करणेचे प्रस्तावास व रु.८८ कोटी मात्रचे खर्चास उपरोक्त दि.०४/०९/२०१४ रोजीचे शासन निर्णयान्वये मान्यता देणेत आलेली आहे. त्यानंतर सदरहू प्रकल्पासाठी रस्ते भूसंपादनासाठी प्रलंबीत असलेल्या दाव्यातील निर्णयानुसार देय असणा-या व्याजाच्या रकमेसह वाढीव खर्चास (रु.३०,७५,३३,१४५/-) दि.०८ जून, २०१७ रोजीचे आदेशान्वये मान्यता दिलेली आहे. त्यामध्ये सदरहू प्रकल्पातील रस्ता क्र.०५ व ९ चे उर्वरीत काम पूर्ण करणे व रस्ता क्र.९ अ चे भूसंपादन व विकसन खर्चाचा समावेश आहे.

विषयांकीत रस्ता क्र.९ चे एकूण ८४० मी. लांबीपैकी ६४० मी. रस्त्यांचे काम पूर्ण असुन सदर रस्ता वापरात आहे. या रस्त्याचा लक्ष्मीनगर व लगतचा भाग तसेच चेनेज ८४० जवळील भाग नगरपंचायतीमार्फत भूसंपादन कार्यवाही पूर्ण होवून कामासाठी उपलब्ध न झाल्याने ठेकेदार रोमन टारमॅट लि. यांना सदरचे काम करता आलेले नाही. रस्ते विकसीत करणेचे कामाबाबत लेखापरीक्षणाचे वेळी लेखापरीक्षकांनी भूसंपादन करून जागा ताब्यात मिळाल्यानंतर ई-निविदा काढण्यात याव्यात अशा सूचना केलेल्या आहेत.

लक्ष्मीनगर वसाहतीतील भूसंपादन करण्यात आलेल्या जागेत विषयांकीत रस्ता क्र.०९ या रस्त्याचे १८ मी. रुदीचे व उर्वरीत २०० मी. लांबीत कॉक्रीटीकरण व इतर अनुषंगिक कामे करणेसाठी प्रचलित सन २०१६-१७ चे जिल्हा दरसूचीनुसार रु.१,३४,६९,०३४/- खर्च अपेक्षित आहे.

**प्रस्ताव** : शिर्डी नगरपंचायतीने रस्ता क्र. ९ (नगर मनमाड रस्त्यापासून लक्ष्मीनगर वसाहतीतुन पुर्वेकडे जाणारा १८ मी. वळण रस्ता) चे उर्वरीत कामासाठी रस्ता उपलब्ध करून दिल्यानंतर सदर रस्त्याचे कामासाठी ई-निविदा मागविता येतील.

तरी सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८०९** **यावर सविस्तर चचा्र होऊन, शिर्डी नगरपंचायत हद्दीतील प्रथम प्राधान्य गटातील सहा रस्त्यांपैकी रस्ता क्र.९ (नगर-मनमाड रस्त्यापासून लक्ष्मीनगर वसाहतीतुन पुर्वेकडे जाणारा १८ मी. वळण रस्ता) वरील अतिक्रमण शिर्डी नगरपंचायतीने काढून दिल्यानंतर, तो संस्थान निधीतून विकसीत करणेबाबतची पुढील कार्यवाही करणेत यावी.** (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग)

---

**विषय नं.१९** **साई नॉलेज पार्क प्रकल्पाचे करणेकामी प्रकल्प सल्लागार नेमणूक करणेसाठी प्राप्त ई-प्रस्तावाचे वाणिज्यीक देकार उघडून त्यावर निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.८१०** दि.२१.०९.२०१७ रोजीच्या स्थानिक उपसमिती सभेसमोर साई नॉलेज पार्क प्रकल्पाचे करणेकामी प्रकल्प सल्लागार नेमणूक करणेसाठी प्राप्त ई-प्रस्तावाचे वाणिज्यीक देकार उघडून निर्णय झालेला असल्यामुळे सदरहू स्थानिक उपसमितीचे इतिवृत्त कायम करतेवेळी या विषयावर चर्चा करणेत यावी, असे ठरले.

(कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग)

---

**विषय नं.२०** **शिर्डी बसस्थानक व भक्तनिवास इमारतीतील मध्यवर्ती ओपन-टु-स्काय भागावर पॉलिकार्बोनेट डोमचे छत करणे.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-** अधिनियमाचे कलम – १७ (१) चे तरतुदीनुसार भक्तांना सोयी सुविधा पुरविणे हे व्यवस्थापन समितीचे कर्तव्य असल्याने महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग शासन निर्णय क्र.सासंवि.२००६/६०७/(८७) का.सोळा, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२ दि.१३/०१/२००९ अन्वये शिर्डी येथील बसस्थानक अत्याधुनिक पध्दतीने बांधण्याकरीता रु.७,६५,५०,८९८/- मात्र इतक्या खर्चास शासन मान्यता देण्यात आली आहे.

**प्रस्तावना:-** शिर्डी येथिल सर्व्हे क्र.१७१ मधील जागेवर संस्थान निधीतून बसस्थानक व त्यावरील भक्तनिवास इमारतीचे बांधकाम श्री साईबाबा संस्थानतर्फे ठेकेदार मे. पाटील कन्स्ट्रक्शन ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर लि., पुणे यांचे मार्फत पूर्ण करण्यात आले आहे. सदर प्रकल्पासाठी मंजूर निविदा रक्कम रु.७,६०,९०,०८९/- मात्र इतकी आहे. परंतू सदरचे खर्चात बचत होईल असा अंदाज आहे.

सदरहु बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे मंजूर आराखडयामध्ये ओपन टु स्काय कोर्टयार्ड दर्शविणेत आलेले आहे. त्यानुसार बस स्थानक इमारतीचे बांधकाम करणेत आलेले आहे. या प्रकल्पाचे आर्किटेक्ट काबरे चौधरी आर्किटेक्टस, नाशिक यांनी पावसाचे पाणी आत मध्ये येऊ नये याकरीता सदरचे ओपन टू स्काय कोर्टयार्डवर पॉली कार्बोनेट सिटचे छत उभारणेबाबत कळविले आहे. तसेच याकामी खर्चाचे अंदाजपत्रक व नकाशे सादर केले आहेत. त्यानुसार सदर कामासाठी अंदाजे रु.११,३६,६००/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. तसेच विभाग नियंत्रक, रा.प.अहमदनगर यांनी पावसाचे पाणी आत येत असल्याने सदरहू ओपन टू स्काय कोर्टयार्डवर छत उभारणेबाबत दि.१२/०६/२०१७ रोजीचे पत्रान्वये मागणी केली आहे.

आर्किटेक्ट यांनी दि.२६/०७/२०१७ रोजी सादर केलेल्या अंदाजपत्रकानुसार उपरोक्तप्रमाणे ओपन टू स्काय कोर्टयार्डवर पॉली कार्बोनेट डोमचे छत उभारणेकामी अंदाजे रु.११,३६,६००/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. शिर्डी बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे सुरु असलेल्या बांधकामाचा खर्च वर नमूद शासन मान्यता रक्कम रु.७,६५,५०,८९८/- मात्रचे मर्यादेत राहून प्रत्यक्ष खर्चात काही प्रमाणात बचत होईल असा अंदाज आहे.

याप्रमाणे शिल्लक राहणा-या मंजूर रकमेतून उपरोक्त खर्च करता येईल. शिर्डी बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचा तसेच परिसर विकास कामासाठी होणा-या खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | कामाचा तपशिल | अपेक्षित खर्च |
|---|---|---|
| ०१ | शिर्डी बसस्थानक इमारत सिव्हील वर्क (अकरावे रनिंग बील + भावफरक बील + अंतीम बील अंदाजे १५ लक्ष) | ६,५४,५९,१५६/- |
| ०२ | स्ट्रिट लाईट केबलकरीता आर सी सी पाईप लाईन टाकणे व त्यावरील चेंबरचे बांधकाम करणे. | ५,०४,९१५/- |
| ०३ | बसस्थानक इमारती व परिसर विद्युतीकरणाचे काम | ४९,०९,९६३/- |
| ०४ | सोलर सिस्टीम बसविणे. | १३,००,०००/- |
| ०५ | दोन लिफ्टची व्यवस्था करणे. | २५,००,०००/- |
| ०६ | जनरेटर व पॅनलकरीता शेड उभारणे. | २,००,०००/- |
| | एकूण अपेक्षित खर्च रु. | ७,४८,७४,०३४/- |
| | **एकूण अपेक्षित पुर्णांकीत रक्कम रु.** | **७,५०,००,०००/-** |
| | **शासन मान्यते पैकी शिल्लक राहणारी अंदाजे रक्कम रु.** | **१५,५०,८९८/-** |

उपरोक्त प्रमाणे शिर्डी बसस्थानक प्रकल्पासाठी मान्यता देण्यात आलेल्या खर्चामध्ये अंदाजे रु.१५.५० लक्ष मात्र बचत होणार आहे. तसेच सदर नियोजित पॉलिकार्बोनेट शीटचे छत हे पक्क्या (आर सी सी) स्वरुपाचे नाही ते अर्धपारदर्शक असल्याने काही प्रमाणात सुर्यप्रकाशही येईल. त्यामुळे सदर छताचे कामासाठी शिर्डी नगरपंचायत यांचे बांधकाम परवानगीची आवश्कता नाही, असे मत आहे.

आर्किटेक्ट यांनी दि.१६/०३/२०१६ रोजीचे पत्रान्वये सदरहू कोर्टयार्डवर पॉलीकार्बोनेट शिटचे छत केल्यास तळमजल्यावरील हॉल व त्यावरील मजल्याचे पॅसेजमध्ये पावसाचे पाणी येणार नाही, त्यासाठी पॉलीकार्बोनेट शिटचे छत तयार करणे आवश्यक आहे असे नमूद केले आहे. सदर आयटेमचा इमारत बांधकामाचे निविदेमध्ये समावेश केलेला नव्हता. पावसाचे पाणी येऊ नये, तसेच प्रवाशांची व भक्तांची गर्दी वाढल्यास त्यांना थांबण्यासाठी वापर करता यावा यासाठी सदरचे छत तयार करणे आवश्यक आहे.

तरी सदर कामासाठी येणा-या खर्चास राज्य शासनाची मान्यता घ्यावी किंवा कसे याबाबत निर्णय होणेस, तसेच याकामी येणारे अंदाजे रु.११,३६,६००/- मात्र इतके खर्चास व सदरचे कामासाठी विहीत पध्दतीने ई- निविदा मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.८११** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी बसस्थानक व भक्तनिवास इमारतीतील मध्यवर्ती ओपन-टु-स्काय भागावर प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे पॉलिकार्बोनेट डोमचे छत तयार करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.११,३६,६००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. परंतु सदरहू निर्णयावर कार्यवाही करणेपुर्वी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची परवानगी घेण्यात यावी व शासन आदेशानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग)

---

**विषय नं.२१** **कामगार अधिकारी हे पद प्रतिनियुक्ती भरणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.त्रिसदस्य समितीचे दिनांक २७.१०.२०१५ चे सभेतील निर्णय क्र.४२५ व मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे दिनांक ०४ मार्च, २०१६ चे आदेशानुसार संस्थानचे विधी अधिकारी, कामगार अधिकारीव कनिष्ठ कामगारअधिकारी ही रिक्त पदे सरळ सेवेने भरणेकामी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द करुन दिनांक ३०.०४.२०१६ अखेर अर्ज मागविणेतआलेले होते.

सदर जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या अर्जांची तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे –

| अ.न | पदनाम | दिनांक ३०.०४.२०१६ अखेर आलेले अर्ज | मुदतीनंतर आलेले अर्ज | एकूण अर्ज |
|---|---|---|---|---|
| ०१. | विधी अधिकारी | २५ | ०१ | २६ |
| ०२. | कामगार अधिकारी | ४० | ०० | ४० |
| ०३. | कनिष्ठ कामगार अधिकारी | ४४ | ०२ | ४६ |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या अर्जांवर कार्यवाही करणेकामी मा.मुंबई उच्च न्यायालय,खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील दिनांक०४ मार्च, २०१६ रोजीचेआदेश, मा. शासनाचे विधी व न्याय विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील दिनांक२५ ऑक्टोबर २०१६ रोजीचा अभिप्राय तसेच मा.प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर यांचेकडील दिनांक१० जानेवारी, २०१७ रोजीचेअभिप्राय इत्यादी सर्व बाबींवर संस्थान ॲडव्होकेट पॅनलवरील ॲड.नितीन भवर औरंगाबाद यांनी दिनांक१५.०२.२०१७ रोजीचे पत्रान्वये दिलेल्या अभिप्रायानुसार, संस्थानचे प्रशासकीय कामकाज पहाणेकामी शासनाने नव्याने नियुक्त केलेल्या मा.व्यवस्थापन समितीने संबधित विषयातील तज्ञांची एक निवड समिती स्थापनकरुन भरतीची निवड प्रक्रिया अमलात आणूनपूढील कार्यवाही करणेबाबतचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक२५.०२.२०१७ रोजीचे सभेपूढे सादर करणेत आला होता.त्यावर समितीने निर्णय क्र.१३९ खालीलप्रमाणे घेतलेला आहे.

निर्णय क्र.१३९- यापूर्वी निर्णय क्र. ४४ मध्ये समिती सदस्य तथा जेष्ठ कायदेतज्ञ मा.ॲड.मोहन जयकर यांचे अध्यक्षतेखाली गठीत करणेत आलेल्या उपसमितीने विधी अधिकारी, कामगार अधिकारी व कनिष्ठ कामगार अधिकारी ही पदे सरळ सेवेने भरणेची कार्यवाही पूर्ण करावी, असे ठरले.

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २५.०२.२०१७चे सभेतील निर्णय क्र. ४४ खालीलप्रमाणे पारित झालेला आहे.

निर्णय क्र.४४- यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.उच्च न्यायालयमुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे श्री साईबाबा संस्थानचे पॅनलवर ॲडव्होकेट म्हणून नियुक्ती करणेकामी ॲडव्होकेटच्या मुलाखती घेणेकामी समिती सदस्य तथा जेष्ठ कायदेतज्ञ ॲड.मोहन जयकर यांचे अध्यक्षतेखाली मा.श्री चंद्रशेखर कदम.मा.श्री भाऊसाहेब वाकचौरे,मा.श्री बिपीनदादा कोल्हे व मा.श्री सचिन तांबे यांची विधी समिती गठीत करण्यात आली.या उपसमितीने उपरोक्त कामी प्राप्त अर्जदाराच्या अर्जाची छाननी करुन लेखी/तोंडी परिक्षा घ्यावीव त्यानुसार उमदेवारांची निवड करुन अंतिम निर्णयार्थ प्रस्ताव समितीसमोर सादर करावा असे ठरले.

मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयास अनुसरुन विधी अधिकारी, कामगार अधिकारी व कनिष्ठ कामगार अधिकारी या पदासाठी प्राप्त झालेले अर्ज प्र.अधिक्षक व प्रशासकीय अधिकारी,सामान्य प्रशासनविभाग यांनी मा.ॲड.मोहन जयकर यांचेकडून दिनांक११.०३.२०१७ रोजी मुंबई येथील कार्यालयात पडताळणी करुन घेतले असून जाहिरातीनुसार खालीलप्रमाणे अर्ज पात्र/अपात्र करण्यात आलेले आहेत.

| **अ.न** | **पदनाम** | **पात्र /अपात्र** |
|---|---|---|
| ०१. | विधी अधिकारी | ०६ अर्ज पात्र |
| ०२. | कामगार अधिकारी | सर्व अर्ज अपात्र |
| ०३. | कनिष्ठ कामगार अधिकारी | सर्व अर्ज अपात्र |

उपरोक्त प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २८.०४.२०१७ रोजीचे सभेत सादर करण्यात आला असता, त्यावर निर्णय क्र.२८७ खालीलप्रमाणे पारित झाला आहे .

निर्णय क्र.२८७- यावर सविस्तर चर्चा होऊन संस्थानमधील विधी अधिकारी या पदासाठी सहा उमेदवार पात्रआहेत.त्यामूळे सदरहू पद भरणेकामी प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली. तसेच कामगार अधिकारी व कनिष्ठ कामगार अधिकारी या पदांसाठी आलेल्या अर्जामधील एकही उमेदवार पात्र ठरलेला नाही. याकरीता ही पदे सरळसेवेने भरणेकामी सेवा प्रवेश नियमातील तरतूदींचा फेरआढावा घेण्यात येऊन, पुनश्च वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात यावी, असे ठरले.

संस्थान आस्थापनेवर एकूण ३९ विभाग कार्यरत असून या विभागात एकूण २०६० कर्मचारी कार्यरत आहेत. संस्थानकडे कामगार अधिकारी व कनिष्ठ कामगार अधिकारी या पदांवर कर्मचारी कार्यरत होते परंतू कामगार अधिकारी या पदावरील कर्मचा-याची पदोन्नती झाली तसेच कनिष्ठ कामगार अधिकारी या पदावरील कर्मचारी सेवानिवृत्त झाल्याने सदर पदे सध्या रिक्त आहेत. त्यामूळे संस्थान कामकाजात अडचण येत आहे.

संस्थान आस्थापनेवरील स्थायी कर्मचा-यांच्या विविध कोर्टात चालू असलेल्या कोर्ट केसेस, सहाय्यक कामगार आयुक्त, उप कामगार आयुक्त यांचेसमोर कर्मचा-यांचे तक्रार अर्जाबाबत समेट प्रकरणे, खातेचौकश्या, गैरशिस्त वर्तन प्रकरणे, शिकाऊ उमेदवार नियुक्ती व कंत्राटी कर्मचारी संदर्भातील कामे इत्यादी प्रकरणांचे कार्यवाही करणेकामी कामगार अधिकारी तातडीने नेमणे आवश्यक आहे. सध्या सेवा प्रवेश नियम, बिंदुनामावली अंतिम करणेची कामे चालू आहे त्यामुळे कामगार अधिकारी व कनिष्ठ कामगार अधिकारी ही पदे सरळसेवेने भरणेकामी सेवा प्रवेश नियमातील तरतुदींचा फेर आढावा घेणेत येऊन, पुनश्च: वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द

करुन प्राप्त होणा-या अर्जातील पात्र उमेदवारांची स्पर्धा परीक्षा घेणे, मुलाखती घेऊन त्यांची निवड करणे या प्रक्रियेला बराच कालावधी लागणार आहे.

याकरीता कामगार अधिकारी या पदावर शासनाचे कामगार विभागाकडून प्रतिनियुक्तीवर अधिकारी घेणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८१२** **यावर सविस्तर चचा्र होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कामगार अधिकारी या पदावर शासनाचे कामगार विभागाकडून प्रतिनियुक्तीवर अधिकारी घेणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.२२** **श्री साईबाबा संस्थानला देणगी स्वरुपात मिळणाऱ्या परकीय चलनाच्या कार्यपध्दतीबाबत.**

**प्रस्ताव-** मंदीर व मंदीर परिसरातील दक्षिणा पेटयांची मोजणी आठवडयातून दोन वेळेस होत असते. दक्षिणापेटया उघडून त्यामध्ये रोख रक्कम, सोने-चांदी अलंकार वस्तु, तांबे पितळ वस्तु, कापड व इतर किरकोळ वस्तु प्राप्त होत असतात. त्याचबरोबर विदेशी चलनातील नोटा व नाणीदेखील प्राप्त होत असतात. तसेच देणगीस्वरूपात देश विदेशातून परकीय चलन प्राप्त होत असते. परकीय चलन, विनिमयन झालेल्या नोटा व नाणी यांची प्रचलीत कार्यपध्दती पुढील प्रमाणे.

**अ) नोटाः-** टपालाद्वारे व दक्षिणापेटी मोजणीमध्ये निघालेले सर्व विदेशी चलनातील नोटा उपरोक्त संदर्भ क्र. १ च्या मा. व्यवस्थापन मंडळाच्या सभेतील निर्णय क्र. ४४० अन्वये लेखाशाखेकडे नोंद करून, बँक ऑफ बडोदा, नाशिक ही संस्थानची परकीय चलनातील व्यवहारासंबधीची नोंदणीकृत बँक असल्याने, त्यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येतात. विदेशी चलनाची भारतीय चलनात होणारी रक्कम बँक ऑफ बडोदा, नाशिक येथे असलेल्यासंस्थानच्या परकीय चलन खात्यात (Foreign Currency A/c.) जमा केली जाते. मात्र भरणा करण्यात आलेल्यापरकीय चलनातील नोटांपैकी काही नोटांचे जागतीक पातळीवर मूल्य कमी असल्याने अशा न चालण्या-या नोटा, तसेच फाटक्या व खराब नोटा बँक स्विकारीत नाहीत.

**ब) विनिमय न झालेले चलनः-** संस्थानकडे बँकेकडून परत आलेल्या, अशा विदेशी चलनातील न चालणा-या तसेच फाटक्या व खराब नोटा पडून राहण्याऐवजी, उपरोक्त संदर्भ क्र.३ च्या मा. त्रिसदसीय समितीच्या सभेतील निर्णय क्र. ५९ अन्वये लेखाशाखेकडे नोंद करून, बँक ऑफ बडोदा, नाशिक यांचेमार्फत मुंबई येथील अधिकृत परकीय चलन एजन्सी मे. कॉक्स अॅन्ड किंग्ज प्रा. लिमिटेड, मुंबई (Cox and Kings (I) Pvt. Ltd. Mumbai) यांचेकडे वटविण्याच्या हमीवर (Collection Basis) पाठविण्यात येत असतात. तदनंतर मे. कॉक्स अॅन्ड किंग्ज प्रा. लिमिटेड, मुंबई यांचेकडून त्याबदल्यात येणारी भारतीय चलनातील रक्कम बँक ऑफ बडोदा, नाशिक यांचेमार्फत तपासून घेऊन ती संस्थानच्या परकीय चलन खाते जमा करण्यात येत असते. सन-२०१६-१७ या आर्थिक वर्षात फाटलेल्या व न चालणा-या विदेशी चलनातील नोटांपासुन साधारणपणे रुपये ८६,५५१/- ( अक्षरी रुपये शहाऐंशी हजार पाचशे एकावन रुपये मात्र) एवढी रक्कम मिळाली आहे.

**क) नाणीः-** तसेच दक्षिणापेटी मोजणीच्या वेळी साधारणतः विस ते पंचविस देशांचे परकीय चलनातील नाणी प्राप्त होत असतात. त्या नाण्यांची विगतवारी देखील उपरोक्त संदर्भ क्र.२ च्या मा. व्यवस्थापन मंडळाच्यासभेतील निर्णय क्र. ४८६ अन्वये लेखाशाखेकडे नोंद करून,बँक ऑफ बडोदा, नाशिक यांचेमार्फत मुंबई येथील अधिकृत परकीय चलन एजन्सी मे. कॉक्स अॅन्ड किंग्ज प्रा. लिमिटेड,(Cox and Kings (I) Pvt. Ltd. Mumbai) यांचे प्रतिनीधी मार्फत करण्यात येते. विगतवारी करण्यात आलेल्या परकीय नाण्यांची यादी तयार करुन त्याची एक प्रत बँक ऑफ बडोदा व एक प्रत कॉक्स अॅन्ड किंग्ज प्रा. लि. मुंबई यांना दिली जाते दिलेल्यायादीतील परकीय नाण्याची भारतीय चलनात होणारी रक्कम कॉक्स अॅन्ड किंग्ज, मुंबई हे बँक ऑफ बडोदा,नाशिकमार्फत संस्थानला कळवितात. तदनंतर संस्थानची मान्यता मिळालेनंतर सदर परकीय चलनाची भारतीय चलनात होणारी रक्कम, बँक ऑफ बडोदा, नाशिक येथील संस्थानच्या परकीय चलन खात्यामध्ये जमा केली जाते. सदर रक्कम जमा झाल्यानंतर वीगतवारी करुन ठेवलेले परकीय चलनातील नाणी बँक ऑफ बडोदा, नाशिक यांचे मार्फत कॉक्स अॅन्ड किंग्ज प्रा. लि. मुंबई यांना दिले जातात सन-२०१६-१७ या आर्थिक वर्षात परकीय नाण्यापासुन साधारणपणे रुपये ३,९७,०५३/- ( अक्षरी रुपये तिन लाख सत्याण्णव हजार त्रेपन्न रुपये मात्र) एवढी रक्कम मिळाली आहे.

उपरोक्त **अ ब व क** मध्ये नमुद केलेली कार्यपध्दती येथून पुढे ही सुरू ठेवणे बाबतच्या प्रस्तावा वर निर्णय होणे कामी सवीनय सादर.

**निर्णय क्र.८१३** **श्री साईबाबा संस्थानला देणगी स्वरुपात मिळणाऱ्या परकीय चलनाची कार्यपध्दतीबाबतचा सदरहू प्रस्ताव उपरोक्त निर्णय क्र.८०३ अन्वये गठीत करणेत आलेल्या समितीसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.२३** **सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता एल.आय.सी. ग्रुप ग्रॅच्युटी इन्शुरन्स स्कीम नुतनीकरणाबाबत.**

**प्रस्ताव-** दि.२२-२३/०९/२००१ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेतील निर्णय क्र. ४१८ अन्वये, दिनांक ०१ ऑक्टोबर, २००१ पासुन संस्थान कर्मचाऱ्यासांठी एल.आय.सी. ग्रुप ग्रॅच्युटी योजना (Policy No.635692) लागु करण्यात आलेली आहे. तसेच निर्णय क्र. ९३ दि.१२/०३/२०१५ अन्वये दिनांक ०१ एप्रिल, २०१५ पासुन IRDA च्या नियमानुसार नवीन कर्मचाऱ्यांसाठी नवीन ग्रुप ग्रॅच्युटी योजना (Policy No.709002248) लागु करण्यात आलेली आहे.

सदर दोन्हीही योजनेंचे नुतनीकरण दरवर्षी ऑक्टोबर महिन्यात करण्यात येत असते. नुतनीकरण करताना त्या वर्षाच्या अंशदानाची रक्कम, लाईफ कव्हर प्रिमीयम आदा करण्यात येतो. मागिल वर्षी मा.व्यवस्थापन सभेतील निर्णय क्र.६७८, दि.१९.०९.२०१६ अन्वये रु.२.८५ कोटी रक्कम डिपॉझीट व प्रिमीयम म्हणून भरण्यास मान्यता मिळाली होती. चालू वर्षासाठी एल.आय.सी.ऑफ इंडीया, पुणे यांनी दि.०८.०९.२०१७ चे ई-मेलद्वारे खालीलप्रमाणे रक्कम ग्रुप ग्रॅच्युटी योजनेत डिपॉझिट करणेबाबत कळविलेले आहे.

| Policy No:GGCA/635692 | | | Policy No:NGGCA/709002248 | | |
|---|---|---|---|---|---|
| **Sr** | Premiun Detail | Amount | Sr | Premiun Detail | Amount |
| 1 | Current Year Contribution | 2,10,47,305.00 | 1 | Current Year Contribution | 6,11,448.00 |
| 2 | Life Cover Premium | 18,58,210.00 | 2 | Life Cover Premium | 45,321.00 |
| 3 | GST | 3,34,478.00 | 3 | GST | 8,158.00 |
| 4 | Additional Contribution to Gratuity Fund | 61,73,421.00 | 4 | Additional Contribution to Gratuity Fund | 1,92,092.00 |
| | Total Amount Payable | 2,94,13,414.00 | | Total Amount Payable | 8,57,019.00 |
| | **Total Amount Payable for both Policies** | | | | **3,02,70,433.00** |

उपरोक्त नमुद रक्कम संस्थानचा खर्च नसुन एलआयसी ग्रुप ग्रॅच्युटी योजनेत गुंतवणुक म्हणुन होते व त्यावर वार्षिक ८.२५% सरासरी दराने व्याज जमा होते. अशाप्रकारे ३१/०३/२०१७ अखेर ग्रॅच्युटी फंडात एकुण रक्कम रु.४७,२१,८१,५३४/-मात्र जमा असून मागिल वर्षी त्यावर रक्कम रु.३,५८,२६,४९७/- मात्र व्याज जमा झाले होते. यामधून ४३ निवृत्त झालेल्या/राजीनामा दिलेल्या कर्मचाऱ्यांना ग्रॅच्युटी फंडातील व्याजातून रक्कम रु.२,४६,८०,८६९/- मात्र ग्रॅच्युटी म्हणुन देण्यात आली व १० मयत झालेल्या कर्मचाऱ्यांना (वारसांना) त्याच्या उर्वरीत सेवेच्या प्रमाणात क्लेमची रक्कम रु.१५,६२,३२८/- मात्र ग्रॅच्युटी फंडातील रक्कमेव्यतीरिक्त क्लेम म्हणून प्राप्त झाली. तरी सालाबादप्रमाणे एलआयसी, पुणे यांचेकडून उपरोक्त संदर्भिय पत्राद्वारे कळविलेली रक्कम रु.३,०२,७०,४३३/-मात्र एवढी होते. पुर्णांकीत रक्कम रु.३,०३,००,०००/- *(अक्षरी रुपये तीन कोटी, तीन लाख)* मात्र एल.आय.सी. ग्रुप ग्रॅच्युटी फंडात RTGS द्वारे वर्ग करण्यास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.८१४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे रु.३,०३,००,०००/- मात्र रक्कम एल.आय.सी. ग्रुप ग्रॅच्युटी फंडात RTGS द्वारे वर्ग करण्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.२४** **अमृतसागर सहकारी दुध व्यावसायिक व प्रक्रिया संघ मर्यादित, अकोले यांचेकडून दुध व दुग्धजन्य पदार्थ पुरवठा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अमृतसागर सहकारी दूध व्यावसायिक व प्रक्रिया संघ मर्यादित, अकोले यांनी दि.१७.०६.२०१७ रोजीचे पत्राव्दारे आमचा संघ आदीवासी भागामध्ये दुध संकलन व वितरणाचे काम गेली ४० वर्षापासून करत असून संकलीत झालेले दुधापासून गणवत्ता वर्धक व दर्जेदार असे दुध, श्रीखंड, दही, ताक, पनीर, लस्सी, व पेढा इत्यादी दुधजन्य पदार्थाची निर्मिती करत आहे. आमचे संघाचे सर्व प्रक्रिया युक्त दुध व दुधजन्य उत्पादने राज्यभर “अगस्ती” ब्रॅंड या नावाने बाजारपेठेमध्ये विकले जात आहे. तरी आपले संस्थानसाठी लागणारे दुध व दुधजन्य पदार्थ आम्ही

आमचे संघामार्फत वाजवी दरामध्ये आपले संस्थानास पुरवठा करणेस इच्छुक आहोत. तरी कृपया आमचे संघास आपले संस्थानास दुध व दुध जन्य पदार्थ पुरवठा करणेची संधी द्यावी, अशी विनंती केलेली आहे.

मा. उपाध्यक्ष श्री.चंद्रशेखर कदम साहेब यांनी अमृतसागर सहकारी दूध व्यावसायिक व प्रक्रिया संघ मर्यादित, अकोले यांचे सदर पत्रावर "मिटींगपुढे ठेवावे" असे निर्देश दिलेले आहेत. सोबत पत्र अवलोकनार्थ सादर केलेले आहे.

याबाबतची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे –

संस्थानकडून दूध वार्षिक ई-निविदा प्रक्रियेव्दारे खरेदी केले जाते. संस्थानची २०१७-१८ ची फेर ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन, मा.व्यवस्थापन समितीचे चक्रीय पध्दतीचे अजेंडयानुसार याकामी मान्यता मिळालेली आहे व न्यूनतम दरधारकांना पुरवठा आदेश देण्यात आलेले आहेत. तसेच संस्थानकडून इतर दुधजन्य पदार्थ किरकोळ स्वरुपात विकत घेतले जात नाहीत.

तथापि अमृतसागर सहकारी दूध व्यावसायिक व प्रक्रिया संघ मर्यादित, अकोले यांचे पत्रावरील मा. उपाध्यक्ष महोदय यांचे निर्देशानुसार सदरचा विषय माव्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.८१५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, अमृतसागर सहकारी दुध व्यावसायिक व प्रक्रिया संघ मर्यादित, अकोले यांचे दुध व दुग्धजन्य पदार्थ खरेदी करणेसाठी, त्यांना पुढील वार्षिक खरेदी प्रक्रियेमध्ये सहभागी होणेबाबत कळविणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं.२५** **मे.स्प्रिती प्रॉडक्टस् प्रा.लि., साहा, अंबाला (हरियाणा) यांचे शुध्द तुप प्रोसेसिंग प्लँटला भेट दिलेचे अहवालाबाबत.**

**प्रस्ताव-** सन २०१७-१८ वर्षाकरीता गाईचे शुध्द तूप खरेदीकामी संस्थानन फेर ई-निविदा प्रक्रिया केली होती. यामध्ये मे.स्प्रिती प्रॉडक्ट्स प्रा.लि., अंबाला यांचे गाईचे शुध्द तूपासाठीचे तीन टप्प्याचे दर न्युनतम होते. याकामी मा.व्यवस्थापन समितीचे सभेत "मे.स्प्रिती प्रॉडक्ट्स प्रा.लि., अंबाला यांना ३ महिन्यांसाठी प्रायोगिक तत्वावर गाईचे शुध्द तूप पुरवठा करणेकामी पुरवठा आदेश देण्यात यावा, त्याचप्रमाणे इच्छुक असणारे स्थानिक समिती सदस्य व संस्थान अधिकारी यांनी मे.स्प्रिती प्रॉडक्ट्स प्रा.लि., अंबाला यांच्या प्लॅन्टला भेट देऊन संस्थानला शुध्द तूप पुरविणेकामी ते सक्षम आहेत का? याची पाहणी करावी." असा निर्णय झाला होता.

मा.व्यवस्थापन समितीचे वरील निर्णयास अनुसरून मा.व्यवस्थापन समितीचे मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष व सर्व माननीय सदस्यांना मे.स्प्रिती प्रॉडक्ट्स प्रा.लि., साहा,अंबाला यांचे प्लॅंटला भेट देणेबाबत इच्छुक असल्यास दोन दिवसांत कळविणेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/२३०५/२०१७ दि.२८.०७.२०१७ चे पत्रान्वये कळविण्यात आले होते.

मा.सदस्य श्री.राजेंद्र सिंग यांनी दि.२९.०७.२०१७ चे पत्रान्वये भेट देणेकामी त्यांना शक्य नसलेबाबत कळविले होते. तसेच मा.उपाध्यक्ष श्री.कदम साहेब यांनी सदर भेटीसाठी दि.१०.०८.२०१७ ही तारीख निश्चित केली होती. त्यास अनुसरून सदर तारखेस मा.सदस्यांना याकामी वेळोवेळी दुध्वनी वरून संपर्क साधुन वेळ देणेबाबत विनंती केली होती.

मा.श्री.वाकचौरेसाहेब, मा.श्री.बिपीनदादा कोल्हे व मा.श्री.जयकरसाहेब यांनी सदर तारखेस आम्ही दिल्लीत आहोत, शक्य झाल्यास आम्ही तेथे येऊ असे सांगितले होते. मा.सौ शेळकेमॅडम यांनी त्यांना वेळेअभावी अंबाला येथे येणे शक्य नसल्याचे सांगितले होते. मा.श्री प्रताप भोसले साहेब यांनी अंबाला येथे येणेबाबत Confirmation दिले होते.

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मुख्य लेखाधिकारी, प्र.अधिक्षक खरेदी व FDA च्या अधिका-यांना जाणेबाबत निर्देश दिले होते. त्यास अनुसरून मा.आयुक्त, अन्न औषध प्रशासन महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना दि.०५.०८.२०१७ चे पत्राने विनंती करण्यात आली होती.

मा.आयुक्त, अन्न औषध प्रशासन,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी त्यांचे प्रादेशिक कार्यालय नाशिक यांचेमार्फत दि.०७.०८.२०१७ चे पत्राने श्री.दिलीप सोनवणे व श्री.देवरे यांना सदर भेटीसाठी नियुक्तकेले होते.

मा.उपाध्यक्ष महोदय यांनी निश्चित केलेल्या दिनांकानुसार माउपाध्यक्ष महोदय व श्री.प्रताप भोसले यांचा दि.१०.०८.२०१७ रोजी जाणे व दि.११.०८.२०१७ रोजी परत येणे असा सदर भेटीचा दौरा निश्चित झाला होता. तथापि श्री.भोसलेसाहेब यांचा दौरा प्रकृती अस्वास्थामुळे रद्द झाला होता.

त्यानंतर अंतिम टप्प्यामध्ये खाली नमुद केलेप्रमाणे मा.उपाध्यक्ष महोदय व संस्थान अधिकारी/कर्मचारी व FDA अधिकारी यांनी मे. स्प्रिती प्रॉडक्ट्स प्रा.लि., साहा, अंबाला येथे दि.१०.०८.२०१७ ते १२.०८.२०१७ या कालावधीत भेट दिली होती.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा.श्री.चंद्रशेखर कदम | - | उपाध्यक्ष |
| २. | श्री.बाबासाहेब घोरपडे | - | मुख्य लेखाधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी |
| ३. | अविनाश कुलकर्णी | - | प्र.अधिक्षक, खरेदी |
| ४. | श्री.दिलीप सोनवणे | - | अन्न सुरक्षा अधिकारी |
| ५. | श्री.संदीप देवरे | - | अन्न सुरक्षा अधिकारी |

वरील भेटीदरम्यान मा.उपाध्यक्ष, मुख्य लेखाधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, प्र.अधिक्षक, खरेदी यांचे भेटीचा अहवाल परिशिष्ट "अ" म्हणून व श्री.दिलीप सोनवणे व श्री.संदिप देवरे, अन्न सुरक्षा अधिकारी यांनी केलेले तपासणीचा अहवाल परिशिष्ट "ब" म्हणून मा.व्यवस्थापन समितीपुढे अवलोकनार्थ व माहितीसाठी सादर.

**निर्णय क्र.८१६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.स्प्रिती प्रॉडक्टस् प्रा.लि., साहा, अंबाला (हरियाणा) यांचे शुध्द तुप प्रोसेसिंग प्लँटला भेट दिलेल्या अहवालाचे अवलोकन करणेत येऊन, त्याची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं.२६** **अॅड.नितीन भवर यांची विविध १० प्रकरणातील वकील फी अदा करणे.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील कलम १७. (१)** राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पहाणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्यती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्त व्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

(२) (च) विश्वस्त व्यवस्थेशी संबंधित असे कोणतेही दावे, खटले व इतर कायदेशीर कार्यवाही, न्यायालयात किंवा न्यायाधिकरणापुढे किंवा इतर प्राधिकरणापुढे दाखल करील व त्या संबंधात बचाव करील.

**प्रास्तविक–** मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे श्री साईबाबा संस्थानचे विरुध्द दाखल झालेल्या खालील तक्त्यातील दाव्यां मध्ये संस्थानचे वतीने अॅड. श्री नितीन भवर, यांनी कामकाज पाहीले आहे, संस्थानचे वतीने कामकाज पाहील्याबाबत व काही प्रकरणात अभिप्राय दिल्याबाबत खालील तक्त्यातील १० बीलाने वकील फी ची मागणी केलेली आहे.

| अ.क्र. | विभागाचे नांव | दावा नंबर/ ओपिनियन | वकील फीचा तपशील | मागणी केलेली वकील फी. |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | मालमत्ता विभाग. | रिट पिटीशन नं. २०४०/२०१४ डॉ. संतोषकुमार मानिकचंद लोढा विरुध्द श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी. | प्रोफेशन /लिगल फी<br>स्टेनो, टायपींग, झेरॉक्स, कोर्ट फी व इतर. | २३,०००/-<br>२०००/- |
| २ | मालमत्ता विभाग. | रिट पिटीशन नं. २०८४/२०१६ चंद्रकांत रतिलाल मेहता विरुध्द श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी. | प्रोफेशन /लिगल फी<br>स्टेनो, टायपींग, झेरॉक्स, कोर्ट फी व इतर. | २३,०००/-<br>२०००/- |
| ३ | आस्थापना विभाग. | विधी अधिकारी, कामगार अधिकारी पदा बाबतचे ओपिनियनचे बील | प्रोफेशन /लिगल फी<br>स्टेनो, टायपींग, झेरॉक्स, कोर्ट फी व इतर. | ९,०००/-<br>१,०००/- |
| ४ | मालमत्ता विभाग. | एफ.ए. एस.टी नं. ६६८८/२०१७ व सी.ए. नं. ६६८९ व ६६९०/२०१७ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी विरुध्द सौ. निर्मला कुंदनमल लुनावत. | प्रोफेशन /लिगल फी | ५४,०००/- |
| ५ | श्री साईबाबा हॉस्पीटल. | रिट पिटीशन नं. ९१७२/२०१६, निशा मधुकर बारसे विरुध्द श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी. | प्रोफेशन /लिगल फी<br>स्टेनो, टायपींग, झेरॉक्स, कोर्ट फी व इतर. | २३,०००/-<br>२०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | मालमत्ता विभाग. | रिट पिटीशन नं. १०४४२/२०१६ रविंद्र मनोहर नागपुरे विरुध्द श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी. | प्रोफेशन /लिगल फी स्टेनो, टायपींग, झेरॉक्स, कोर्ट फी व इतर. | २३,०००/- २०००/- |
| ७ | मालमत्ता विभाग. | रिट पिटीशन नं. १०४४२/२०१६ मधील सिव्हील अर्ज क्र.७९३७/२०१७ शिर्डी नगरपंचायत शिर्डी विरुध्द श्री साईबाबा संस्थान विश्वसतव्यवस्था, शिर्डी. | प्रोफेशन /लिगल फी स्टेनो, टायपींग, झेरॉक्स, कोर्ट फी व इतर. | ८,०००/- २०००/- |
| ८ | श्री साईबाबा हॉस्पीटल. | रिट पिटीशन नं. ८९८७/२०१६ सुनंदा किसन जगताप विरुध्द श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी. | प्रोफेशन /लिगल फी स्टेनो, टायपींग, झेरॉक्स, कोर्ट फी व इतर. | २३,०००/- २०००/- |
| ९ | लेखाशाखा विभाग. | सोने चांदी वितळवून नानी व पेंडंट तयार करणेबाबतचे ओपिनियनचे बील. | प्रोफेशन /लिगल फी स्टेनो, टायपींग, झेरॉक्स, कोर्ट फी व इतर. | ९,०००/- १,०००/- |
| १० | कामगार विभाग. | रिट पिटीशन नं. ९९६९/२०१६ किशोर साहेबराव गवळी, विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर चे बील. | प्रोफेशन /लिगल फी स्टेनो, टायपींग, झेरॉक्स, कोर्ट फी व इतर. | २३,०००/- २०००/- |
| | | | **एकुण** | **२,३४,०००/-** |

**मागणी–** मा.उच्च न्यायालयातील वकीलास वकील फी अदा करणेबाबत संस्थानचे वकील फी शेड्युल मध्ये तरतूद नसल्याने यापुर्वी ॲड. आर. एन.धोर्डे यांना पी.आय.एल. १८/२०११ मध्ये एकत्रीत रु. २०,०००/- वकील फी अदा केलेली आहे तसेच ॲड. श्री एस.आर. चौकीदार यांना रिट पिटीशन करीता व पी.आय.एल. करीता एकत्रीत रु. २०,०००/- इतकी वकील फी अदा केलेली आहे, तसेच सिव्हील ॲप्लीकेश मध्ये यापुर्वी ॲड. नितीन भवर व ॲड. श्री एस.आर. चौकीदार यांना रु. १०,०००/- प्रमाणे वकील फी अदा केलेली आहे, लिगल ओपिनियन बाबत संस्थानचे वकील फी शेड्युल मध्ये In opinion matter fess will be of Rs. 200/-, No fees for opinion will be paid in running matters which are in the court of concern Advocate, असे नमुद आहे. सदर फी सन १९९२ साली ठरलेली आहे, तसेच फक्त अहमदनगर जिल्ह्यातील कोर्टा पुर्ती मर्यादित आहे, मा. उच्च न्यायालयातील वकीलास किती फी द्यावी याबाबत नमुद केलेले नाही, त्यामुळे किती वकील फी द्यावी याबाबत निर्णय होणेबाबत.

**संस्थान अधिनियम/ ठराव या नुसार अनुमान–** ॲड. श्री नितीन भवर यांनी एकुण दहा प्रकरणात कॉलम नं. ५ मध्ये दर्शविल्या प्रमाणे रु.२,३४,०००/- वकील फीची मागणी केलेली आहे, मा. उच्च न्यायालयातील वकीलास वकील फी अदा करावी याबाबत संस्थानचे वकील फी शेड्युल मध्ये तरतूद नसल्यानेकिती वकील फी द्यावी याबाबत निर्णय होणेबाबत.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–** ॲड. श्री नितीन भवर यांना एकुण १० प्रकरणात कॉलम नं. ५ मध्ये दर्शविल्या प्रमाणे रु. २,३४,०००/- वकील फी ची मागणी केलेली आहे, याबाबत मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णय होवून वकील फी अदा करणेचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८१७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, ॲड.नितीन भवर यांनी विविध १० प्रकरणांची मागणी केलेली रु.२,३४,०००/- मात्र वकील फी, त्यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच यापुढे प्रत्येक दाव्याची एकत्रित फी ठरवून घेण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- विधी अधिकारी)

---

**विषय नं.२७** **संस्थान परिसरात रेल्वे बुकींग काऊंटर सुरु करणेकामी सेवाधाम इमारतीतील भाडेतत्वावर वापरास देऊ केलेल्या दोन रुम्स विनामुल्य वापरास देणे.**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतूद-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) अधिनियम २००४ मधील कलम १७ (३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहीत झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाचे लेखी पुर्व मंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्यसंक्रमित करण्यात येणार नाही, अशी तरतूद आहे.

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान परिसरात रेल्वे बुकींग काऊंटर सुरु करणेकामी सेवाधाम इमारतीतील भाडेतत्वावर वापरास देवू केलेल्या दोन रुम्स विनामुल्य वापरास देणेबाबत..

**प्रस्तावना-** यापूर्वी मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६/०८/२०१६ रोजीचे सभेतील विषय क्रं.३३ निर्णय क्रं.५४२ अन्वये रेल्वेने तिकीट आरक्षणासाठी जागेची मागणी केल्यास त्यांनाही सेवाधाम इमारतीत जागा उपलब्ध करुन देण्यात यावी,असे ठरलेले आहे. त्या अनुषंगाने रेल्वे विभागास कळविणेत आले. रेल्वे विभागाने त्यांचेकडील दि.१३/०९/२०१६ रोजीच्या पत्रान्वये रेल्वे तिकीट रिझर्वेशन काऊंटरसाठी सेवाधाम इमारतीतील दोन रुमची मागणी केलेली आहे. दरम्यानचे काळात मा.डिव्हीजनल रेल्वे मॅनेजर (कमर्शियल) सोलापूर यांनी त्यांचेकडील दि.२६/१०/२०१६ रोजीचे पत्र प्राप्त दि.०६/१२/२०१६ च्या पत्रान्वये देवू केलेल्या सेवाधाम इमारतीतील दोन रुम विनामोबदला वापरण्यास देण्याची संस्थानकडे विनंती केली. त्याबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीच्या सभेपूढे सादर करणेत आला. त्यावर निर्णय क्रं.१९९ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, साईनगर रेल्वे स्टेशनवर संस्थान वापरासाठी जागा देणेचे अटीवर, प्रस्तावात नमूद केलेले सेवाधाम इमारतीमधील दोन गाळे,रेल्वे बुकींग काऊंटरसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने ठरवून दिलेल्या भाडे दराप्रमाणे व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन ११ महीन्यांचे भाडे कराराने रेल्वेस उपलब्ध करुन देण्यात यावे.

तसेच सेवाधाम इमारतीमध्ये साईसेवकांना रहाण्याची व्यवस्था करावयाची असल्यामुळे विविध कर्मचारी संघटना, होमगार्ड,विद्युत मंडळ व इतरांना वापरासाठी दिलेल्या खोल्या त्वरीत खाली करुन घेण्यात याव्या, असे ठरले.

उपरोक्त ठरावाच्या अनुषंगाने साईनगर रेल्वे स्टेशनवर संस्थान वापरासाठी जागा देणेचे अटीवर प्रस्तावात नमूद केलेले सेवाधाम इमारतीमधील दोन गाळे रेल्वे बुकींग काऊंटरसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने ठरवून दिलेल्या भाडेदराप्रमाणे म्हणजेच प्रतिमहा एका गाळयास रु.७९२/- असे एकूण दोन गाळयांसाठीचे मासिक भाडेरु.१,५८४/- इतके व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन ११ महीन्यांचे भाडेकराराने प्रस्तावित असलेचे इकडील पत्र जा.क्रं.एसएसएसटी/मालमत्ता/२२६/२०१७ दि.१३/०४/२०१७ अन्वये मा.डिव्हीजनल रेल्वे मॅनेजर (कमर्शियल) सोलापूर यांना अलाहीदा कळविण्यात आलेले आहे.

मा.डिव्हीजनल रेल्वे मॅनेजर (कमर्शियल) सोलापूर यांनी इकडील दि.१३/०४/२०१७ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने शिर्डी येथील साईनगर रेल्वे स्टेशनवर संस्थानचे वापरासाठी जागा उपलब्ध करुन देण्यात यावी याबाबत काहीएक खुलासा केलेला नाही. मात्र संस्थानचे सेवाधाम इमारतीतील दोन रुम विनामुल्य वापरास मिळणेबाबत सिनियर रेल्वे डिव्हीजनल मॅनेजर,सोलापूर यांनी त्यांचेकडील जा.नं.SUR/C/Cog/UTS/568/17Date 03/07/2017 चे पत्रान्वये विनंती केलेली आहे.

**विभागाचा अभिप्राय-** संस्थानचे सेवाधाम इमारतीतील दोन रुम रेल्वे बुकींग काऊंटरसाठी भाडेतत्वावर देणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये निर्णय क्रं.१९९ प्रमाणे अलाहीदा निर्णय झालेला आहे. तथापि मा.सिनियर रेल्वे डिव्हीजनल मॅनेजर,सोलापूर यांनी त्यांचेकडील दि.०३/०७/२०१७ रोजीचे पत्रान्वये सदरच्या भाडेतत्वावर देवू केलेल्या दोन रुम्स विनामुल्य वापरास देणेबाबत विनंती केलेली आहे. तरी सदरचे प्रस्तावावर चर्चा होऊन निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८१८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्तांच्या सोयीसाठी संस्थान परिसरात रेल्वे बुकींग काऊंटर सुरु करणेकामी सेवाधाम इमारतीतील दोन खोल्या रेल्वे विभागास विनामुल्य वापरास उपलब्ध करुन देण्यात याव्या, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.२८** **प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडिया, मुंबई यांना भाडेपट्टयाने देणेत आलेल्या जागेस मुदतवाढ देणे.**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतूद-**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही,विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

**प्रस्ताव-** प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया, मुंबई यांना भाडेपट्टयाने देणेत आलेल्या जागेस मुदतवाढ देणेबाबत...

**प्रस्तावना-** प्रसार भारती (भारतीय प्रसारण निगम) आकाशवाणी तथा दुरदर्शन मुंबई यांनी दि.२१/०४/२००३ रोजीचे पत्रान्वये शिर्डी येथे दुरदर्शन लघु प्रसारण केंद्र उभारणेसाठी संस्थानकडे मासिक भाडे तत्वावर २६६.२८ चौमी.मोकळी जागा व ११४.३२ चौमी बांधीव जागा अशी एकुण ३८०.६० चौमी जागा मिळणेस विनंती केलेली होती. सदर प्रस्तावाबाबत मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.११/०५/२००३ रोजीचे सभेत ठराव क्र.२०७ अन्वये मा.धर्मादाय आयुक्त,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांची पुर्व मान्यता घेवून जागा भाडे तत्वावर देण्यात यावी ठरले आहे. सदर ठरावास अनुसरुन दि.०९/०६/२००३ रोजीचे पत्रान्वये मा.धर्मादाय आयुक्त,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया यांना संस्थानची जागा भाडे तत्वावर देणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. मा.धर्मादाय आयुक्त,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दि.१०/०७/२००३ रोजीचे आदेशाने प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया, मुंबई यांना Low Power T.V.Centerशिर्डी येथे उभारणेसाठी संस्थानचे अर्जात नमुद केलेप्रमाणे जागा भाडयाने देणेस परवानगी दिलेली आहे.

प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया,यांनी दि.०६/०८/२००३ रोजीचे पत्राने (१) पी.डब्ल्यु.डी. यांचेकडून निश्चित झालेले भाडे देण्यात येईल, (२) कमीत कमी १५ वर्षासाठी जागा दयावी लागेल, (३) करारनामा ३ वर्ष किंवा ५ वर्षासाठी करण्यात यावा त्यानंतर नुतनीकरण करण्यात यावे असा राहील, असे इकडील कार्यालयास कळविलेले आहे. प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया, यांचे उपरोक्त पत्राबाबत मा. व्यवस्थापन मंडळाचे दि.०५/१०/२००३ रोजीचे सभेत विषय सादर करुन निर्णय क्र.४७३ अन्वये प्रसार भारती यांना १५ वर्षासाठी जागा भाडयाने देणेबाबतचा प्रस्ताव मंजुर झालेला आहे. त्यानुसार प्रसार भारती यांना दि.२२/०८/२००६ पासून स.नं.१४८ धर्मशाळा सध्या साईनाथ रुग्णालय येथील २६६.२८ चौमी. मोकळी जागा व ११४.३२ चौमी. बांधीव जागा अशी एकुण ३८०.६० चौमी.संस्थानची जागा व रुम वापरास देण्यात आलेली आहे.

यापुर्वी ठरावाप्रमाणे १५ वर्षासाठी (३-३ वर्षाचे टप्प्याने) लिव्ह अॅन्ड लायसन्स तत्वावर जागा दिली आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियमातील कलम १७(३) च्या तरतुदीप्रमाणे फक्त १ वर्ष कालावधीसाठी संस्थान मिळकत Lease वर देता येते. त्याप्रमाणे यापूर्वी मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१८३ प्रमाणे दि.२१/०८/२०१६ ते दि.२०/०७/२०१७ या ११ महीन्यांचे कालावधीकरीता मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदरची मुदत दि.२०/०७/२०१७ रोजी संपुष्टात आली असल्याने प्रसार भारती,भारतीय प्रसारण निगम,लघु प्रक्षेपण केंद्र,शिर्डी यांनी दि.१५/०७/२०१७ रोजीचे पत्रान्वये पुढील कालावधी दि.२१/०७/२०१७ ते दि.२०/०६/२०१८ या ११ महीने कालावधीकरीता मुदतवाढ मिळणेकामी विनंती केलेली आहे.

संस्थानचे मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.११/०५/२००३ व दि. ०५/१०/२००३ चे सभेतील निर्णयानुसार जागेचे भाडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे प्रमाणपत्रानुसार घेणेचे ठरलेले आहे व प्रत्येक ३ वर्षाने सदर मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन खालीलप्रमाणे आकारणी करण्यात आलेली आहे.

१) पहिल्या टप्प्यातील ३ वर्षाचे दि.२१/०८/२००३ ते दि.२०/०८/२००६ अखेर रुपये ३३२५/- मासिक भाडे प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया, मुंबई यांनी संस्थानला दिलेले आहे.

२) दुस-या टप्प्यातील तीन वर्षाचे दि.२१/०८/२००६ ते दि.२०/०८/२००९ अखेर रु.३३२५/- मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रु.३६५७-५० मासिक भाडे प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया, मुंबई यांनी संस्थानला दिलेले आहे.

३) तिस-या टप्प्यातील तीन वर्षाचे दि.२१/०८/२००९ ते दि.२०/०८/२०१२ अखेर रु.३६५७-५० मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रु.४०२४/- मासिक भाडे प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया, मुंबई यांनी संस्थानला दिलेले आहे.

४) चौथ्या टप्प्यातील तीन वर्षाचे दि.२१/०८/२०१२ ते दि.२०/०८/२०१५ अखेर रु.४०२४/- मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रु.४४२७/- मासिक भाडे प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया, मुंबई यांनी संस्थानला दिलेले आहे.

५) पाचव्या टप्प्यातील तीन वर्षाचे कालावधीसाठी दि.२१/०८/२०१५ ते दि.२०/०८/२०१८ अखेर रु.४४२७/- मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रु.४८७०/- मासिक भाडे आकारुन प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया,मुंबई यांना पुढील दि२१/०७/२०१७ ते दि.२०/०६/२०१८ या ११ महीन्यांचे कालावधीकरीता मुदतवाढ देता येईल.

**विभागाचा अभिप्राय-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५/१०/२००३ रोजीचे सभेतील निर्णयानुसार प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया, मुंबई यांना प्रस्तुत मिळकत १५ वर्षासाठी लिज डिडवर देणेस मान्यता आहे. मात्र संस्थानच्या सन २००४ च्या अधिनियमाचे तरतुदीनुसार प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया, मुंबई यांना १ वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी संस्थान मिळकत लिज डिडवर देता येणार नाही. तेंव्हा प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया, मुंबई यांना दि२१/०७/२०१७ ते २०/०६/२०१८ या ११ महीन्यांचे कालावधीसाठी मासिक परवाना फी रु.४,८७०/- (अक्षरी रु.चार हजार आठशे सत्तर मात्र) व मिटर रिंडीगप्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन शासनाचे विधी व न्याय विभागाचे पूर्वपरवानगीने ११ महीन्यांसाठी लिव्ह अॅण्ड लायसेन्स तत्वावर मुदतवाढ देणेकामी व करारनामा करुन घेणेकामीच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८१९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया, मुंबई यांना दि.२१/०७/२०१७ ते २०/०६/२०१८ या ११ महीन्यांचे कालावधीसाठी मासिक परवाना फी रु.४,८७०/- मात्र व मिटर रिंडीगप्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन शासनाचे विधी व न्याय विभागाचे पूर्वपरवानगीने लिव्ह अॅण्ड लायसेन्स तत्वावर मुदतवाढ देणेस व त्यांचेबरोबर कायदेशीर करारनामा करुन घेणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.२९** **स्टेट बँक ऑफ इंडीया, शाखा शिर्डी यांना संस्थानचे साईनाथ छाया इमारतीतील ए.टी.एम. चे जागेच्या वापरास मुदतवाढ देणे.**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतूद -** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) अधिनियम २००४ मधील कलम १७ (३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहीत झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाचे लेखी पुर्व मंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्यसंक्रमित करण्यात येणार नाही, अशी तरतूद आहे.

**प्रस्ताव-** स्टेट बॅंक ऑफ इंडीया, शाखा शिर्डी यांना संस्थानचे साईनाथछाया इमारतीतील ए.टी.एम.चे जागेच्या वापरास मुदतवाढ देणेबाबत..

**प्रस्तावना-** यापूर्वी स्टेट बॅंक ऑफ इंडिया,शाखा शिर्डी यांना संस्थान मालकीच्या शिर्डी येथील सिटी सर्वे नं.३२ मधील साईनाथछाया या इमारतीतील तळमजल्यावरील ९ चौमी जागा ए.टी.एम.साठी वापरास मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५/०२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.८७ नुसार मासिक भाडे रु.६,०००/- इतके आकारुन व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन दि.२८/०७/२०१६ ते दि.२७/०७/२०१७ या एक वर्षाचे कालावधीकरीता मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

सदरची मुदत दि.२७/०७/२०१७ रोजी संपल्याने मा.शाखाधिकारी,स्टेट बॅंक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांनी सदर एटी.एम.वापरास दिलेल्या जागेस पुढील दि.२८/०७/२०१७ ते दि.२७/०६/२०१७ या ११ महीन्यांचे कालावधीकरीता मुदतवाढ मिळणेकामी दि.०८/०६/२०१७ रोजीच्या पत्रान्वये इकडेस विनंती केलेली आहे.

यापूर्वी मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७/०८/२०१६ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.४७९ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन स्टेट बॅंक ऑफ इंडीया, शाखा शिर्डी यांना एटी.एम.साठी दिलेली संस्थानचे सिटी सर्वे नं.३२ मधील साईनाथछाया इमारतीतील तळमजल्यावर दिलेल्या ९ चौमी. जागा मध्यवर्ती ठिकाणी असून त्या जागेचे भाडे खूपच कमी आहे. याकरीता व्यवस्थापक, स्टेट बॅंक ऑफ इंडीया, शाखा शिर्डी यांचेशी भाडेवाढ करणेबाबत चर्चा करुन सभेसमोर प्रस्ताव सादर करावा, असे ठरले."

त्या अनुषंगाने व दरम्यानचे काळात सदर जागेचे भाडेदर प्रमाणपत्र मा.कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांचेकडून प्राप्त करुन घेतलेले असता त्यांनी सदर जागेचे मासिक भाडे रु.१,०५३/- इतके निश्चित करुन इकडेस कळविले. सदरचे भाडे अत्यल्प असल्याने व उक्त निर्णयाच्या अनुषंगाने मा.शाखाधिकारी, स्टेट बॅंक ऑफ इंडीया, शाखा शिर्डी यांचेशी मासिक भाडेबाबत दि.२४/०१/२०१७ रोजी समक्ष चर्चा करणेत आली असून त्यात शाखाधिकारी यांनी उक्त जागेचे भाडे दरमहा रु,६,०००/- इतके देण्याचे कबुल केले व त्यात यापुढे दरवर्षी १०% वाढ करुन व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन करारनामा करुन देणेबाबत मान्य केलेले आहे.

**विभागाचा अभिप्राय-** मा.शाखाधिकारी, स्टेट बॅंक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांचेशी यापूर्वी दि.२४/०१/२०१७ रोजी उपरोक्तप्रमाणे झालेल्या चर्चेनुसार संस्थान मालकीचे सिटी सर्वे नं.३२ मधील

साईनाथछाया इमारतीतील तळमजल्यावरील ९ चौमी.जागा (एक गाळा) ए.टी.एम.साठी दि.२८/०७/२०१७ ते दि.२७/०६/२०१८ या ११ महीन्याच्या कालावधीसाठी मागील मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रु.६,०००/-+ रु.६००/- (१०%) = एकूण रु.६,६००/- (अक्षरी रु.सहा हजार सहाशे मात्र) इतके भाडे आकारण्यात येवून व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन शासनाचे विधी व न्याय विभागाचे पूर्वपरवानगीने ११ महीन्यांसाठी मुदतवाढ देता येईल व लिव्ह अॅण्ड लायसन्स करारनामा करुन घेता येईल.

सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८२०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, स्टेट बॅंक ऑफ इंडीया, शाखा शिर्डी यांना एटी.एम.चे वापरासाठी साईनाथछाया इमारतीतील तळमजल्यावरील दिलेल्या ९ चौमी.जागेस दि.२८/०७/२०१७ ते दि.२७/०६/२०१८ या ११ महीन्याच्या कालावधीसाठी मागील मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रु.६,०००/-+ रु.६००/-(१०%) = एकूण रु.६,६००/- मात्र भाडे व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन शासनाचे विधी व न्याय विभागाचे पूर्वपरवानगीने लिव्ह अॅण्ड लायसेन्स तत्वावर मुदतवाढ देणेस व त्यांचेबरोबर कायदेशीर करारनामा करुन घेणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.३०** **श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षासाठी संस्थानला विनामोबदला जमीन वापरास देणेबाबत प्राप्त झालेल्या प्रस्तावांपैकी छाननीअंती योग्य असलेले प्रस्ताव स्विकारुन, प्रस्तावकांचा अभिनंदनाचा ठराव पारीत करणे.**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतूद–** संस्थान अधिनियम २००४ मधील कलम १७(२)(ट) मधील तरतुदीनुसार विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबविण्याच्या प्रयोजनासाठी तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादीत करील किंवा खरेदी करील.

**प्रस्ताव-** श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षासाठी संस्थानला विनामोबदला जमीन वापरास देणेबाबत प्राप्त झालेले प्रस्ताव स्विकृत करणे.

**प्रस्तावना –** श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षानिमित्त दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ या कालावधीत शिर्डी येथे होणा-या साईभक्तांच्या संभाव्य गर्दीचे व्यवस्थापन करण्याच्या दृष्टिने तसेच साईभक्तांच्या सुविधेच्या दृष्टिने मोफत दर्शनरांग प्रवेशपत्र काऊंटर, वाहनतळ, साईभक्तांना अन्न,निवारा,वैद्यकीय सेवा इ.मुलभूत सुविधा विनाविलंब उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टिकोनातून संस्थानला मोठया प्रमाणात जमीनींची आवश्यकता भासणार आहे.

शिर्डी येथील खालील नमूद केलेल्या शिर्डी येथील रहिवासी यांनी त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या जमीनी/ जागा संस्थानला श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षासाठी विनामोबदला संस्थानला वापरास देणेकामीचे इकडेस प्रस्ताव सादर केलेले आहेत.

| अ.नं | जमीन मालकाचे नाव | जमीनीचे लोकेशन | समाधी मंदिरापासून जमीनीचे अंतर | सर्वे नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.नितीन उत्तमराव कोते व इतर ५ | हॉटेल गोरडीयाच्या पश्चिमेस | समाधी मंदिरापासून नजीकचे अंतरावर | ४/१ पै. | २ एकर |
| २ | श्री.कैलास (बापू) गोविंदराव कोते पा. व श्री.अजित झुंबरलाल कुंकूलोळ व इतर | नगर-मनमाड साकुरी शिव लगत | १.५ ते २ किमी. | ११४,११५ | ७ एकर |
| ३ | श्री.वेणूनाथ सुर्यभान गोंदकर व श्री.जगन्नाथ सुर्यभान गोंदकर | साईनाथ हॉस्पिटलचे पश्चिमेस | ५०० मीटर | १४७ | ५ एकर |
| ४ | डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व इतर २ | रुई रोडच्या पूर्वेस | ५०० मीटर | ५/१ व ५/८ | २.५ एकर |
| ५ | श्री.कमलाकर गणपतराव कोते व इतर | कालिकानगर | १ किमी. | ५७/६४ | २८ फलॅट (५६ फलॅटचे इमारती मधील २८ फलॅट) |

**उपरोक्त अ.नं.१**मधील मौजे शिर्डी येथील मिळकत सर्वे नं.४/१ मधील क्षेत्र २ एकर इतके जमीन मालक श्रीमती अर्चना उत्तम कोते, श्री.नितीन उत्तम कोते, वसंतराव तुकाराम कोते, श्रीराम वसंतराव कोते, श्रीमती संगिता शिवाजी कोते व केतन शिवाजी कोते यांनी उक्त क्षेत्र १ वर्षे कालावधीकरीता (शताब्दी वर्षाकरीता) संस्थानला विनामुल्य वापरास देणेकामी अर्ज सादर केलेला आहे.

सदर मिळकतीचा ७/१२ उतारा अवलोकन करता सदरची मिळकत अर्जदार यांची समाईकातील असून ७/१२ उता-यावर हिस्सेवारीप्रमाणे क्षेत्र दर्शविलेले आहे. ७/१२ उता-यावरील कब्जेदार सदरी नाव असणा-यांपैकी सुशिला वसंत कोते या मयत आहेत. मात्र त्यांचे पती वसंत तुकाराम कोते व मुलगा श्रीराम वसंतराव कोते यांच्या अर्जावर स्वाक्ष-या आहेत. सुशिला वसंत कोते यांच्या वारसाची नोंद अद्यापपर्यंत झालेली दिसून येत नाही. तसेच शिवाजी तुकाराम कोते हे देखील मयत आहेत. त्यांची वारस पत्नी संगिता शिवाजी कोते व केतन शिवाजी कोते यांच्या सदर अर्जावर स्वाक्ष-या आहेत. शिवाजी तुकाराम कोते यांच्या वारसाची नोंद अद्यापपावेतो झालेचे दिसून येत नाही. तसेच प्रस्तुत मिळकतीसंबंधात वाद असलेचे दिसून येत नाही.

अर्जदार व त्यांचे कुटूंबातील प्रत्येक घटकाचे उक्त क्षेत्र संस्थानला समाधी शताब्दी वर्षासाठी वापरणेकामी देणेबाबत कोणतीही हरकत नसलेबाबतचे संयुक्त प्रतिज्ञापत्र प्राप्त करुन घेवून सदरचे क्षेत्र संस्थानला समाधी शताब्दी वर्षासाठी साईभक्तांच्या सुविधेच्या दृष्टिने मोफत दर्शनरांग प्रवेशपत्र काऊंटर स्थापित करणेकामी वापरास घेता येईल.

**उपरोक्त अ.नं.२** मधील मिळकत सर्वे नं.११४ व ११५ मधील क्षेत्र ७ एकर इतके जमीन मालक श्री.कैलास (बापू) गोविंदराव कोते व श्री.अजित झुंबरलाल कुंकूलोळ व इतर यांनी संस्थानला शताब्दी वर्षानिमित्त विनामोबदला वापरास देण्याचे ठरविलेले आहे. संबंधीत ७/१२ उता-याचे अवलोकन करता सर्वे नं.११४/७७ मध्ये अर्जदार यांचे खालीलप्रमाणे क्षेत्र दर्शविलेले आहे.

| अ.नं. | अर्जदार मालकाचे नाव | सर्वे नं. | क्षेत्र हे.आर | सहकब्जेदार | क्षेत्र हे.आर |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.कैलास गोविंद व सुमित्रा कैलास कोते<br>श्री.अजित झुंबरलाल कुंकूलोळ | ११४/७७<br>११४/७७ | ०.१७<br>१.०८ | श्री.निखिल सुरेश बोरावके | ०.३३ |
| २ | श्री.अजित झुंबरलाल कुंकूलोळ | ११५/१२ | ०.२० | श्री.राजेंद्र रावसाहेब व श्री.निखिल सुरेश बोरावके | ०.१० |
| ३ | श्री.कैलास गोविंद व सुमित्रा कैलास कोते<br>श्री.अजित झुंबरलाल कुंकूलोळ | ११५/१३<br>११५/१३ | ०.३४<br>१.०६ | | |
| ४ | श्री.कैलास गोविंद व सुमित्रा कैलास कोते | ११५/१८ | ०.५५ | श्री.निखिल सुरेश बोरावके | ०.८५ |
| | **एकूण** | | **३.४०** | | |

उपरोक्त क्षेत्रापैकी ७ एकर क्षेत्र अर्जदार यांनी संस्थानला समाधी शताब्दी वर्षानिमित्त वापरासाठी देवू केलेले आहे.

सदर क्षेत्राबाबत स्थानिक चौकशी केली असता कोर्टात वाद चालू असलेचे दिसून येत नाही. तथापि सदरचे क्षेत्र हे समाईक असल्याने सहकब्जेदार यांची संमती घेता येईल. अर्जदार यांनी मोजणी नकाशा सादर केलेला नाही. संस्थानचे कंत्राटी मोजणीदार व बांधकाम विभाग यांचेमार्फत सदरक्षेत्राची तात्पुरती मोजणी करुन घेवून क्षेत्र निश्चिती करता येईल. सदरचे क्षेत्राचा उपयोग संस्थानला साईभक्तांच्या सुविधेसाठी वाहन पार्कींग व्यवस्था करणेकामी करता येईल.

**उपरोक्त अ.नं.३** मधील मिळकत सर्वे नं.१४७ क्षेत्र ५ एकर इतके जमीन मालक श्री.जगन्नाथ सुर्यभान गोंदकर व श्री.वेणूनाथ सुर्यभान गोंदकर यांनी संस्थानला एक वर्षाकरीता विनामोबदला वापरास देवू केलेले आहे. तथापि त्यात त्यांनी सदर जमीनीकडे पायी जाण्यासाठी श्री साईनाथ रुग्णालयातून एक छोटे गेट आहे ते मोठे करुन जमीनीचा वापर करता येवू शकतो, असेबाबत नमूद केलेले आहे. सदरचे क्षेत्र संस्थान मालकीचे सर्वे नं.१४८ पैकीच्या मिळकतीचे पश्चिमेस असून सदर मिळकतीत जाणे-येणेच्या रस्त्याबाबत अर्जदार व संस्थान यांचेत वाद चालू असून मे.राहाता येथील दिवाणी न्यायाधीश यांचे कोर्टात रे.मु.नं.२७/२०१२ चा दावा चालू आहे. त्यामुळे

साईनाथ रुग्णालयाचे पश्चिमेस असलेले छोटे गेट मोठे करुन सदरचे क्षेत्र संस्थानने वापरास घेतल्यास उक्त दाव्यास बाध येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**उपरोक्त अ.नं.४** मधील मिळकत सर्वे नं.५/१ व ५/८ पैकी क्षेत्र १०० आर क्षेत्र जमीन मालक डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर, श्री.ज्ञानदेव भागचंद गोंदकर व श्री.शंकर जगन्नाथ गोंदकर यांनी संस्थानला शताब्दी वर्षानिमित्त विनामोबदला वापरास देवू केलेले आहे. तथापि त्यांचे भाऊ डॉ.सोन्याबापू भागचंद गोंदकर यांनी त्यास हरकत घेतलेली आहे. सदर क्षेत्राबाबत दिवाणी न्यायालयात वाद चालू आहे. अशा परिस्थितीत सदरचे क्षेत्र वापरास घेणे विधीग्राहय ठरणार नाही.

**उपरोक्त अ.नं.५** मधील मिळकत सर्वे नं.५७/६४ मधील मिळकत ही बांधीव असून त्यात एकूण ५६ फलॅटस बांधलेले आहेत. सदर इमारतीचे उत्तरेकडील भागात २८ फलॅट अर्जदार श्री.कमलाकर गणपत कोते व इतर ३ यांनी संस्थानला समाधी शताब्दी वर्षानिमित्त विनामोबदला वापरास देवू केलेले आहेत.

अर्जदार यांनी सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता

१) ७/१२ उता-यावर श्री.कमलाकर व श्री.हरीभाऊ गणपतराव कोते यांचे सामाईक हिश्श्याचे क्षेत्र ०.५६ आर इतके दर्शविलेले आहे व इतर हक्कात गुंठेवारी विकास अधिनियमाखाली असे नमूद केलेले आहे. सदर ७/१२ उता-यावर अकृषिक क्षेत्र अथवा अकृषिक आकारणीची नोंद नाही.

२) बिगरशेती आदेश श्रीमती परिघाबाई दादा कोते यांचे नावाने असून क्षेत्र १ हे.४१ आर पैकी ६० आर (६००० चौमी) इतके रहिवास कारणासाठी अकृषिक वापरास परवानगी देण्यात आलेली आहे. तथापि ७/१२ उता-यावर अकृषिक नोंद (बिनशेती) अथवा अकृषिक आकाराची नोंद नाही.

३) शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी श्रीहरीभाऊ व श्री.कमलाकर गणपतराव कोते यांचे नावाने स.नं.५७/६४ पै.मधील बांधकाम परवानगी जा.क्रं.नपं./बांध/कावि/११/१९३६/२०१३ दि.२७/०२/२०१३ अन्वये निर्गत केलेली आहे. तथापि त्यात क्षेत्र नमूद केलेले नाही. तसेच नगरपंचायतीने भोगवटा दाखला जा.क्रं.बांध/टे.क्रं.८/२/४३३/२०१५ दि.०३/०२/२०१५ निर्गत केलेला आहे. त्यातदेखील क्षेत्राचा उल्लेख दिसून येत नाही.

४) मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत यांनी उपरोक्त बांधकाम परवानगीच्या अनुषंगाने बांधकाम रेखांकन आराखडा मंजूर केलेला आहे. त्यावर मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत यांचेकडील जानं.नपं./बांध/कावि/११४३३/२०१५ दि.०३/०२/२०१५ अन्वये बांधकाम परवानगी दिलेल्या इमारतीस वापर परवाना देणेत आले असलेबाबतची नोंद केलेली आहे. सदर बांधकाम रेखांकनआराखडयात प्लॉट एरीया क्षेत्र ०.७२ आर असे दर्शविलेले आहे.

बांधकाम रेखांकन आराखडयात दर्शविलेले क्षेत्र, बिगरशेती आदेशात दर्शविलेले क्षेत्र आणि ७/१२ उता-यावर दर्शविलेले क्षेत्राचा व आकाराचा मेळ बसत नाही.

सदर मिळकतीबाबत स्थानिक चौकशी करता कोर्टात वाद चालू असलेचे दिसून येत नाही. सदर बांधीव इमारतीस नगरपंचायतने अद्याप कर आकारणी केलेली असलेचे दिसून येत नाही.

तथापि सदरचे २८ फलॅट संस्थानला एक वर्ष या तात्पुरत्या कालावधीसाठी वापरास घेणेकामी नगरपंचायतीचा नाहरकत दाखला प्राप्त करुन घेवून सदरचे फलॅट शताब्दी कालावधीत शिर्डीमध्ये कर्तव्यावर येणा-या शासकीय/निमशासकीय कर्मचारी, सांस्कृतिक कार्यक्रम सादर करणा-या कलाकारांसाठी किंवा साई सेवकांसाठी वापरता येईल.

**विभागाचा अभिप्राय-** प्राप्त प्रस्ताव खालीलप्रमाणे.

| अ.नं. | अर्जदार मालकाचे नाव | सर्वे नं. | क्षेत्र हे.आर (प्रस्तावित) | न्यायालयात वाद चालू आहे काय | प्रस्ताव स्विकारणे योग्य आहे काय |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.नितीन उत्तम कोते व इतर ५ | ४/१ पै. | ०.८० | नाही | होय |
| २ | श्री.कैलास (बापू) गोविंद कोते व इतर १ आणि श्री.अजित झुंबरलाल कुंकूलोळ व इतर | ११४/७७,११५/१२, ११५/१३,११५/१८ चे एकूण क्षेत्र ३ हे.४० आर पैकी | २.८० | नाही | होय |
| ३ | श्री.वेणूनाथ सुर्यभान गोंदकर व श्री.जगन्नाथ सुर्यभान गोंदकर | १४७ पै. | २.०० | होय | नाही |
| ४ | डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व इतर २ | ५/१ व ५/८ पै. | १.०० | होय | नाही |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | श्री.कमलाकर गणपतराव कोते व इतर | ५७/६४ पै.बांधीव मिळकत २८ फलॅट | २८ फलॅट | नाही | होय |

उपरोक्त अ.नं.१,२ व ५ मधील मिळकती संबंधात न्यायालयात वाद चालू असलेचे दिसून येत नाही. तेंव्हा सदरच्या मिळकती संस्थानला समाधी शताब्दी वर्षासाठी विनामोबदला स्विकारणे. २) सदर मिळकती संबंधात साईबाबा समाधी शताब्दी या कालावधीसाठी करारनामा करणे. ३) उपरोक्त प्रयोजनार्थ वापर करणेसाठी सदर मिळकतींचा आवश्यक विकास व तद्नुषंगिक कामे संस्थानचे बांधकाम विभागामार्फत करणे. ४) सदर मिळकत धारकांचा अभिनंदनपर ठराव व तशा आशयाचे पत्र संबंधीतांना देणे

यासाठी सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८२१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.३१** **अखिल महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संयुक्त महामंडळ अधिवेशनासाठी निवास, सभागृह व मंडप टाकणेस परवानगी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद:-** अधिनियमातील विनियम २१ (१) (ख) मध्ये भक्तांना राहण्याकरीता व वापर करण्याकरीता विश्रामगृहे बांधणे व त्याची देखभाल करणे अशी तरतुद आहे.

**प्रस्ताविक:-** संदर्भीय पत्रानुसार अखिल महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यामिक शाळा मुख्याध्यापक संयुक्त महामंडळ अधिवेशन दि.२७/१०/२०१७ ते २९/१०/२०१७ यादिवशी घेण्याचे ठरवले आहे, तरी मंजुरी पत्रात आम्ही समक्ष पहाणी केल्याप्रमाणे धर्मशाळा-२ मधील इमारतीतील दोन समोरा समोरील इमारतीत निवासव्यवस्था अंदाजे १००० पर्यंत व त्यांचे सभागृह व मंडप टाकणेस परवानगी मिळुन दि २७/१०/२०१७ ते २९/१०/२०१७ पर्यंत उपलब्ध व्हाव्यात ही नम्र विनंती पत्राव्दारे इकडील विभागास कळविलेले आहे.

तसेच उपरोक्त प्रमाणे अधिवेशनासाठी अंदाजे ३ ते ४ हजार मुख्याध्यापक साईभक्त येवू शकतील असे दि.२०/०८/२०१७ चे पत्रात नमुद केले आहे.

**मागणी:-** अधिवेशनासाठी निवास, सभागृह व मंडप टाकणेस परवानगी मिळणे बाबत.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:-**

श्रींच्या दर्शनासाठी येणा-या साईभक्तांची प्रथम प्राधन्याने धर्मशाळा विभागात हॉल देऊन निवासव्यवस्था करण्यात येते. लग्नसमारंभ, शिबिरे, सभा, संमेलन अथवा इतर धार्मिक/ सामाजिक कार्यक्रमांसाठी (जागा व हॉलची) परवानगी दिली जात नाही. तसेच इकडील विभागात सभागृह ही उपलब्ध नाही.

तथापी दि. १६/०८/२०१६ रोजीचा मा.व्यवस्थापन समितीचे सभेतिल विषय नं.२५ व निर्णय क्र.५३४ नुसार साई धर्मशाळा येथे प्रशिक्षण, शिबीर, स्पर्धा इ. साठी पार्कीगची जागा (कॉक्रींट असलेली) उपलब्ध करुन देण्यात येवु नये, असे ठरले. तसेच दि.२५/०७/२०१७ रोजीचा मा.व्यवस्थापन समितीचे सभेतिल विषय नं.११४ व निर्णय क्र.६३४ नुसार राजकीय कार्यक्रमासाठी साई धर्मशाळा येथील हॉल देणे योग्य होणार नाही, त्याचबरोबर एखाद्या राजकीय कार्यक्रमासाठी हॉल उपलब्ध करुन दिल्यास, इतरही त्याची मागणी करतील व तशी प्रथा सुरु होईल. या सर्व बाबींचा विचार करता उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.

१) तसेच कार्यालयाचे वरील हॉल हा भोजनाचा हॉल असुन भोजन गृह चालु नसल्याने सध्या वापरात नाही. परंतु त्या हॉलमध्ये व्दारावती विभागाकडुन प्राप्त ३२५७ कापुस गाद्या हॉलमध्ये ठेवण्यात आलेल्या आहेत. तसेच विभागाकडील खराब झालेल्या वस्तु उदा. खुर्ची, टेबल, बादली, मग, खराब बेडशिट, खराब उशीकव्हर, इ. वस्तु ठेवण्यात आलेल्या आहे. सध्या त्याचा स्टोअर म्हणुन वापर होत आहे. गर्दीच्या वेळी रुग्ण नातेवाईकांची तसेच परिसरातील येणा-या साईभक्तांची निवासव्यवस्था करण्यात येत असते.

२) अखिल महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संयुक्त महामंडळ यांना येणाऱ्या ३ ते ४ हजार मुख्याध्यापकांचे अधिवेशानासाठी मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार सभागृह व मंडप टाकणे करीता परवानगी देता येणार नाही असे मत आहे.

प्रस्तावित कार्यक्रमासाठी हॉल/ जागा उपलब्ध करुन देण्यासाठी मा.व्यवस्थापन समितीचे सदस्यांची सुचना आहे. सदरील बाब ही धोरणात्मक स्वरुपाची असल्याने मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८२२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, अखिल महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यामिक शाळा मुख्याध्यापक संयुक्त महामंडळ यांना शिर्डी येथे अधिवेशन घेणेसाठी दि२७/१०/२०१७ ते २९/१०/२०१७ अखेर, त्यांचे मागणीप्रमाणे साईधर्मशाळा विभागाकडील दोन समोरा समोरील इमारतीमध्ये अंदाजे १००० व्यक्तीपर्यंतची सशुल्क निवासव्यवस्था तसेच सभागृह व मंडप टाकणेस सशुल्क परवानगी देणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईधर्मशाळा)

---

**विषय नं.३२** **साईआश्रम भक्तनिवाससाठी प्लॅस्टिक व इतर साहित्य खरेदी करणे.**

**प्रस्ताव-** **अधिनियम:-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी २००४ मधील २१ (१) (ग) "भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे." व (२) पोट-कलम (१) (ख) "भक्तांना राहण्यासाठी व वापर करण्याकरीता विश्रामगृहे बांधणे व त्याची देखभाल करणे."

**प्रास्ताविक:-** संस्थान अधिनियमातील तरतुदीनुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेमार्फत भक्तांची निवासव्यवस्था व त्यामध्ये विविध सुविधा पुरविणेत येते. त्या अनुषंगाने साईआश्रम भक्तनिवास साईभक्तांच्या निवास व्यवस्थेसाठी दि.११/०४/२०१३ पासुन सुरु करण्यात आलेले असुन या ठिकाणी १२ इमारतीमधुन १५३६ खोल्या आहेत.

साईआश्रम भक्तनिवास विभागामध्ये भक्तांची गर्दी वर्षभर कायम असते. त्यामुळे इकडील विभागातील निवासव्यवस्थेचा पुर्ण क्षमतेने वापर होत असल्याने खोल्यांमध्ये साईभक्तांच्या वापरासाठी दिलेले प्लॅस्टिक साहित्य सततच्या वापरामुळे तुटफुट व खराब होऊन वापरास अयोग्य झालेले आहे.

साईआश्रम भक्तनिवास विभाग सुरु होऊन चार वर्ष झालेआहेत. त्यामुळे विभाग सुरु झाला त्या वेळेस खरेदी केलेल्या प्लॅस्टिक बादली, मग, ट्रे, आंघोळीचा स्टुल, डस्टबिन, डोअरमॅट, स्टील ग्लास, इत्यादी वस्तुंचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं | वस्तुंचे वर्णन | क्षमता | खरेदी कालावधी दिनांक | प्रती नग दर रुपये/पैसे | खरेदी नग | वस्तु वापरुन झालेले कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्लॅस्टिक खुर्ची | हाताची | २९/०३/२०१५ | २५७/- | ३०० | ०२ वर्ष |
| २ | प्लॅस्टिक बादली | १८ लिटर | ०७/०५/२०११ | ९८/- | १,६९० | ०५ वर्ष |
| ३ | प्लॅस्टिक बादली | ०२ लिटर | १५/१२/२०१६ | २०/- | १,००० | ०९ महिने |
| ४ | प्लॅस्टिक जग | ०२ लीटर | ०६/०५/२०११ | ४६/- | १,५५० | ०५ वर्ष |
| ५ | प्लॅस्टिक मग | ०१ लीटर | ०६/०५/२०११ | १३/- | ३,४०० | ०५ वर्ष |
| ६ | प्लॅस्टिक ट्रे | लहान | ०७/०३/२०१४ | १२९/- | २,००० | ०३ वर्ष |
| ७ | बाथ स्टुल | - | ०६/०५/२०११ | ९१/- | १,६५० | ०५ वर्ष |
| ८ | कुलुपे (लिंक लॉक) | डबल लॉक | १०/१०/२०११ | १६५/- | १,७५० | ०५ वर्ष |
| ९ | स्टिल ग्लास | २५० मि लि | २५/०२/२०११ | ३०/- | ३,५०० | ०५ वर्ष |
| १० | रबर मोड डोअर मॅट (कुशन डोअरमॅट) | २'X१' .३" | २२/०७/२०१४ | ११८/- | २,००० | ०३ वर्ष |
| ११ | पायपुसणी | २'X१' .३" | १५/११/२०१६ | ५३/- | ४०० | ०९ महिने |

**मागणी:-** श्री साई समाधी शताब्दी वर्ष सुरु होत असल्याने भक्तांच्या गर्दीत वाढ होत आहे. भक्तांनासोयी सुविधा पुरविणेसाठी खालील प्रमाणे साहित्यांची आवश्यकता आहे. यामध्ये सेलो, निलकमल, सुप्रीम, तत्सम दर्जाचे इत्यादी नामांकित कंपनीचे साहित्य खरेदी करता येईल. यासाठी प्लॅस्टीक व इतर साहीत्य खरदी करणेकामी स्थानिक फर्निचर दुकानदार यांच्याकडे दराबाबतचौकशी केली असता त्यांनी खालील कोष्टकात नमुद केले नुसार प्लॅस्टिक साहित्यांचे दर दिलेले आहे.

| अ.नं | तपशील | वर्णन/ क्षमता | कंपनीचे नाव | मागणी नग | दर प्रती नग रुपये | एकुण रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | प्लॅस्टिक खुर्ची | बिगर हाताची | निलकमल | ५०० | ४८० /- | २,४०,०००/- |
| | | | आरीयन | ५०० | ३२० /- | १,६०,०००/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | सुप्रिम | ५०० | ४६० /- | २,३०,०००/- |
| | | | **सेलो** | **५००** | **४७० /-** | **२,३५,०००/-** |
| | | | Next chair | ५०० | ४८० /- | २,४०,०००/- |
| २ | प्लॅस्टिक बादली बाथरुम साठी (लाल कलर) | १७ लीटर | महानंदा | १,५०० | १९५ /- | २,९२,५००/- |
| ३ | प्लॅस्टिक बादली टॉयलेटसाठी (आकाशी कलर) | ०५ लीटर | महानंदा | १,५०० | ७५ /- | १,१२,५००/- |
| ४ | प्लॅस्टिक डस्टबीन लहान (खोलीमध्ये) | फ्रॉस्टीऑफीस बिन | महानंदा | १,६०० | ११५ /- | १,८४,०००/- |
| ५ | प्लॅस्टिक स्टुल | १८ इंची | महानंदा | ४० | २५० /- | १०,०००/- |
| ६ | प्लॅस्टिक ट्रे | लहान | - | १,५०० | ११०/- | १,६५,०००/- |
| ७ | प्लॅस्टिक जग | ०२ लीटर | महानंदा | ७,०० | ६८ /- | ४७,६०० |
| ८ | प्लॅस्टिक मग | ०१ लीटर | महानंदा | १,५०० | ४९ /- | ७३, ५००/- |
| ९ | कुलुपे (लिंक लॉक) | ०७ लिव्हर (३ चावीसह) | लिंक | ७,०० | १९८/- | १,३८,६००/- |
| १० | स्टिल ग्लास | २५० मि ली | - | ३,००० | ३६/- | १,०८,०००/- |
| ११ | कुशन डोअरमॅट | २’X१’ .३” | - | १,६०० | १८५ /- | २,९६,०००/- |
| १२ | पायपुसणी | २’X१’ .३” | - | १,५०० | १६५ /- | २,४७,५००/- |
| | | | | | **एकूण** | **१९,१०,२००/-** |

उपरोक्त कोष्टकात नमुद केले प्रमाणे सेलो, निलकमल,सुप्रीम तत्सम दर्जाचे नांमाकित कंपन्यांचे प्लॅस्टिक साहित्य खरेदी करण्याची आवश्यकता आहे. सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी ऑफिस व इतर खर्च, स्टेशनरी छपाई, फर्निचर खरेदी बजेट रु.४,००,००,०००/- (अक्षरी रुपये चार कोटी मात्र) मंजुर असुन, सदर प्लॅस्टीक साहित्य खरेदी चा खर्च रु. १९,१०,२००/- शिल्लक रक्कमेतुन करता येईल.

**संस्थान अधिनियम/ठराव नुसार अनुमान:-** मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेनुसार कार्यवाही करता येईल.

**विभागाचे स्पष्ट मत/ अभिप्राय:-**

१) उपरोक्त मागणी कोष्टकात नमुदप्रमाणे सेलो, निलकमल, सुप्रीम, तत्सम दर्जाचे नांमाकित कंपन्यांचे प्लॅस्टिक साहित्य खरेदी करणेस,

२) सदरचे प्लॅस्टिक साहित्य खरेदी विभागामार्फत ई-निवीदा प्रक्रिया पध्दतीने खरेदी करणेस,

३) याकामी येणा-या एकुण अपेक्षित खर्च रु. १९,१०,२०० /- (अक्षरी रुपये एकोणावीस लाख दहा हजार दोनशे मात्र) चे खर्चास,

उपरोक्त १ ते ३ बाबींवर निर्णय होणेकामी मा. व्यवस्थापन समितीसभेसमोर निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.८२३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवाससाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे नामांकित कंपन्यांचे प्लॅस्टिक व इतर साहित्य खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१९,१०,२००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास)

---

**विषय नं.३३** **कॅन्टीन विभागाकरीता आवश्यक असलेले पातेले, स्टेनलेस स्टिल टी जार खरेदी करणे.**

**प्रस्ताव-** **अधिनियम- २००४ मधील तरतुद-** सन २००४ मधील महाराष्ट्र शासन राजपत्रातील अधिनियम १७(१) मध्ये भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करून द्याव्यात अशी तरतुद करण्यात आलेली आहे.

**प्रस्तावित:-**

**(अ)** कॅन्टीन विभागा मार्फत साईभक्तांना चहा,कॉफी,दुध, तयार करण्याचे काम १) मंदिर परीसरातील जुने प्रसादालय रसोडा २) साईबाबा भक्तनिवास या दोन ठिकाणाहुन केले जाते.

मंदिर परिसरातील जुने प्रसादालय रसोडा येथे तयार होणारे चहा, कॉफी,दूध हे शांतिनिवास /भक्तनिवास दर्शन रांग, साईबाबा कॉम्पलेक्स (१६ गुंठे), मुख्य कॅन्टीन-जुने प्रसादालय परीसर, साईआश्रम धर्मशाळा, व्दारावती निवासस्थान, साईबाबा रूग्णालय, साईनाथ रूग्णालय या ठिकाणी पुरवठा केला जातो. साईबाबा भक्तनिवास येथे तयार होणारे चहा, कॉफी, दूध हे साईबाबा भक्तनिवासस्थान (५००रूम) साईआश्रम भक्तनिवासस्थान – G,J विंग या ठिकाणी पुरवठा केला जातो. या दोनही ठिकाणी चहा,कॉफी तयार करण्यासाठी वापरण्यात येणारी ॲल्युमिनियमची भांडी ही ०३ ते १० वर्षापुर्वी खरेदी करण्यात आलेली होती. त्यापैकी बरीचशी भांडी निरोपयोगी झाल्याने त्यांची विक्री करण्यात आलेली आहे. त्यामुळे कॅन्टीन विभागाकडे या दोन चहा बनविण्याचे ठिकाणी सध्या वापरात असलेले पातेल्यांची कमतरता व सततचे वापरामुळे सध्या वापरात असलेले ॲल्युमिनियम पातेल्यांची झीज होवुन ते निकामी होवु शकतात.या करीता तसेच २०१७-२०१८ मध्ये श्री साईंचा समाधी शताब्दी सोहळा साजरा होत आहे त्यासाठी होणारी गर्दी विचारात घेवुन चहा, कॉफी तयार करण्यासाठी खालील **अ** प्रमाणे पातेल्यांची आवश्यकता आहे सध्या आपलेकडे ॲल्युमिनियमचे पातेले वापरात आहेत परंतु ISO मानांकनाचे दृष्टीने स्टिलची भांडी वापरावी लागणार आहेत.

**ब)** कॅन्टीन विभागा मार्फत साईभक्तांना चहा,कॉफी,दुध, तयार करण्याचे काम १) मंदिर परीसरातील जुने प्रसादालय रसोडा

२) साईबाबा भक्तनिवास या दोन ठिकाणाहुन तयार होणारे चहा,कॉफी,दूध हे स्टेनलेस स्टिल जार व्दारे पुरवठा केला जातो. चहा, दूध, कॉफी वाटप करण्यासाठी वापरण्यात येणारे स्टेनलेस स्टिल टी जार हे ०५ ते ०६ वर्षापुर्वी क्लासिक/ नॅशनल कंपनीचे खेरदी करण्यात आलेले होते. त्यापैकी बरेचशे स्टेनलेस स्टिल टी जार निरोपयोगी झाल्याने त्यांची विक्री करण्यात आलेली आहे. त्यामुळे कॅन्टीन विभागाकडे या दोन चहा बनविण्याचे ठिकाणासाठी सध्या वापरात येत असलेल्या स्टेनलेस स्टिल टी जार ची सततचे वापरामुळे त्यांची झीज, तसेच त्यांचे लिकेजचे प्रमाण यांमुळे त्यांची कमतरता निर्माण होऊ शकते.

सन २०१७ -२०१८ मध्ये श्री साईंचा समाधी शताब्दी सोहळा साजरा होत आहे या बरोबरच श्री रामनवमी, श्री गुरूपौर्णिमा, श्री पुण्यतिथी उत्सव, दिपावली व नाताळ सुट्टी या कालावधीत होणारी प्रचंड संभाव्य गर्दी विचारात घेवुन तसेच गर्दीचे वेळी अतिरिक्त व्यवस्था म्हणून चहा, कॉफी,दूध यांचे स्टॉल लावणे झाल्यास ते साहित्य आपल्याकडे उपलब्ध असणे गरजेचे आहे या सर्व बाबींचा विचार करता खालील **ब** प्रमाणे स्टेनलेस स्टिल टी जार आवश्यक आहेत. क्लासिक/ नॅशनल,अनमोल,एमस्क्वेअर अगर इतर तत्सम कंपन्यांचे टी जार बाजारात उपलब्ध आहेत.

स्टेनलेस स्टिल पातेले व स्टेनलेस स्टिल टी जार यांचे दर कोपरगाव, सगंमनेर येथील व्यापा-यांकडुन घेवून त्यांचे स्टेनलेस स्टिल पातेल्यांचे सरासरी दर सादर केलेले आहेत. व स्टेनलेस स्टिल टी जार खरेदी कामी ई-मेल व्दारे दर पत्रके मागवुन आलेल्या दरपत्रकाप्रमाणे सरासरी दर नमुद करण्यात आले आहेत.

**विभागाची मागणी:- (अ) स्टेनलेस स्टिल पातेले**

| अ. क्र | तपशिल<br>स्टेनलेस स्टिल पातेले (स्टेलम ३०४, ८-% निकेल धातु असलेले ) टोप | साईज<br>व्यास×उंची | मागणी<br>नग | अंदाजे वजन<br>किलो- ग्रॅम |
|---|---|---|---|---|
| ०१. | २०० लि क्षमतेचे, 6mm. सपाट बुडाचे, 3mm जाडीचे, १० झाकण्यासह | ३२"×१६" | १० | ६५०.००० |
| ०२. | १५० लि क्षमतेचे, 6mm.सपाट बुडाचे, 3mmजाडीचे | ३०"×१६" | ०६ | ३३६.००० |
| ०३. | १०० लि क्षमतेचे, 6mm.सपाट बुडाचे, 3mmजाडीचे | २७"×१५" | ०५ | २२५.००० |
| ०४. | २५ लि क्षमतेचे, 6mm.सपाट बुडाचे, 3mmजाडीचे | १८"×१४" | ०३ | ७२.००० |
| ०५. | १० लि क्षमतेचे, जाड बुडाचे | १३"×१०" | ०३ | ३९.००० |
| | एकुण | | २७ | १३२२.००० |
| | **प्रति किलो दर रूपये** | | | ५१८.०० |
| | **अपेक्षित एकुण खर्च रूपये** | | | **६,८४,७९६.००** |

**(ब) स्टेनलेस स्टिल टी जार**

| अ. क्र | तपशिल<br>कॉकसह, २६ गेज स्टिल पत्र्याचे. | मागणी<br>नग | अंदाजे दर<br>रूपये | एकुण किंमत<br>रूपये |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०१. | स्टेनलेस स्टिल टी जार २५ लि.क्षमतेचा | ६० | २६८४/- | १,६१,०४०/- |
| ०२. | स्टेनलेस स्टिल टी जार १५ लि.क्षमतेचा | ६० | २२१४/- | १,३२,८४०/- |
| ०३. | स्टेनलेस स्टिल टी जार १० लि.क्षमतेचा | ५० | १८५३/- | ९२,६५०/- |
| ०४. | स्टेनलेस स्टिल टी जार ७.५ लि.क्षमतेचा | १५ | १६७३/- | २५,०९५/- |
| ०५. | स्टेनलेस स्टिल टी जार ५ लि.क्षमतेचा | १५ | १५२६/- | २२,८९०/- |
| | **एकुण अपेक्षित खर्च रूपये** | | | **४,३४,५१५/-** |

**विभागाचे मत:-** विभागाचे मागणी नुसार (अ) प्रमाणे रू.६,८४,७९६/- व (ब) प्रमाणे रू.४,३४,५१५/- असा एकुण रू.११,१९,३११/-इतका अपेक्षित खर्च असुन त्यास व सदर खरेदी, खरेदी विभागामार्फत विहीत पध्दतीने खरेदी (वर्तमान पत्रात जाहिरात/संस्थानचे संकेतस्थळावर माहिती देण्यापासुन ते पुरवठा आदेश देण्यापर्यतच्या सर्व समावेशक प्रक्रिया व खर्चासह) करून मिळणेचा विषय मा.व्यवसथापन समिती सभे समोर निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.८२४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, कॅन्टीन विभागाकरीता प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे पातेले, स्टेनलेस स्टिल टी जार खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.११,१९,३११/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, कॅन्टीन विभाग)

---

**विषय नं.३४** **माहे जानेवारी- २०१७ ते एप्रिल- २०१७ अखेर प्रसादभोजनकामी आलेल्या खर्चाबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०.११.२०१६ सभेतील निर्णय क्रं.८२० नुसार असे ठरले की,मा.त्रीसदस्य समितीच्या दि.१४/०६/२०१६ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं३४३अन्वये श्रींचे समाधी शताब्दी महोत्सव कालावधीमध्ये दि.०१/१०/२०१७ ते १८/१०/२०१८ पर्यंत देणगीदार साईभक्तांचे देणगीतून मोफत अन्नदान वर्ष म्हणून घोषित करणेस मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच अन्नदान फंडामधील शिल्लक निधी व दिवसेदिवस मोफत भोजन योजनेमध्ये साईभक्तांची वाढती देणगी या बाबींचा विचार करता, नविन वर्षाची साईभक्तांना भेट देण्यासाठी दि.०१/०१/२०१७ पासून प्रायोगिक तत्वावर संपूर्ण दिवस मोफत भोजन चालू करणेत यावे.,सदरहू योजना प्रथमत: दि.३०/०९/२०१७ पर्यंत सुरु ठेवण्यात यावी व या योजनेस भक्तांचा उस्फुर्त प्रतिसाद मिळाल्यास समाधी शताब्दी वर्षानंतरही मोफत प्रसादभोजन योजना चालू ठेवण्यात यावी. परंतु या योजनेचा लाभ जनरल भोजनहॉलमध्ये प्रसादभोजन घेणा-या भक्तांनाच राहील. व्ही.आय.पी व व्ही.व्ही.आय.पी प्रसादभोजनासाठी पुर्वीप्रमाणेच शुल्क आकारणे यावे.असा निर्णय झालेला असल्यामुळे माहे- जानेवारी ते एप्रिल मध्ये प्रसादभोजन बनविणेकामी आलेला प्रत्यक्ष खर्चाचा व उत्पन्नाचा तपशिल खालीलप्रमाणे .

**अ)उत्पन्नाचा तपशिल**

| अ.नं. | उत्पन्नाचा तपशिल | महिना/वर्ष-२०१७ | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | जानेवारी | फेब्रुवारी | मार्च | एप्रिल |
| ०१ | मोफत भोजन योजनेअंतर्गत जमा झालेली देणगी रक्कम | ४४,७३,६४०.०० | २८,९५,२७८.०० | ४०,०८,९१८.०० | ५४,७२,७६५.०० |
| ०२ | विशेष बैठक व्ही.आय.पी.रक्कम | ४८,५६,२९०.०० | ३०,२५,०८०.०० | ३६,१९,३१०.०० | ३४,८७,५४०.०० |
| ०३ | कायम/कंत्राटी /आऊटसोर्स कर्मचारी व मुकबधिर विदयार्थी भोजन रक्कम | ६९,६५५.०० | ६७,६५१.०० | ७३,१५४.०० | ५६,१८६.०० |
| ०४ | मासिक भोजन पास रक्कम | २२५.०० | २२५.०० | ०.०० | ०.०० |
| | **एकुण उत्पनाची रक्कम =** | **९३,९९,८१०.००** | **५९,८८,२३४.००** | **७७,०१,३८२.००** | **९०,१६,४९१.००** |

**ब) प्रसादभोजनकामी आलेल्या खर्चाचा तपशिल**

| अ.नं. | खर्चाच्या रक्कमेचा तपशिल | महिना/वर्ष-२०१७ | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | जानेवारी | फेब्रुवारी | मार्च | एप्रिल |
| ०१ | धान्य,कडधान्य,डाळी,तुप,मसाले वैगरेसाठी आलेला खर्च | १,२९,२३,७२९.०२ | ९५,२८,९३७.२८ | १,०५,३०,८३१.१५ | १,००,५९,२४१.८५ |
| ०२ | भाजीपाला खर्च | ९,३४,३९९.८४ | ७,२४,७०१.३८ | ८,१८,६३२.४३ | १०,७३,७१९.३० |
| ०३ | दुध खर्च | २,८३,४३२.५० | १,७५,७०२.८० | २,८०,४४०.०० | ३,२५,३२७.५० |
| ०४ | गॅस व मशिनरी दुरुस्ती देखभाल खर्च | २५,९७,१०९.२१ | १४,३३,३८९.९६ | १९,०४,११०.३६ | १९,२४,५५१.३६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०५ | कायम कर्मचारी पगार रक्कम | ६१,४५,५१०.०० | ६१,३५,५६८.०० | ६१,५६,८९६.०० | ६३,०३,९५७.०० |
| ०६ | कंत्राटी कर्मचारी पगार रक्कम | ३०,३३,०५१.०० | २७,५३,८९८.०० | ३५,४६,२५१.०० | ३८,३५,१२९.०० |
| ०७ | चपाती/पुरी,चपाती मशिन चपाती मजुरी रक्कम | ३,८९,१४३.०० | २,७६,९३३.६० | ३,७६,१४२.९६ | ३,०७,८२२.३८ |
| ०८ | हाऊसकिपींग व जादा वाढपी केटरर्स मजुरी रक्कम | १४,४९,९९९.०० | १४,४९,९९९.०० | १४,४९,९९९.०० | २०,१४,३०८.०० |
| ०९ | किराणा व भाजीपाला व इतर वाहतुक इंधन खर्च अंदाजे | १,००,०००.०० | १,००,०००.०० | १,००,०००.०० | १,००,०००.०० |
| १० | पाणी खर्च अंदाजे | ४,८०,१८०.०० | ४,८०,१८०.०० | ४,८०,१८०.०० | ४,८०,१८०.०० |
| ११ | लाईट खर्च | २२,४३,५५५.०० | १२,३१,९३९.०० | १३,३८,५७९.०० | ११,१३,०८२.०० |
| **एकुण खर्चाची रक्कम =** | | **३,०५,८०,१०८.५७** | **२,४२,९१,२४९.०२** | **२,६९,८२,०६१.९०** | **२,७५,३७,३१८.३९** |

| **महिना** | **उत्पन्नाचा तपशिल** | **खर्चाचा तपशिल** | **प्रसादभोजन संख्या** | **प्रति ताटास आलेला खर्च** |
|---|---|---|---|---|
| **जानेवारी-२०१७** | **९३,९९,८१०.००** | **३,०५,८०,१०८.५७** | १४,५०,३७८ | २१.०८ |
| **फेब्रुवारी-२०१७** | **५९,८८,२३४.००** | **२,४२,९१,२४९.०२** | ९,९८,९२६ | २४.३१ |
| **मार्च-२०१७** | **७७,०१,३८२.००** | **२,६९,८२,०६१.९०** | ११,०१,९९० | २४.४८ |
| **एप्रिल-२०१७** | **९०,१६,४९१.००** | **२,७५,३७,३१८.३९** | ११,२७,२०५ | २४.४२ |

**क) अन्नदान फंडातील देणगी वितिरीक्त मोफत भोजन योजनेअंतर्गत जमा झालेली देणगी व प्रसादभोजन घेणा-या भक्तांची संख्या तुलनात्मक माहिती.**

| **महिना** | **प्रसादभोजन संख्या** | **मोफत भोजन देणगी** | **महिना** | **प्रसादभोजन संख्या** | **मोफत भोजन देणगी** |
|---|---|---|---|---|---|
| जानेवारी-२०१६ | १२,७४,९७५ | ७४,३७,२९८/- | जानेवारी-२०१७ | १४,५०,३७८ | ४४,७३,६४०/- |
| फेब्रुवारी-२०१६ | ८,७३,६९७ | ३९,८५,८८९/- | फेब्रुवारी-२०१७ | ९,९८,९२६ | २८,९५,२७८/- |
| मार्च-२०१६ | ९,८६,८७४ | ७३,१४,८३७/- | मार्च-२०१७ | ११,०१,९९० | ४०,०८,९१८/- |
| एप्रिल-२०१६ | ९,८६,३०७ | १,१८,५०,७६५/- | एप्रिल-२०१७ | ११,२७,२०५ | ५४,७२,७६५/- |

**मागणीः-** मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार ०१ जानेवारी २०१७ पासुन सुरु करणेत आलेली संस्थानमार्फत संपूर्ण दिवस मोफत योजनेकामी माहे-जानेवारी-२०१७ ते एप्रिल-२०१७ अखेर प्रसादभोजनकामी प्राप्त झालेले उत्पन्न आणि त्याकामी आलेला खर्च मा.व्यवस्थापन समितीपुढे अवलोकानार्थ सादर करणेबाबत...

**संस्थान अधिनियम/ठराव यानुसार अनुमानः-** आर्थिक

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मतः-** ०१ जानेवारी २०१७ पासुन सुरु करणेत आलेली संस्थानमार्फत संपूर्ण दिवस मोफत योजनेकामी माहे-जानेवारी-२०१७ ते एप्रिल-२०१७ अखेर प्रसादभोजनकामी प्राप्त झालेले उत्पन्न आणि त्याकामी आलेला खर्च मा.व्यवस्थापन समितीपुढे अवलोकानार्थ सादर करता येईल असे नम्र मत आहे.

तरी माहे-जानेवारी-२०१७ ते एप्रिल-२०१७ अखेर प्रसादभोजनकामी प्राप्त झालेले उत्पन्न आणि त्याकामी आलेला प्रत्यक्ष खर्च याबाबतची माहिती मा.व्यवस्थापन समितीपुढे अवलोकनार्थ सादर.

निर्णय क्र.८२५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे-जानेवारी-२०१७ ते एप्रिल-२०१७ अखेर प्रसादभोजनकामी आलेला प्रत्यक्ष खर्च व प्राप्त झालेल्या देणग्या याचे अवलोकन करणेत आले. त्यामध्ये दि.०१ जानेवारी २०१७ पासुन संपूर्ण दिवस मोफत योजना सुरु झाल्यापासुन अन्नदान फंडामध्ये कमी देणग्या प्राप्त झाल्याचे निदर्शनास आले. अन्नदान फंडामध्ये देणग्या प्राप्त होणेसाठी शताब्दी अन्नदान योजना तयार करणेत येऊन, साईभक्तांना आवाहन करणेत यावे व समाधी शताब्दी वर्षामध्येही संपुर्ण दिवस मोफत प्रसादभोजन साईभक्तांना उपलब्ध करुन देण्यात यावे. तसेच दि.०१ ऑक्टोबर, २०१७ पासुन मुकबधीर विद्यालयांना पुरविणेत येणारे प्रसाद भोजन मोफत देण्यात यावा. त्याचप्रमाणे प्रसादालयामध्ये मोफत नित्य अन्नदानासाठी प्राप्त होणाऱ्या देणग्या व लेखाशाखा विभागाकडील देणगी काऊंटरवर अन्नदान फंडामध्ये प्राप्त होणाऱ्या देणग्यांचा सविस्तर अहवाल पुढील सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्रसादालय विभागप्रमुख/ मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.३५** **माहे जुन २०१७ ते जुलै २०१७ या कालावधीतील प्रयोगशाळांचे तपासणी अहवाल मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८.१०.२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८०० नुसार "यापुढे मोतीचुर लाडु प्रसाद निर्मीती करीता खरेदी करणेत येत असलेल्यागावरान तुपाचे प्रत्येक नमुन्याची तपासणी अश्वमेध इंजिनीअर्स ॲण्ड कन्सलटंटस नासिक, या NABL मान्यताप्राप्त प्रयोगशाळेकडुन करुन घेण्यात यावी", असे ठरलेले आहे.

त्यानुसार भांडार विभागास प्राप्त होणा-या प्रत्येक नविन बॅचचे गावरान तुपाचे नमुन्यांची तपासणी अश्वमेध इंजिनीअर्स ॲण्ड कन्सलटंटस नासिक, या NABL मान्यताप्राप्त प्रयोगशाळेकडुन करणेत येत आहे. याशिवाय संस्थानची श्री साई प्रसादालयातील प्रयोगशाळा कार्यान्वीत झालेपासुन किराणा माल, गावरान तुप व खाद्यतेलाचे प्रत्येक बॅचचे नमुन्यांची तपासणी त्यांचेकडुनही केली जात आहे.

खरेदी विभागाचे दि.१४.०७.२०१७ रोजीचे मंजूरटिपणीमध्ये संस्थानला प्राप्त होणा-या गावरान तुप व खाद्यतेलाची तपासणी राज्य/ केंद्र शासनाच्या प्रयोगशाळेमधून करुन घेणेबाबत निर्देश झालेले आहेत. त्यानुसार भांडार विभागामार्फत दि.०१.०८.२०१७ पासून त्याप्रमाणे अंमलबजावणी करणेत येत आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.३१.०८.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६३७ अन्वये "संस्थानसाठी किराणा माल अथवा इतर ज्या साहित्यांच्या नमुन्यांची लॅब तपासणी करण्यात येते अशा लॅब तपासण्यांचा अहवाल सभेसमोर सादर करण्यात यावा", असे ठरलेले आहे. त्यानुसार माहे मे २०१७ पर्यंतचे सर्व प्रयोगशाळा तपासणी अहवाल यापुर्वी मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेत आलेले आहेत.

आता माहे जुन २०१७ ते जुलै २०१७ या कालावधीतील तपासणी अहवालाचे परिशिष्ठ यासोबत अवलोकनार्थ सादर केले आहे. अश्वमेधइंजिनीअर्स ॲण्ड कन्सलटंटस, नासिक, यांचे गावरान तुपाचे प्रत्येक तपासणी अहवालात "The analysed food sample complies with Food Safety and Standards (Food Products Standards and Food Additives) Regulations,2011 (for which limits have been mentioned) with respect to the parameters tested." असे नमुद आहे.

रिजनल ॲगमार्क लॅबोरेटरी, मुंबई, (Central Govt. Lab.) यांचे गावरान तुपाचे व खाद्यतेलाचे तपासणी अहवालात "The Samples submitted by the party Conform to Agmark specification" असे नमुद आहे.

उपरोक्त तपासणी अहवालांचे आधारे सदरचे गावरानतुपाचा व खाद्यतेलाचा पुरवठा वेळोवेळी संस्थानचे विविध विभागांना करणेत आलेला आहे.

तरी सोबतचे परिशिष्ठ (पा.नं.१ ते ४) प्रमाणे गावरान तुपाचे व खाद्यतेलाचे प्रयोगशाळा तपासणी अहवाल मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढेअवलोकनार्थ सादर.

**निर्णय क्र.८२६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे जुन- २०१७ ते जुलै- २०१७ या कालावधीतील गावरान तुप व खाद्यतेलाच्या नमुन्यांचे प्रयोगशाळेंकडून प्राप्त झालेल्या तपासणी अहवालाचे अवलोकन करणेत येऊन, त्याची नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही- अधिक्षक, भांडार विभाग)

---

**विषय नं.३६** **श्री गुरुस्थान मंदिराकरीता सोन्याच्या पादुका देणगी दाखल स्विकारणेस परवानगी बाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ तरतुद-**

| अ.क्र | कलम/तरतूद क्रमांक | कलम/ तरतूदीचे शीर्षक | पोटकल/उपकलम क्रमांक | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग | १ (ग) | भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे |

**प्रस्तावना:-** श्रींचे गुरुस्थान मंदिरामध्ये अक्कलकोटचे श्रीस्वामी समर्थ महाराजांच्या पादुका पुर्वीपासुन स्थापन करण्यात आलेल्या आहेत. सदर पादुका या चांदीमध्ये तयार करण्यात आलेल्या आहेत.

**प्रस्ताव:-** साईभक्त श्री.चिराला चिन्नारेड्डी यांनी आपले दि०१/०९/२०१७ रोजीचे पत्रान्वये श्रीगुरुस्थान मंदिराचे चांदीच्या पादुकांवर सोन्याच्या पादुका देणगीदाखल देणेबाबत इच्छा प्रदर्शित केली आहे. तरी याबाबत निर्णय होणेस विनंती.

**विभागचा अभिप्राय:-** यापुर्वी साईभक्त श्री विजय कुमार बार्ली, रा.हैद्राबाद यांनी त्यांचे दि.२८/०२/२०१७ चे विनंती अर्जान्वये श्रींचे गुरुस्थान मंदिरातील फोटोसमोरील चांदीच्या पादुकांना७५० ग्रॅम

सोन्याचे पादुकांचे आवरण देणगीदाखल देणेबाबत इच्छा प्रदर्शित केली आहे. यासाठी लागणारा सर्व खर्च ते देण्यास तयार आहेत. सदर देणगी स्विकारणेकरीता प्रस्तावास मा.व्यवस्थापन समितीचे दि.२७.०३.२०१७चे सभेतील विषय नं.१०, निर्णय क्र.२४३ नुसार प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे दानशुर साईभक्त श्री.बी.विजय कुमार यांचेकडुन श्रीगुरुस्थान मंदिरातील चांदीच्या पादुकांवर ७५० ग्रॅम सोन्याचे आवरण देणगीदाखल स्विकारणेस मान्यता देण्यात आली आहे. ठरावानुसार जा.क्र.एसएसएस/मंदिर/४७२/२०१७, दि.२६.०४.२०१७ चे श्री विजयकुमार बार्ली यांना पत्र देण्यात आलेले आहे त्यानंतर त्यांनी त्याबाबतची आवश्यक मापेही घेतली आहे परंतु, अद्यापपर्यंत साईभक्त श्री.बी.विजयकुमार यांनी पादुका देणगीदाखल दिलेल्या नाही.

तरी आता नव्याने साईभक्त श्री.चिराला चिन्नारेड्डी, रा.नेल्लुर हे देखील श्रीगुरुस्थान मंदिराचे चांदीच्या पादुकांना सोन्याच्या पादुका देणगीदाखल देणेबाबत इच्छित असल्याने त्यांचेकडुन सोन्याच्या पादुका स्विकारावे, असे नम्र मत आहे. तसेच श्री.बी.विजयकुमार यांचेकडुन भविष्यामध्ये इतर वस्तु देणगीदाखल देणेबाबत इच्छा प्रदर्शित केल्यास ती वस्तू देणगी म्हणून स्विकारता येईल. तरी याबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८२७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दानशुर साईभक्त श्री.चिराला चिन्नारेड्डी, रा.नेल्लुर यांचेकडून श्रीगुरुस्थान मंदिराचे चांदीच्या पादुकांना ७५० ग्रॅम सोन्याचे आवरण देणगीदाखल स्विकारणेस मान्यता देण्यात आली. तथापि, सदरहू देणगी स्विकारणेपुर्वी मंदिर व लेखाशाखा विभागाने विहीत कार्यपध्दतीची अंमलबजावणी करावी, असे ठरले.** (कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख)

---

**विषय नं.३७** **संस्थान रुग्णालयातील एक वर्ष परिविक्षाधीन कालावधी पुर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना संस्थान सेवेत कायम करणे.**

**प्रस्ताव-** **अधिनियम कलम २००४ तरतुद–** कलम १३(४) मधील समितीस संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची (कार्यकारी अधिका-यांव्यतिरिक्त) व कर्मचा-याची नेमणूक करता येईल.

परंतु ज्या अधिका-याला किंवा कर्मचा-याला दरमहा दोन हजार रुपयांहून अधिक वेतन देण्यात येत असेल किंवा द्यावयाचे असेल, अशा कोणत्याही अधिका-यांची किंवा कर्मचा-याची नेमणूक, समितीकडून, असे पद राज्य शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजूर करण्यात येईपर्यंत केली जाणार नाही. आकृतीबंधातील अटी-शर्ती क्र. ३– "सदर पदांवर नव्याने नियुक्ती करताना समितीने सदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिद्धी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परीक्षा घेऊन नियुक्ती करावी."तसेच अट शर्त क्र. ८ मध्ये "समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पद्धतीने भरावी जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही" असे नमुद आहे.

**मा व्यवस्थापन समिती सभेतील ठराव-**

१) मा व्यवस्थापन समिती दि. १८/१२/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र ६३०.

संस्थान रूग्णालयामध्ये आवश्यक असलेल्या वैद्यकीय अधिका-यांच्या पदांबरोबरच वैद्यकिय संचालक पद भरणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.

२) मा व्यवस्थापन समिती दि. १६/०८/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र ५१०.

दि. २४/०५/२०१६ रोजी संस्थानचे दोन्ही रूग्णालयासाठी वैद्यकीय संचालक व इतर २८ पदांसाठी घेणेत आलेल्या मुलाखतीचे बंद पाकीट आजचे सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील उमेदवारांना मिळालेले गुण, त्यांची शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव व रिक्त पदे या सर्व गोष्टींचे समितीने अवलोकन केले.

यावर सविस्तर चर्चा होऊन, निवड समितीने नियुक्तीसाठी शिफारस केलेले उमेदवार व राज्य शासनाचे आरक्षणविषयक तसेच भरती संदर्भातील विविध शासन निर्णय / परिपत्रक यासह सदरहू प्रस्ताव अंतीम निर्णयार्थ रूग्णालय उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.

**प्रस्ताविक-** मा व्यवस्थापन समिती दि. १८/१२/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र ६३० नुसार संस्थान रूग्णालयामध्ये आवश्यक असलेल्या वैद्यकीय अधिका-यांच्या पदांबरोबरच वैद्यकिय संचालक पद भरणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली. सदर निर्णयानुसार संस्थानचे संकेतस्थळावर व वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करणेत आली होती. जाहिरातीस अनुसरून आलेल्या अर्जदारांचे अर्ज मा डीन बी.जे.एम.सी. पुणे यांचेकडे तपासणी पाठविले होते त्यातील पात्र अर्जदारांच्या दि. २४/०५/२०१६ रोजी मा डीन, बीजेएमसी, पुणे व सिव्हील सर्जन, अहमदनगर यांनी मुलाखती

घेऊन मुलाखतीचा निकाल व्हिडीओ चित्रीकरणासमोर पाकीटात सिल केला. सदरचे बंद पाकीट दि. १६/०८/२०१६ रोजीचे मा व्यवस्थापन समितीचे सभेसमोर उघडणेत येऊन त्यावर निर्णय क्र ५१० नुसार दि. २४/०५/२०१६ रोजी संस्थानचे दोन्ही रूग्णालयासाठी वैद्यकीय संचालक व इतर २८ पदांसाठी घेणेत आलेल्या मुलाखतीचे बंद पाकीट आजचे सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील उमेदवारांना मिळालेले गुण, त्यांची शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव व रिक्त पदे या सर्व गोष्टींचे समितीने अवलोकन केले.

यावर सविस्तर चर्चा होऊन, निवड समितीने नियुक्तीसाठी शिफारस केलेले उमेदवार व राज्य शासनाचे आरक्षणविषयक तसेच भरती संदर्भातील विविध शासन निर्णय / परिपत्रक यासह सदरहू प्रस्ताव अंतीम निर्णयार्थ रूग्णालय उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.

तथापि, दि. ०७/०९/२०१६ रोजी दु. ०२.०० चे दरम्यान प्र वैद्यकीय संचालक व दु ०३.३० चे दरम्यान श्री गमे, प्रशासकीय अधिकारी यांनी मा उच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या तज्ञ समितीच्या शिफारसीप्रमाणे उमेदवारांना नेमणूक आदेश द्यावेत असे मा कार्यकारी अधिकारी यांचे निर्देश आहेत असे सांगितले त्यानुसार एच आर दि. ०८/०९/२०१६ रोजीचे मंजुर टिपणीअन्वये मुलाखतीचे अहवालातील शिफारसीनुसार निवड केलेल्या उमेदवारांना हजर तारखेपासून १ परिविक्षाधीन कालावधीसाठी दि. १२/०९/२०१६ रोजी नेमणूक आदेश देणेत आलेले आहे. त्यांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ नं | उमेदवाराचे नाव | पदाचे नाव | हजर तारीख | ०१ वर्ष परिविक्षाधीन कालावधी संपुष्टात येत असल्याचा दिनांक | परिविक्षाधीन कालावधीत घेतलेल्या अर्जित / विनावेतन रजा | रजेमुळे परिविक्षाधीन कालावधी संपुष्टात येत असल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ | ०७ |
| १ | डॉ अजित यशवंत पाटील | नेत्रविकार तज्ञ | ०१/१०/२०१६ | ३०/०९/२०१७ | अर्जित-१२ विनावेतन-०१ | १३/१०/२०१७ |
| २ | डॉ कविता शंतनु सरवार | उतीविकृती शास्त्रज्ञ | ०३/१०/२०१६ | ०२/१०/२०१७ | अर्जित-२० विनावेतन-०१ | २३/१०/२०१७ |
| ३ | डॉ आत्माराम लक्ष्मण धुळगंड | निवासी वैद्यकीय अधिकारी (RMO) | ०१/१०/२०१६ | ३०/०९/२०१७ | अर्जित-०८ विनावेतन-०४ | १२/१०/२०१७ |
| ४ | डॉ अनघा गहिनीनाथ विखे | निवासी वैद्यकीय अधिकारी (RMO) | ०३/११/२०१६ | ०२/११/२०१७ | अर्जित-१६ विनावेतन-०१ | १९/११/२०१७ |
| ५ | श्री निखील पितांबर नेतकर | मध्यवर्ती निर्जतुकीकरण तंत्रज्ञ | १३/०९/२०१६ | १२/०९/२०१७ | अर्जित-२२ | ०४/१०/२०१७ |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) (सर्वसाधारण सेवा अटी) विनियम, २०१३ मधील विनियम २९. महाराष्ट्र शासनाचे नियम, विनियम आणि आदेश लागू करणे या शिर्षकाखाली, संस्थानाने तयार केलेल्या विविध सेवाविनियमात विनिर्दिष्ट तरतुदी नसलेल्या सर्व बाबीचे शक्य असेल तेव्हा आणि संस्थानाला योग्य वाटेलअशा प्रमाणात महाराष्ट्र शासनाच्या कर्मचा-यांना लागू असलेल्या पध्दती प्रमाणेच नियमन करण्यात येईल, असे नमुद आहे.

शासन सेवेतील अधिकारी/ कर्मचारी यांच्या परिवीक्षाधीन कालावधिबाबतचे शासन निर्णय क्रमांक परिवी २७१५/ प्रक्र३०२/आठ दि. २९/०२/२०१६ रोजीचे शासन निर्णयातील तरतूद क्र ३ ब परिवीक्षाधीन कालावधित कोणत्याही स्वरूपाची रजा (नैमित्तीक रजा वगळून) उपभोगल्यास त्याचा परिवीक्षाधीन कालावधि रजेच्या कालावधीएवढा वाढविण्यात यावा.

उपरोक्त कर्मचा-यांचा एक वर्ष परिविक्षाधीन कालावधी पुर्ण झाल्याने त्यांना संस्थान सेवेत कायम करणेकामी त्यांचे ०१ वर्ष कामकाजाबाबतचा गोपनीय अहवाल संबंधीत कर्मचाऱ्यांचे विभागप्रमुख वैद्यकीय संचालक व वैद्यकीय अधिक्षीका यांचेकडून खालीलप्रमाणे प्राप्तझालेला आहे.

| अ नं | उमेदवाराचे व पदाचे नाव | गोपनीय अहवाल |
| --- | --- | --- |
| १ | डॉ अजित यशवंत पाटील<br>नेत्रविकार तज्ञ, साईनाथ रूग्णालय | वागणुक चांगली आहे. हुकुमाप्रमाणे, योग्य रितीने काम करतात, काही प्रकरणे चालू अथवा प्रस्तावीत नाही. संस्थान सेवेत कायम करणेस हरकत नाही. |
| २ | डॉ कविता शंतनु सरवार<br>उतीविक्रुती शास्त्रज्ञ<br>श्री साईबाबा हॉस्पिटल | वागणुक चांगली आहे. हुकुमाप्रमाणे, योग्य रितीने काम करतात, काही प्रकरणे चालू अथवा प्रस्तावीत नाही. संस्थान सेवेत कायम करणेस हरकत नाही. |
| ३ | डॉ आत्माराम लक्ष्मण धुळगंड<br>निवासी वैद्यकीय अधिकारी (RMO)<br>साईनाथ रूग्णालय | वागणुक चांगली आहे. हुकुमाप्रमाणे, योग्य रितीने काम करतात, काही प्रकरणे चालू अथवा प्रस्तावीत नाही. संस्थान सेवेत कायम करणेस हरकत नाही. |
| ४ | डॉ अनघा गहिनीनाथ विखे<br>निवासी वैद्यकीय अधिकारी (RMO)<br>श्री साईबाबा हॉस्पिटल | वागणुक चांगली आहे. हुकुमाप्रमाणे, योग्य रितीने काम करतात, काही प्रकरणे चालू अथवा प्रस्तावीत नाही. संस्थान सेवेत कायम करणेस हरकत नाही. |
| ५ | श्री निखील पितांबर नेतकर<br>मध्यवर्ती निर्जतुकीकरण तंत्रज्ञ<br>श्री साईबाबा हॉस्पिटल | वागणुक चांगली आहे. हुकुमाप्रमाणे, योग्य रितीने काम करतात, काही प्रकरणे चालू अथवा प्रस्तावीत नाही. संस्थान सेवेत कायम करणेस हरकत नाही. |

**मागणी-** श्री साईबाबा संस्थान रूग्णालयातील एक वर्ष परिविक्षाधीन कालावधी पुर्ण झालेल्या कर्मचा-यांना संस्थान सेवेत कायम करणेबाबत.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–** श्री साईबाबा संस्थान रूग्णालयातील एक वर्ष परिविक्षाधीन कालावधी पुर्ण झालेल्या उपरोक्त कर्मचा-यांना त्यांचे ०१ वर्ष परिविक्षाधीन कालावधी संपुष्टात येत असल्याचे (स्तंभ क्र ७ मधील) लगतचे दिनांकापासून संस्थान सेवेत कायम करता येईल.

निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.८२८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या ०५ कर्मचाऱ्यांचा ०१ वर्ष परिविक्षाधीन कालावधी संपुष्टात येत असल्यामुळे त्यांचा परिविक्षाधीन कालावधी संपुष्टात येत असलेच्या लगतचे दिनांकापासून त्यांना संस्थान सेवेत कायम करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३८** **मा.कामगार न्यायालय, अहमदनगर युएलपी क्र.१७/ २०१३ श्री.पांडुरंग तुकाराम धुमसे, मदतनीस, श्री साईनाथ रुग्णालय विरुध्द कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी लागलेल्या निकालानुसार कामावर हजर/ रुजु करुन घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री पांडुरंग तुकाराम धुमसे हे दि. ०४.१२.२००६ पासुन श्री साईनाथ रुग्णालयात मदतनीस म्हणून कार्यरत होते. वैद्यकीय अधिक्षक यांचे दि. २२.०३.२०१२ रोजीचे निवेदन व विविध दैनिक वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या वृत्तांमधून असे दिसुन येते की, श्री. धुमसे हे दि. १८.०३.२०१२ रोजी श्री साईनाथ रुग्णालयाचे रक्तपेढी विभागात रात्री ८ ते सकाळी ८ या ड्युटीत कामावर हजर होते. त्या ड्युटीत रात्री १ ते १:३० वाजेच्या दरम्यान श्री. धुमसे यांनी त्यांचे सह कर्मचारी श्री. शिवाजी कोंडीबा आवळेकर, रक्तपेढी तंत्रज्ञ, यांना असे सांगितले की, १५ ते २० मिनीटांसाठी मी बाहेर जावून येतो. त्यानंतर श्री. धुमसे यांनीसंस्थान नियमानुसार कामावर असताना कामाची जागा सोडण्यापूर्वी मुव्हमेंट रजिष्टरमध्ये नोंद करणे आवश्यक असताना देखील श्री. धुमसे यांनी मुव्हमेंट रजिष्टरमध्ये नोंद न करताच कामाची जागा सोडून गेले. त्यानंतर रात्री२:३० ते ३ वाजेच्या दरम्यान श्री. धुमसे रक्तपेढीत परत आले. विविध दैनिक वृत्तपत्रांमधील वृत्तपत्रांवरुन असे दिसून येते की, श्री.धुमसे यांचे राहाता येथील श्री.रावसाहेब देवराम कांदळकर यांची पत्नी सौ. अनिता हिच्याशी अनैतिक संबंध होते. त्या संबंधास श्री. रावसाहेब कांदळकर यांनी विरोध केला म्हणून श्री. धुमसे यांनी सौ. अनिता यांचे इतर नातेवाईकांच्या मदतीने श्री रावसाहेब कांदळकर यांना धारदार शस्त्राने भोसकुन ठार मारले. त्यानंतर श्री. रावसाहेब कांदळकर यांना संस्थानचे रुग्णालयात आणले होते. त्यावेळी डॉक्टरांनी तपासलेनंतर श्री रावसाहेब कांदळकर मृत झाल्याचे घोषित केले. याप्रकरणी रावसाहेब कांदळकर यांचे बंधू श्री अण्णासाहेब कांदळकर यांनी राहाता पोलीसांकडे या घटनेची फिर्याद दाखल केलेली आहे. त्यानुसार श्री. धुमसे सह ७ जणांवर भारतीय दंड विधान संहिता कलम नं. ३०२,

१४३, १४७, १४८ कलमांन्वये गुन्हा दाखल झालेला आहे. सदर प्रकरणी श्री. धुमसे यांना पोलीसांनी अटक केली होती. पोलीसांनी श्री. धुमसे यांना न्यायालयासमोर हजर केले असता, मा. न्यायालयाने श्री. धुमसे यांना २२ मार्चपर्यंत पोलीस कस्टडी दिलेली होती. सदरचे घटनेनंतर श्री. धुमसे हे सतत, सलग, विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरुन गैरहजर आहेत. सदरच्या घटनेबाबत दि. २०.०३.२०१२ ते दि. २२.०३.२०१२ रोजीच्या विविध दैनिक वर्तमानपत्रात बातम्या प्रसिद्ध झाल्या. त्यामुळे संस्थान व रुग्णालय प्रशासनाचे नावलौकिकास बाधा पोहचली आहे. याबाबत इकडील जा.नं. एसएसएस/ वशी ७बी/ ९४/२०१२ दि.०७.०४.२०१२ व एसएसएस / वशी७बी / १६५९/२०१२ दि. २८.०६.२०१२ अन्वये कारणे दाखवा नोटीस काढून श्री.धुमसे यांचा लेखी खुलासा मागविणेत आला होता. श्री. धुमसे यांचा दि.१०.०८.२०१२ रोजीचा खुलासा असमाधानकारक आहे.

अशाप्रकारे कामावर असताना वरिष्ठांच्या परवानगीशिवाय विनाकारण योग्य कारणाशिवाय कामाची जागा सोडून जाणे, संस्थान प्रशासन व व्यवस्थापन यांची बदनामी होईल असे गैरकृत्य करणे, सतत, सलग,दिर्घकाळ, विनापरवानगी रजा अर्जाशिवाय गैरहजर राहणे ही श्री. धुमसे यांची कृत्ये इंडस्ट्रीयल एम्प्लॉयमेंट (स्टॅण्डींग ऑर्डर्स) ॲक्ट १९४६ खालील स्थायी आदेशाचे कलम नं. २४(ए), २४(एफ), २४(एच) नुसार गंभीर गैरशिस्त वर्तने ठरतात. श्री. धुमसे यांचे गंभीर गैरवर्तनाबद्दल त्यांचेवर रीतसर आरोपपत्र बजावून खाते चौकशी करण्यात आलेली आहे. चौकशीत त्यांचेवरील आरोप शाबीत झालेने ते दोषी आढळून आहे. सबब, मा. व्यवस्थापन समितीचे दि. २७.०४.२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३८१ नुसार जा.नं.एसएसएस/ वशी७बी/ १७४३/ २०१३ दि. २९.०६.२०१३ अन्वये बडतर्फ करण्यात आलेले आहे.

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये श्री. धुमसे यांनी मा. कामगार न्यायालय, अहमदनगर युएलपी क्र. १७/२०१३ श्री. पांडुरंग तुकाराम धुमसे, मदतनीस, श्रीसाईनाथ रुग्णालय विरुद्ध श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी बाबत दि. १३.०७.२०१७ रोजीच्या निकालाचीप्रत इकडील कार्यालयास दि. ०३.०८.२०१७ रोजी श्री. धुमसे यांचे दि.०२.०८.२०१७ रोजीचे अर्जासोबत प्राप्त झाली आहे.

मा. कामगार न्यायालय, अहमदनगर यांनी खालीलप्रमाणे आदेश केलेले आहेत.

**ORDER**

**01.** Complaint is partly allowed.

**02.** Order dtd. 19.06.2013 terminating the services of the complaint being illegal is quashed and set aside.

**03.** The Respondent is directed to reinstate the Complainant with continuity but without back wages.

**04.** No costs.

श्री धुमसे यांना देण्यात आलेली शिक्षा ही त्यांचेवर ठेवण्यात आलेल्या आरोपांच्या तुलनेत जास्त कडक होती म्हणून मा. कामगार न्यायालयाने शिक्षेचे आदेश रद्दबातल ठरविलेले आहे. मा. न्यायालयाचा आदेश योग्य आहे. तसेच मा.न्यायालयाने खाते चौकशीची कार्यवाही योग्य ठरविली आहे व केवळ शिक्षेचे आदेश रद्द केले आहेत. त्यामुळे तुलनेने सौम्य शिक्षेचे आदेश नव्याने पारीत करता येतील का, याबाबत संस्थान कामगार कायदा सल्लागार ॲड. अशोकराव पाटील, अहमदनगर यांचा दि. १४.०८.२०१७ रोजीचे पत्रान्वये कायदेशीर अभिप्राय घेण्यात आला. ॲड. अशोकराव पाटील यांनी दि. २४.०८.२०१७ रोजी कायदेशीर मत दिले असुन, त्यात त्यांनी “Once the punishment of dismissal is found shocking and disproportionate then we have no jurisdiction to substitute the lesser punishment”. असे नमुद केले आहे.

श्री. धुमसे यांनी दि.०५.०९.२०१७ रोजीचा विनंती अर्ज दिलेले असुन त्यात त्यांनी, “मला दि. १८.०३.२०१२३ रोजी शिस्तभंगाची कारवाई म्हणून बडतर्फ केले होते. तक्रार १७/२०१३ मा. कामगार न्यायालय, अहमदनगर माझा अंतिम आदेश दि. १३.०७.२०१७ रोजी कामावर हजर करुन घेण्याचा झाला, त्यानंतर दि. ०२.०८.२०१७ विनंतीपूर्वक अर्ज केलेला आहे. तरी मी वारंवार संबंधित अधिकारी यांना वारंवार भेटत होतो त्यानंतर दि. ०५.०९.२०१७ माझ्या अधिका-यांनी सांगितल्याप्रमाणे मी आपणास हमीपत्र दिलेले आहे.

तरी मा. मेहरबान साहेबांनी माझ्या हमीपत्राचा विचार करुन मला लवकरात लवकर कामावर घेण्यात यावे ही नम्र विनंती” असे म्हटलेले आहे.

श्री. धुमसे यांनी दि. ०५.०९.२०१७ रोजी रु. १००/- चे स्टॅम्प पेपरवर हमीपत्र करुन दिलेले आहे. त्यात त्यांनी "मी श्री. पांडुरंग तुकारा धुमसे, हुद्दा –मदतनीस, विभाग – श्री साईनाथ रुग्णालय विभागात संस्थानमध्ये नोकरी होतो. मला व्यवस्थापनाने दि. १८.०३.२०१७ रोजी शिस्तभंगाची कारवाई म्हणून बडतर्फ केल्याने मी मा. कामगार न्यायालय, अहमदनगर येथे संस्थान विरुद्ध तक्रार (यु.एल.पी.) क्र. १७/२०१३ दाखल केली होती. सदरच्या तक्रारीमध्ये मा. कामगार न्यायालय, अहमदनगर यांनी दि. १३.०७.२०१७ रोजती कामावर हजर करुन घेण्याबाबतीच्या न्यायनिवाडा केलेला आहे. मी खालीलप्रमाणे हमीपत्र लिहुन देत आहे.

मला दि. २९.०६.२०१२ रोजी बडतर्फ केल्यापासुन ते कामावर हजर होणेचे तारखेपासुन या कालावधीतील वेतन किंवा वेतनापोटी फरक (Back Wages) मागणार नाही. किंवा यापुढील न्यायालयात किंवा सरकारी दरबारी जाणार नाही, अशी हमी देतो.

आज रोजी दि. ०५.०९.२०१७ रोजी मौजे शिर्डी येथील श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी मागितल्याप्रमाणे मी हमीपत्र राजीखुशीने लिहुन देत आहे. तरी मला लवकरात लवकर कामावर घेण्यात यावे, ही विनंती" असे म्हटलेले आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–** श्री. धुमसे यांना देण्यात आलेली शिक्षा ही त्यांचेवर ठेवण्यात आलेल्या आरोपांच्या तुलनेत जास्त कडक होती म्हणून मा.कामगार न्यायालयाने शिक्षेचे आदेश रद्दबादल ठरविलेले आहे. त्यामुळे मा. कामगार न्यायालयाचा दि. १३.०७.२०१७ रोजीचा आदेश विचारात घेता श्री. पांडुरंग तुकाराम धुमसे यांना बडतर्फ कालावधीतील वेतनाशिवाय संस्थान सेवेत सलग सेवा धरुन पर्नस्थापना करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णयास्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.८२९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावातील विभागाचा अभिप्राय व मा.कामगार न्यायालयाचा दि.१३.०७.२०१७ रोजीचा आदेश विचारात घेता, श्री.पांडुरंग तुकाराम धुमसे मदतनीस यांना बडतर्फ कालावधीतील वेतनाशिवाय संस्थान सेवेत सलग सेवा धरुन पुन:स्थापना करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३९** **पाणी पुरवठा विभागाकरीता वार्षिक पध्दतीने साहित्यांची खरेदी करणे.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-**

| अ.नं. | कलम/ तरतुद क्रमांक | कलम/तरतुदीचे शीर्षक | पोटकलम/ उपकलम क्रमांक | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | १ | राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, **भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे** आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील. |
| ०२ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | २ (झ) | सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील. |
| ०३ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | ६ | या अधिनियमाच्या तरतुदीस अधीन राहून, समितीला या अधिनियामाखालील आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील. |

**प्रस्तावना:-** श्री साईंच्या दर्शनासाठी शिर्डी येथे येणा-या भक्तांना निवासाची सुविधा उपलब्ध व्हावी म्हणून संस्थानमार्फत निवासस्थान इमारतींची उभारणी करण्यात आलेली आहे. सदर इमारतीमधील खोल्या/हॉल

साईभक्तांना निवासासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. श्री साई मंदिर, दर्शनरांगेच्या इमारती, साईआश्रम भक्तनिवास इमारत, साई धर्मशाळा इमारत, व्दारावती भक्तनिवास इमारत, कर्मचारी निवासस्थान इमारत इ.ठिकाणचे इमारतीमध्ये वापरासाठी पाणी उपलब्ध व्हावे यासाठी पाईपलाईन व्दारे पाण्याचे नळ कनेक्शन देण्यात आलेले आहेत. सततच्या वापराने ब-याच ठिकाणच्या पाईपलाईन, नळ लिकेज होत असतात. पाण्याचा अपव्यय होवू नये यासाठी सदर पाईपलाईनचे लिकेज झाल्यानंतर ते त्वरीत बंद करुन पाणी पुरवठा सुरळीत ठेवणे गरजेचे असते. यासाठी आवश्यक साहित्य कायमस्वरुपी विभागाकडे उपलब्ध ठेवावे लागते.

**प्रस्ताव:-** सद्यस्थितीत प्लंबींग मेन्टेनंसकरीता आवश्यक साहित्य पाणी पुरवठा विभागाकडील स्टोअर्समध्ये तसेच संस्थानचे मुख्य भांडार विभागाकडे उपलब्ध नाहीत. ऐनवेळी पाईपलाईन लिकेज झाल्यास पाणी पुरवठा खंडीत होवू नये, पाणी वाया जावू नये यासाठी सदरचे साहित्य खरेदी करणे गरजेचे असते. विभागाकडुन आवश्यकता भासेल त्या वेळी प्रस्ताव सादर करण्यात येवून साहित्याची खरेदी करण्यात येत आहे. यामध्ये वेळेवर साहित्य उपलब्ध होत नसलेने कामे विहीत मुदतीत पुर्ण करणेस अडचणी येत आहेत.

श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते १८ ऑक्टोबर, २०१८ (विजयादशमी) या कालावधीत साजरे करण्यात येणार आहे. या कालावधीमध्ये लाखो साईभक्त श्री साईचे महासमाधीचे दर्शनार्थ शिर्डी येथे भेट देतील. यामुळे साईभक्तांचे संख्येत वाढ होणार असल्याने श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्ष सन २०१७-२०१८ निमित्त येणा-या भाविकांना संस्थान परिसरात निवारा शेड (मंडप व्यवस्था) प्रस्तावित असलेने सदर निवारा शेडमध्ये भाविकांना सुरळीतपणे पिण्याचा पाणी पुरवठा होणेसाठी नव्याने तात्पुरते स्वरुपात पाईपलाईन टाकून पाणी सुविधा निर्माण कराव्या लागतील. याकरीता साहित्याची आवश्यकता भासणार आहे.

**मागणी:-** सोबतच्या यादीनुसार अ.नं.०१ ते अ.नं.५०२ प्रमाणे पाणी पुरवठा विभागाचे दैनंदिन प्लंबींग मेन्टेनंसचे कामासाठी तसेच श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्ष कालावधीत येणारे साईभक्तांकरीता पाणी व्यवस्था करणेसाठी विविध प्रकारचे साहित्य खरेदी करावे लागणार आहे.

**विभागाचे स्पष्ट मत/ अभिप्राय:-** मागील तीन वर्षापासून मटेरीयल खरेदी झालेली नाही. त्यामुळे दैनंदिन कामकाजात अडचणी निर्माण होत आहे. त्यामुळे आवश्यक मटेरीयल खरेदी करणे गरजेचे आहे. तरी उपरोक्त प्रमाणे सोबतचे यादीनुसार अ.नं.०१ ते अ.नं.५०२ प्रमाणे पाणी पुरवठा विभागाचे दैनंदिन प्लंबींग, इलेक्ट्रिक मेन्टेनंसचे कामासाठी तसेच श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्ष कालावधीत येणारे साईभक्तांकरीता पाणी व्यवस्था करणेसाठी अंदाजे रक्कम रु.१,४४,८४,४५५/- मात्र इतका खर्च अपेक्षित असून सदरची खरेदी खरेदी विभागाकडुन करणेस व यासाठी येणारे अंदाजे खर्चास मंजुरी मिळणेसाठी मान्यतेस्तव सादर.

**निर्णय क्र.८३०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, पाणी पुरवठा विभागाचे दैनंदिन प्लंबींग, इलेक्ट्रिक मेन्टेनंसचे कामासाठी तसेच श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्ष कालावधीत येणारे साईभक्तांकरीता पाणी व्यवस्था करणेसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे वार्षिक पध्दतीने साहित्यांची खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१,४४,८४,४५५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**<u>यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.</u>**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१** **दिनांक २१.०९.२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.८३१** दिनांक २१.०९.२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

**०१** **श्री साईबाबांच्या जीवनावर आधारीत "सबका मालीक एक है" या महानाटयाची स्क्रिप्ट तपासणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव

आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

४. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ड) श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

**मा. व्यवस्थापन समिती ठरावः-**

१) श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित करावयाच्या धार्मिक सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांची रूपरेषा व स्वरूप ठरविणेकामी साईभक्त, शिर्डी ग्रामस्थ तसेच जागतिक साई मंदिर विश्वस्त/पदाधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या सूचना व अभिप्राय यावर चर्चा होऊन धोरणात्मक निर्णय होणेकामी धार्मिक सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे वेळापत्रक मा. व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करणेत आले होते. त्यात सप्टेंबर-२०१७ व ऑक्टोबर-२०१८ मध्ये या नाटयप्रयोगाचा समावेश करण्यात आलेला आहे. सदरहू प्रस्तावावर मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.३५८ अन्वये खालीलप्रमाणे संमत झालेला आहे.

*“..समाधी शताब्दी वर्षामध्ये सादर करावयाच्या कार्यक्रमांची रूपरेषा ठरविणेत येऊन, झालेल्या चर्चेप्रमाणे तात्काळ कार्यवाही करणेस व त्याकामी येणा-या सर्व समावेशक खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे..”*

२) श्री साईबाबांच्या जीवनावर आधरीत ‘सबका मालिक एक है’ या महानाट्याचे संस्थानने आयोजन करणेबाबतचा विषय मा.व्यवस्थापन समितीच्या दि.२०/०८/२०१७ रोजीच्या सभेत सादर करण्यात आला होता. यावर निर्णय क्र.६९४ खालीलप्रमाणे संमत झाला आहे.

“ श्री साईबाबांच्या जीवनावर आधारित ‘सबका मालिक एक है’ या महानाट्याचे समाधी शताब्दीच्या पार्श्वभूमीवर दि.०१ ऑक्टोबर, २०१७ रोजी आयोजन करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.९,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच या नाटयप्रयोगातील प्रसंग व संवाद याचे स्क्रिप्ट स्थानिक उपसमिती सभेकडून तपासून घ्यावी, असे ठरले.”

**प्रस्तावना:-** श्री.प्रशांत डांगे, कार्यकारी निर्माता, साई क्रिएटिव्ह व्हीजन, नागपूर यांचे दि.२८/११/२०१६ व दि.२२/०७/२०१७ चे पत्रानुसार साई चरित्रावर आधारीत ‘सबका मालिक एक है‘ या प्रकाश (Light) आणि ध्वनी (Sound) हिंदी महानाट्याचे श्रीसाईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजन करण्यासाठीचा प्रस्ताव दि.२०/०८/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करण्यात आला होता. त्यावर निर्णय क्र.६९४ अन्वये रक्कम रु.९ लाख मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली आहे. तसेच या नाट्यप्रयोगातील प्रसंग व संवाद याचे स्क्रिप्ट स्थानिक उपसमिती सभेकडून तपासुन घ्यावी, असे ठरले आहे.

**प्रस्तावः-** श्री साईबाबांच्या जीवनावर आधारीत ‘सबका मालिक एक है’ या महानाट्याचे संस्थानने आयोजन करणेबाबतचा विषय मा.व्यवस्थापन समितीच्या दि.२०/०८/२०१७ रोजीच्या सभेत सादर करण्यात आला होता. यावर निर्णय क्र.६९४ पुढीलप्रमाणे संमत झाला आहे, “श्री साईबाबांच्या जीवनावर आधारित ‘सबका मालिक एक है’ या महानाट्याचे समाधी शताब्दीच्या पार्श्वभूमीवर दि.०१ ऑक्टोबर, २०१७ रोजी आयोजन करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.९,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच या नाटयप्रयोगातील प्रसंग व संवाद याचे स्क्रिप्ट स्थानिक उपसमिती सभेकडून तपासून घ्यावी, असे ठरले.”

श्री.सोमेश्वर बालपांडे, दिग्दर्शक यांनी पाठविलेली ‘सबका मालिक एक है’ या महानाट्याची स्क्रिप्ट मा. स्थानिक उपसमिती सभेच्या सर्व सदस्यांना सभेमध्ये पुरविणेत आली होती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, ‘सबका मालिक एक है’ या महानाट्याची स्क्रिप्ट, मुळ श्री साईसच्चरित्र ग्रंथाचा सखोल अभ्यास असणाऱ्या तज्ञांकडून तपासून घेण्यात यावी, असे सर्व सदस्यांचे मत झाले. याकरीता साईचरित्राचा अभ्यास असणारे संस्थानमधील कायम कर्मचारी श्री.मोहन यादव, जनसंपर्क अधिकारी व श्री.नवेंदू मराठे, लिपीक तसेच साईलिला द्वैमासिकाचे माजी संपादक श्री.विद्याधर ताठे यांचेकडून सदरहू महानाट्याची स्क्रिप्ट तपासून घेण्यात यावी**

**तसेच दि.०१ ऑक्टोबर, २०१७ रोजी मान्यवरांच्या हस्ते श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाच्या ध्वजस्तंभाचे अनावरण करण्यात येणार आहे. त्यामुळे 'सबका मालिक एक है' या महानाट्याचे आयोजन दि.०१ ऑक्टोबर, २०१७ रोजी न करता पुढे करण्यात यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

०२ **श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष उदघाटन सोहळा दि.०१ ऑक्टोबर, २०१७ रोजी मा.मुख्यमंत्री महोदय यांचे प्रमुख उपस्थितीत आयोजीत करावयाच्या कार्यक्रमाचे तपशीलवार नियोजन करणे.**

श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव-२०१७ शुक्रवार, दि.२९/०९/२०१७ ते सोमवार, दि.०२/१०/२०१७ अखेर असा चार दिवस साजरा करण्यात येत आहे. श्रीसाईबाबा पुण्यतिथी उत्सवाचे तृतीय दिवशी रविवार, दि.०१ ऑक्टोबर,२०१७ रोजी श्रीसाईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे प्रथम दिवसाने सुरुवात होत आहे. त्यानिमित्त संस्थानतर्फे भव्य कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आलेले आहे.

**प्रस्ताव:-**

१) दि.०१ ऑक्टोबर, २०१७ रोजी मा.राष्ट्रपती महोदय, मा.राज्यपाल महोदय, मा.मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य हे उद्घाटन समारंभाकरीता शिर्डी येथे येणार आहेत. त्याकरीता खाली नमूद केल्याप्रमाणे कार्यक्रमाची रुपरेषेबाबत चर्चा होऊन निश्चित होणेस मान्यता मिळणेस विनंती.

२) प्रमुख अतिथी, मंत्री महोदय व इतर मान्यवरांचे सत्कार साहित्य निश्चित होणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**विभागाचा अभिप्राय:-**

**अ)** दि.३०/०९/२०१७ रोजी श्रीपुण्यतिथी उत्सवाचा मुख्य दिवस असल्याने समाधी मंदिर रात्रभर दर्शनासाठी उघडे असल्याने काकड आरती होणार नाही. तसेच दि.०१ ऑक्टोबर, २०१७ चे दिवशी खालील कार्यक्रमांचे नियोजन करणेत यावे, असे मत आहे. तरी याबाबत निर्णय होणेस विनंती.

**मिनीट- टू- मिनीट कार्यक्रम पत्रिका**

| **अश्विन शु ॥११** | **रविवार, दि.०१/१०/२०१७ रोजीचे कार्यक्रम** |
|---|---|
| पहाटे ५.०० ते ५.२० वा. | श्रीसाईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाची सुरुवात निमित्त श्रींचे समाधी व मूर्तीस सप्तनद्यांचे (गंगा, यमुना, सरस्वती, नर्मदा, सिंधु, कावेरी, तुंगभद्रा, इ.) पाण्याने स्नान. |
| सकाळी५:३०ते ५.४०वा. | श्रींची नित्याची "शिर्डी माझे पंढरपुर" आरती (आरतीनंतर दर्शनरांग सुरु होईल) |
| सकाळी५.४५ ते ५.५५ वा | मा.व्यवस्थापन समितीचे वतीने (श्री पुण्यतिथी उत्सव तृतीय दिवस) समाधी मंदिरात श्रींची पाद्यपूजा. (पाद्यपूजेच्या वेळेस दर्शनाच्या इतर तीनही रांगा चालू राहतील) |
| सकाळी ६.०५ ते ७ वा | श्रींचे समाधीस पुजारी यांचेमार्फत सप्तनद्यांचे पाण्याने समाधी अभिषेक पूजा करण्यात येईल. |
| सकाळी ६.०० ते ९.०० वाजेपर्यंत | समाधी मंदिरात भजन त्यानंतर मंत्रोच्चार, शिर्डी माझे पंढरपुर आरती व ललकारी होऊन शताब्दी महोत्सवाचे ध्वाजाची व फोटोची समाधी मंदिरातुन श्रीद्वारकामाई येथे मिरवणूक व तेथुन श्रींचे रथामध्ये फोटो व ध्वज ठेवुन शिर्डी शहरातुन मिरवणूक होऊन ध्वज शोभायात्रा लेंडीबागेत येईल.<br>(सहभाग:- मा.अध्यक्ष, उपाध्यक्ष, सर्व सदस्य व मुख्य कार्यकारी अधिकारी, उपजिल्हाधिकारी तसेच उपकार्यकारी अधिकारी, श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व शिर्डी ग्रामस्थ आणि नाट्यरसिक संच, शिर्डी यांचा सहभाग असेल.) |
| सकाळी ८.०० ते ८.३० वाजेपर्यंत | श्रीगणेशयाग यज्ञ- (श्रीदत्त मंदिरासमोरील मोकळया जागेत)<br>उपासनी कन्याकुमारी स्थान, साकुरी, ता.राहाता यांचेमार्फत<br>मा.अध्यक्ष महोदय व इतर यांचे हस्ते प्रधान संकल्प करुन पूजेस सुरुवात करण्यात येईल. |
| सकाळी १० ते १०.१५वा **(१५ मिनीटे)** | **मा.मान्यवर यांचे शुभहस्ते लेंडीबागेत ध्वजारोहण कार्यक्रम.**<br>(श्रीगणेश-वरुण पुजन, शिर्डी माझे पंढरपुर आरती व ध्वजारोहन करुन श्रीफळ फोडण्यात येईल.)<br>(मंदिर विभाग पौरोहित्य-१)श्री.बाळासाहेब जोशी, २)श्री.अमित देशमुख व २ चोपदार हे उपस्थीती.) |
| सकाळी १०.१७ ते १०.३० वा **(१५ मिनीटे)** | **मा.मान्यवरांचे समाधी मंदिरामध्ये आगमन, शिर्डी माझे पंढरपुर आरती, दर्शन कार्यक्रम.**<br>(मा.प्रमुख अतिथी व इतर मान्यवरांचे आगमन – निर्गमन एकूण वेळ १५ मिनीटे) |

| | |
|---|---|
| सकाळी १०.३५ ते ११.३० वा. | **मा.मान्यवर यांचे उपस्थितीत १६ गुंठे येथे मुख्य उदघाटन समारंभ.** |
| दुपारी १२.१० वाजता | श्रींची माध्यान्ह आरती. |
| दुपारी ३.१५ ते ४.०० वाजेपर्यंत | १६ गुंठे जागेत सामुहिक श्रीसाईनाथ स्तवन मंजरी पठण कार्यक्रम. |
| दुपारी ४.०० वाजता | समाधी मंदिरात पुजारी यांचेमार्फत नित्याचे श्रीसाईसच्चरित्राचे अध्याय वाचन. |
| दुपारी ४.०० ते ६.०० वा | एकादशीनिमित्त नामवंत कीर्तनकार यांचे कीर्तन. |
| सायंकाळी ६.१५वाजता | श्रींची धुपारती. |
| सायं.७.३० ते १०.०० वाजेपर्यंत | सबका मालिक एक महानाट्य कार्यक्रम. |
| रात्रौ १०.३० वाजता | श्रींची शेजारती. |

**ब)** श्रींचे दर्शनासाठी येणारे मान्यवरांचा संस्थानचे वतीने यथोचित सत्कार करण्यात येतो. दि.०१ ऑक्टोबर, २०१७ रोजी मा.राष्ट्रपती महोदय, मा.राज्यपाल महोदय, मा.मुख्यमंत्री महोदय हे श्रीसाईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे उद्धाटन कार्यक्रमाकरीता शिर्डी येथे येणार आहेत. प्रमुख मान्यवरांचे समवेत इतर मंत्री महोदय देखील उपस्थीत असणार आहेत. त्याअनुषंगाने सर्व मान्यवरांचे संस्थानचे वतीने सत्कार करण्यात येणार आहे. त्याकामी खालीलप्रमाणे नियोजन करता येईल-

प्रमुख मान्यवरांचे सत्कारासाठी नियोजन खालीलपैकी साहित्य खरेदी करता येईल-

१) मा.राष्ट्रपती महोदय, मा.राज्यपाल महोदय, मा.मुख्यमंत्री महोदय यांना श्रींची ५ नंबर पावडर मूर्ती लाकडी बॉक्समध्ये फिट करुन देता येईल. सदर मूर्ती वार्षिक पावडर मार्बल मुर्ती पुरवठादार यांचेकडुन खरेदी करता येतील.

२) मा.राष्ट्रपती महोदय, मा.राज्यपाल महोदय, मा.मुख्यमंत्री महोदय यांचे सत्काराकरीता स्थानिक दुकानदार यांचेकडुन श्रींची मकराना प्युअर मार्बल मूर्ती खरेदी करुन लाकडी बॉक्समध्ये फिट करुन मान्यवरांचा सत्कार करता येईल. प्युअर मार्बल मूर्ती खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम रु.५०,०००/- (अक्षरी रुपये पंन्नास हजार मात्र) खर्च अपेक्षीत आहे.

३) मा.राष्ट्रपती महोदय, मा.राज्यपाल महोदय, मा.मुख्यमंत्री महोदय यांना स्थानिक दुकानदार यांचेकडुन श्रींचे समाधी मंदिराचा देखावा असलेला काचेचा मोठा आकर्षक लाईटींगचे मंदिराचा मोठा बॉक्स देता येईल. याकामी अंदाजे रक्कम रु.३०,००० (अक्षरी रुपये तीस हजार मात्र) खर्च अपेक्षीत आहे.

४) श्रीसाईबाबांचा गोल्डन व आकर्षक अशी उच्च प्रतिची फ्रेम किंवा इत्यादी मा.व्यवस्थापन समिती ठरवेल त्याप्रमाणे साहित्य खरेदी करुन मान्यवरांना देता येईल.

प्रमुख मान्यवरांचे समवेत येणारे इतर महत्वाचे मान्यवरांचे सत्काराचे नियोजन खालीलपैकी खरेदी करता येईल-

१) प्रमुख मान्यवरांचे समवेत इतर महत्वाचे मान्यवरांना ५नंबर अथवा ४नंबर पवडर मार्बल मूर्ती लाकडी बॉक्समध्ये फीट करुन किंवा फक्त ४नंबर किंवा५ नंबर मुर्ती विना बॉक्स देता येईल.

२) प्रमुख मान्यवरांचे यांना स्थानिक दुकानदार यांचेकडुन श्रींचे समाधी मंदिराचा देखावा असलेला काचेचा लहान आकर्षक लाईटींगचे मंदिराचा लहान आकाराचा बॉक्स देता येईल.

३) मा.व्यवस्थापन समिती ठरवेल त्याप्रमाणे साहित्य खरेदी करुन मान्यवरांना देता येईल.

तरी दि.०१ ऑक्टोबर, २०१७ रोजीचे उद्धाटन कार्यक्रमाची मिनीट-टू-मिनीट रुपरेषा निश्चित होणेस व कार्यक्रमाकरीता येणारे मा.राष्ट्रपती महोदय, मा.राज्यपाल महोदय, मा.मुख्यमंत्री महोदय व इतर मान्यवरांचे सत्काराकरीता उपरोक्त नमूद केलेले साहित्य अथवा मा.व्यवस्थापन समितीने ठरविल्याप्रमाणे साहित्य निश्चित होणेस व सदर साहित्य खरेदी करणेकामी होणा-या खर्चास मान्यता मिळणेकामी निर्णय होणेस विनंती आहे.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.०१ ऑक्टोबर, २०१७ रोजीचे उद्धाटन कार्यक्रमासाठी प्रस्तावित मान्यवरांच्या आगमनापासुन ते निर्गगनापर्यंतच्या कार्यक्रमाची सभेने माहिती घेतली. या उद्धाटन सोहळयाची उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या रुपरेषेमधील सकाळी ०८.०० ते ८.३० वेळेत मा.अध्यक्ष महोदय व इतर यांचे हस्ते प्रधान संकल्प करुन पूजेस सुरुवात करण्यात येईल, त्याऐवजी मा.उपाध्यक्ष महोदय (सपत्नीक) व इतर यांचे हस्ते प्रधान संकल्प करुन पूजेस सुरुवात करण्यात येईल व सकाळी १०.०० ते १०.१५ वेळेत मा.मान्यवर यांचे शुभहस्ते लेंडीबागेत ध्वजारोहण कार्यक्रमाचे**

**वेळेची शिर्डी माझे पंढरपुर ही आरती न करता, श्रीगणेश-वरुण पुजन व ध्वजारोहन करुन श्रीफळ फोडण्यात येईल, असा बदल करणेत येऊन, प्रस्तावित मिनीट-टू-मिनीट रुपरेषा अंतीम करणेत आली.**

**तसेच दि.०१ ऑक्टोबर, २०१७ रोजी आयोजित करण्यात येणारे सर्व सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रम पुढे ढकलणेत यावेत. त्याचप्रमाणे मा.राष्ट्रपती महोदय व इतर मान्यवरांचे सत्काराकरीता उपरोक्त प्रस्तावामध्ये नमूद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व आवश्यक असलेले साहित्य खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात यावी. तसेच स्टेजवरील मान्यवरांच्या सत्कारासाठी डिव्हीनिटीचे लहान व मोठे गोल्ड प्लेटेड मोमेंटो खरेदी करणेत यावे. याकरीता येणाऱ्या खर्चास व ती भेटवस्तु मान्यवरांना देण्यास मान्यता द्यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख/ समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

०३ **श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष उदघाटन सोहळा दि.०१ ऑक्टोबर, २०१७ रोजी आयोजीत करणेत आलेल्या शोभा यात्रेच्या नियोजनास मान्यता देणे.**

**मा. व्यवस्थापन समिती ठरावः-**

१) मा. व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१७१

श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवा निमित्ताने दि.०१ ऑक्टोंबर, २०१७ ते १८ ऑक्टोंबर, २०१८ अखेर ३८६ दिवस दररोज साईभक्तांसाठी धार्मिक, सामाजीक साईबाबांची शिकवण, सेवाभाव दर्शविणा-या भव्य स्वरुपाच्या कार्यक्रमांचे आयोजन करणेत यावे,

*२) मा. व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३५८*

*शताब्दी वर्षाचे सुरुवातीस करावयाच्या ध्वजारोहणासाठी सोबत सादर केलेल्या नुमन्यांमधील अ.नं. ०३ चा नमुना सर्वानुमते मान्य करण्यात आला. या ध्वजासाठी भगव्या रंगाचे उच्च प्रतीचे रेशमी कापड वापरण्यात येऊन, त्यावर समाधी शताब्दीचा लोगो व श्रींचा श्रध्दा –सबुरी हा मंत्र छापणेत यावा. तसेच ध्वजाची उंची साधारणपणे ६० फुट म्हणजेच रामनवमी उत्सवातील निमोणकर निशाणाचे उंची इतकी असावी व ऊन, वारा, पावसामुळे ध्वज खराब होईल याकरीता प्रत्येक उत्सवाच्या वेळेस ध्वजाचे कापड बदलण्यात यावे.ध्वजाची पाद्यपूजा, उभारणी व स्तंभ संरजाम बागेत करावी. शताब्दी वर्षाचे सुरुवातीस करावयाच्या ध्वजारोहणासाठी व इतर धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचे उदघाटन प्रसंगी मा. मुख्यमंत्री तसेच संत महंत आदि मान्यवरांना तसेच समारोपाच्या कार्यक्रमास मा. पंतप्रधान यांना निमंत्रीत करणेत यावे. याचबरोबर आयोजित होणा-या निरनिराळया कार्यक्रमांसाठी मान्यवरांना निमंत्रीत करणेत यावे सदर कार्यक्रमास प्रसिध्दी मिळणेसाठी देशभरातील चॅनल/ पत्रकारांना निमंत्रीत करावे याशिवाय शताब्दीचे अनुषंगाने इतर विविध विषयावर चर्चा करणेत आली. व उपरोक्त चर्चेबरोबरच समाधी शताब्दी वर्षामध्ये सादर करावयाच्या कार्यक्रमाची रुपरेषा ठरविणेत येऊन झालेल्या चर्चेप्रमाणे तात्काळ कार्यवाही करणेस व त्याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.*

*३) मा. व्यवस्थापन समितीचे दि.२५/०७/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६७१.*

*श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१७-२०१८ चा उदघाटन समारंभ कार्यक्रम दि. ०१ ऑक्टोंबर, २०१७ रोजी गेट नं. ०३ समारील १६ गुंठे जागेमध्ये करणेस व त्यानुषंगाने निमंत्रण पत्रिका, मंडप स्टेज व इतर अनुषंगिक बाबी करणेस, तसेच त्यासाठी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली. या उदघाटन कार्यक्रमाच्या दृष्टीने प्रसिध्दीसाठी Video Clip, Audio Clip, Flex तयार करुन घेण्यास व त्यासाठी येणा-या खर्चासही मान्यता देण्यात आली. तसेच या कामांसाठी येणारा खर्च देणगीदार साईभक्त देण्यास इच्छूक असतील तर त्यांनाही आवाहन करणेत यावे, असे ठरले. याचबरोबर, या उदघाटन कार्यक्रमाच्या दिवशी शोभायात्रा, ग्रंथदिंडी, साईरथ मिरवणूक आयोजित करणेस व त्यासाठी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.*

**प्रस्तावनाः-** श्री साईबाबा यांच्या समाधीस ऑक्टोबर-२०१८ मध्ये १०० वर्ष पूर्ण होत असल्याने श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर, २०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जाणार आहे. यासाठी शताब्दीचे संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणेत येत असून संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्रीसाईबाबा महासमाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल, या दृष्टीने तयारी करणेचे नियोजन आहे.

सदर कार्यक्रमांचे स्वरुप व रुपरेषा ठरविणेसाठी आजतागायत शिर्डी ग्रामस्थ व साईभक्त यांचेकडून प्राप्त झालेल्या सूचना वजा प्रस्ताव, जागतिक साईमंदीर विश्वस्त परिषदमध्ये झालेली चर्चा तसेच वेळोवेळी मा. व्यवस्थापन झालेल्या बैठका यातील मुद्दे विचारात घेऊन मा. व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेत सविस्तर प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदर सभेतील निर्णय क्रमांक १७१ नुसार शताब्दी वर्षाचे

दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर, २०१८ याकालावधीत आयोजित करावयाचे विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे प्रारुप वेळापत्रक तयार करणेत आले होते.

सदरचे वेळापत्रक मा. व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेत सादर करण्यात आले होते. सदर सभेत शताब्दीचे अनुषंगाने विविध विषयावंर चर्चा करणेत आली यावेळी शताब्दी वर्षाची सुरुवात ध्वजारोहणाच्या कार्यक्रमाने करावी व ध्वजारोहण कार्यक्रमाचे उदघाटन प्रसंगी मा. मुख्यमंत्री तसेच संत मंहत आदि मान्यवरांना निमंत्रीत करण्यात्त यावे असे ठरले आहे. यासाठी ध्वजारोहणापुर्वी ध्वजाची शिर्डी गावातून भव्य शोभायात्रा काढण्याचे नियोजन आहे.

**ध्वज शोभायात्रेचा मार्ग:-** ध्वजशोभायात्रा 'शिर्डी माझे पंढरपूर' या आरतीनंतर सकाळी ०६.०० वाजता सुरू होऊन ती समाधी मंदिरातून - श्री द्वारकामाई- चावडीमार्गे-पालखी रोड – कानिफनाथ मंदिर – नगर मनमाड रोड – बसस्थानक – खंडोबा मंदिर – कनकुरी रोड समोरील विभाजक ओलांडून भजनी मंडळ व श्रींचा रथ हा फुलमार्केट चौकातून- गेट क्र. ४ मधून सकाळी ०९.०० वाजता मंदिर परिसर असा असेल. तर बाकी देखावे, बॅण्ड पथक, आदि हे नगर-मनमाड रोड ने पुढे निघून जातील.

**ध्वज शोभायात्रेचे सहभागी होणारे कलाकार व त्यांचा ध्वजशोभायात्रेतील क्रम-**

मा. व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.३५८ अन्वये वेळापत्रकास मान्यता देण्यात आली आहे. या वेळापत्रकात शताब्दी वर्षाचे प्रारंभ दिनी ध्वजारोहण कार्यक्रमाचा समावेश केलेला आहे. या ध्वजशोभा यात्रेत खालीलप्रमाणे कलाकार सहभागी होणार असून त्यातील काही कलाकारांनी (प्रवासखर्च म्हणून) नाममात्र मानधन कळविलेले आहे. तर बरेचशे कलाकार विनामुल्य सेवा देणार आहेत.

| अ.नं. (अ) | कार्यक्रमाचा तपशिल (ब) | कलाकार संख्या (क) | मानधन / प्रवास खर्च (ड) | आवश्यक रुम / हॉल (ई) | निवासस्थाने (ऊ) |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | शिंग तुतारी ५ – श्री. गुरव, कोपरगांव | ०७ | ५,५००/- | १ हॉल | साई आश्रम धर्मशाळा |
| ०२ | सनई संबळ – २ गट – श्री. विधाटे व श्री. भोसले, राहुरी | ११ | ७,०००/- | | |
| ०३ | सनई चौघडा – श्री. राजेंद्र जाधव, पुणे | ०६ | विनामुल्य | १ रुम | शांतिनिकेतन |
| ०४ | कुडाळ - देखावा – श्री. कुडाळकर- श्री गणपती-लक्ष्मी-सरस्वती (हालता व चलत देखावा) | ४५ | १,७५,०००/- | ३ हॉल | साई आश्रम धर्मशाळा |
| ०५ | नादब्रम्ह ढोल पथक – श्री. खंडेलवाल, पुणे | १२० | ६०,०००/- | ५ हॉल | साई आश्रम धर्मशाळा |
| ०६ | कुडाळ - देखावा – श्रीसाईबाबांची चावडी फेरी | ४५ | - | ३ हॉल | - |
| ०७ | स्वरसम्राट बॅण्ड – श्री. सोनवणे, सटाणा | ३० | ३०,०००/- | १ हॉल | साई आश्रम धर्मशाळा |
| ०८ | कुडाळ- देखावा –कालिया मर्दन (हालता व चलत देखावा) | - | - | --- | - |
| ०९ | बॅन्जो ऑर्केस्ट्रा - कैलास वारुळे, शिर्डी | ३० | २१,०००/- | -- | स्थानिक |
| १० | आंध्र प्रदेश | ३० | विनामुल्य | २ हॉल | साई आश्रम धर्मशाळा |
| | आंध्रप्रदेश श्रीमती सुवर्णाश्री व कलाकार | १० | विनामुल्य | २ रूम | साईआश्रम ०१ |
| ११ | गुजरात - डांगी आदिवासी नृत्य व गरबा नृत्य | ३५ | विनामुल्य | २ हॉल | साई आश्रम धर्मशाळा |
| १२ | कर्नाटक | ३५ | विनामुल्य | २ हॉल | साई आश्रमधर्मशाळा |
| १३ | महाराष्ट्र (साईगंगा प्रतिष्ठाण, पुणे) - संत ज्ञानेश्वर - ३ भावंडे, गोरा कुंभार, नामदेव, नारदमुनी – गणपती – छ. शिवाजी महाराज इ. | ४५ | विनामुल्य | २ हॉल | साई आश्रम धर्मशाळा |
| १४ | तामिळनाडू कला मास्टर, चैन्नई ०९५००१९१११११ | १५ | विनामुल्य | १ हॉल | साई आश्रमधर्मशाळा |
| १५ | कुडाळ - देखावा – श्रीसाईबाबा जात्यावर गहू दळतांना | - | - | --- | - |
| १६ | पार्लेश्वर ढोल पथक – श्री. सुमित, मुंबई | १०० | ७२,०००/- | ४ हॉल | साईआश्रमधर्मशाळा |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १७ | कुडाळ-देखावा– श्रीसाईबाबांचे निंबवृक्षाखाली आगमन | - | - | - | - |
| १८ | लेझिम पथक – शाळा –श्री साईनाथ हायस्कुल, शिर्डी | | विनामुल्य | -- | स्थानिक |
| १९ | झांजपथक – सन्मित्र युवक मंडळ, शिर्डी | ६० | विनामुल्य | -- | स्थानिक |
| २० | संस्थान भजनीमंडळ | ३० | विनामुल्य | -- | स्थानिक |
| २१ | श्रींचा साईरथ | -- | -- | -- | -- |
| २२ | जनरेटर | -- | -- | -- | -- |

तसेच शिर्डी व शिर्डी परिसरातील ग्रामस्थांना पारंपारीक वेषभुषा म्हणजेच पुरुषांसाठी पांढ-या रंगाचे धोतर, शर्ट अथवा कुर्ता पायजमा तर महिलांसाठी नऊ वार साडी परिधान करुन सदर यात्रेत सहभागी करुन घेता येईल, जेणेकरुन या विशिष्ट पेहरावामुळे ध्वजयात्रेची शोभा वाढेल. या करीता शिर्डी ग्रामस्थ यांना आवाहन करता येईल.

उपरोक्तप्रमाणे ध्वजशोभा मिरवणूकीचे नियोजन करण्यात येणार असून दि. ०१ ऑक्टोबर, २०१७ रोजी ध्वज यात्रा मिरवणूक सकाळी ६.०० वाजता निघणार असल्याने, अनेक कलाकारांना / मंडळांना मुक्कामी शिर्डी येथे दिनांक ३०/०९/२०१७ रोजी शिर्डीत मुक्कामी यावे लागणार आहे. करीता त्यांची वरील तक्यात 'ई' व 'ऊ' या रकान्यात नमूद केल्याप्रमाणे संस्थानमार्फत निवासव्यवस्थेसह चहापाणी, नाष्टा, भोजनप्रसाद व दर्शन व्यवस्था संस्थानमार्फत मोफत करावी लागेल.

तरी श्री साईबाबा समाधी शताब्दी ध्वजयात्रा मिरवणूकीची सुरुवात भव्य व आकर्षक स्वरुपात होणेसाठी उपरोक्त नमूद केलेल्या बाबींसाठी संस्थानचे संबंधीत विभागांमार्फत आवश्यक कार्यवाही होणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २०/०८/२०१७ रोजीचे सभेत मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर करण्यात आला होता, त्यावर निर्णय क्रमांक ६८१ खालीलप्रमाणे झाला आहे :

"श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव दिनांक १ ऑक्टोबर २०१७ रोजी भव्य ध्वजयात्रा, श्री साईचरित्र ग्रंथ दिंडी, रथ मिरवणूक समाधी मंदिरातून– श्री व्दारकामाई– चावडी मार्गे– पालखी रोड– कानिफनाथ मंदिर– नगर मनमाड रोड– बसस्थानक– खंडोबा मंदिर– गेट क्र.४ मधून लेडींबाग यामार्गे काढणेत यावी व तयामध्ये शिर्डी ग्रामस्थांचा सहभाग घेण्यात यावा, असे ठरले. तसेच यासाठी प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व याकामी येणा-या अंदाजे रुपये ५,२०,५००/- मात्रचे खर्चास, त्याचप्रमाणे सदर कार्यक्रमप्रसंगी उद्भवणा-या प्रासंगिक खर्चास मान्यता देण्यात आली "

तरी श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव प्रारंभ दिनी आयोजित भव्य ध्वजशोभायात्रा व रथ मिरवणूक कामी निमंत्रित कलाकारांची उपरोक्तप्रमाणे व्यवस्था करणेकामी मान्यतेस्तव सविनय सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव प्रारंभ दिनी आयोजित भव्य ध्वजशोभायात्रा व रथ मिरवणूकीसाठी प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या कलाकारांना निमंत्रित करुन त्यांची सेवा घेणेस मान्यता देण्यात यावी. तसेच सदरहू मिरवणूक सेवाधाम इमारतीजवळ आल्यानंतर, ध्वज व रथ गेट नं.४ मधून मंदिर परिसरामध्ये घेण्यात यावा व उर्वरीत शोभायात्रा ठरलेल्या मार्गाने चालू द्यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

०४ **श्रींचे पुण्यतिथी उत्सवानिमीत्त किर्तनकार व कलाकार निश्चीत करणे व त्यांचे मानधन ठरविणेबाबत.**

**मा. व्यवस्थापन समितिचे सभेतील निर्णय:-**

(१) मा. व्यवस्थापन समितिचे दि.२०/०८/२०१७ रोजी खालीलप्रमाणे निर्णय क्र.६८२ संमत झाला आहे.

"श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव वर्षभर आयोजित करण्यात येणा-या विविध प्रस्तावित धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमाची सुधारीत रुपरेषा ठरविण्यात आली. तसेच शताब्दी महोत्सवामध्ये आयोजित करावयाच्या धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमासाठीचे कलाकार व त्यांचे मानधन याचे परिशिष्ट ब, क ड व ई सोबत सादर केलेले आहे. या यादीतील कार्यक्रम, कलाकार व त्यांचे मानधन स्थानिक उपसमितीने छाननी करुन कार्यक्रम निश्चित करावे त्यामधील विनामुल्य सेवा करणा-या कलाकारांना प्राधान्य देण्यात येऊन, वर्षभर संधी देण्यात यावी.कार्यक्रमाची निश्चिती झाल्यानंतर त्यामध्ये गरजेनुसार/ परिस्थितीनुसार आवश्यक ते बदल करण्याचे अधिकार व्यवस्थापन समितीला राहतील, असे ठरले.

या निश्चित केलेल्या सर्व प्रकारच्या कार्यक्रमांसाठी, अपवाद वगळता मानधन व प्रवास असे सर्व मिळून प्रत्येकी एका कार्यक्रमासाठी जास्तीत जास्त रु.३ लाख मात्रचे खर्चास तसेच शताब्दी वर्षात आयोजीत केलेल्या

कार्यक्रमांसाठी स्टेज, मंडप, साउंड सिस्टीम, विद्युत रोषणाई, सीसीटीव्ही, सुरक्षा व्यवस्था, आवश्यक जादाचे मनुष्यबळ यावर होणारा खर्च व इतर अनुषंगिक खर्चासही मान्यता देण्यात आली.

श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव २०१७ शुक्रवार, दि.२९/०९/२०१७ ते सोमवार दि.०२/१०/२०१७ असा चार दिवस साजरा करण्यात येणार आहे. त्यातील दिनांक २९/०९/२०१७ व दिनांक ०१/१०/२०१७ चे कलाकार कार्यक्रमांना यापुर्वीच मा.व्यवस्थापन समितीने मान्यता दिलेली आहे. तथापि उत्सवातील किर्तन कार्यक्रम व दिनांक ३०/०९/२०१७ व ०२/१०/२०१७ चे कलाकार कार्यक्रम निश्चित होणे बाकी आहे.

किर्तन व कलाकार कार्यक्रमासाठी खालील व्यक्तिंनी सहमती दर्शविलेली आहे.

| अ.नं. | कलाकारांचे नाव | कार्यक्रम | दिनांक | मानधन रुपये |
|---|---|---|---|---|
| **(अ) किर्तन कार्यक्रम :-** | | | | |
| १ | ह.भ.प.श्री.समीहन चंद्रशेखर आठवले, पंढरपूर, जि. सोलापूर ९४२२०६९१५७ | कीर्तन | २९/०९/२०१७ ते ०२/१०/२०१७ (४ दिवस) | 'संस्थानकडून जे मिळेल ते' |
| **(ब) कलाकार कार्यक्रम :-** | | | | |
| ०२ | डॉ.अमृता व श्री. अजय वॉरीयर, बंगळुरू ९७४१०२६६५७ | विविध भाषेतील साईभजन संध्या व भक्ति गीते | ३०/०९/२०१७ | विनामुल्य |
| ०३ | श्री. विजय साखरकर, मुंबई ९८२१३९३३२३ | साईभजन संध्या | ०२/१०/२०१७ | ४०,०००/- |
| ०४ | श्री. जगदीश पाटील, मुंबई – ८०९७२१८१११ | साईभजन संध्या | ०२/१०/२०१७ | विनामुल्य |
| ०५ | श्री पारस जैन, शिर्डी – ९८२२५४६८१७ | साईभजन संध्या | ०२/१०/२०१७ | विनामुल्य |

**(अ) किर्तन कार्यक्रम–** श्री रामनवमी व गुरुपौर्णिमा उत्सवातील किर्तनकारांना (तीन दिवस) साधारणत: रु.११,०००/- मानधन देण्यात येते. श्री समीहन आठवले, पंढरपूर यांनी पुण्यतिथी उत्सवात किर्तनाची सेवा देण्याचे मान्य केले असून, यावेळी पुण्यतिथी उत्सव ४ दिवस असून त्यांना रुपये १५,०००/- इतके मानधन देण्यात यावे, असे नम्र मत आहे.

**(ब) कलाकार कार्यक्रम–** (१) दिनांक ३०/०९/२०१७ – सदरहु दिवशी डॉ.अमृता व श्री. अजय वॉरीयर, बंगळुरू हे विनामुल्य कार्यक्रम करण्यास तयार आहेत. त्यांना कार्यक्रम सादर करण्यास संधी दयावी, असे नम्र मत आहे.

(२) दिनांक ०२/१०/२०१७ – सदरहु दिवशी श्री. विजय साखरकर, मुंबई हे रुपये ४०,०००/- मानधन घेऊन कार्यक्रम करण्यास तयार आहेत. तसेच उपरोक्त तक्त्यातील अ.नं. ४ ते ५ मध्ये नमूद केलेल्या कलाकारांनी मोफत कार्यक्रम करण्यास सहमती दर्शविली आहे.

तरी वरील **अ व ब** याबाबत निर्णय होणेसाठी सदरहू प्रस्ताव मा. स्थानिक उपसमितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे पुण्यतिथी उत्सवानिमीत्त किर्तनकार, कलाकार व त्यांचे मानधन खालीलप्रमाणे निश्चित करणेत यावे. तसेच निश्चित करणेत आलेल्या किर्तनकार/ कलाकारांची चहा-नाष्टा, भोजन, दर्शन व निवासव्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करणेत यावी.**

| **(अ) किर्तन कार्यक्रम :-** | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **अ.नं.** | **दिनांक व वेळ** | **कलाकारांचे नाव** | **कार्यक्रम** | **मानधन रुपये** | **ठिकाण** |
| १ | २९/०९/२०१७ ते ०२/१०/२०१७ (४ दिवस) | ह.भ.प.श्री. समीहन चंद्रशेखर आठवले, पंढरपूर, जि. सोलापूर ९४२२०६९१५७ | कीर्तन | रु.१५,०००/- (एकत्रित) | समाधी मंदिरा शेजारील स्टेज |
| **(ब) कलाकार कार्यक्रम :-** | | | | | |
| **अ.नं.** | **दिनांक व वेळ** | **कलाकारांचे नाव** | **कार्यक्रम** | **मानधन रुपये** | **ठिकाण** |
| ०१ | २९/०९/२०१७ | मा.व्यवस्थापन समितीने ठरविलेले कलाकार व मानधन | | | समाधी मंदिरा शेजारील स्टेज |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०२ | ३०/०९/२०१७ | डॉ.अमृता व श्री. अजय वॉरीयर, बंगळुरू ९७४१०२६६५७ | हिंदी भाषेतील साईभजन संध्या व भक्ति गीते | विनामुल्य | समाधी मंदिरा शेजारील स्टेज |
| ०३ | ०२/१०/२०१७ | श्री. जगदीश पाटील, मुंबई– ८०९७२१८१११ | साईभजन संध्या | विनामुल्य | १६ गुंठे परिसर |

**त्याप्रमाणे दि.०१.१०.२०१७ रोजी १६ गुंठे परिसरामध्ये नव्याने उभारण्यात आलेल्या सभामंडपामधील पहिलाच कार्यक्रम होणार आहे. तसेच याच दिवशी श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव- २०१७-१८ चा शुभारंभही होत असल्यामुळे दि.०१ ऑक्टोबर, २०१७ रोजी सायंकाळी ०७.०० ते १०.०० या वेळेत श्री.सुरेश वाडकर, मुंबई या प्रख्यात कलाकाराचा साईभजन संध्या कार्यक्रम आयोजित करणेत यावा. त्यांची दर्शन/ आरती, प्रसाद भोजन व निवासव्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करणेत यावी, असे ठरले. तसेच श्री.सुरेश वाडकर, मुंबई यांचा कार्यक्रम आयोजन करणेकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

०५ **साई नॉलेज पार्क प्रकल्पाचे Concept Desion and Evaluation करणेकामी प्रकल्प सल्लागार नेमणूक करणेसाठी प्राप्त न्युनतम निविदाधारकांशी वाटाघाटी करणे.**

**श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:**

अ) कलम १७ (समितीची कर्तव्ये व अधिकार) -पोटकलम(२)खंड(ठ)- समिती श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्यालीला व शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील;

ब) समितीकडून कलम २१ (विश्वस्त निधीचा विनियोग) -

१. पोटकलम (१) खंड (ङ) - श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे;

२. पोटकलम (१) खंड (झ)- विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांचा विकास करणे आणि विश्वस्तव्यवस्थेच्या प्रयोजनांसाठी स्थावर किंवा जंगम मालमत्तांचे संपादन करणे;

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:** दिनांक २७/०३/२०१७ निर्णय क्र.२५८

**प्रस्तावना:** श्री साईबाबांचे समाधीचे दर्शनासाठी शिर्डीत येणा-या साईभक्तांना विरंगुळा मिळणेबरोबरच श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व शिकवण याबाबत माहीती देणेचे दृष्टीने संस्थानमार्फत साईगार्डनचे उर्वरीत जागेत साई नॉलेज पार्क अंतर्गत तारांगण, वॅक्स म्युझियमसह साईसृष्टी प्रकल्प प्रस्तावीत आहे. त्यानुसार साई नॉलेज पार्कचे कामांसाठी सल्लागार संस्थेची नेमणूक करणेसाठी दि. १०/०४/२०१७ रोजीचे टिपणी अन्वये, दि.१७/०६/२०१७ अखेर ई-प्रस्ताव मागविणेत आले होते. सदरचे मुदतीत ०७ संस्थांनी ई-प्रस्ताव अपलोड केले होते. सदर प्रस्तावामध्ये दोनच सल्लागार पात्रतेचे निकष पूर्ण करीत होते. स्पर्धात्मक दर प्राप्त होणेकामी दि.१९/०७/२०१७ रोजीचे टिपणीअन्वये दि.२८/०८/२०१७ अखेर फेर ई-प्रस्ताव मागविणेत आले आहेत. याकामी खालीलप्रमाणे ०६ संस्थांनी ई-प्रस्ताव अपलोड केले आहेत.

| Sr. No. | Name & Address of consultant |
|---|---|
| 1. | Suresh babu And Partners, Mumbai |
| 2. | Collage design Pvt. Ltd., Mumbai |
| 3. | SandeepShikre and Associates, Mumbai |
| 4. | The Architect, Jalgaon / Pune |
| 5. | Creative Circle, Nagpur |
| 6. | Om sai Civil Contractor, Panwel |

उपरोक्त सल्लागारांचे प्रस्तावातील तांत्रीक (Technical bid) माहितीचा लिफाफा क्र.०१ दि.३०/०८/२०१७ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेत उघडणेत आला. सदर लिफाफ्यात सल्लागार यांनी सादर केलेले कागदपत्रांची छाननी केली असता, खालील तीन सल्लागार वाणिज्यिक देकार (Commercial bid) उघडणेसाठी पात्र होत असल्याने, त्यांचे प्रस्तावांचा वाणिज्यिक देकार (Commercial bid) दि.१६/०९/२०१७ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेत आले असून, त्यांचे दरांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Name & Address of consultant | Fees Rate (%) | Remark |
|---|---|---|---|
| 1. | Collage design Pvt. Ltd., Mumbai | 1.50% | |
| 2. | SandeepShikre and Associates, Mumbai | 0.00% | L-1 |
| 3. | Creative Circle, Nagpur | 2.71% | |

**प्रस्ताव:** वरीलप्रमाणे साई नॉलेज पार्क प्रकल्पाचे Concept, Design and Evaluation करणेकामी प्रकल्प सल्लागार सेवेसाठी Sandeep Shikre and Associates, Mumbai यांनी देऊ केलेले दर निम्नतम (L-1) स्वरुपाचे 0.00% आहेत. तरी त्यांचे निम्नतम स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीकडे शिफारस करणेकामी निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साई नॉलेज पार्क प्रकल्पाचे Concept, Design and Evaluation करणेकामी प्रकल्प सल्लागार सेवेसाठी Sandeep Shikre and Associates, Mumbai यांनी देऊ केलेले दर निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------

०६ **श्री साईलिला अंक सभासदांना वितरण करणेकामी पाकिटे (Envelope) विहीत पध्दतीने छपाई करुन पुरवठा होणेकामी प्राप्त न्युनतम निविदाधारकांशी वाटाघाटी करणे.**

**अधिनियम तरतुद –** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ कलम क्र.१७ (२) ठ मध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे. श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार –प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

**ठराव:-** मा. व्यवस्थापन समिती दि.२५.०७.२०१७ रोजीच्या सभेतील निर्णय क्र. ६०९ अन्वये यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईलीला अंक पाठविणेकामी प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे पाकीटे छपाई करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु. २,९९,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. असा निर्णय झालेला होता.

**प्रस्ताविक:-** श्री साईलीला व्दैमासिक नियतकालिके पाकीटात भरुन सर्वसाधारण टपालाव्दारे व्दैमासिकांच्या सभासदांना पोस्टाने पाठविली जातात. वापरात येणारी पाकीटांचा शिल्लक साठा लवकरच संपत असून पुढील वर्षाची तरतूद म्हणून श्री साईलीला- मराठी ०१ लाख व हिंदी-इंग्रजीचे १ लाख ५० हजार पाकिटे उपलब्ध करुन देणेबाबत सहा. संपादक, श्री साईलीला, मुंबई कार्यालय यांनी दि१०.०६.२०१७ रोजीचे आवक पत्रान्वये कळविले होते.

श्री साईलीला नियतकालिके पाठविणेकामी पाकिटे आवश्यक असल्याने खालील प्रमाणे तक्त्यात छपाई करुन घेणे आहे.

| अ.नं. | छपाई तपशिल | शिल्लक साठा | मागील छपाई दर (सन-२०१६) | प्रस्तावित छपाई नग | प्रस्तावित अंदाजे छपाई दर | अंदाजे एकूण प्रस्तावित छपाई खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | **साईलीला- मराठी पाकीटे** (Envelope)<br>पाकीटाचा आकार- ११.५ X ८.५+ १.७ प्लॅप<br>वापरावयाचा कागद- ८० जी.एस.एम.क्राफ्ट ब्राऊन पेपर, एक रंगात छपाई | १०,००० | ०.८९ | १,००,००० | १.२५ | १,२५,०००/- |
| ०२ | **श्री साईलीला- हिदी-इंग्रजी पाकीटे** (Envelope)<br>पाकीटाचा आकार- ११.५ X ८.५+ १.७ प्लॅप<br>वापरावयाचा कागद- ८० जी.एस.एम.क्राफ्ट ब्राऊन पेपर, एक रंगात छपाई | ७,००० | ०.८९ | १,५०,००० | १.१६ | १,७४,०००/- |
| | | | | | एकूण रु. | २,९९,०००/- |

श्री साईलीला अंक पाकीटे छपाईकामी संस्थान संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यात आलेली होती. तसेच सर्व प्रिंटीग प्रेस यांना ईमेल व दुरध्वनी करुन कळविण्यात आलेले होते. ई-निविदा अपलोडसाठी दि. १८.०८.२०१७ ते २८.०८.२०१७ असा ११ दिवसांचा कालावधी देण्यात आलेला होता.

मा. खरेदी समिती दि. ३०.०८.२०१७ रोजीचे सभेत ई-निविदेतील तांत्रिक बीड (Technical Bid) उघडून निविदेतील अटी/ शर्तीनुसार ०५ स्पर्धक निविदाकारांच्या पूर्वपात्रतेविषयक तक्ता कागदपत्रांची लेखाशाखेकडून तपासून घेतला असता, त्याचा अहवाल खालील तक्त्यात दिले प्रमाणे आहे.

| अ.नं. | निविदाकारांचे नाव | **पात्र / अपात्र** |
|---|---|---|
| ०१ | मे. प्रवरा ऑफसेट, लोणी | **पात्र** |
| ०२ | मे. संप्रती ऑफसेट, सोलापूर | **पात्र** |
| ०३ | मे. क्लासिक स्टेशनरीज, कं. मुंबई | **पात्र** |
| ०४ | मे. पुना इनव्हलप मॅन्यु. कंपनी, पुणे | **पात्र** |
| ०५ | मे. राजमुद्रा ऑफसेट, औरंगाबाद | **पात्र** |

ई-निविदेतील तांत्रिक बीडमध्ये (Technical Bid) ०५ पात्र निविदाकार यांचे दि. १६.०९.२०१७ रोजीचे मा. खरेदी समिती सभेसमोर ई-निविदेतील व्यावसायिक बीड (Commercial Bid) उघडले असता, निविदाकारांचा दरपत्रकांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ. नं. | छपाई तपशिल | प्रस्तावित छपाई नग | क्लासिक स्टेशनरीज, कं. मुंबई | राजमुद्रा ऑफसेट, औरंगाबाद | संप्रती ऑफसेट, सोलापूर | प्रवरा ऑफसेट, लोणी | पुना इनव्हलप मॅन्यु. कंपनी, पुणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | **साईलीला- मराठी पाकीटे** (Envelope)<br>पाकीटाचा आकार- ११.५ X ८.५+ १.७ प्लॅप<br>वापरावयाचा कागद- ८० जी.एस.एम.क्राफ्ट ब्राऊन पेपर, एक रंगात छपाई | **१,००,०००** | १.४८ | १.५५ | १.९४ | **१.०५** | १.५० |
| ०२ | **श्री साईलीला- हिंदी-इंग्रजी पाकीटे** (Envelope)<br>पाकीटाचा आकार- ११.५ X ८.५+ १.७ प्लॅप<br>वापरावयाचा कागद- ८० जी.एस.एम.क्राफ्ट ब्राऊन पेपर, एक रंगात छपाई | **१,५०,०००** | १.४८ | १.४९ | १.९४ | **१.१०** | १.५० |

**मागणीः-** श्री साईभक्तांना अंक सभासदांना पाकिटात पाठविले जातात मुंबई कार्यालय यांचेकडे शिल्लक साठा अत्यंत कमी असल्याने पाकीटे छपाईकामाचा कार्यादेश पारित करणे आवश्यक आहे.

**संस्थानचे अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय ई. छाननी करुन अनुमानः-** आर्थिक/ धोरणात्मक

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मतः-** श्री साईलीला अंक सभासदांना वितरण करणेकामी पाकीटे (Envelope) विहीत पध्दतीने छपाई करुन पुरवठा होणेकामी ई-निविदेतील तांत्रिक बीडमध्ये (Technical Bid) पात्र निविदाकारांचे व्यवसायिक बीड उघडले असता, तुलनात्मक तक्त्यातील निम्नत्तम दरधारक निविदाकार मे. प्रवरा ऑफसेट, लोणी यांना कार्यादेश पारित करणे व येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता मिळणेकामी सदर विषय मा. उपसमिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईलीला अंक सभासदांना वितरण करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे पाकीटे (Envelope) छपाई करुन घेणेकामी, प्रवरा ऑफसेट, लोणी यांचे उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामध्ये गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**०७ श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१७-१८ चे अनुषंगाने विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांकरीता साईआश्रम भक्तनिवास परिसरात टेन्साईल फॅब्रीकशेड उभारणेकामी प्राप्त ई-निविदांचे वाणिज्यिक देकारांवर निर्णय होणेबाबत**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) अधिनियम -२००४ मधिल तरतूद:-**

१. अधिनियम कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२. अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेची तरतूद आहे. त्यातील पोटकलम (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे." अशी तरतूद आहे.

**३.** अधिनियम कलम २१ मधील पोट कलम १ (ख), रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पुजा-अर्जा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

**मा. व्यवस्थापन समिती निर्णय:-**

१. मा. व्यवस्थापन समितीचे दि.१५ जून, २०१७ रोजीचे सभेत खालीलप्रमाणे निर्णय क्र. २१९ समंत करणेत आला आहे.

*“श्रींचे समाधी शताब्दी वर्षानिमित्ताने साईभक्तांसाठी मोठमोठ्या कलाकरांचे कार्यक्रम साईआश्रम भक्तनिवास येथे आयोजीत करावयाचे आहेत. त्यासाठी त्या ठिकाणी होणा-या कार्यक्रमांकरीता डोम स्वरूपाचा मंडप संस्थानमार्फत खरेदी करुन अथवा भाडोत्री पध्दतीने उभारणेबाबतचा सविस्तर प्रस्ताव मा. कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने सभेसमोर सादर करणेत यावा.”*

२. मा. व्यवस्थापन समितीचे दि.२५ जुलै , २०१७ रोजीचे सभेत खालीलप्रमाणे निर्णय क्र. ५५२ समंत करणेत आला आहे.

*“यावर सविस्तर चर्चा होऊन, समाधी शताब्दी वर्षामधील विविध कार्यक्रमांसाठी साईआश्रम भक्तनिवास पार्किंगमध्ये प्रस्तावात नमूद केलल्या पर्याय क्र. ०२ नुसार कार्यवाही करणेस तसेच याकामी विहित पध्दतीतने ई-निविदांची मागणी करणेस व त्याकामी येणा-या सर्वसमावेषक खर्चास मान्यता देण्यात आली.”*

**प्रस्तावना**: श्री साईबाबा यांचे समाधीस दि.१८ ऑक्टोबर २०१८ रोजी १०० वर्ष पूर्ण होत आहे. त्यानिमित्ताने संस्थानमार्फत श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते १८ ऑक्टोबर २०१८ (विजया दशमी) अखेर साजरे करण्यात येणार आहे. श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षामध्ये शिर्डीत येणा-या भाविकांसाठी सोयी-सुविधा उभारणे तसेच संपूर्ण वर्षभर वेगवेगळे धार्मिक व सांस्कृतीक कार्यक्रमाचे अयोजन करुन साई चरित्रावर आधारीत वेगवेगळे इव्हेन्ट तयार करुन त्याचे सादरीकरण करणे, जेणेकरुन संपूर्ण वर्षभर शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहील, त्यादृष्टीने प्रयत्न करण्यात येत आहे. त्याकरीता साईआश्रम भक्तनिवास परिसरात कायमस्वरुपी टेन्साईल फॅब्रीकचे छत असलेले शेड उभारणे प्रस्तावीत आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.२५/०७/२०१७ रोजीचे उपरोक्त निर्णयानुसार याकामी वृत्तपत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात होती. ठेकेदार यांना ई-निविदा अपलोड करण्यासाठी अंतिम मूदत दि.१४/०९/२०१७ अखेर ठेवण्यात आली होती. ई-निविदा अपलोड करणेची अंतिम मूदतीत खालील ०५ ई-निविदा अपलोड झालेल्या आहे.

| अ.नं. | ठेकेदारांचे नांव/ गांव |
|---|---|
| ०१ | वेर्स्टन आऊट डोअर स्ट्रक्चर्स प्रा.लि., ठाणे |
| ०२ | पुजा आर्किटेक्चरल सिस्टम प्रा.लि., मुंबई |
| ०३ | स्प्रिच टेनसो स्ट्रक्चर्स प्रा.लि., वडोद्रा, गुजरात |
| ०४ | आरएसके इंजिनिअरींग इंडिया प्रा. लि., पुणे |
| ०५ | सुभाष कन्स्ट्रक्शन कंपनी, डोंबीवली |

सदर प्राप्त ई-निविदांचे तांत्रीक निविदा मा खरेदी समितीचे दि.१६/०९/२०१७ रोजीचे सभेपुढे उघडणेत आल्या असून ठेकेदार यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता तांत्रीक छाननी अहवालानुसार खालील तीन ठेकेदार पात्र झाले आहेत.

| **अ.नं.** | **ठेकेदारांचे नांव/ गांव** |
|---|---|
| ०१ | वेर्स्टन आऊट डोअर स्ट्रक्चर्स प्रा.लि., ठाणे |
| ०२ | सुभाष कन्स्ट्रक्शन कंपनी, डोंबीवली |
| ०३ | स्प्रिच टेनसो स्ट्रक्चर्स प्रा.लि., वडोद्रा, गुजरात |

उपरोक्त ०३ पात्रताधारक ठेकेदार यांनी सादर केलेला ई- निविदांचा लिफाफा क्र. ०२ (वाणिज्यीक निविदा) दि.२१/०९/२०१७ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेत आले असून, त्यांनी सादर केलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| **अ.नं.** | **ठेकेदारांचे नांव/ गांव** | **रक्कम** | **शेरा** |
|---|---|---|---|
| ०१ | वेर्स्टन आऊट डोअर स्ट्रक्चर्स प्रा.लि., ठाणे | १,६९,९२,३३०/- | - |
| ०२ | सुभाष कन्स्ट्रक्शन कंपनी, डोंबीवली | **१,३६,६०,२०१.८०** | **निम्नतम** |
| ०३ | स्प्रिच टेनसो स्ट्रक्चर्स प्रा.लि., वडोद्रा, गुजरात | १,७६,८४,९९८/- | - |

उपरोक्त तपशिलानुसार उपरोक्त निविदाधारकांपैकी ठेकेदार सुभाष कन्स्ट्रक्शन कंपनी, डोंबीवली यांचे दर निम्नतम आहेत. तरी याकामी निम्नतम दराचे ठेकेदार यांना कार्यादेश देणेसाठी सदरील विषय मा. व्यवस्थापन समितीकडे शिफारस करणेकामी सविनय सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१७-१८ चे अनुषंगाने विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांकरीता साईआश्रम भक्तनिवास परिसरात टेन्साईल फॅब्रीकशेड उभारणेकामी सुभाष कन्स्ट्रक्शन कंपनी, डोंबीवली यांचे एकत्रित रु.१,३६,६०,२०१.८० मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग)

---

०८ **श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पीटलकरीता बसविण्यात आलेल्या सांडपाणी प्रक्रिया संयत्र(STP) करीता वार्षिक AMC/ Operation & Maintenance देणेकामी उघडण्यात आलेल्या ई-निविदेबाबत.**

श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पीटलकरीता बसविण्यात आलेल्या सांडपाणी प्रक्रिया संयत्राचे एक वर्ष कालावधीसाठी AMC/Operation & Maintenance देणेकरीता विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या एकुण रक्कम रुपये १०,०७,०००/- मात्रचे (रक्कम रु. ८८२०००/- AMC/Operation & Maintenance + इतर दुरुस्तीकरीता १,२५,०००/-) खर्चास दिनांक २५.७.२०१७ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय नुसार मान्यता देण्यात आली आहे. सदर मान्यतेनुसार महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ई-निविदा जाहीरात अपलोड करण्यात आली होती. यामध्ये ई-निविदा ऑनलाईन डाऊनलोडकरीता दिनांक ५/०९/२०१७ रोजी सकाळी १०.०० वाजेपासून दिनांक १३/०९/२०१७ पर्यंत वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आली होती.

त्यानुसार खालील टेंडर धारक यांच्या तांत्रिक निविदा प्राप्त झाल्या आहेत :

| अ.नं. | ई-निविदाधारकांचे नांव | अ.नं. | ई-निविदाधारकांचे नांव |
|---|---|---|---|
| १. | Akshay Enterprises, Panvel | ४ | Panse Consultant Pune |
| २ | Aquatech Engineers, Pune | ५ | Raveena Watertech, |
| ३ | Green Scientific Development (I) Pvt Ltd Mumbai | ६ | Yash Enviro Technologies Pune |

वरील प्राप्त ६ ई-निविदेतील तांत्रिक निविदा (Technical Bid) दिनांक १६/९/२०१७ रोजी मा. खरेदी समितीचे सभेमध्ये उघडणेत आलेले आहेत. त्यातील टेंडर फी व ई.एम.डी. रकमेचा ऑनलाईन जमा केलेचे चलन, कंपनीचा वार्षिक उलाढाल, अनुभव कामाची यादी, कंपनीचे रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट,.जी.एस.टी. व पी.

एफ. नंबर, अंडरटेकींग सर्टिफिकेट इत्यादी बाबी तपासल्या असून, त्यात वरील अ. नं.५ Raveena Watertech, यांनी कंपनी रजिस्ट्रेशन प्रत तांत्रिक निविदासोबत जोडलेली नसल्याने त्यांना अपात्र ठरवून उर्वरीत पाच टेंडरधारक यांचे आर्थिक (Financial) बीड दिनांक २१/०९/२०१७ रोजीचे मा. खरेदी समितीत उघडणेत आले, त्यात खालीलप्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत :

| अ.नं. | ई-निविदाधारकांचे नांव | एकुण दर | शेरा |
|---|---|---|---|
| १. | Akshay Enterprises, Panvel | 14,88,020.00 | L5 |
| २ | Aquatech Engineers, Pune | 12,46,508.00 | L4 |
| ३ | Green Scientific Development (I) Pvt Ltd, Mumbai | **9,66,900.00** | **L1** |
| ४. | Panse Consultant, Pune | 11,90,400.00 | L3 |
| ५. | Yash Enviro Technologies, Pune | 11,87,087.40 | L2 |

उपरोक्त आर्थिक (Financial) बीडमधील अ.नं.३ मे.ग्रीन सायन्टीफिक डेव्हलपमेंट (इं) प्रा. लि. मुंबई यांचे श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पीटलकरीता बसविण्यात आलेल्या सांडपाणी प्रक्रिया संयत्राचे एक वर्ष कालावधीसाठी AMC/Operation & Maintenance कामांकरीता एकत्रित रक्कम रुपये ९,६६,९००/- मात्रचे दर निम्नतम आहेत.

तरी श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ हॉस्पीटल येथील सांडपाणी प्रक्रिया संयत्राचे एक वर्ष कालावधीसाठी AMC/Operation & Maintenance देणेकरीता निम्नतम दरधारक मे.ग्रीन सायन्टीफिक डेव्हलपमेंट (इं) प्रा. लि. मुंबई यांचे दराबाबत पुढिल निर्णय होणकामी सदरचा प्रस्ताव मा. स्थानिक उप-समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पीटल येथील सांडपाणी प्रक्रिया संयत्राचे एक वर्ष कालावधीसाठी AMC/Operation & Maintenance देणेकामी करीता मे.ग्रीन सायन्टीफिक डेव्हलपमेंट (इं) प्रा. लि., मुंबई यांचे एकत्रित रु.९,६६,९००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

०९ **मा.सदस्यांच्या सुचनांबाबत.**

**आजचे स्थानिक उपसमिती सभेमध्ये विविध चर्चेच्या अनुषंगाने मा.सदस्यांनी खालीलप्रमाणे शिफारस केली आहे.**

श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव वर्षातील धार्मिक, सांस्कृतीक, सामाजीक व पादुका दर्शन सोहळयाच्या कार्यक्रमाची पुस्तीका आकर्षक स्वरुपात प्रसिध्द करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२** **श्री साईबाबा समाधी शताब्दीकरीता ध्वज निश्चितीबाबत.**

**प्रस्ताव-** श्रीसाईबाबांच्या महासमाधीस सन-२०१८ मध्ये १०० वर्षे पुर्ण होत असल्याने श्रीसाईबाबा संस्थानमार्फत श्रीसाईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर, २०१८ या कालावधीत साजरा केला जाणार आहे. शताब्दीचे संपूर्ण वर्षभर वेगवेगळ्या धार्मिक व सांस्कृतीक कार्यक्रमांचे आयोजन करुन संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्रीसाईबाबा महासमाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल, या दृष्टीने तयारी करण्याचे नियोजन आहे.याकामी बांधकाम-शताब्दी विभागामार्फत विविध कार्यक्रमांचे प्रारुप वेळापत्रक तयार करण्यात येऊन दुरुस्त्यांसह मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७चे सभेत निर्णय क्र.३५८ नुसार समाधी शताब्दी वर्षामध्ये सादर करावयच्या कार्यक्रमाची रुपरेषा ठरविणेत येऊन झालेल्या चर्चेप्रमाणे तात्काळ कार्यवाही करणेस व त्याकामी येणा-या सर्व समावेशक खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.त्यानुसार श्रीसाईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे वेळापत्रकात अ.क्र.२९) नुसार अ.क्र.०३) प्रमाणे ध्वज निर्मीती करणेबाबत निर्देश देण्यात आलेले आहे.

**प्रस्ताव:-** श्रीसाईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे सुरुवातीस दि.०१ ऑक्टोबर, २०१७ रोजी ध्वजारोहन कार्यक्रमाची रुपरेषा व उद्घाटन सोहळा कार्यक्रम निश्चित करण्यात आलेला आहे. त्याकामी

मा.मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांचे हस्ते श्रीसाईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे ध्वजारोहन करुन श्रीसाईबाबा समाधी शताब्दी महोत्सवास सुरुवात करण्यात येणार आहे. त्याकामी जा.क्र.एसएसएसटी/बांधकाम-शताब्दी/ १४३१/२०१७, दि.२०.०६.२०१७ यांचे निर्देशानुसार श्रीसाईबाबा समाधी शताब्दी महोत्सव-२०१७-१८ करीता ध्वज तयार करण्यात आला आहे. सदर ध्वजाची निश्चिती होणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**विभागाचा अभिप्राय:-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०.०८.२०१७ चे सभेत विषय नं.०४, निर्णय क्र.६७९ नुसार श्रीसाईबाबा समाधी शताब्दी वर्ष उद्घाटन सोहळयाचा व ध्वजारोहन कार्यक्रमाची रुपरेषा ठरविणेत आलेली आहे. त्यानुसार मंदिर विभागामार्फत बांधकाम- शताब्दी विभागाचे निर्देशानुसार श्रीसाईबाबा समाधी शताब्दी लोगो असलेला सॅटीन कपड्यावर ९.५ फुट X १५फुट असा भव्य आकाराचा ध्वज तयार करण्यात आलेला आहे.

तरी मंदिर विभागामार्फत तयार करण्यात आलेला ध्वज निश्चिती होणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८३२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीसाईबाबा समाधी शताब्दी लोगो असलेला सॅटीन कपड्यावर ९.५ फुट X १५ फुट असा भव्य आकाराच्या तयार करणेत आलेल्या ध्वजाचे अवलोकन करणेत येऊन, सदरहू ध्वज त्यावरील डिझाईनसह अंतीम करणेत आला.** (कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३** **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव ध्वजारोहण व उदघाटन समारंभ दि.०१.१०.२०१७ रोजीचे कार्यक्रम पत्रिकेत मान्यवरांचा समावेश करणे व छपाईकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अ)** श्रीसाईबाबा यांच्या समाधीस सन २०१८ मध्ये १०० वर्षे पुर्ण होत असल्याने श्री साईबाबा संस्थानमार्फत श्रीसाईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि.०१.१०.२०१७ ते दि.१८.१०.२०१८ या कालावधीत साजरे केले जाणार आहे.

रविवार, दि.०१ ऑक्टोबर २०१७ रोजी सकाळी १०:०० वाजता शताब्दी महोत्सव व उदघाटन समारंभ मा.श्री.रामनाथ कोविन्द, राष्ट्रपती भारत सरकार यांचे शुभहस्ते व सन्माननीय अतिथी मा.श्री.सी. विद्यासागर राव, राज्यपाल महाराष्ट्र राज्य तसेच मा.देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे अध्यक्षतेखाली तसेच इतर मान्यवरांच्या उपस्थितीत करण्याचे नियोजन आहे.

**ब)** श्री जगन्नाथ सुर्यभान गोंदकर, उपनगराध्यक्ष -शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी दि.२२.०९.१७ रोजीचे पत्रान्वये सर्व नगरसेवकांचा कार्यक्रम पत्रिकेत समावेश करणेबाबत विनंती केली आहे

सदर कार्यक्रमाची पत्रिका छपाई करुन मंत्री महोदय, जिल्हाधिकारी, शासकीय अधिकारी, नगराध्यक्ष, नगरसेवक, ग्रामस्थ, अशा काही महत्वाच्या मान्यवरांना पाठविणेचे नियोजन आहे.

तरी सदर कार्यक्रम पत्रिकेत राजशिष्टाचार प्रमाणे खालीलप्रमाणे मान्यवरांचे कार्यक्रम पत्रिकेत समावेश करणे आहे.

| **अ.नं.** | **मान्यवरांचे नाव** |
|---|---|
| ०१ | मा.श्री.राम नाथ कोविन्द, राष्ट्रपती, भारत सरकार **यांचे शुभ हस्ते** |
| ०२ | मा.श्री.सी.विद्यासागर राव, राज्यपाल, महाराष्ट्र राज्य- **सन्माननीय अतिथी** |
| ०३ | मा.ना.श्री.देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य **- कार्यक्रमाचे अध्यक्ष** |
| | **प्रमुख उपस्थिती** |
| ०४ | मा.ना.प्रा.श्री.राम,शिंदे, (जलसंधारण व राजशिष्टाचार ) तथा पालकमंत्री, अहमदनगर |
| ०५ | मा. ना. श्री राधाकृष्ण विखेपाटील विरोधी पक्ष नेता, विधानसभा महाराष्ट्र राज्य |
| ०६ | मा.ना. डॉ. रणजीत पाटील, राज्यमंत्री गृह (शहरे) नगरविकास, विधी आणि न्याय विभाग संसदीय कार्ये कौशल्य विकास आणि उद्योजकता, माजी सैनिक कल्याण |
| ०७ | मा.डॉ.सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी |
| ०८ | मा.श्री.चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम उपाध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी |
| ०९ | मा.सौ.योगिताताई अभय शेळके पाटील , नगराध्यक्षा, शिर्डी नगपंचायत तथा सदस्य, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी |
| १० | मा.ना.सौ.शालिनीताई विखे पाटील अध्यक्षा ,जिल्हा परिषद ,अहमदनगर |
| ११ | मा. श्री. सदाशिवराव लोखंडे, खासदार,शिर्डी लोकसभा मतदार संघ |
| १२ | मा.सौ.स्नेहलताताई बिपीनदादा कोल्हे ,आमदार, कोपरगाव, विधानसभा मतदार संघ |

| | |
|---|---|
| १३ | मा. श्री.सुमीत मल्लिक भा.प्र.से ,मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य |
| १४ | मा.श्री.एन.जे. जमादार, प्रधान सचिव, विधी परामर्शि विधी व न्याय विभाग |
| १५ | मा.श्री. महेश झगडे भा.प्र.से, विभागीय आयुक्त, नाशिक |
| १६ | मा.श्री.विनय चौबे भा.पो.से विशेष पोलिस महानिरीक्षक, नाशिक |
| १७ | मा.श्री.अभय महाजन भा.प्र.से., जिल्हाधिकारी, अहमदनगर |
| १८ | मा.श्री रंजनकुमार शर्मा भा.पो.से., जिल्हा पोलिस अधिक्षक, अहमदनगर |
| | **कार्यक्रमाचे आयोजक** |
| १९ | डॉ.मनिषा शामसुंदर कायंदे , सदस्य, |
| २० | अॅड.मोहन मोतीराम जयकर, सदस्य, |
| २१ | श्री.प्रताप सखाहरी भोसले, सदस्य, |
| २२ | डॉ.राजेंद्र राजा बली सिंह, सदस्य, |
| २३ | श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे , सदस्य, |
| २४ | श्री.बिपीनदादा शंकरराव कोल्हे , सदस्य, |
| २५ | श्री.रविंद्र गजानन मिर्लेकर, सदस्य, |
| २६ | श्री. अमोल गजानन कीर्तिकर, सदस्य, |
| २७ | रुबल अग्रवाल भा.प्र.से. मुख्य कार्यकारी अधिकारी |

उपरोक्त तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे मान्यवरांचे श्रीसाईबाबा समाधी शताब्दी महोत्सव ध्वजारोहण व उदघाटन समारंभ कार्यक्रम पत्रिकेत समावेश होणेस व छपाईकामी येणा-या योग्य त्या खर्चास मान्यता मिळणेस तसेच "ब" मध्ये नमुद केलेप्रमाणे नगरसेवकांचे नावाचा समावेश करावा किंवा कसे? यावर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८३३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव ध्वजारोहण व उदघाटन समारंभ दि.०१.१०.२०१७ रोजीचे कार्यक्रम पत्रिकेत प्रस्तावात नमुद केलेल्या मान्यवरांचा समावेश करणेत यावा. तसेच शिर्डी ग्रामस्थ व साईभक्त, यांचाही उल्लेख सदरहू पत्रिकेमध्ये करणेत यावा, असे ठरले व या निमंत्रण पत्रिका छपाई करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४** **नॅशनल क्लासिकल डान्स अॅकॅडमी यांचा क्लासिकल डान्स फेस्टीव्हल या कार्यक्रमाचा शताब्दी महोत्सवाचे धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमाचे वेळापत्रकात समावेश करणे.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :-**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

४. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ड) श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

**मा. व्यवस्थापन समिती ठराव:-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.७५० अन्वये खालीलप्रमाणे निर्णय संमत झालेला आहे.

श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव सन २०१७-१८ या कालावधीत आयोजित करावयाचे विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम व पदुका दर्शन सोहळा कार्यक्रमांबाबत सविस्तर चर्चा होऊन, त्यास अंतिम स्वरुप देण्यात आले.

**प्रस्तावनाः-** नॅशनल क्लासिकल डान्स ॲकडमी, चेन्नरायापटना, जि.हसन (कर्नाटक) यांनी मा. कार्यकारी अधिकारी यांना अग्रेषित केलेल्या पत्रात आयोजक श्रीमती स्वाती भारव्दाज यांनी शास्त्रीय नृत्याचे (भरतनाटयम) १०५३ प्रयोग सादर करुन गिनीस बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये नांव नोंदणी झालेचे नमूद केले आहे. त्यांनी श्रींचे शताब्दी वर्षामध्ये भारतातील ८ प्रकारचे राष्ट्रीय नृत्य प्रकार एकाच मंचावर प्रदर्शित करणेचा प्रस्ताव सादर केला आहे. सदर शास्त्रीय नृत्यासाठी नवी दिल्ली, आग्रा, भोपाल, त्रिवेंद्रम, कर्नाटक, मुंबई, गोवा, वाराणसी, बिहार, उत्तर प्रदेश, हिमाचल प्रदेश, चेन्नई, हैद्राबाद, काकीनाडा आणि केरला इत्यादी वेगवेगळ्या ठिकाणावरुन ०३ ते ४० वर्ष वयोगटातील २०० कलाकार सहभागी होणार असल्याचे सांगितले आहे व सदर नृत्य सादर करणेसाठी दि.१४ व १५ ऑक्टोबर, २०१७ असा दोन दिवसाचा कालावधीची मागणी केलेली आहे. सदर कार्यक्रमासाठी त्यांनी मानधनाबाबत कोणताही उल्लेख केलेला नाही.

**विभागाचा अभिप्राय-** नॅशनल क्लासिकल डान्स ॲकडमी, हसन (कर्नाटक) यांनी श्रींचे शताब्दी वर्षामध्ये भारतातील ८ प्रकारचे राष्ट्रीय नृत्य प्रकार एकाच मंच्यावर २०० कलाकाराकारांचा समूह कला प्रदर्शित करणार आहे.

तरी श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव सन २०१७-१८ मध्ये आयोजित करावयाच्या धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे मुळ वेळापत्रकात दि.१४ व १५ ऑक्टोबर २०१७ रोजी क्लासिकल डान्स फेस्टीव्हल या कार्यक्रमाचा समावेश करणेसाठी सदरहू प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८३४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, नॅशनल क्लासिकल डान्स ॲकडमी, हसन (कर्नाटक) हे क्लासिकल डान्स फेस्टीव्हलचा संपुर्ण खर्च करणार आहेत, त्यांना फक्त जागा उपलब्ध करुन द्यावयाची असल्यामुळे त्यांचे कार्यक्रमाचा शताब्दी महोत्सवाचे धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमाचे वेळापत्रकामध्ये समावेश करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०५** **साई श्रध्दा सबुरी, नवी दिल्ली यांचे "Sai Kids Carnival" या लहाण मुलांच्या कार्यक्रमाचा श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे धार्मिक, सांस्कृतीक व सामाजीक कार्यक्रमाचे वेळापत्रकात समावेश करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :-**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

४. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ड) श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

**मा. व्यवस्थापन समिती ठरावः-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.७५० अन्वये खालीलप्रमाणे निर्णय संमत झालेला आहे. श्रीसाईबाबा समाधी शताब्दी महोत्सव सन २०१७-१८ या कालावधीत आयोजित करावयाचे विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम व पादुका दर्शन सोहळा कार्यक्रमांबाबत सविस्तर चर्चा होऊन, त्यास अंतिम स्वरुप देण्यात आले.

**प्रस्तावनाः-** श्रीमती रूबी शर्मा, मुख्य संपादक, साई श्रध्दा सबुरी, नवी दिल्ली यांनी उपरोक्त संदर्भीय पत्रांनुसार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अग्रेषित केलेल्या पत्रात, "साई श्रध्दा सबुरी हे जागतिक दर्जाचे साईबाबांना समर्पित केलेले उत्तम नियतकालीक असून साईबाबांशी संबंधीत कथा, माहिती, उद्दीष्ट्ये इत्यादींबद्दल हे नियतकालीक माहिती पुरविते. हिंदी व इंग्रजी दोन्ही भाषेमध्ये सदर नियतकालीक एकाच किंमतीत जगभरातील साईभक्तांना उपलब्ध करुन देण्यात येते.

सन २००७ पासून साई श्रध्दा सबुरी, दिल्ली मार्फत लहान मुलांचे कलेला वाव देणेसाठी “Sai Cultural Festival” च्या माध्यमातून मंच उपलब्ध करुन देत आहे. त्यांनी दामिनी एनजीओ, कॉमन वेल्थ गेम्स, हुडा ॲडमिनिस्ट्रेशन इ. बरोबर देखील काम केले आहे.

साई श्रध्दा सबुरी, नवी दिल्ली यांनी लहान मुलांसाठी नृत्य, गायन, पेंटींग, साईबाबांवर अधारित नाटक व लहान मुलांना पारितोषीक वितरण इ. कार्यक्रम शताब्दी वर्षामध्ये सादर करणेस परवानगी मिळावी” असे आशयाचे पत्र दिलेले आहे. त्याबरोबरच सन २००९ पासून ‘’Sai Kids Carnival” यशस्वी झाला आहे आणि आम्हाला आनंद होत आहे की, आम्हाला श्री साईबाबा शताब्दी महोत्सवात काही सामान्य मुलांच्या प्रतिभेचा पाया घालण्याची संधी मिळावी, असे कळविले आहे.

यापुर्वी दि.१४/०३/२०१६ रोजी श्रीमती रूबी शर्मा, मुख्य संपादक, साई श्रध्दा सबुरी, नवी दिल्ली यांना Sai Kid’s Programme करीता खुले नाट्यगृह, शिर्डी येथे अटी व शर्तीवर दोन दिवस कार्यक्रम करण्यास परवानगी देण्यात आली होती.

**प्रस्ताव:-** साई श्रध्दा सबुरी, नवी दिल्ली हे लहान मुलांसाठी“Sai Kids Carnival” हा नृत्य, गायन, पेंटींग, साईबाबांवर अधारित नाटक व लहान मुलांना पारितोषीक वितरण इ. कार्यक्रम सादर करणार आहेत. या उत्सवात भारतातील सर्व खास मुलामुलींचा सहभाग घेण्यात येईल आणि त्यापैकी प्रत्येकाला साई श्रध्दा सबुरी, नवी दिल्ली मार्फत मोफत परिवहन (Transportation), अन्न (Food), भेट (Gift) आणि इतर सुविधा पुरविणार आहेत.

त्यासाठी त्यांनी त्यांचे २०१७ च्या “Sai Kids Carnival” चे खालीलप्रमाणे वेळापत्रक कळविले आहे.

- Date : 8th December 2017
- Venue : Shirdi Sai Palki Gate No.3
- Timing : 7.00 pm – 10.00 pm
- There would be approximately 50-60 participants
- Participants from all across India
- Event includes some of the exclusive performances of normal and special kids
- Our activities includes all those talent seeking things and they are Dancing, Singing, Play / Kit
- We will handle the logistic requirement which includes Musicians, Stage, Sound
- Gifts and snacks for all the participants

श्रीमती रूबी शर्मा, मुख्य संपादक, साई श्रध्दा सबुरी, नवी दिल्ली यांचेशी दि.२३/०९/२०१७ रोजी “Sai Kids Carnival” कार्यक्रमाबाबत दुरध्वनीवरुन संपर्क साधला असता त्यांनी सदर कार्यक्रमासाठी एकुण ६० दिव्यांग व गरीब परिस्थितील मुले सहभागी होणार असून संस्थानकडून कार्यक्रमासाठी स्टेज, ध्वनी व्यवस्था व निवासव्यवस्था करण्याबाबत सांगितले आहे.

श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवात “Sai Kids Carnival” चे आयोजन करावयाचे झाल्यास साई कॉम्प्लेक्स समोरील १६ गुंठे जागेत आयोजन करता येईल. तरी सदरच्या कार्यक्रमाचा समावेश श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव२०१७-१८ मध्ये आयोजित करावयाच्या धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे वेळापत्रकात करावा किंवा कसे? यासाठी सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८३५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साई श्रध्दा सबुरी, नवी दिल्ली यांचे “Sai Kids Carnival” या लहाण मुलांच्या कार्यक्रमाचा श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे धार्मिक, सांस्कृतीक व सामाजीक कार्यक्रमाचे वेळापत्रकामध्ये समावेश करणेस व त्यांचे कार्यक्रमासाठी संस्थानमार्फत स्टेज, ध्वनी व निवासव्यवस्था विनामुल्य करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०६** **श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षानिमीत्त श्री रामनवमी उत्सवामध्ये महाराष्ट्र कुस्ती स्पर्धा आयोजीत करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-**

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

**मा. व्यवस्थापन समितीचे निर्णय:-**

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६८९ –

"..*श्री रामनवमी उत्सवामध्ये कुस्ती स्पर्धा आयोजित करणेबाबत समिती सदस्य मा. श्री. भाऊसाहेब वाकचौरे यांनी महाराष्ट्र केसरी व हिंद केसरी स्पर्धा शिर्डी येथे आयोजित करणेसाठी येणा-या खर्चाचे अंदाजपत्रक संबंधीतांकडून प्राप्त करून घेऊन मा. व्यवस्थापन समितीच्या पुढील बैठकीत याबाबतचे सादरीकरण व सविस्तर सादर करावा..*"

**प्रस्तावना–** श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि. १८ ऑक्टोबर, २०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जाणार आहे.

श्री समाधी शताब्दी वर्ष अत्यंत भक्तीमय आणि साईस्मरणपूर्ण असावा या उद्देशाने समाधी शताब्दी वर्षात विविध धार्मिक-सांस्कृतिक-सामाजिक कार्यक्रम आयोजिले जाणार आहेत. परंतु याबरोबरच अशा एखाद्या कार्यक्रमाचे आयोजन करावे ज्यायोगे साईबाबांच्या व्यक्तिमत्वाच्या एखाद्या पैलूचही स्मरण होईल, याच उद्देशाने शिर्डी येथे अतिशय भव्य अशा कुस्ती स्पर्धा भरवाव्यात असा मा. व्यवस्थापन समितीची मानस आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे वरील निर्णयात ठरलेप्रमाणे कुस्ती स्पर्धेचे आयोजन करणेकरीता अपेक्षित खर्चाचा अंदाज येणेकरीता महाराष्ट्र राज्य कुस्तिगीर परिषद यांना पत्र पाठविण्यात आले होते. त्यानुसार महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेचे सरचिटणीस यांनी खालीलप्रमाणे खर्चाचे अंदाजपत्रक कळविलेले आहे:

| अ.नं. | तपशिल | अधिकारी/पदाधिकारी संख्या |
|---|---|---|
| १. | अ) तालीम संघ X १६ कुस्तीगीर (३३ जिल्हा + ११ मनपा) | ७२० |
| | ४५ तालीम संघ X २ व्यवस्थापक | ९० |
| | ४५ तालीम संघ X २ मार्गदर्शक | ९० |
| २. | ब) तांत्रिक अधिकारी (पंच) | १२५ |
| ३. | i. पदाधिकारी व प्रतिनिधी | ९० |
| ४. | नामांकित कुस्तीगीर | ४० |
| ५. | इ) भारतीय कुस्ती संघ निरीक्षक – २<br>भारतीय शैली कुस्ती महासंघ – २<br>महाराष्ट्र ऑलिपींक निरीक्षक – १ | ०५ |
| | **एकूण संख्या :** | **११६०** |

**खर्चाचे अंदाजपत्रक**

| अ.नं. | तपशिल | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | भोजन खर्च – स्पर्धक सहभाग ११६० X ५ दिवस X रुपय ४५०/- प्रती दिन | २६,१०,०००/- |
| २ | निवास खर्च – | ५,००,०००/- |

| | | |
|---|---|---|
| | अ) खेळाडू, मार्गदर्शक व्यवस्थापक – निवास व्यवस्था<br>ब) पंच – निवास व्यवस्था<br>क) पदाधिकारी- निवास व्यवस्था | |
| ३. | प्रवास खर्च व पंच मानधन –<br>अ) पंच (तांत्रिक अधिकारी) मानधन, बस व रेल्वे भाडे<br>ब) पदाधिकारी, नामांकित कुस्तीगीर, निरीक्षक – प्रवास खर्च | ६,००,०००/- |
| ४. | आखाडा(स्पर्धेचे स्थळ)<br>अ) २ गादी + १ माती = ३ आखाडे (५० X १५०)<br>ब) प्रेक्षक गॅलरी – ५० हजार प्रेक्षकांसाठी)<br>क) स्टेज (४० X २०) | ५१,००,०००/- |
| ५. | वाहन व्यवस्था<br>बस व रेल्वे स्टेशन ते स्पर्धेचे ठिकाण व परत बसेस<br>बसेस, मिनीबस, सुमो इ. | |
| ६. | अ) ७२० कुस्तीगीर, ९० मार्गदर्शक, ९० व्यवस्थापक, १२५ पंच व ९५ पदाधिकारी – टॅकसुट (११२० X रुपये ६५०/-) | ७,२८,०००/- |
| | ब) पंच – टी शर्टस, कॅप्स इ. (२०० X ४००/-) | ८०,०००/- |
| ७. | स्पर्धेचे साहित्य – वाहतुक खर्च<br>अ) २ मॅटस – (आंतरराष्ट्रीय)<br>१ आखाडा – (माती) व वजनकाटे – ६ | १,००,०००/- |
| | ब) वॅटस – ६ सेटस व घडयाळे – ६ नग | |
| ८. | गुण पत्रके, वैदयकिय फॉर्मस, स्टेशनरी सर्टिफिकेटस, स्कोरशिट, स्टेशनरी व इतर साहित्य | ७०,०००/- |
| ९. | बक्षिसे – अ) खेळाडू – मेडल्स (पदके) ट्रॉफीज<br>ब) पाहुणे स्मृतीचिन्हे | १,५०,०००/- |
| १०. | उद्घाटन, समारोप – प्रमुख पाहुणे, बॅंड, हार, गुच्छ, नारळ, शाली, फोटो | ५०,०००/- |
| ११. | प्राविण्यधारक – रोख बक्षिसे<br>प्रथम ३०,०००/-<br>व्दितीय २०,०००/-<br>तृतीय १०,०००/-<br>तृतीय १०,०००/-<br>} ७०,०००/- X १६ वजनगट<br>(गादी व माती प्रत्येकी ८ वजन गट) | ११,२०,०००/- |
| १२. | प्रसिध्दी<br>पोस्टर्स, बॅनर्स, कटआऊट इ.<br>वार्ताहार परिषद, टि.व्ही. कव्हरेज / ४ व्हीडीओ कॅमेरे व एलईडी टि.व्ही. | |
| १३. | पत्रव्यवहार, पोस्टेज, फॅक्स, टाईपिंग, झेरॉक्स | ३०,०००/- |
| १४. | वैदयकिय सुविधा | ५०,०००/- |
| १५. | रॉयल्टी | ५,००,०००/- |
| | **एकूण खर्च :** | **१,२६,१३,०००/-** |

**प्रस्ताव:-** महाराष्ट्र राज्य कुसतीगीर परिषद यांनी शिर्डी येथे रामनवमी कालावधीत आयोजित करावयाच्या कुस्ती स्पर्धेसाठी उभारावी लागणारी सोयी-सुविधा इत्यादी बाबी कळविलेल्या आहेत.

**१)** **एकूण स्पर्धक** (कुस्तीगीर (७२०), नामाकिंत कुस्तीगीर (४०) व पंच, मार्गदर्शक, व्यवस्थापक) – एकूण संख्या- **१,१६०**

**२) कुस्तीस्पर्धेसाठी अंदाजित खर्च:-**

| **अ.नं.** | **तपशील** | **अंकी खर्च रुपये** | **अक्षरी रुपये** |
|---|---|---|---|
| १. | भोजन खर्च | २६,१०,०००/- | सव्वीस लाख, दहा हजार |
| २. | आखाडा (स्टेडीयम) - ५० हजार प्रेक्षकांसाठी | ५१,००,०००/- | एक्कावन्न लाख |
| ३. | खेळाडू व पंचाकरीता ट्रॅकसुट | ८,०८,०००/- | आठ लाख, आठ हजार |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | बक्षिसे | १५,७०,०००/- | पंधरा लाख, सत्तर हजार |
| ५. | प्रवास खर्च, पंच मानधन व वाहन व्यवस्था | ७,००,०००/- | सात लाख |
| ६. | निवास व्यवस्था | ५,००,०००/- | पाच लाख |
| ७. | प्रसिध्दी | ५,००,०००/- | पाच लाख |
| ८. | रॉयल्टी | ५,००,०००/- | पाच लाख |
| ९. | इतर (उद्घाटन समारोप, वजन काटे, घडयाळे, स्टेशनरी, पोस्टेज, वैदयकीय सुविधा व झेरॉक्स) | ३,२५,०००/- | तीन लाख, पंचवीस हजार |
| | **एकूण :** | **१,२६,१३,०००/-** | **एक कोटी, सव्वीस लाख, तेरा हजार** |

वरीलप्रमाणे महाराष्ट्र राज्य कुस्तिगीर परिषद यांनी रक्कम रु. १,२६,१३,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी, सव्वीस लाख, तेरा हजार) मात्रचे खर्चाचे अंदाजपत्रक कळविलेले आहे.

तरी शताब्दी कालावधीत श्री रामनवमी उत्सवामध्ये महाराष्ट्र केसरी स्पर्धेचे शिर्डी येथे आयोजन करणेकामी वर नमूद महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषद यांचेकडून प्राप्त झालेल्या खर्चाचे प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय होणेकामी सदरहू प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८३६** **सदरहू विषयावर चर्चा करणेसाठी आजचे सभेत पै.वैभव विलास लांडगे, अहमदनगर जिल्हा कुस्ती संघटना, अहमदनगर हे त्यांच्या सहकाऱ्यांसह उपस्थित होते. त्यांनी शताब्दी कालावधीत शिर्डी येथे महाराष्ट्र केसरी स्पर्धेचे आयोजन करावे, अशी विनंती केली व त्यासाठी अंदाजे रु.६०- ७० लाख मात्र खर्च संस्थानने करावा, अशी विनंती सभेस केली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, शताब्दी कालावधीत महाराष्ट्र केसरी स्पर्धेचे शिर्डी येथे आयोजन करणेकामी खुपच जास्त खर्च येत आहे. हा खर्च कमी कसा करता येईल, याचे विवरण पै.वैभव लांडगे, अहमदनगर यांचेकडून लेखी स्वरुपात घ्यावे, असे ठरले.** (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०७** **साईबाबा समाधी शताब्दी निमित्त होणाऱ्या गर्दीच्या अनुषंगाने सुरक्षिततेच्या दृष्टीने तातडीने सुरक्षा साहित्य भाडे तत्वावर घेणेकामी दरपत्रक (आर.एफ.क्यु.) मागविणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबांचे समाधीचे शताब्दी महोत्सव आक्टोंबर २०१७ ते ऑक्टोंबर २०१८ या कालावधीमध्ये संस्थानमार्फत साजरा होत आहे. मंदिर परीसरात श्रीं च्या दर्शनार्थ येणा-या साईभक्तांची सुरक्षितेच्या दृष्टीकोनातून सुरक्षा रक्षकांमार्फत डि.एफ.एम.डी. व एच.एच.एम.डी. व्दारे तसेच त्यांचेकडील असलेल्या साहित्यांची/ सामानांची एक्स-रे बॅगेज स्कॅनर व्दारे तपासणी करण्यात येते. समाधी शताब्दी महोत्सव निमित्त होणा-या गर्दीच्या अनुषंगाने साईभक्तांच्या सुरक्षितेच्या दृष्टीकोनातून तसेच साईभक्तांची तपासणी करणेकामी संरक्षण विभागाकडे असलेले सुरक्षा साहित्यांची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | सुरक्षा साहित्याचे नावं | एकूण नग | बंद स्थितीत | चालु स्थितीत |
|---|---|---|---|---|
| ०१ | एक्स-रे बॅगेज स्कॅनर | ०२ नग | ०२ नग | --- |
| ०२ | डि.एफ.एम.डी. | १३ नग | १२ नग | ०१ नग |
| ०३ | एच.एच.एम.डी. | ६० नग | २० नग | ४० नग |
| ०४ | वॉकी टॉकी | ६० नग | १५ नग | ३५ नग |

श्रींचे मंदिर व मंदिर परिसराचे सुरक्षितता ही बाब अत्यंत महत्वाची असल्यामुळे सुरक्षा यंत्रणा, फायर सेफ्टी, सी.सी.टी.व्ही. यंत्रणा वगैरे सुरक्षा विषयक मार्गदर्शनासाठी केंद्र शासनाच्या केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल यासारख्या चांगल्या संस्थेचे मार्गदर्शन घेण्याची संस्थानला आवश्यकता असल्याने, त्यास अनुसरुन केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बलाचे (CISF) अधिकारी यांनी दि.14.01.2016 ते दि.18.01.2016 या कालावधीत तसेच महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ (MSSC) यांनी दि.20.09.2016 व दि.21.09.2016 या कालावधीत तसेच पोलीस अधिक्षक, राज्य गुप्तवार्ता विभाग-शिर्डी, जिल्हा विशेष शाखा- अहमदनगर, शिर्डी पोलीस स्टेशन व साई मंदिर सुरक्षा यांचेकडील अधिका-यांनी वेळोवेळी मंदिर, मंदिर परिसर तसेच संस्थान संलग्न सर्व परिसराची पहाणी करुन आढळुन आलेल्या त्रुटी, उणीवाबाबत सुरक्षितेच्या दृष्टीने करावयाच्या उपाययोजना व खरेदी करणे आवश्यक असलेले सुरक्षा साहित्य इत्यादी बाबत सुरक्षा ऑडीट केले असून त्याचा सविस्तर सुरक्षा अहवालही

इकडील कार्यालयाकडे सादर केला असता प्रामुख्याने त्यामध्ये त्यांनी खालीलप्रमाणे महत्वाच्या सुचना व आवश्यक सुरक्षा साहित्यांची गरज असल्याचे नमुद केलेले आहे.

- **प्रामुख्याने केलेल्या सुचना –**

१) संस्थानचे सर्व प्रवेशव्दारावर बुलेट प्रुफ मोर्चे असणे आवश्यक आहे.
२) प्रत्येक प्रवेशव्दाराने येणा-या साईभक्तांची डि.एफ.एम.डी., एच.एच.एम.डी. व्दारे तपासणी करण्यात यावी.
३) संस्थानचे सर्वत्र परीसरात फायर एक्स्टींग्युशर तसेच सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे आवश्यक आहे.
४) संस्थानचे सर्वत्र परीसरात सर्च लाईटची व्यवस्था असणे गरजेचे आहे.
५) संस्थानचे परीसरात आर्थीक बाबींशी निगडीत असलेले ठिकाणी व कॅश काऊंटर येथे बंदुकधारी सुरक्षा कर्मचारी असणे आवश्यक आहे.
६) मंदिरात दर्शनार्थ येणा-या तसेच प्रसादालयाचे ठिकाणी येणा-या साईभक्तांचे साहित्यांची/ सामानांची बॅगेज स्कॅनरव्दारे तपासणी होणे अत्यंत महत्वाचे आहे.
७) मंदिर व परीसरात २४ तास सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वीत असावी. तसेच सीसीटीव्ही फुटेजचा साठा ९० दिवसांपर्यत राहील अशी व्यवस्था असावी.
८) मंदिरात मोबाईल व इलेक्ट्रॉनिक्स वस्तू घेऊन जाण्यास सक्त मनाई करावी.
९) मंदिर परीसरात मोबाईल जॅमर कार्यप्रणाली कार्यान्वीत करण्यात यावी. इत्यादी

उपरोक्तप्रमाणे प्रामुख्याने सुरक्षा ऑडीट अधिका-यांनी सुचना केलेल्या आहेत.

- **सुरक्षा ऑडीटनुसार आवश्यक असलेल्या सुरक्षा साहित्यांचा तपशिल खालीलप्रमाणे –**

| अ.नं. | सुरक्षा साहित्यांचा तपशिल | नग |
|---|---|---|
| **01.** | X-Ray baggage inspection systems<br>Gate-02 01 Nos.<br>Gate-03 01 Nos.<br>Gate-04 01 Nos.<br>Gate-05 01 Nos.<br>Prasadalaya (IN Gate)-01<br>All Accommodation facilities- Sai Ashram, Sai Dharmashala, Dwarawati-03 Nos | **06** |
| **02** | DFMD<br>Gate-02 02 Nos.<br>Gate-03 03 Nos.<br>Gate-04 03 Nos.<br>Darshan Queue (1&2)-08 Nos<br>Prasadalaya (IN Gate)-02 Nos<br>All Accommodation facilities- Sai Ashram, Sai Dharmashala, Dwarawati-06 Nos | **24** |
| **03** | Body Scanner | **02** |
| **04** | VHF<br>Static base sets with antenna, battery and accessories | **12** |
| **05** | VHF hand set with accessories | **75** |

करीता साईभक्तांच्या सुरक्षितेच्या दृष्टीने व शताब्दीच्या होणा-या गर्दीच्या नियोजनाकामी तातडीची गरज म्हणून उपरोक्तप्रमाणे सुरक्षा ऑडीट अहवालात दर्शविलेल्या सुरक्षा साहित्य खरेदीबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५/०६/२०१७ रोजीच्या सभेत सादर केला असता ठराव क्र.४९० अन्वये खालीलप्रमाणे सुरक्षा साहित्य खरेदी करणेकामी येणा-या अंदाजे अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

| Sr. No. | Item Description | Qty | Appr. Amt. |
|---|---|---|---|
| 01. | X-Ray baggage inspection systems (Scanner) | 04 | 60,00,000/- |
| 02. | DFMD | 40 | 40,00,000/- |
| 03. | Body Scanner | 01 | 70,00,000/- |
| 04. | VHF (Static base sets with antenna, battery and accessories) | 02 | 69,000/- |
| 05. | VHF hand set with accessories | 75 | 12,00,000/- |
| 06. | HHMD (Hand Held Metal Detector) | 40 | 20,000/- |
| | | Total | 1,82,89,000/- |
| | Add 10% as installation / testing charges cable supply, laying etc., shall be extra | + | 18,28,900/- |
| | | Total | 2,01,17,900/- |

**नम्र मत-** उपरोक्तप्रमाणे सुरक्षा साहित्य खरेदी करणेकामी ई-निविदा प्रक्रियेस जादा अवधी लागत असलेने, तसेच ०१ ऑक्टोंबर २०१७ पासुन श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष सुरु होत असुन ई-निविदा होईपर्यंत महाराष्ट्र शासन खरेदी नियमावलीतील तरतुद/ नियम क्र. ४.५ अन्वये तातडीची गरज म्हणून खालील दर्शविलेप्रमाणे सुरक्षा साहित्य ०३ महिन्यांसाठी भाडे तत्वावर घेणेकामी पुरवठाधारकांकडुन दरपत्रकासाठी विनंती (आर.एफ.क्यु.) मागविता येतील, असे नम्र मत आहे.

**<u>तातडीची गरज म्हणून भाडे तत्वावर घ्यावयाचे सुरक्षा साहित्याचा तपशिल खालीलप्रमाणे-</u>**

| अ.नं. | सुरक्षा साहित्याचा तपशिल | एकूण नग |
|---|---|---|
| ०१ | एक्स-रे बॅगेज स्कॅनर | ०४ नग |
| ०२ | डि.एम.एम.डी. | ०९ नग |
| ०३ | एच.एच.एम.डी. | १५ नग |
| ०४ | बुलेट प्रुफ जॅकेट | १० नग |
| ०५ | बॉम्ब ब्लॅंकेट | ०१ नग |

करीता साईबाबा समाधी शताब्दी वर्ष ०१ ऑक्टोंबर २०१७ पासून सुरु होत असलेने होणारी संभाव्य साईभक्तांची गर्दी लक्षात घेता तातडीची गरज म्हणून उपरोक्त तक्त्यात दर्शविलेनुसार सुरक्षा साहित्य ०३ महिन्यांसाठी भाडे तत्वावर घेणेकामी पुरवठाधारकांकडुन दरपत्रकासाठी विनंती (आर.एफ.क्यु.) मागविणेकामी तसेच आर.एफ.क्यु. मसुद्याप्रमाणे अल्प कालावधीसाठी संस्थानच्या अधिकृत संकेतस्थळावर आर.एफ.क्यु. प्रसिध्द् करण्यात आलेली असून पुरविठाधारकांकडुन दरपत्रके मागविण्यात येत असून सदरचे प्रस्तावाबाबत केलेल्या कार्यवाहीस मा.व्यवस्थापन समितीची कार्योत्तर मंजुरी मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.८३७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईबाबा समाधी शताब्दी निमित्त होणाऱ्या गर्दीच्या अनुषंगाने सुरक्षिततेच्या दृष्टीने तातडीने प्रस्तावात नमुद केलेले सुरक्षा साहित्य भाडे तत्वावर घेणेकामी दरपत्रक (आर.एफ.क्यु.) मागविणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०८** **सन २०१८ ची श्री साई दैनंदिनी/दिनदर्शिका व श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिकेचे प्राप्त नमुने पाहुन त्यास मान्यता मिळणे व छपाई सुरुवात करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम:-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ कलम १७ नं. ठ मध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे.

"श्री साईबाबांचे जीवन कार्य,त्यांच्या लिला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार-प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालविल व त्याचा विस्तार करील."

**प्रस्ताविक:-** मा.व्यवस्थापन समिती दि.०८.०९.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७६८ (०५) अन्वये श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका छपाईकामी निम्नत्तम दरधारक यांचेकडून छपाईकामास लवकरच सुरुवात करणार आहे.

**प्रस्ताव:-** सन-२०१८ चे श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिकेचे खालील पुरवठाधारकांचे निमत्तम दर मंजूर झाले असून, त्यांचेकडून प्राप्त झालेले नमुने त्यांचे नावासमोर खालील तक्त्यात दर्शविण्यात आले आहेत.

| अ.नं. | पुरवठाधारकांचे नाव | प्राप्त छपाई नमुना तपशिल |
|---|---|---|
| ०१ | मे. प्रिंटप्लस प्रा.लि., मुंबई | १) श्री साई दैनंदिनी डिलक्स- कव्हर नमुना<br>२) श्री साईबाबा डायरी पॅकेट साईज- कव्हर नमुना |
| ०२ | मे. चेरी ऑफसेट, सोलापूर | श्री साई दिनदर्शिका ०१ पानी मोठे– नमुना प्राप्त |
| ०३ | मे. वेद प्रकाश सुनिल दत्त, नवी दिल्ली | १) श्री साईबाबा डिलक्स वॉल कॅलेंडर्स (८ पेजेस)- छपाई फोटो नमुना प्राप्त<br>२) श्री साईबाबा मेटपेट कॅलेंडर्स (७ पेजेस)- छपाई फोटो नमुना प्राप्त |
| ०४ | मे. सॅप प्रिंट सोल्युशन प्रा. लि., मुंबई | १) श्री साईबाबा थ्रीडी वॉल कॅलेंडर्स (सिंगल पेज)- छपाई फोटो नमुना प्राप्त<br>२) श्री साईबाबा थ्रीडी डेस्क कॅलेंडर्स (७ पेजेस)- छपाई फोटो नमुना प्राप्त<br>३) श्री साईबाबा डेस्क कॅलेंडर्स (७ पेजेस) - छपाई फोटो नमुना प्राप्त (कोरोनाडो पेपरवर छपाई) |

**मागणी:-** श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका-२०१८ चे छपाईकामाचे नमुने पाहून त्यास मान्यता घेणे, छपाईकामास सुरुवात करणे आहे.

**संस्थानचे अधिनियम / ठराव यानुसार छाननी करुन शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** धोरणात्मक

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट:–** सन २०१८ ची श्री साई दैनंदिनी/ दिनदर्शिका व श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिकाबाबत उपरोक्त पुरवठाधारकांकडील प्राप्त नमुने पाहून त्यास मान्यता मिळणे व छपाईस सुरुवात करणेबाबतचा विषय मा. व्यवस्थापन समितीच्या सभेत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८३८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१८ ची श्री साई दैनंदिनी/ दिनदर्शिका व श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका यांचे पुरवठाधारकांकडून प्राप्त झालेल्या नमुन्यांची पाहणी करुन, नमुने अंतीम करणेत आले व त्याप्रमाणे छपाई सुरु करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०९** **साई कॉम्प्लेक्स समोरील (१६ गुंठे) परिसरातील मंडपास नाव देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा यांच्या समाधीस दि. १८ ऑक्टोबर २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ या कालावधीमध्ये 'श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष' साजरे केले जाणार आहे.

या शताब्दी वर्षात साईभक्तांसाठी धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक कार्यक्रम करण्यात येणार आहेत. यातील बरेचसे धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम साई कॉम्प्लेक्स (१६ गुंठे) परिसरात आयोजित करण्यात येणार आहेत. यासाठी संस्थानचे १६ गुंठे परिसरामध्ये भव्य मंडप उभारण्यात आलेला आहे. तथापि या मंडपास तथा जागेस अदयापपावेतो कोणतेही नाव देण्यात आलेले नाही. सदर मंडपास कायमस्वरुपी नाव दयावयाचे असल्याने तसेच मंडप शताब्दीचे कार्यक्रमाकरीता वर्षभर राखीव असल्याने, त्यास विशिष्ट नावाने संबोधणे उचित ठरेल, असे नम्र मत आहे. संस्थान मालकीच्या सदरहु मंडपास श्रींचे समकालीन भक्तांचे नांव दयावयाचे ठरल्यास, बरेचसे भक्तांचे वंशज यासाठी पाठपुरावा करण्याची शक्यता नाकारता येत नाही. यासाठी मंडपाचे नामकरण करणेकरीता खालीलपैकी एक नाव अथवा मा. व्यवस्थापन समितीने सुचविलेले नांव देण्याची कार्यवाही करता येईल :

| | |
|---|---|
| १) श्रदधा सबुरी मंडप | २) श्रीसाई शिलधी मंडप |
| ३) श्रीसाई शताब्दी मंडप | ४) संत श्रीसाईबाबा मंडप |
| ५) श्रीसाईबाबा शताब्दी महोत्सव मंडप | ६) श्रीसाई दरबार मंडप |
| ७) श्रीसाई व्दारकामाई मंडप | ८) श्रीसाई हनुमान मंडप |

९) श्रीसाई समाधी शताब्दी मंडप — १०) श्रीसाई कला दालन मंडप

११) श्रीसाई आराधना दालन मंडप — १२) श्री साई शारदा कला मंदिर मंडप

तरी उपरोक्त नावे तसेच मा. व्यवस्थापन समितीने सुचविलेले नांव यापैकी एक नांव साई कॉम्पलेक्स समोरील (१६ गुंठे) परिसरात उभारणेत आलेल्या मंडपास देणेकामी निर्णय होणेस तसेच सदरहु नावाचे आकर्षक बोर्ड बांधकाम विभागामार्फत मंडपाचे दर्शनी भागात लावणेस व याकामी येणाऱ्या अनुषंगीक खर्चास मान्यता मिळणेकामी सदरहु प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे आयत्या वेळचा विषयामध्ये निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८३९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साई कॉम्प्लेक्स समोरील (१६ गुंठे) परिसरामध्ये विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम करणेसाठी उभारणेत आलेल्या मंडपास "श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप" व साईआश्रम भक्तनिवास येथे उभारणेत आलेल्या मंडपास "साईआश्रम समाधी शताब्दी मंडप" असे नाव देण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१०** **श्री साई मंदिर सुरक्षेकरीता महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाची सुरक्षा घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई मंदिर व मंदिर परिसराच्या सुरक्षेकरीता महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाची सुरक्षा घेणेकामी जा.नं.एसएसएस/ वशि/संरक्षण/ ५४२७/२०१५ दि.३१/१२/२०१५ चे पत्राने मा.महाव्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई यांना प्रतिमहा येणारा खर्च व इतर अटी/शर्तीची मागणी करण्यात आलेली होती. त्यानुसार जा.क्र.म.रा.सु.म.२०१/२०१६ दि.१६/०१/२०१६ चे पत्राने वरी. उपमहाव्यवस्थाक, म.रा.सु.म. यांनी सिक्युरिटी ऑडीटकामी येणारा खर्च कळविला होता. सदरचे खर्चास मा.व्यवस्थापन समिती दि.१६/०८/२०१७ चे सभेमध्ये मान्यता घेऊन जा.नं.एसएसएस/वशि/संरक्षण/३१९२/२०१६ दि.२१/०९/२०१६ नुसार सिक्युरिटी ऑडीट फी व रजिस्टेशन फी रु.४७,२५०/- (टॅक्स कपात करुन) म.रा.सु.म. चे खात्यावर आदा करणेत आलेली आहे.

त्यानुसार महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ यांचेकडून मंदिर, मंदिर परिसर व संस्थानचे सर्व इमारतीचे सिक्युरिटी ऑडीट करुन जा.क्र.मरासुम/३४७०/२०१६ दि.०७/११/२०१६ चे पत्रान्वये सुरक्षा ऑडीट अहवाल सादर केला आहे. सदरचे अहवालामाध्ये श्री साईबाबा संस्थानला दररोज १३४२ सुरक्षा कर्मचाऱ्यांची आवश्यकता असल्याचे कळविलेले आहे. महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ यांनी सादर केलेल्या नियमावलीनुसार १३४२ सुरक्षा कर्मचाऱ्यांचे तीन महिन्यांचे वेतन "सिक्युरिटी डिपॉझीट" म्हणुन (विना सेवा शुल्क आणि रिफंडेबल) आणि एक महिन्याचे वेतन (सेवा शुल्कासहीत) ॲडव्हान्स म्हणून महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाकडे जमा करावे लागेल, असे कळविले आहे. तसेच त्यांचे अहवालानुसार त्यांनी "सिक्युरिटी ऑफीसर" म्हणुन निवृत्त पोलीस अधिकारी (ACP/Dysp पदाचे) यांची वरिष्ठ अधिकारी म्हणून नेमणुक करण्याची शिफारस करण्यात यावी तसेच त्यांचेकडील प्राप्त अहवालानुसार कर्मचाऱ्यांचे वेतन खालीलप्रमाणे कळविलेले आहे.

| Name of post | Chargable Rate | Name of post | Chargable Rate |
|---|---|---|---|
| SSO (Rtd.Addi.SP) | ८०,०००/- | AHG(Armed Head Guard) | २४,०००/- |
| SSO (Rtd.ACP) | ६०,०००/- | HG (Head Guard) | २१,०००/- |
| SSO (Rtd.P.I) | ५०,०००/- | SG (Security Guard) | २०,०००/- |
| SO | ३३,०००/- | LSG (Ladies Security Guard) | २०,०००/- |
| ASO | २७,०००/- | ASG(Armed Security Guard) | २३,०००/- |
| SS | ३६,०००/- | | |

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाचे सुरक्षा ऑडीट अहवालानुसार १३४२ सुरक्षा कर्मचाऱ्यांकरीता मासिक रु.३,२४,१९,६५०/- खर्च कळविला होता. दि.१२/०५/२०१७ रोजी मा.श्री रंजनकुमार शर्मा, पोलिस अधिक्षक, अहमदनगर यांचे समवेत सुरक्षा ऑडीट संदर्भात बैठक झाली असता बैठकीमध्ये मंदिर सुरक्षेकरीता महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ यांचेमार्फत कर्मचारी घेणेबाबत मत व्यक्त केले. तसेच दि.०६/०७/२०१७ रोजी श्री साईबाबा समाधी महोत्सव कृती आराखडया संदर्भात मा.ना.देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली आढावा बैठक झाली असता बैठकीमध्ये श्री साईबाबा मंदिर सुरक्षा व्यवस्थेतील त्रुटी व शताब्दी

वर्ष निमीत्ताने भाविकांची होणारी गर्दी या सर्व पार्श्वभुमीवर मा.मुख्यमंत्री महोदय यांनी संरक्षण व्यवस्थेतील त्रुटी तातडीने दुर करणेसाठी शासनाच्या माहिती तंत्रज्ञान गृह विभागामार्फत शिर्डी येथे सीसीटीव्ही यंत्रणा तातडीने उभारणे व महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाची सुरक्षा व्यवस्था उपलब्ध करुन घेणेबाबत निर्देश दिले.

मा.मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य व मा.पोलिस अधिक्षक, अहमदनगर यांचे सुचनेनुसार उपविभागीय पोलिस अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांचेमार्फत मनुष्यबळासंदर्भात सर्व्हे करुन दि.१२/०७/२०१७ चे पत्रान्वये साईमंदिर सुरक्षेकरीता तुर्त २०४ नियुक्त होणेबाबत व उर्वरीत टप्प्या-टप्प्याने नियुक्तीची कार्यवाही होणेस कळविले होते. त्यानुसार मा.व्यवस्थापन समिती दि.२५/०७/२०१७ रोजीच्या सभेमध्ये मासिक रु.४२,०९,०००/- चे खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर केला असता, निर्णय क्र.५४१ प्रमाणे यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, सध्या संस्थानमध्ये कायम व कंत्राटी सुरक्षा रक्षकांची संख्या जास्त असल्यामुळे संस्थानवर मोठया प्रमाणावर आर्थिक भार पडत आहे. तथापि, मंदिर सुरक्षा हाही अतिशय प्राधान्याचा विषय आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ यांचे ५० सुरक्षा कर्मचारी व एक सुरक्षा अधिकारी एवढे मनुष्यबळ श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाच्या अनुषंगाने सुरवातीस एक वर्ष (दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते ३० सप्टेंबर २०१८) कालावधीसाठी घेणेत यावे व त्यांचा कामाच्या अनुभवानुसार व संस्थानची गरज पाहुन मनुष्यबळ वाढविणेबाबत पुढील निर्णय घेण्यात येईल, असे ठरले.

मा.व्यवस्थापन समिती दि.२५/०७/२०१७ चे सभेतील निर्णयानुसार महाराष्ट्र राज्य सुरक्षा मंडळ यांना जा.नं.एसएसएस/ वशि/ संरक्षण/२८०९/२०१७ दि.२४/०८/२०१७ चे पत्रान्वये मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई यांना श्री साई मंदिराकरीता ०१ सुरक्षा अधिकारी व ५० सुरक्षा कर्मचारी (३० पुरुष व २० महिला) दि.०१/१०/२०१७ ते दि.३०/०९/२०१७ पर्यंत पुरविणेस तयार असलेबाबत संमतीपत्र सादर करणेस कळविणेत आले होते.

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ यांचेमार्फत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी करीता महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाची सुरक्षा पुरविणे संदर्भात चर्चा करण्यासाठी अप्पर मुख्य सचिव (गृह) यांचे अध्यक्षतेखाली दि.२८/०८/२०१७ रोजी त्यांचे दालनात (२ रा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई) येथे महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई, आयुक्त, राज्य गुप्त वार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई, जिल्हाधिकारी, अहमदनगर, पोलिस अधिक्षक, अहमदनगर, मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांची संयुक्तीक बैठक आयोजीत करण्यात आली होती. सदरचे बैठकीमध्ये साई मंदिराकरीता महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाचे ०१ अधिकारी व ५० कर्मचारी नेमणुकीबाबत संख्या अतिशय कमी असुन श्री साई मंदिरास प्राप्त होणारे धमकी पत्र, सद्यस्थितीत देशांत विविध ठिकाणी होत असलेले अतिरेकी हल्ले, बॉम्बस्फोटाच्या घटना, त्याचप्रमाणे अतिरेक्यांनी देशांतील धार्मिक स्थळांना टार्गेट केलेची परिस्थीती, जगभरामध्ये सुरु असलेल्या दहशतवादी कारवाया ई.विषयावर सविस्तर चर्चा होऊन श्री साई मंदिराकरीता पोलिस विभागाने यापुर्वी कळविले प्रमाणे २०४ कर्मचारी घेणेबाबत सुचना करण्यात आली.

शताब्दी महोत्सव २०१७-२०१८ चे निमीत्ताने श्रींचे दर्शनाकरीता मोठया प्रमाणात गर्दी होणार असुन श्री साई मंदिर व साईभक्तांची सुरक्षा ही महत्वाची बाब असल्याने श्री साई मंदिर सुरक्षेकरीता उपविभागीय पोलिस अधिकारी, शिर्डी भाग शिर्डी यांनी सुरक्षा रक्षकांची पॉईटंची निश्चीती केलेप्रमाणे खालील तपशिल प्रमाणे अधिकारी कर्मचारी व कर्मचारी घेणे अपेक्षित आहे.

| अ.नं | ठिकाण | प्रथम सत्र | | द्वितीय सत्र | | तृतीय सत्र | | एकुण | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | SG | LSG | SG | LSG | SG | LSG | SG | LSG | |
| १ | गेट A फ्री दर्शन | २ | २ | २ | २ | २ | २ | ६ | ६ | फ्रिक्सींग/चेकींग |
| २ | गेट B फ्री दर्शन | २ | २ | २ | २ | २ | २ | ६ | ६ | फ्रिक्सींग/चेकींग |
| ३ | गेट नं.३ आत/बाहेर | २ | २ | २ | २ | २ | २ | ६ | ६ | फ्रिक्सींग/चेकींग |
| ४ | गेट नं.४ आत/बाहेर | २ | २ | २ | २ | २ | २ | ६ | ६ | फ्रिक्सींग/चेकींग |
| ५ | गेट नं.५ बाहेर | १ | १ | १ | १ | १ | १ | ३ | ३ | फ्रिक्सींग/चेकींग |
| ६ | गेट नं.०२ VIP | १ | १ | १ | १ | १ | १ | ३ | ३ | फ्रिक्सींग/चेकींग |
| ७ | साई कॉम्प्लेक्स चेकींग पॉईंट | २ | २ | २ | २ | २ | २ | ६ | ६ | फ्रिक्सींग/चेकींग |
| ८ | पिंपळवाडी रोड चेकींग पॉईंट | २ | २ | २ | २ | २ | २ | ६ | ६ | फ्रिक्सींग/चेकींग |
| ९ | द्वारकामाई चेकींग पॉईंट | २ | २ | २ | २ | २ | २ | ६ | ६ | फ्रिक्सींग/चेकींग |
| १० | मेन गेट नं.४ बाहेर | २ | २ | २ | २ | २ | २ | ६ | ६ | फ्रिक्सींग/चेकींग |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ | लाडू काऊंटर फ्री पासेस | २ | २ | २ | २ | २ | २ | ६ | ६ | फ्रिक्सींग/चेकींग |
| १२ | प्रसादालय चेकींग पॉईंट १ | २ | २ | २ | २ | २ | २ | ६ | ६ | फ्रिक्सींग/चेकींग |
| १३ | प्रसादालय चेकींग पॉईंट २ | २ | २ | २ | २ | २ | २ | ६ | ६ | फ्रिक्सींग/चेकींग |
| | | २४ | २४ | २४ | २४ | २४ | २४ | ७२ | ७२ | |

| SSO | ASO | SS | HG | SG | LSG | Total | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०४ | ११ | ९३ | ९३ | २०४ | २८% Extra सुट्टीनुसार |

| अ.नं. | तपशिल | संख्या | प्रतिमाह वेतन | प्रतिमाह एकुण खर्च |
|---|---|---|---|---|
| ०१. | Senior Security Officer (Rtd.ACP) | ०१ | ६०,०००/- | ६०,०००/- |
| ०२. | Asistant Security Officer | ०३ | २७,०००/- | ८१,०००/- |
| ०३. | Security Supervisor) | ०४ | ३६,०००/- | १,४४,०००/- |
| ०४. | Head Guard | १० | २१,०००/- | २,१०,०००/- |
| ०५. | Security Guard | ९३ | २०,०००/- | १८,६०,०००/- |
| ०६. | Ladies Security Guard | ९३ | २०,०००/- | १८,६०,०००/- |
| | | **२०४** | **एकुण** | **४२,१५,०००/-** |
| | GST १८% | | | ७,५८,७००/- |
| **अ)** | **दरमहा येणारा अंदाजीत एकुण खर्च** | | | **४९,७३,७००/-** |
| **ब)** | **एक महिन्याची ॲडव्हान्सरुपी द्यावयाची रक्कम रु.** | | | **४९,७३,७००/-** |
| **क)** | **तीन महिन्याची डिपॉझिट रक्कम रु.** | | | **१,२६,४५,०००/-** |
| **ड)** | **काम सुरु होणेपुर्वी आदा करावयाची ॲडव्हान्स व डिपॉझिटची एकुण रक्कम रु.** | | | **१,७६,१८,७००/-** |

तरी १) महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ यांचेमार्फत श्री साई मंदिर सुरक्षेकामी वरील तपशिलप्रमाणे अधिकारी व कर्मचारी घेणेस व त्याकामी दरमहा येणारे अंदाजीत खर्च रु.४९,७३,७००/- चे खर्चास मान्यता असावी. २) एक महिन्याचे वेतनाची ॲडव्हान्सरुपी द्यावयाची रक्कम रु.४९,७३,७००/- + तीन महिन्यांचे वेतनाची डिपॉझीट म्हणुन आदा करावयाची रक्कम रु.१,२६,४५,०००/- असे एकुण १,७६,१८,७००/- रु मात्र महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ यांचे खात्यावर जमा करणेस मान्यता असावी. तसेच मा.व्यवस्थापन समिती मान्यतेनंतर शासन मान्यतेस्तव प्रस्ताव सादर करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.८४०** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ यांचेमार्फत श्री साई मंदिर सुरक्षेकामी प्रायोगिक तत्वावर ३ महिने कालावधीसाठी १०० सुरक्षा कर्मचारी व त्यानुसार आवश्यक असलेले अधिकारी घेण्यात यावे. तसेच या महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाच्या कर्मचाऱ्यांमध्ये संस्थान कर्मचाऱ्यांचीही नेमणूक करणेत यावी.** (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.११** **सन २०१७-१८ या वर्षासाठी साईबाबा भक्तनिवासस्थान व संस्थान रुग्णालये लॉण्ड्रीसाठी आवश्यक केमिकल/ डिटर्जेन्ट संयुक्तखरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद-** १) २१ चा (१) चा (ग)– भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

२) (ख) भक्तांना राहण्यासाठी व वापर करण्याकरीता विश्रामगृहे बांधणे व त्याची देखभाल करणे.

**मा.व्यवस्थापन मंडळाचा ठराव –** १) दि.२६/०३/२०११ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेमधील संमत विषय नं.३२ व निर्णय क्र.२३२.

२) दि.१८/०२/२०१५ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेमधील संमत विषय नं.१३ व निर्णय क्र.४१.

**प्रास्तावीक–** श्री साईबाबा संस्थानचे ०२ लॉण्ड्री युनिट असुन एक रुग्णालय तर दुसरे इकडील विभागा कडे आहे. दोनही युनिटसाठी आवश्यक केमिकल/डिटर्जंन्ट पुर्वी दोन स्वतंत्र प्रस्ताव ठेवून खरेदी केले जात असे.

दि.२६/०३/२०११ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये येथुन पुढे संस्थानचे भक्तनिवासस्थान, रुग्णालये व इतर विभागांचा लॉण्ड्री केमिकल खरेदीकामी एकत्रित प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात यावा असे ठरले असल्याने शिरस्त्याप्रमाणे एकत्रित खरेदी प्रस्ताव सादर केला जातो, खरेदी प्रक्रीया खरेदी विभागामार्फत केली जाते.

दि.१८/०२/२०१५ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेमधील विषय नं.१३ व निर्णय क्रं.४१ नुसार श्री सुरेश ब्राम्हणकर यांची संस्थान परिसरात स्वच्छता व किडनाशक तांत्रिक सल्लागार म्हणुन सेवाभावी नियुक्ती करण्यात आलेली असल्याने सदर खरेदीबाबत शिरस्त्याप्रमाणे त्यांचा लॉण्ड्री केमिकल व डिटर्जंन्टमध्ये समाविष्ट घटकांचे माहितीबाबत अहवाल मागविण्यात आला त्यांनी त्यांचा अहवाल दि.०४/०७/२०१७ रोजी संस्थानला सादर केला आहे तो सोबत अवलोकनार्थ व माहितीसाठी सादर आहे. त्यानुसार आपणास आवश्यक लॉण्ड्री केमिकल व डिटर्जंन्ट खरेदी करावे लागणार आहे. यासाठी आवश्यक त्या तरतुदी, रासायनिक घटकांसह केमिकल/ डिटर्जंन्ट खरेदी व येणा-या अदमासे खर्चास मान्यतेसाठी दि.१४/०८/२०१७ रोजी सादर करण्यात आलेली होती सदर टिपणी वर

१) फक्त ई-मेलद्वारे घेतलेल्या दरानुसार Estimated Cost काढलेली आहे. दर खुप वेगवेगळे आहेत. Market Survey आवश्यक.

२) ई-मेलद्वारा मागविण्यात आलेल्या दरपत्रकानुसार अंदाजित रक्कम Estimated Cost कशी Calculate केली ते स्पष्ट होत नाही. निविदा दर स्विकृतीसाठी Estimated Cost महत्त्वाची असल्याने अंदाजित किंमत कशी परीगणित केली याचे स्वतंत्र Sheet अधिक्षक व प्रशासकीय अधिकारी यांचे स्वाक्षरीने नस्ती बरोबर ठेवावे असे वाटते, असे निर्देश असल्याने त्यानुसार सविनय फेर सादर की,

**विभागाची मागणी –** सन २०१५/२०१६ करीता केमिकल/डिटर्जंन्ट खरेदी, खरेदी विभागामार्फत ई-निविदा पध्दतीने खरेदी करण्यात आलेली होती. आता साईबाबा भक्तनिवासस्थान विभाग व रुग्णालय विभागांसाठी (साईबाबा भक्तनिवासस्थान मागणी पत्र दि.०३/०७/२०१७ प्रमाणे व रुग्णालय मागणी पत्र दि.०४/०७/२०१७) सन २०१७/२०१८ या वर्षाकरीता पुढीलप्रमाणे विभागवार लॉण्ड्री केमिकल/डिटर्जंन्टची आवश्यकता भासणार आहे.

मागील वर्षाकरीता ई-निविदा मागवुन खरेदी करण्यात आलेल्या केमिकल/डिटर्जंन्टच्या खर्चाचा तपशिल.

| **साईबाबा भक्तनिवासस्थान लॉण्ड्रीकरीता** | | | | **श्री साईनाथ रुग्णालयाकडील लाण्ड्रीकरीता** | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **अ.नं** | **तपशिल** | **दर प्रति किलो/लिटर** | **एकुण रक्कम** | **अ.नं** | **तपशिल** | **दर प्रति किलो/लिटर** | **एकुण रक्कम** |
| १ | डिटर्जंन्ट पावडर – २००० किलो | ३७/- | ७४,०००/- | १ | डिटर्जंन्ट पावडर– २१६० किलो | ३७/- | ७९,९२०/- |
| २ | लिक्वीड – २००० लिटर | ६५/- | १,३०,०००/- | २ | लिक्वीड (तेलकट डाग काढणेकामी) ४०० लिटर | ४५/- | १८,०००/- |
| ३ | डिटर्जंन्ट पावडर (सिंथॅटीक कपडे धुण्यासाठी) १०० किलो | ३५/- | ३,५००/- | ३ | पावडर (कपडे न्युट्रलाईज करणेसाठी) १००० किलो | ५०/- | ५०,०००/- |
| ४ | पावडर (कपडे न्युट्रलाईज करणेसाठी) १००० किलो | ५०/- | ५०,०००/- | ४ | लिक्वीड (वुलन रग, ब्लॅकेट धुण्यासाठी) ४०० लिटर | १५७/- | ६२,८००/- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | लिक्वीड (वुलन रग, ब्लॅकेट धुण्यासाठी) ५० लिटर | १५७/- | ७,८५०/- | ५ | लिक्वीड (रक्ताचे डाग काढणेसाठी) ४०० लिटर | १४६/- | ५८,४००/- |
| **साईबाबा भक्तनिवासस्थान एकुण खर्च -** | | | **२,६५,३५०/-** | **श्री साईनाथ रुग्णालय लॉण्ड्री एकुण खर्च -** | | | **२,६९,१२०/-** |

सदरकामी मागील वर्षी एकुण ५,३४,४७० मात्र चे खर्चास मंजुरी प्राप्त होती सध्या उभय विभागाकडे खालीलप्रमाणे केमिकल/डिटर्जंटचा साठा शिल्लक आहे.

**विभागांकडील शिल्लक साठा-**

| **अ.नं** | **तपशिल** | **साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाकडील दि.०३/०७/२०१७ अखेरचा शिल्लक साठा. किलो/लिटर** | **रुग्णालयाकडील दि.०४/०७/२०१७ अखेरचा शिल्लक साठा. किलो/लिटर** |
|---|---|---|---|
| १ | बेडशिट, उशिकव्हर, चादर, गादीकव्हर,टॉवेल इ.रंगीत/पांढरे कपडे धुण्याची पावडर | ६२२ कि.ग्रॅम | ५६५ कि.ग्रॅम |
| २ | बेडशिट, उशिकव्हर, चादर, गादीकव्हर,टॉवेल इ.रंगीत/पांढरे कपडे धुण्याचे लिक्वीड | ६२२ लि.मिली | ----- |
| ३ | कपडे न्युट्रलाईज करणेची पावडर | ३४०.१०० कि.ग्रॅम | |
| ३ | वुलन रग/ब्लॅकेट धुण्याचे लिक्वीड | १८.१०० लि.मिली | १२० लि.मिली |
| ४ | सिंथेटीक कपडे धुण्याची पावडर | ९८.९०० कि.ग्रॅम | |
| ५ | रक्ताचे, अन्नाचे, तेलाचे, गंजलेले व इतर डाग असणारे कपडे, रंगीत डाग असणारे कपडे | ------ | १० लि.मिली. |

नमुद साठा पुढील दोन ते तीन महिने पुरेल इतका आहे त्यामुळे सन २०१७/२०१८ या वर्षासाठी आवश्यक केमिकल/ डिटर्जंट खरेदी करावे लागेल.

**विभागाची मागणी- साईबाबा भक्तनिवासस्थान तथा संस्थान रुग्णालये** या विभागासाठी खालीलप्रमाणे केमिकल/ डिटर्जंटची आवश्यकता सन-२०१७/२०१८ या वर्षासाठी आवश्यक आहे.

| **अ.नं.** | **धुण्यासाठीचे कपडे** | अंदाजे आवश्यक डिटर्जंन्ट पावडर (किलो/ग्रॅम) | अंदाजे आवश्यक लिक्वीड (लिटर/ मिली) | अंदाजे आवश्यक डिटर्जंन्ट पावडर (किलो/ग्रॅम) | अंदाजे आवश्यक लिक्वीड (लिटर/ मिली) | एकुण मागणी किलो / लिटर |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **साईबाबा भक्तनिवासस्थान** | | **संस्थान रुग्णालये** | | |
| १ | **सर्व प्रकारचे कपडे –** बेडशिट, उशिकव्हर, चादर, गादीकव्हर, टॉवेल.इ. रंगीत/पांढरे धुण्यासाठी | २००० किलो | ---- | २६०० किलो | ---- | ४६०० कि.ग्रॅ |
| २ | **सर्व प्रकारचे कपडे –** बेडशिट, उशिकव्हर, चादर, गादीकव्हर, टॉवेल.इ. रंगीत/ पांढरे धुण्यासाठी | ----- | २००० लिटर | ----- | ३०० लिटर | २३०० लिटर |
| ३ | रक्ताचे, अन्नाचे, तेलाचे, गंजलेले व इतर डाग असणारे कपडे, रंगीत डाग असणारे कपडे | --- | ---- | ----- | ११०० लि. | ११०० लिटर |
| ४ | वुलन रग, ब्लॅकेट | --- | --- | ---- | ७०० लि. | ७०० लिटर |
| ५ | कपडे न्युट्रलाईज्ड करणेसाठी | १००० किलो | --- | १३०० किलो | --- | २३०० कि.ग्रॅ |

सदर खरेदीकामी विचारात घेतले जाणारे अदमासे दर निश्चित करतांना प्रत्यक्ष मार्केट सर्वे व दर पत्रके यांचा विचार करण्यात आला. दि.१०.०९.२०१७ रोजी इकडील विभागाचे प्रतिनिधीने नाशिक येथे जाऊन आवश्यक केमिकल/ डिटर्जंट दराबाबत पहाणी / अभ्यास केलेला आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे अंदाजे किमंती निश्चित करुन प्रस्तावीत Estimated Cost काढली आहे, तपशीलवार विवरण खालीलप्रमाणे.

| अ.नं | धुण्यासाठीचे कपडे | अंदाजे आवश्यक डिटर्जंन्ट पावडर (किलो/ग्रॅम) | अंदाजे आवश्यक लिक्वीड (लिटर/ मिली) | मागील मंजुर दर रु. पै.से | दरपत्रक धारकांनी दिलेले दर | | | एकूण रुपये.पैसे | प्रस्तावित अदामासे सरासरी किमंत रु. पै. | एकुण होणारी रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | गजानन इंडस्ट्रीयल सप्लायर्स, नासिक | रोहीत एजन्सिज, नासिक | स्नेह एंन्टरप्रायजेस, नासिक | | | |
| १ | सर्व प्रकारचे कपडे – बेडशिट, उशिकव्हर, चादर, गादीकव्हर, टॉवेल.इ.रंगीत/पांढरे धुण्यासाठी | ४६०० किलो | ---- | ३७.०० | ११५/- प्रती किलो | ९९/- प्रती किलो | २९७/- प्रती किलो | ५११/- | १७०/- प्रती किलो | ७,८२,०००/- |
| २ | सर्व प्रकारचे कपडे – बेडशिट, उशिकव्हर, चादर, गादीकव्हर, टॉवेल. इ.रंगीत/पांढरे धुण्यासाठी | ----- | २३०० लिटर | ६५.०० | २१०/- प्रती लिटर | १९२/- प्रती लिटर | ---- | ४०२/- | २०१/- प्रती लिटर | ४,६२,३००/- |
| ३ | रक्ताचे,अन्नाचे,तेलाचे,गंज लेले व इतर डाग असणारे कपडे, रंगीत डाग असणारे कपडे | ----- | ११०० लिटर | १४६.०० | २२८/- प्रती लिटर | ३७०/- प्रती लिटर | ३०५/- प्रती लिटर | ९०३/- | ३०१/- प्रती लिटर | ३,३१,१००/- |
| ४ | वुलन, रग, ब्लॅकेट.इ. | ---- | ७०० लिटर | १५७.०० | १९८/- प्रती लिटर | २४६/- प्रती लिटर | ----- | ४४४/- | २२२/- प्रती लिटर | १,५५,४००/- |
| ५ | कपडे न्युट्रलाईज्ड करणेसाठी | २३०० किलो | ----- | ५०.०० | ७१/- प्रती किलो | १५५/- प्रती किलो | १९७/- प्रती किलो | ४२३/- | १४१/- प्रती किलो | ३,२४,३००/- |
| | एकुण रुपये - | | | | | | | | | २०,५५,१००/- |
| | **अक्षरी अपेक्षीत अंदाजे किमंत रुपये – वीस लाख पच्चावन हजार शंभर मात्र.** | | | | | | | | | |

यापुर्वी संस्थानने नेमलेल्या सल्लागाराचे अभिप्रायानुसार सदरहु खरेदी करतेवेळी खाली दिल्याप्रमाणे समाविष्ट घटकांचा विचार करावा लागेल.

**१) समाविष्ट घटक टक्केवारीसह व इतर आवश्यक प्रमाणपत्रे (श्री. सुरेश ब्राम्हणकर, तांत्रिक सल्लागार यांचे अहवालानुसार) –**

| अ.नं | धुण्यासाठीचे कपडे | रसायनाचा प्रकार | क्रियाशिल घटक व क्रियाशिल घटकांचे प्रमाण टक्के (%) | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | **सर्व प्रकारचे कपडे –** बेडशिट, उशिकव्हर, चादर, गादीकव्हर, टॉवेल.इ. रंगीत/पांढरे धुण्यासाठी | डिटर्जंन्ट पावडर | सोडीयम लॉरिल बेनझेन सलफेट १०-२० % | कमी झाग परीमाणकारक रंगास हानिकारक नसणारा सर्व प्रकारच्या कपडयांसाठी. |
| | | | सोडीयम मेटा सिलिकेटेड २० -३० % | |
| | | | सोडीयम होक्सा मेटा फॉस्फाइट १०-२० % | |
| | | | सोडीयम कारबोनेट १०-२० % | |
| | | | सोडीयम ट्रायपॉली फॉस्फेट ०५-१० % | |
| २ | **सर्व प्रकारचे कपडे –** बेडशिट, उशिकव्हर, चादर, | लिक्वीड द्रवरुप साबण | इथाक्सीलॅरल अल्कोहोल ०५ – १० % | सर्व प्रकारचे कपडयांसाठी |
| | | | पॉलीइथीलीन ग्रालयकाल ०१-०५ % | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | गादीकव्हर, टॉवेल.इ. रंगीत/ पांढरे धुण्यासाठी | | फॅटीॲसीड/पोटॅशियम साल्ट १५-१८% | स्वयंमचलीत मात्रा, कमी झाग, अत्यंत परिणामकारक सुरक्षित. |
| | | | टे ट्राकाल ०५-०७ % | |
| | | | इडीटीए ०० -०५ % | |
| | | | सोडीयम मेटा सीलीकेट ०५-१०% | |
| | | | आर.ओ.पाणी १०-५५% | |
| ३ | रक्ताचे, अन्नाचे तेलाचे, गंजलेले व इतर डाग असणारे कपडे रंगीत डाग असणारे कपडे | लिक्वीड द्रवरुप साबण | पोटॅशियम इन्झाईम ०१-०२ % | रक्ताचे डाग, मातीचे, जेवणाचे, तेलाचे, गंजलेले व इतर डाग रंगीत डागांना सुरक्षितपणे धुण्यासाठी. |
| | | | लायपेज ०५-१० % | |
| | | | १-४ डी ग्लुकॅन ग्लुकॅनो हायड्रोलेज ०५-१० % | |
| | | | टे ट्राकाल १०-२० % | |
| | | | सोडीयम लॉरिज बेन्झाइम सल्फेट २०-३० % | |
| | | | सोडीयम सल्फेट ३०-४४ % | |
| ४ | वुलन, रग, ब्लॅकेट.इ. | लिक्वीड द्रवरुप साबण | एन्झाइम्स, ब्लिच व चमकवणारा घटकनसलेला व पी एच न्युटरन नसलेला इथॅनन व युथ्यालस्टर १०% च्या कमी स्पेसिफिक गॅव्हिडी १.००३ +/- ०.०१ व पुर्नपणे पाण्यात विरघळणारा | ---- |
| ५ | कपडे न्युट्रलाईज करणेसाठी | पावडर | मुख्य किमान घटक फॉर्मीक ॲसिड १२ %, सिट्रीक ॲसिड १ ते ५ % किमान प्रमाण असलेले व इतर घटक पर्यावरणास हानीकारक नसणारे पाण्यात पुर्णपणे विरघळणारा. | |

वरीलप्रमाणे किमान घटक असणारे व पर्यावरणास हानिकार नसणारे तसेच पाण्यात पुर्णपणे विरघळणारे असणे अत्यावश्यक आहे. असे त्यांनी त्यांचे अहवालामध्ये नमुद केले आहे.

**२) BIS (Bureau of Indian Standards) या संस्थेद्वारे वेळोवेळी संशोधित मानंकाप्रमाणे (IS 4955:2001) असलेबाबतचा दाखला सलग्न असणे गरजेचे आहे.**

**३) लॉण्ड्री उत्पादने ECOMARK असावीत तसेच याबाबत सक्षम दाखला असावा.**

**छाननी करुन अनुमान-** उपरोक्तप्रमाणे लॉण्ड्री केमिकल/डिटर्जंन्ट खरेदी नमुद अधिनियमातील तरतुदीस अनुसरुन तथा संमत व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार व साईभक्तांचे, रुग्णांचे सोयी सुविधेसाठी करता येईल. सदर खरेदीकामी अंदाजे रु.२०,५५,१००/- (अक्षरी रुपये वीस लाख पंच्चावन हजार शंभर मात्र) खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चाची तरतुद संबंधित विभागांचे सन २०१७/२०१८ चे अंदाजपत्रकामध्ये करण्यात आलेली आहे.

**विभागाचा अभिप्राय-** उपरोक्तप्रमाणे विभागनिहाय केमिकल/डिटर्जंन्ट हिन्दुस्तान युनिलिव्हर, ब्रीलियंट बायोब्लेंन्ड एक्सट्रा, व्हॅनीश, उजाला, प्युरेक्स, बायो सुड, विप्रो इंडीया लि., गोदरेज कझ्युमर प्रॉडक्ट लि. या ब्रॅन्डेड कंपनीचे किंवा तत्सम कंपनीचे खरेदी केल्यास आपणास धुलाईबाबत आवश्यक तसे परीणाम समोर येतील तसेच संबंधित कंपनीचे मार्गदर्शनही लाभेल असे नम्र मत आहे.

करीता-

१) साईबाबा भक्तनिवासस्थान तथा संस्थान रुग्णालये या विभागांसाठी आवश्यक केमिकल/डिटर्जंन्ट खरेदीकामी येणा-या अंदाजे खर्चास

२) जनसंपर्क विभागामार्फत वर्तमान पत्रात शासकीय दराने जाहिरात प्रसिध्द करणेस

३) व्यापक तथा सर्वदूर प्रसिध्दीसाठी सदरकामी विहीत केली जाणारी जाहिरात संस्थानचे वेब साईटवर माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत Upload करणेस

४) खरेदी, खरेदी विभागामार्फत ई-निविदा पध्दतीने करण्यास

मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८४१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१७-१८ या वर्षासाठी साईबाबा भक्तनिवासस्थान व संस्थान रुग्णालये लॉण्ड्रीसाठी आवश्यक केमिकल/ डिटर्जंन्ट संयुक्त खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे २०,५५,१००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईबाबा भक्तनिवास)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१२** **श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षासाठी संस्थानला विनामोबदला जमीन वापरास देणेबाबत डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व विजयकुमार मोहन बार्ली यांचा दि२०/०९/२०१७ रोजीचा संयुक्तअर्ज.**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतूद-** संस्थान अधिनियम २००४ मधील कलम १७(२)(ट) मधील तरतुदीनुसार विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबविण्याच्या प्रयोजनासाठी तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादीत करील किंवा खरेदी करील.

**प्रस्ताव-** श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षासाठी संस्थानला विनामोबदला जमीन वापरास देणेबाबत डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व जयकुमार मोहन बार्ली,रा.शिर्डी यांचा प्रस्ताव स्विकृत करणेबाबत..

**प्रस्तावना –** श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षानिमित्त दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ या कालावधीत शिर्डी येथे होणा-या साईभक्तांच्या संभाव्य गर्दीचे व्यवस्थापन करण्याच्या दृष्टिने तसेच साईभक्तांच्या सुविधेच्या दृष्टिने वाहनतळ सुविधा विनाविलंब उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टिकोनातून संस्थानला मोठया प्रमाणात जमीनींची आवश्यकता भासणार आहे.

शिर्डी येथील खालील नमूद केलेल्या रहिवासी यांनी त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या जमीनी/जागा संस्थानला श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षासाठी विनामोबदला संस्थानला वापरास देणेकामीचा इकडेस प्रस्ताव सादर केलेला आहे.

| अ.नं | जमीन मालकाचे नाव | जमीनीचे लोकेशन | समाधी मंदिरापासून जमीनीचे अंतर | सर्वे नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व शोभा एकनाथ गोंदकर (समाईक) | साईआश्रम-१ चे जवळ | सुमारे १.५ किमी. | १८७/२/२ | ०.३० आर |
| २ | श्री.विजयकुमार मोहन बार्ली व बी.आर.मोहन राव (समाईक) | साईआश्रम-१ चे जवळ | सुमारे १.५ किमी. | १८७/२/३ | ०.३० आर |

विषयांकित अर्जाचे अवलोकन केले असता

१) डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व विजयकुमार मोहन बार्ली करीता म्हणून डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर यांनी स्वाक्षरी केलेली आहे.

२) अर्जासोबत सादर केलेल्या ७/१२ उता-याचे अवलोकन केले असता त्यात सर्वे नं.१८७/२/२ क्षेत्र ०.३० आर एकनाथ भागचंद गोंदकर व शोभा भागचंद गोंदकर यांचे समाईक हिश्श्यास दर्शविलेले आहे.

३) तसेच सर्वे नं.१८७/२/३ चे ७/१२ उता-याचे अवलोकन केले असता क्षेत्र ०.३० आर इतके विजयकुमार मोहन बार्ली व बी.आर.मोहन राव यांचे समाईक क्षेत्र दर्शविलेले आहे.

**विभागाचा अभिप्राय-** उपरोक्त मिळकती संदर्भात स्थानिक चौकशी केली असता न्यायालयात वाद चालू असल्याचे दिसून येत नाही. तथापि उक्त जमीनीचे संबंधीत कब्जेदार व सहकब्जेदार यांचे स्वाक्षरीने अर्ज सादर केलेला नाही.फक्त एक कब्जेदाराने अर्जावर स्वाक्षरी केलेली आहे. तेंव्हा सर्व कब्जेदार व सहकब्जेदार यांचे स्वाक्षरीचा अर्ज प्राप्त करुन घ्यावा लागेल व करारनामा देखील सर्व कब्जेदार व सहकब्जेदार यांचेबरोबर करावा लागेल. तत्राप उक्त क्षेत्र वापरासाठी स्विकृत करावयाचे झाल्यास सदरप्रमाणे पुर्तता करुन घेता येईल.

१) तेंव्हा सदरच्या मिळकती संस्थानला समाधी शताब्दी वर्षासाठी विनामोबदला स्विकारणे.

२) सदर मिळकती संबंधात साईबाबा समाधी शताब्दी या कालावधीसाठी करारनामा करणे.

३) उपरोक्त प्रयोजनार्थ वापर करणेसाठी सदर मिळकतीचा आवश्यक तो विकास व तद्नुषंगिक कामे संस्थानचे बांधकाम विभागामार्फत करणे.

४) सदर मिळकत धारकांचा अभिनंदनपर ठराव व तशा आशयाचे पत्र संबंधीतांना देणे.

सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८४२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षामध्ये साईभक्तांना विविध सुविधा पुरविणेसाठी डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व विजयकुमार मोहन बार्ली यांची प्रस्तावित जमीन विनामोबदला वापरासाठी घेण्यास व त्यासाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१३** **श्री साई प्रसादालयात चालू असलेल्या संपूर्ण दिवस मोफत भोजन योजनेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद :-** सन-२००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.१४(भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापीत केले अध्यादेश व केलेले विनीयम मधील २१(१घ) नूसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे.

**प्रस्ताविक :-** संदर्भिय अ.नं.१ नुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी मार्फत साजरे करण्यात येणारे साईबाबा समाधी वर्ष (०१ आक्टोबर २०१७ ते १८ ऑक्टोबर २०१८) देणगीदार साईभक्तांचे देणगीतून मोफत अन्नदान वर्ष म्हणून घोषित करणेतस मान्यता मिळालेली होती.

श्री साई प्रसादालयात संपुर्ण दिवस मोफत भोजन योजना सुरु करणेबाबत संदर्भिय अ.नं.२ नुसार , मा.त्रीसदस्य समिती दि.१४/०६/२०१६ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.३४३ अन्वये, "श्रींचे समाधी शताब्दी महोत्सव कालावधीमध्ये दि.०१/१०/२०१७ ते दि.१८/१०/२०१८ पर्यंत देणगीदार साईभक्तांचे देणगीतून मोफत अन्नदान वर्ष घोषित करणेस मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच अन्नदान फंडामधील शिल्लक निधी व दिवसेंदिवस मोफत भोजन योजनेमध्ये साईभक्तांची वाढती देणगी या बाबीचा विचार करता नवीन वर्षाची साईभक्तांना भेट देणेसाठी दि.०१ जानेवारी २०१७ पासून प्रायोगिक तत्वावर संपुर्ण दिवस मोफत प्रसादभोजन चालू करणेत यावे. सदरहू योजना प्रथमतः दि.३०/०९/२०१७ पर्यंत सुरु ठेवणेत यावी व या योजनेस भक्तांचा उत्फुर्त प्रतिसाद मिळाल्यास समाधी शताब्दी वर्षानंतरही मोफत प्रसाद भोजन योजना सुरु ठेवण्यात यावी, परंतू या योजनेचा लाभ जनरल भोजन हॉलमध्ये प्रसादभोजन घेणा-या भक्तांनाच राहील. व्ही.आय.पी. व व्ही.आय.पी. प्रसादभोजनासाठी पुर्वीप्रमाणेच शुल्क आकारणेत यावे." असे ठरलेले आहे.

त्यानूसार मा.व्यवस्थापन समिती दि.३०/११/२०१६ चे सभेतील निर्णय क्र.८२० नुसार, ०१ जानेवारी २०१७ पासून श्री साई प्रसादालयात संपुर्ण दिवस मोफत प्रसादभोजन सुरु करणेत आलेले असून ते आज पावेतो चालू आहे.

परंतु सदरहू योजना प्रायोगिक तत्वावर दि.३०/०९/२०१७ पर्यंत सुरु ठेवेणेत यावी व या योजनेस भक्तांचा उस्फुर्त प्रतिसाद मिळाल्यास समाधी शताब्दी वर्षानंतरही मोफत प्रसाद भोजन योजना चालू ठेवण्यात यावी, असे नमूद केलेले असल्यामुळे सन-२०१६ मधील माहे जानेवारी-२०१६ ते ऑगस्ट-२०१६ तसेच सन-२०१७ मधील माहे जानेवारी-२०१७ ते ऑगस्ट -२०१७ अखेर "मोफत प्रसादभोजन योजना" अंतर्गत जमा झालेली देणगी रक्कम व प्रसादभोजनघेणा-या भक्तांची संख्या याबाबतची तुलनात्मक माहीती खालीलप्रमाणे अवलोकनार्थ सादर करीत आहोत.

**अ) <u>सन-२०१६ मध्ये मोफत प्रसादभोजन योजनेअंतर्गत जमा देणगी रक्कम व प्रसादभोजन घेणा-या भक्तांची संख्या-</u>**

| **महिना** | **प्रसादभोजन संख्या** | **मोफत प्रसादभोजन योजने जमा देणगी रक्कम** |
|---|---|---|
| जानेवारी-२०१६ | १२, ७४, ९७५ | ७३,३७,२९८/- |
| फेब्रुवारी-२०१६ | ८,७३,६९७ | ३९,८५,८८९/- |
| मार्च-२०१६ | ९,८६,८७४ | ७३,१४,८३७/- |
| एप्रिल-२०१६ | ९,८६,३०७ | १,१८, ५०, ७६५/- |
| मे-२०१६ | १३,२०,५४३ | ९०,६२,७६६/- |
| जुन-२०१६ | १०,६९,५२३ | ६३,५२,९२१/- |

| | | |
|---|---|---|
| जुलै-२०१६ | १०,२०,१३४ | १,१२,७२,५७३/- |
| ऑगष्ट-२०१६ | १०,३७,८४० | ५५,६२,२९०/- |
| **एकुण =** | **८५,६९,८९३** | **६,२७,३९,३३९/-** |

**ब)** **<u>सन-२०१७ मध्ये मोफत प्रसादभोजन योजनेअंतर्गत जमा देणगी रक्कम व प्रसादभोजन घेणा-या भक्तांची संख्या-</u>**

| **महिना** | **प्रसादभोजन संख्या** | **मोफत प्रसादभोजन योजनेत देणगी रक्कम** |
|---|---|---|
| जानेवारी-२०१७ | १४,५०,३७८ | ४४,७३,६४०/- |
| फेब्रुवारी-२०१७ | ९,९८,९२४ | २८,९५,२७८/- |
| मार्च-२०१७ | ११,०१,९७३ | ४०,०८,९१८/- |
| एप्रिल-२०१७ | ११,२७,१४२ | ५४,७२,७६५/- |
| मे-२०१७ | १२,५४,९४३ | ३८,२२,९९८/- |
| जुन-२०१७ | १३,५४,६७१ | ४४,३८,११२/- |
| जुलै-२०१७ | १३,८३,१२७ | ६९,३७,७४८/- |
| ऑगष्ट-२०१७ | १२,५८,९५२ | ४१,८४,२१९/- |
| **एकुण =** | **९९,३०,११०** | **३,६२,३३,६७८/-** |

वरील अ) व ब) चे अवलोकन करता, सन-२०१७ मध्ये मोफत प्रसादभोजन योजनेअंतर्गत जमा होणा-या देणगी रकमेमध्ये जवळपास मोठयाप्रमाणात घट झालेली असून प्रसादभोजन घेणा-या भक्तांची संख्या मात्र वाढलेली आहे. म्हणजेच मोफत प्रसादभोजन योजनेअंतर्गत जमा होणारी देणगी मागील वर्षाचे तुलनेत कमी झालेली आहे. म्हणजेच, दि.०१ जानेवारी २०१७ पासून प्रायोगिक तत्वावर सुरु करणेत आलेल्या संपुर्ण दिवस मोफत प्रसादभोजन योजनेमध्ये ऑगस्ट-२०१७ पर्यंत अवलोकन करता देणगीदार भक्तांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत नाही. असे दिसून येत आहे.

**मागणी:-** मा.व्यवस्थापन समिती दि.३०/११/२०१६ चे सभेतील निर्णय क्र.८२० नुसार, संस्थानमार्फत प्रायोगिक तत्वावर ०१ जानेवारी २०१७ पासून ते दि.३०/०९/२०१७ पर्यंत श्री साई प्रसादालयात संपुर्ण दिवस सुरु असलेले मोफत भोजन दि.०१/१०/२०१७ पासून पुढे सुरु ठेवावे किंवा कसे ? याबाबत निर्णय होणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**संस्थान अधिनियम/ठराव यानुसार अनुमान:- आर्थिक व धोरणात्मक**

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:-** उपरोक्त प्रास्तविक नूसार अ) व ब) चे अवलोकन करता, माहे जानेवारी २०१७ पासून ते आजतागायत मोफत प्रसादभोजन योजनेअंतर्गत जमा होणारी देणगी मागील वर्षाचे तुलनेत मोठया प्रमाणात कमी झालेली असून जेवण घेणा-या भक्तांची संख्या मात्र मागील वर्षाचे तुलनेत मोठया प्रमाणात वाढलेली आहे. म्हणजेच, दि.०१ जानेवारी २०१७ पासून प्रायोगिक तत्वावर सुरु करणेत आलेल्या संपुर्ण दिवस मोफत प्रसादभोजन योजनेमध्ये देणगीदार भक्तांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत नाही. असे दिसून येत असल्याने, मा.व्यवस्थापन समिती दि.३०/११/२०१६ चे सभेतील निर्णय क्र.८२० नुसार, संस्थानमार्फत प्रायोगिक तत्वावर दि.०१ जानेवारी २०१७ पासून ते दि.३०/०९/२०१७ पर्यंत श्री साई प्रसादालयात संपुर्ण दिवस सुरु असलेले मोफत भोजन दि.०१/१०/२०१७ पासून पुढे चालू ठेवावे किंवा कसे? याबाबत निर्णय होणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८४३** **उपरोक्त विषय नं.३४ वरील चर्चेच्या वेळी निर्णय क्र.८३४ अन्वये समाधी शताब्दी वर्षामध्ये श्री साई प्रसादालयात संपुर्ण दिवस सुरु असलेले मोफत भोजन दि०१/१०/२०१७ पासून पुढे चालू ठेवणेस मान्यता देण्यात आलेली आहे.** (कार्यवाही- प्रसादालय विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१४** **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे उद्धाटनाचा कार्यक्रम साईनगर मैदानात आयोजित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा शताब्दी महोत्सवी वर्षाचे उद्धाटन दिनांक १ आक्टोबर २०१७ रोजी माननिय राष्ट्रपती महोदय, भारत गणराज्य यांचे शुभहस्ते करण्याचे संस्थानचा मानस आहे. उद्धाटन सोहळा साई कॉम्प्लेक्स समोरील १६ गुंठे परिसरात आयोजित करण्यात आलेला होता व या दौ-याबाबत मा. राष्ट्रपती महोदय यांचा शिर्डीचा संभाव्य दौरा

मिनिट टु मिनिट प्रोगाम संस्थानकडून शासनाकडे पाठविणेत आलेला होता. या दौ-याबाबत पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक जिविशा/ महामहीम राष्ट्रपती दौरा/६२१४/२०१७, दिनांक २१/०९/२०१७ अन्वये शासनास संभाव्य दौ-या दरम्यान होणार कार्यक्रम स्थळाबाबत अभिप्राय दिलेले असून, त्यात त्यांनी कार्यक्रमाचे ठिकाण हे सुरक्षेच्या दृष्टीने योग्य नसल्याने दुस-या ठिकाणी कार्यक्रम घेणे योग्य राहील असे अभिप्राय दिलेले आहेत.

उपरोक्त अभिप्रायानुसार मा. उपसचिव, सामन्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांनी त्यांचेकडील पत्र कमांक टिआरएस-२०१७/प्र.क्र.१६२/३०/ दिनांक २१/०९/२०१७ अन्वये मा. राष्ट्रपती यांच्या अहमदनगर (शिर्डी) येथील प्रस्तावित दौ-याच्या अनुषंगाने नियोजित कार्यक्रम स्थळाबाबतची निश्चिती तात्काळ करुन शासनास अहवाल सादर करणेबाबत कळविण्यात आले आहे. त्याचप्रमाणे कार्यक्रम स्थळाची निश्चिती तातडीने करुन जिल्हाधिकारी कार्यालयास पाठविणेबाबत मा. जिल्हाधिकारी यांची सूचित केले आहे. तसेच कार्यक्रम स्थळ निश्चित करुन पुन:श्च मिनिट टु मिनिट कार्यक्रम अहवाल तात्काळ पाठविणेस जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी यांचे कार्यालय यांनी पत्र क्र. स्वाकक्ष/कावि/७७९/२०१७ दि. २३/०९/२०१७ नुसार कळविले आहे.

वरील शासनाचे पत्रानुसार मा. राष्ट्रपती यांचे कार्यक्रमाचे ठिकाण साई कॉम्प्लेक्स समोरील १६ गुंठे परिसरात न घेता साईनगर मैदानावर घेता येईल. सदरचे बदलास व त्याअनुषंगाने होणा-या खर्चास व कार्यवाहीस मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागेल.

तरी मा.राष्ट्रपती यांचे दिनांक १ आक्टोबर २०१७ रोजी होणा-या कार्यक्रमाचे ठिकाण शासनाने कळविलेनुसार सुरक्षितेच्यादृष्टीने साई कॉम्प्लेक्स समोरील १६ गुंठे परिसरात न घेता साईनगर मैदान येथे घेणेस व त्याअनुषंगाने करावयाचे कार्यवाहीस व सर्वसमावेशक (ग्राऊंड लेव्हलिंग, मंडप, साऊंड सिस्टीम, सुरक्षा, बॅरीकेटीग व इतर) खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८४४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.जिल्हाधिकारी तथा दंडाधिकारी, अहमदनगर व मा.पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांनी दि.२३.०९.२०१७ चे पत्राने सुचित केलेनुसार सन्मा. राष्ट्रपती यांचा दिनांक १ आक्टोबर २०१७ रोजी होणारा कार्यक्रमाचे ठिकाण सुरक्षितेच्या दृष्टीने साई कॉम्प्लेक्स समोरील १६ गुंठे परिसरात न घेता साईनगर मैदान येथे आयोजित करणेस व त्याअनुषंगमे कार्यवाही करणेस तसेच खाली नमुद केलेल्या अंदाजे खर्चास मान्यता देण्यात आली.**

| अ.नं. | खर्चाची बाब | तपशील | अंदाजे खर्च |
|---|---|---|---|
| **अ) स्टेज खर्च-** | | | |
| १ | साईनगर मैदान सुधारणा | लांबी २९० स्के.फुट<br>रुंदी २९० स्के.फुट<br>(एकूण-८७,००० स्के. फुट)<br>मुरुम टाकणे, रोलर, व्हायब्रेटर रोलींगने सपाटीकरण व दबाई. | ५,००,०००/- |
| २ | सुपर स्ट्रक्चर मंडप | १०० X ३०० स्के.फुट | १२००,०००/- |
| ३ | कार्पेट | ३०,००० स्के.फुट | १,५०,०००/- |
| ४ | स्टेज | २०X८० स्के.फुट<br>(एकूण-१६०० स्के.फुट) | २,००,०००/- |
| ५ | स्टेजवरील मान्यवरांसाठी डनलपचा लेदर सोफा | २० नग | १,००,०००/- |
| ६ | मुख्य मंडपामध्ये मा.राष्ट्रपती, मा.राज्यपाल, मा.मुख्यमंत्री या सन्माननीय अतिथींसाठी डनलप सोफा. | ३० नग | १,००,०००/- |
| ७ | स्टीलचे सोफासेट | १०० नग | ६०,०००/- |
| ८ | लाईट व जनरेटर व्यवस्था | १०० नग | २०,०००/- |
| ९ | फायबर चेअर | ३००० नग | ३०,०००/- |
| १० | स्टेजपुढील बी बॅरीगेट | | ३०,०००/- |
| ११ | ट्रान्सपोर्ट खर्च, बॅक ड्राप पडदे, फॅन, कुलर | | ७५,०००/- |
| १२ | प्लायवुडचे फिक्स स्टेअरकेस | | १,००,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| १३ | १० फुट उंचीचे १२०० फुट पार्टीशन | | १,५०,०००/- |
| १४ | महिला चेकींग कॅबीन | ४ नग | १,२०,०००/- |
| १५ | वायरलेस कंन्ट्रोल बुथ | | २०,०००/- |
| १६ | मुख्य मंडपाबाहेर डाव्या उजव्या दोन्ही बाजुने अतिरीक्त २ पाईप मंडप | | १,१०,०००/- |
| १७ | LED Wall साठी रायझर | ४ नग | ३५,०००/- |
| १८ | इलेक्ट्रॉनिक मिडीयासाठी डबल रायझर | | १५,०००/- |
| १९ | मुख्य मंडपामध्ये ४ फुट उंचीचे २००० फुट बॅरेकेडींग | | १०,०००/- |
| | | एकुण | ३०,२५,०००/- |
| **ब) स्टेज डेकोरेशनसाठीचा खर्च-** | | | |
| १ | प्लॅटफॉर्म ६०X८०X१४ GI Metal fremwork with marin padal Inculding Transport & labour | | ३,५०,०००/- |
| २ | Decoration & Exculzation of Stage, providing decoretive FRP Arches, Backdrop, ODM, Dadolows, pentizy, freming, labour & Transport | | १०,००,०००/- |
| | | एकुण | १३,५०,०००/- |
| **क) फोटोग्राफी-** | | | |
| १ | Photography | | ५०,०००/- |
| २ | Videography & Video wall live stand streaming | | २,२५,०००/- |
| | | अंदाजे एकुण खर्च रु. | ४६,५०,०००/- |

**तसेच उपरोक्त कामकाज हे दि.२९.१०.२०१७ पर्यंत पुर्ण करुन, सुरक्षीततेच्या दृष्टीने योग्य त्या तपासण्या व रंगीत तालीमसाठी पोलीस विभागास उपलब्ध करुन द्यावयाचे असल्यामुळे सदरहु कामकाज प्रचलित पध्दतीने कोटेशन/ ई-निविदा प्रक्रिया राबवून करणे शक्य होणार नसल्याने, तातडीची बाब म्हणून उपरोक्त तक्त्यामधील अ मधील कामे मा.जिल्हाधिकारी यांनी सुचविलेले अहमदनगर येथील मेहत्रे मंडप ॲन्ड डेकोरेटर्स यांचेकडून व ब मधील कामे ND's Art World Pvt. Ltd., Mumbai यांचेकडून करुन घेणेस तसेच अ, ब व क मधील कामे करुन घेण्यासाठी येणाऱ्या अंदाजे रु.४६,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१५** **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाची जाहिरात वर्तमानपत्रात थेट प्रसिध्दीस देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद-** महाराष्ट्र शासनाने पुनर्घटीत केलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे अधिनियमात "समितीची कर्तव्य व अधिकारी" या शिर्षकाखाली अधिनियिम नंबर १७ (१) मध्ये "राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील." अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक–** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १५.०९.२०१२ चे सभेतील निर्णय क्रमांक ७८६.

**प्रस्ताविक– १)** उपरोक्त संदर्भ क्रमांक १ चे पत्राने बांधकाम-शताब्दी कक्षाने कळविलेनुसार श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाची जाहिरात वर्तमानपत्रात थेट प्रसिध्द करणेबाबत कळविलेले आहे. तथापि,

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) च्या जाहिराती मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १५.०९.२०१२ चे सभेतील निर्णयान्वये शासकीय दराने प्रसिध्दीसाठी दिल्या जातात. तथापि, मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ३१.०८.२०१६ चे सभेतील निर्णय क्रमांक ६१९ अन्वये मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना दिनांक ३०.०९.२०१६ रोजी संस्थानच्या जाहिराती व्यावसायिक दराने देणेबाबत मार्गदर्शन/ मिळणेबाबत पत्र दिले होते. त्यानुसार संदर्भ क्रमांक ३ अन्वये विधी व न्याय विभागाने क्र.सासंवि-२०१६/१४२७/ प्र.क्र.१७६/ का.१६ दिनांक २१.०४.२०१७ चे पत्र प्राप्त झाले असून सदर पत्रात खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेले आहेत.

"दि.२९.११.२०१६ रोजी मंत्रीपरिषदेने घेतलेल्या निर्णयानुसार दि.३०.०३.२०१६ च्या शासन निर्णयात सुधारणा करण्यात आली असून सर्व शासकीय विभागांनी आणि त्यांच्या नियंत्रणाखालील मंडळे/ महामंडळे/ प्राधिकरण/उपक्रम यांनी त्यांच्या दर्शनी जाहिराती (Display Advertisement) तयार करण्याचे, वितरणाचे व सर्वकष जाहीरात मोहिमा आखणी व अंमलबजावणीचे काम माहिती व जनसंपर्क महासंचालनालया मार्फत करावे. कोणत्याही परीस्थितीत ही कार्यवाही स्वतंत्रपणे करण्यात येवू नये अशा स्पष्ट सूचना दि.०५.०१.२०१७ च्या शासन निर्णयात देण्यात आल्या आहेत.

श्री साईबाबा संस्थान शिर्डीच्या जाहिराती पूर्वी वर्तमानपत्रांच्या स्थानिक प्रतिनिधींमार्फत व्यावसायीक दराने प्रसिध्दीसाठी देण्यात येत होत्या. व्यवस्थापन समितीच्या सन २०१२ च्या निर्णयानुसार संस्थानच्या जाहिराती शासकीय दराने प्रसिध्दीसाठी देण्यात येत आहेत. संस्थानच्या जाहिराती पुर्वी व्यावसायीक दराने टाईम्स ग्रुप, दै.लोकमत व दै.सकाळ या वृत्तपत्रांना वितरीत केल्यामुळे आता सदर वृत्तपत्रे संस्थानच्या जाहिराती शासनमान्य दराने स्विकारत नाहीत. शासनमान्य यादीवरील उर्वरीत जी वृत्तपत्रे संस्थानच्या जाहिराती शासनमान्य दराने स्विकारण्यास तयार आहेत त्या वृत्तपत्रांना संस्थानच्या जाहिराती वितरीत करण्यात येतील. महासंचालनालयाच्या शासनमान्य यादीत राज्याबाहेरील वृत्तपत्र समाविष्ट नाहीत. संस्थानच्या देश पातळीवरील विविध जाहिराती डीएव्हीपी दराने स्वीकारणा-या वृत्तपत्रांना करता येतील. शासन मान्य यादीवरील जी वृत्तपत्रे शासकीय दराने जाहिरात स्वीकारत नाहीत ही बाब नवीन शासकीय जाहीरात धोरणात विचारार्थ ठेवण्यात येईल. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या जाहिरात शाखेने दिलेल्या पूर्वपृष्ठावरील अभिप्रायांस अनुसरुन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या जाहिराती देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी."असे कळविले होते.

त्यानुसार विधी व न्याय विभागाचे वर नमुद केलेले दिनांक २१.०४.२०१७ रोजीचे पत्र मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २३.०५.२०१७ रोजीचे सभेत सादर करण्यात आले होते. सदर पत्रावर मा.व्यवस्थापन समितीचे सभेत, "संस्थानमध्ये राबविण्यात येणा-या मोठया प्रकल्पांच्या जाहिराती व्यावसायिक दराने दिल्यास, ठेकेदार / पुरवठाधारकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळेल, असे समितीचे मत आहे. याकरीता संस्थानच्या मोठया प्रकल्पांच्या जाहिराती व्यावसायिक दराने प्रसिध्द करणेबाबत मा.आयुक्त, माहिती व जनसंपर्क संचनालय यांचेकडून मार्गदर्शन घेण्यात यावे." असा निर्णय घेण्यात आलेला असून सदर निर्णयाचे अनुषंगाने मा.आयुक्त, माहिती व जनसंपर्क संचनालय यांना जा.नं.एसएसएस/पीआरओ/१९५६/२०१७ दिनांक ११.०७.२०१७ रोजी मार्गदर्शन व भेटीसाठी वेळ मिळणेबाबत कळविलेले आहे. मात्र अद्यापपर्यंत त्यांचेकडून उत्तर अप्राप्त आहे.

**२)** बांधकाम-शताब्दी कक्षाने कळविल्यानुसार श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाची जाहिरात **(आतिल ०१ पान)** या आकारमानात वर्तमानपत्रात स्थानिक प्रतिनिधींमार्फत प्रसिध्द करणेसाठी खालीलप्रमाणे अंदाजे खर्च अपेक्षित आहे.

**अ) <u>अहमदनगर आवृत्तीचे दर</u>**

| **अ.नं.** | **वर्तमानपत्राचे नांव** | **आवृत्ती** | **अंदाजे अपेक्षित खर्च एक पान** | **अंदाजे अपेक्षित खर्च आर्धे पान** | **अंदाजे अपेक्षित खर्च पाव पान** |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | सार्वमत | अहमदनगर | ८५,०००/- | ४३,०००/- | २२,०००/- |
| ०२ | लोकमत | अहमदनगर | ४,७८,०००/- | २,४०,०००/- | १,२५,०००/- |
| ०३ | सकाळ | अहमदनगर | ४,०५,०००/- | २,१०,०००/- | १,०५,०००/- |
| ०४ | पुढारी | अहमदनगर | २,०५,०००/- | २,१०,०००/- | १,०५,०००/- |
| ०५ | पुण्यनगरी | अहमदनगर | १,६५,०००/- | ८३,०००/- | ४२,०००/- |
| ०६ | लोकसत्ता | अहमदनगर | २,९७,०००/- | १,४९,०००/- | ७५,०००/- |
| ०७ | महाराष्ट्र टाईम्स | अहमदनगर | २,१५,०००/- | १,१०,०००/- | ५५,०००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०८ | दिव्य मराठी | अहमदनगर | ३,१७,०००/- | १,५९,०००/- | ८०,०००/- |
| ०९ | केसरी | अहमदनगर | १,६०,०००/- | ८०,०००/- | ४०,०००/- |
| १० | प्रभात | अहमदनगर | २,१५,०००/- | १,१०,०००/- | ६०,०००/- |
| ११ | जयबाबा | अहमदनगर | ७५,०००/- | ३८,०००/- | २०,०००/- |
| १२ | नवामराठा | अहमदनगर | ८५,०००/- | ४३,०००/- | २२,०००/- |
| १३ | समाचार | अहमदनगर | ८५,०००/- | ४३,०००/- | २२,०००/- |
| १४ | नगर टाइम्स | अहमदनगर | ८५,०००/- | ४३,०००/- | २२,०००/- |
| | | **एकूण रक्कम रुपये** | **२८,७२,०००/-** | **१५,६१,०००/-** | **७,९५,०००/-** |

**ब) <u>महाराष्ट्र</u>**

| **अ.नं.** | **वर्तमानपत्राचे नांव** | **आवृत्ती** | **अंदाजे अपेक्षित खर्च** |
|---|---|---|---|
| ०१ | सार्वमत+देशदुत | महाराष्ट्र सर्व आवृत्ती | ६,८५,०००/- |
| ०२ | लोकमत | महाराष्ट्र सर्व आवृत्ती | ९०,५०,०००/- |
| ०३ | सकाळ | महाराष्ट्र सर्व आवृत्ती | ८५,८०,०००/- |
| ०४ | पुढारी | महाराष्ट्र सर्व आवृत्ती | ८५,८०,०००/- |
| ०५ | पुण्यनगरी | महाराष्ट्र सर्व आवृत्ती | ३३,००,०००/- |
| ०६ | लोकसत्ता | महाराष्ट्र सर्व आवृत्ती | ५६,०८,०००/- |
| ०७ | महाराष्ट्र टाईम्स | महाराष्ट्र सर्व आवृत्ती | ३७,९५,०००/- |
| ०८ | दिव्य मराठी | महाराष्ट्र सर्व आवृत्ती | ४२,०४,०००/- |
| ०९ | केसरी | महाराष्ट्र सर्व आवृत्ती | ७,००,०००/- |
| १० | प्रभात | महाराष्ट्र सर्व आवृत्ती | ९,९०,०००/- |
| ११ | सामना | महाराष्ट्र सर्व आवृत्ती | १५,६७,०००/- |
| १२ | गांवकरी | महाराष्ट्र सर्व आवृत्ती | १,६०,०००/- |
| १३ | टाईम्स ऑफ इंडिया | महाराष्ट्र सर्व आवृत्ती | १,०२,८०,०००/- |
| **एकूण रक्कम रुपये** | | | **५,७४,९९,०००/-** |

**क) भारत**

| **अ.नं.** | **वर्तमानपत्राचे नांव** | **आवृत्ती** | **अंदाजे अपेक्षित खर्च** |
|---|---|---|---|
| ०१ | टाईम्स ऑफ इंडिया | इंडिया सर्व आवृत्ती | ४,१२,५०,०००/- |
| ०२ | इंडियन एक्सप्रेस | इंडिया सर्व आवृत्ती | ७३,५७,०००/- |
| ०३ | दैनिक भास्कर ग्रुप | इंडिया सर्व आवृत्ती | १,८६,५०,०००/- |
| **एकूण रक्कम रुपये** | | | **६,७२,५७,०००/-** |

**३)** शासकीय दारने जाहिराती प्रसिध्द करणेपुर्वी संस्थानच्या जाहिराती उपरोक्त वर्तमानपत्रात प्रसिध्दीसाठी द्यावयाच्या झाल्यास वर्तमानपत्रांच्या स्थानिक प्रतिनिधीमार्फत प्रसिध्दीसाठी देण्यात येत होत्या. त्याप्रमाणे इंडीयन एक्सप्रेस व लोकसत्ता या वर्तमानपत्रासाठी श्री.सीताराम चांडे (वनिता ॲडव्हटायझिंग एजन्सी, आश्वी), सकाळ या वर्तमानपत्रासाठी श्री.सतिष वैजापूरकर (वैजापूरकर ॲडव्हटायझिंग एजन्सी, राहाता), लोकमत या वर्तमानपत्रासाठी श्री.प्रमोद आहेर, (अश्वमेघ ॲड.एजन्सी, शिर्डी), दिव्यमराठी या वर्तमानपत्रासाठी श्री.नवनाथ दिघे, टाइम्स ऑफ इंडीया व महाराष्ट्र टाईम्स या दैनिकांसाठी कोठारी ॲड.एजन्सी, श्रीरामपूर, सार्वमत या वर्तमान पत्रासाठी सार्वमत कार्यालय शिर्डी, सामना या वर्तमानपत्रासाठी श्री.अशोक सदाफळ, पुढारी या वर्तमानपत्रासाठी श्री.प्रविण ताटू, प्रभात या वर्तमानपत्रासाठी श्री.राजकुमार जाधव, केसरी व पुण्यनगरी या वर्तमानपत्रासाठी श्री.बाबा मणियार, जनप्रवास या दैनिकासाठी श्री.नानासाहेब जवरे यांना प्रसिध्दीसाठी देता येतील. सदरच्या जाहिरातीचे अहमदनगर आवृत्ती, सर्व महाराष्ट्र आवृत्ती व ऑल इंडिया आवृत्तीचे रेटकार्ड प्रमाणे असलेले दरानुसार अंदाजे अपेक्षित खर्च नमुद केलेला आहे.

४) सदरची जाहिरात प्रसिध्द करणेकामी जाहिरातीचा मसुदा शताब्दी कक्षाने मान्यता घेवून लवकरात लवकर जनसंपर्क विभागाकडे सादर करावा.

तरी श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाची जाहिरात प्रसिध्दीस देतांना वरील १ ते ४ मुद्याचा विचार करुन वर्तमानपत्रांचे स्थानिक प्रतिनिधींमार्फत प्रसिध्दीसाठी देणेस मान्यतेसाठी सविनय सादर.

**मागणी-** श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाची जाहिरात वर्तमानपत्रात थेट प्रसिध्दीस देणेबाबत.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय –** श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाची जाहिरात वर्तमानपत्रात थेट प्रसिध्दीस देणेबाबत कळविले आहे. १) मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १५.०९.२०१२ चे सभेतील निर्णय क्रमांक ७८६ संस्थानच्या जाहिराती शासकीय दराने प्रसिध्दीसाठी देण्यात येतात.याबाबत शासनाने दिलेल्या २१.०४.२०१७ च्या पत्रावर विचार व्हावा. २) बांधकाम-शताब्दी कक्षाने सदरची जाहिरात थेट वर्तमानपत्रात प्रसिध्द करणेबाबत कळविले आहे. त्यानुसार अहमदनगर आवृती, महाराष्ट्र राज्य व संपुर्ण देशात प्रसिध्द होणाऱ्या वर्तमानपत्राचे रेटकार्डनुसार दर नमुद केलेले आहे. रेटकार्डनुसार नमुद केलेल्या उपरोक्त दरावर ५% जीएसटी आकारुन येणारी बीले आदा करावी लागतील. ३) शासकीय दराने जाहिरात प्रसिध्दीस देणेपुर्वी श्री साईबाबा संस्थानच्या जाहिराती वर्तमानपत्रांच्या स्थानिक प्रतिनिधींमार्फत प्रसिध्दीस देण्यात येत होत्या त्यानुसार सदरची जाहिरात वर्तमानपत्रांच्या स्थानिक प्रतिनिधींमार्फत प्रसिध्दीस देणेस ४) शताब्दी कक्षाने जाहिरातीचा मसुदा मान्य करुन जनसंपर्क विभागाकडे तातडीने सादर करणेबाबत आदेश व्हावेत.

तरी सदरची जाहिरात प्रसिध्दीस देणेकामी वरील १ ते ४ बाबत निर्णय होणेसाठी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८४५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या दि.०५.०१.२०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार संस्थानला व्यावसायिक दराने जाहिराती देता येणार नाहीत, सबब उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.** (कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१६** **कला, वाणिज्य व विज्ञान शाखेचे वरिष्ठ महाविद्यालय सुरु करणेबाबत.**

**प्रस्ताव-** शिर्डीमध्ये इ.१२ वी नंतरच्या उच्च शिक्षणाची सुविधा नसल्याने शिर्डीतील व परिसरातील विद्यार्थ्यांनां उच्च शिक्षणासाठी बाहेरगांवी जावे लागते. त्यामुळे विद्यार्थ्यांची विशेषतः मुलींची सुरक्षितता धोक्यात आलेली आहे. त्यांना सुरक्षित जीवन जगता यावे व पुढील शिक्षण घेता यावे यासाठी शिर्डीत वरिष्ठ महाविद्यालय (सिनिअर कॉलेज) असणे गरजेचे आहे. याबाबत शिर्डी व परिसरातील विविध सामाजिक संघटनांनी मार्चे, निदर्शने करुन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत वरिष्ठ महाविद्यालय सुरु करण्याची मागणी केलेली आहे. त्याबाबत विविध वृत्तपत्रांमध्ये बातम्या प्रसिद्ध झालेल्या आहेत.

त्यानुसार श्री साईबाबा संस्थानमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करणेत आलेली होती.

१. मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८.०१.२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५७(४) अन्वये सध्या संस्थानचे श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयामध्ये इ.१२ वी पर्यंत कला, वाणिज्य व विज्ञान शाखांच्या शिक्षणाची सुविधा उपलब्ध आहे. यापुढील शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थ्यांना बाहेरगावी जावे लागत आहे. पुढील शिक्षणाची सुविधा संस्थानने सुरु केल्यास स्थानिक व परिसरातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची चांगली सोय उपलब्ध होईल. यादृष्टीने कला, वाणिज्य व विज्ञान या तीनही शाखांचे पदवीपर्यंतचे शिक्षणाची सुविधा संस्थानमार्फत सुरु करणेसाठी सविस्तर प्रस्ताव तयार करुन तो मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करावा, असे ठरले.

२. त्यानुसार संस्थानचे प्रतिनिधींनी दि.२६ ऑगस्ट, २०१४ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे समक्ष जाऊन चर्चा केली असता, वरिष्ठ महाविद्यालय सुरु करणेकरिता तालुकावार बृह्द आराखडा दि.३० सप्टेंबर, २०१४ अखेरे विद्यापीठाचे वेबसाईटवर (www.unipune.ac.in) प्रसिद्ध होइल. बृह्द आराखडयात तालुक्याकरिता महाविद्यालय मंजुर असेल, तर त्यानुसार दि.०१ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर, २०१४ अखेर ऑनलाईन अर्ज मागविण्यात येतील असे कळविले.

३. त्यानुसार श्री साईबाबा संस्थानचे कला, वाणिज्य व विज्ञान शाखेचे वरिष्ठ महाविद्यालय सन २०१५-१६ मध्ये सुरु करणेकरिता राहाता तालुक्याच्या बृह्द आराखडयात समावेश करणेबाबत, कुलसचिव सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांचेशी इकडील जाक्र.एसएसएस/कनिष्ठ/३०३५/२०१४ दि.२२.०९.२०१४ अन्वये पत्रव्यवहार करणेत आलेला होता.

४. तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६.११.२०१४ चे सभेतील निर्णय क्र.९६४ नुसार श्री साईबाबा संस्थानचे वरिष्ठ महाविद्यालय सुरु करणेकरिता जागा निश्चित करणेत यावी व त्यानंतर वरिष्ठ महाविद्यालय सुरु करणेसाठी शासनास काय आवश्यक आहे यासह सविस्तर फेरप्रस्ताव सादर करणेत यावा, तसेच जोपर्यंत शासनाचे बृह्द आराखाडयामध्ये नोंद होणेसाठी ऑनलाईन अर्ज करणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली.

५. सन २०१५-१६ करिता राहाता तालुक्यासाठी कला वाणिज्य व विज्ञान शाखेचे नवीन महाविद्यालय बृह्द आराखडयात समाविष्ट करण्यात आला व त्यानुसार विहित नमुन्यातील प्रस्ताव दि.३१ ऑक्टोबर, २०१४ रोजी विद्यापीठाकडे सादर करण्यात आलेला होता.

६. दाखल प्रस्तावानुसार विद्यापीठाने दि.१४.०१.२०१५ रोजीचे पत्रान्वये डॉ.शर्मिला चौधरी, बबनराव घोलप कॉलेज, सांगवी, पुणे यांचे अध्यक्षतेखाली तज्ञ समिती गठीत करुन त्यांचेकडून अहवाल मागितला. याबाबत डॉ.चौधरी यांचेशी संस्थानचे प्रतिनिधी यांनी फोनवर व इमेलद्वारे संपर्क साधून शिर्डी येथे भेट देण्याची विनंती केली, परंतू तज्ञ समितीने शिर्डी येथे भेट दिलेली नाही. तसेच विद्यापीठाने दि.१३.०२.२०१५, दि.०१.०४.२०१५ रोजीचे स्मरण पत्रान्वये डॉ.शर्मिला चौधरी, बबनराव घोलप कॉलेज, सांगवी, पुणे यांना शिर्डी येथे प्रत्यक्ष भेट देऊन अहवाल देणेबाबत कळविलेले होते. मात्र सदर तज्ञ समितीने शिर्डी येथे भेट दिलेली नाही.

७. दरम्यानचे काळात संस्थानमार्फत जा.नं.एसएसएस/कनिष्ठ/४५१७/२०१५ दि.१३ नोव्हेंबर, २०१५, जा.नं.एसएसएस/ कनिष्ठ ५८५३/२०१६ दि.२१ जानेवारी, २०१६ अन्वये मा.कुलसचिव, यांचेशी पत्रव्यवहार करुन वरिष्ठ महाविद्यालयास मान्यता मिळणेबाबत विनंती करण्यात आलेली आहे.

८. संस्थानच्या प्रतिनीधींनी दि.११.०५.२०१६ रोजी सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ येथे समक्ष जाऊन नवीन महाविद्यालय संलग्नता कक्षाचे श्री.रानवडे साहेब यांचेशी चर्चा केली असता, त्यांनी शासन परिपत्रक क्र.उशिप/१११३/प्र.४०५/विशि-३/मंत्रालय विस्तार, मुंबई दि.२९ एप्रिल, २०१५ नुसार नवीन महाविद्यालयांना मान्यता न देण्याचा निर्णय शासन स्तरावर घेण्यात आलेला आहे. सदरचा निर्णय मा.उच्च न्यायालयात सादर केलेला आहे. त्यामुळे सन २०१५ मध्ये संस्थानच्या अर्जाप्रमाणे कार्यवाही होऊ शकली नाही, असे कळविण्यात आले.

९. त्यानंतर जा.नं.एसएसएस/कनिष्ठ/१५३०/२०१६ दि.०१ जुलै, २०१६, जा.न.एसएसएस/ कनिष्ठ/ २७०५/ २०१६ दि.३१ ऑगस्ट, २०१६ अन्वये मा.कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांचेशी पत्रव्यवहार करुन सन २०१७-१८ मध्ये वरिष्ठ महाविद्यालय सुरु करणेकामी राहाता तालुक्याचा बृह्द आराखडयात समावेश करणेबाबत विनंती केलेली आहे.

१०. दरम्यानचे काळात दि.२९ जुलै, २०१६ रोजी शासनाने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे कामकाज पाहणेसाठी नविन व्यवस्थापन समितीची नेमणूक केली आहे. त्यानंतर मा.उपाध्यक्ष महोदय, यांनी देखील जा.क्र.एसएसएस/कनिष्ठ/३१६९/२०१६ दिनांक १९.०९.२०१६ अन्वये मा.श्री.विनोदजी तावडे साहेब, शिक्षणमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेकडे प्रस्ताव सादर केलेला होता.

११. तसेच जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/१२७, १२८ व १२९/२०१७ दि.०७ एप्रिल, २०१७ अन्वये मा.संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास महामंडळ, मा.कुलगुरु व मा.कुलसचिव यांचेकडे श्री साईबाबा संस्थानचे कला, वाणिज्य व विज्ञान शाखेचे वरिष्ठ महाविद्यालय सुरु करणेकरिता राहाता तालुक्याच्या बृह्द आराखडयात समावेश करण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

१२. मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३-२४/०५/२०१७ चे सभेतील निर्णय क.४४४ अल्पसे संस्थानचे कला, वाणिज्य, विज्ञान शाखेचे वरिष्ठ महाविद्यालय सुरु करणेस तसेच त्यासाठी राहाता तालुक्याचा बृह्द आराखडयात समावेश करणेकामी सावित्रीबई फुले पुणे विद्यापीठ यांचेकडे पाठपुरावा करणेत येऊन, पुढील शैक्षणिक वर्षामध्ये शासन मान्यता मिळवून वरिष्ठ महाविद्यालय सुरु करता येईल, अशी कार्यवाही करणेत यावी, असे निर्देश दिलेले आहेत.

१३. त्यानंतर जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/८२४/२०१७ दि.१७ मे, २०१७ तसेच जा.क्र.एसएसएस/ साप्रशा/ आस्था/१०८३/२०१७ दि.०१ जुन, २०१६ अन्वये मा.कुलगुरु तसेच तीन्ही विभागांच्या अधिष्ठता यांना श्री साईबाबा संस्थानचे कला, वाणिज्य व विज्ञान शाखेचे वरिष्ठ महाविद्यालय सुरु करणेकरिता राहाता तालुक्याच्या बृह्द आराखडयात समावेश करण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता.

१४. त्यानंतर मा.कार्यकारी अधिकारी महोदया यांनी पुणे विद्यापीठ येथे जाऊन मा.कुलगुरु, पुणे विद्यापीठ यांचे समक्ष भेट घेऊन जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/१५१४/२०१७ दि.२१ जून, २०१७ रोजीचे पत्रान्वये श्री साईबाबा संस्थानचे कला, वाणिज्य व विज्ञान शाखेचे वरिष्ठ महाविद्यालय सुरु करणेकरिता राहाता तालुक्याच्या बृहद आराखडयात समावेश करण्याबाबत विनंती केलेली आहे.

उपरोक्त झालेल्या कार्यवाहीनुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत सन २०१८-१९ करिता नवीन महाविद्यालय सुरु करणेकामी तयार करण्यात आलेल्या बहृद आराखडयामध्ये राहाता तालुक्यासाठी ०२ कला, वाणिज्य, विज्ञान शाखेचे महाविद्यालय सुरु करणेबाबत समावेश करण्यात आलेला आहे. सदरचे Notification जाहिरात क्रमांक ५०/ दि.१२.०९.२०१७ अन्वये विद्यापीठाचे संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेले आहे. सदर Notification नुसार दि.३० सप्टेंबर, २०१७ रोजी सांय.०६.०० वा. पर्यंत ऑनलाईन पद्धतीने तसेच अर्जाच्या ०४ साक्षंकित प्रती विद्यापीठाचे शिक्षण विभागात समक्ष सादर करणेबाबत नमुद केलेले आहे.

सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ (श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४) मधील तरतुद क्र.१७ (१) व १७ (२) (ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्म निरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसेच करण्यास सहाय्य करिल. तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणिक संस्था स्थापन करील, असे नमुद केलेले आहे.

तरी अधिनियमातील तरतुदीनुसार नवीन वरिष्ठ महाविद्यालय सुरु करणेकामी अर्ज भरावयाची कार्यवाही करता येईल. सदरचा ऑनलाईन अर्ज भरणेबाबत विद्यापीठाने व महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्र.एनजीसी २०१७/(२९/१७)/मशि-४, दि.१५ सप्टेंबर, २०१७ रोजीचे शासन निर्णयांमध्ये मार्गदर्शन केलेले आहे. तसेच विद्यापीठाचे संकेतस्थळावर देखील त्याबाबत मार्गदर्शन केलेले आहे.

श्री साईबाबा संस्थानमार्फत सदर अर्ज भरतांना खालील बाबींवर धोरणात्मक निर्णय होणे अपेक्षित आहे.

**१. <u>प्रस्तावित वरिष्ठ महाविद्यालयाचे नांव ठरविणे.</u>** सदरचे नांव ठरविण्याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय घेता येईल, असे नम्र मत आहे.

२. **<u>प्रस्तावित वरिष्ठ महाविद्यालयासाठी इमारत/ जागा निश्चित करणे. -</u>** साईभक्त श्री.के.व्ही.रमणी यांचेकडून साईआश्रम ०१ व साई धर्मशाळा या दोन इमारती श्री साईबाबा संस्थानला देणगी स्वरुपात मिळालेल्या आहेत. सदर इमारतींचे हस्तांतरण करतांना केलेल्या करारनाम्यामध्ये सदरची इमारत साईभक्तांव्यतिरिक्त इतर कोणत्याही गोष्टींसाठी वापरू नये, असे नमुद केलेले आहे. मात्र सध्या साई धर्मशाळा इमारत निमगांव-को-हाळे येथे इमारत क्रमांक D मध्ये कनिष्ठ महाविद्यालय भरविण्यात येत आहे. त्यामुळे वरिष्ठ महाविद्यालय सुरु करणेकामी दाखल करावयाच्या ऑनलाईन प्रस्तावामध्ये सध्या साई धर्मशाळा विभागाकडील **इमारत क्र.C** ही इमारत प्रस्तावित करता येईल. त्याबाबत साईभक्त श्री.के.व्ही.रमणी यांनी काही आक्षेप घेतल्यास वरिष्ठ महाविद्यालयास मंजुरी मिळेपावेतो (माहे जानेवारी-२०१८ अखेर) शिर्डी शहरात, भाड्याने अथवा संस्थानचे मालकीचे जागेचा विचार करता येईल.

सबब वरिष्ठ महाविद्यालयाकरिता ऑनलाईन प्रस्ताव दाखल करण्याची अंतिम मुदत ही दि.३० सप्टेंबर, २०१७ असल्याने अत्यंत कमी अवधीमध्ये दुसरी इमारत प्रस्तावित करुन, त्याचे कागदपत्रे जमा करणे जिकीरीचे होऊ शकते. त्यामुळे सद्यस्थितीमध्ये ऑनलाईन प्रस्ताव दाखल करतांना साई धर्मशाळा **<u>इमारत क्र.C</u>** ही वरिष्ठ महाविद्यालयासाठी प्रस्तावित इमारत म्हणून दाखविता येईल, असे नम्र मत आहे.

३. **<u>प्रस्तावित वरिष्ठ महाविद्यालयासाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांचा आकृतीबंध निश्चित करणे. –</u>** सदरबाबत राहाता व कोपरगांव तालुक्यातील तज्ञ व्यक्तींचे (वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य, सेवानिवृत्त प्राचार्य) मार्गदर्शन घेतले असता. त्यांनी विद्यार्थी संख्या, तीन्ही शाखेंमध्ये शिकविले जाणारे विषय, दुस-या व तिस-या वर्षासाठी निश्चित होणारे स्पशेल विषय यांचा सर्वांगीन अभ्यास करुन, आकृतीबंध निश्चित करावा लागेल. तसेच वरिष्ठ महाविद्यालयाचे प्रत्येक वर्षासाठी विद्यार्थी संख्येनुसार शिक्षकांचा व शिक्षकेतर कर्मचारी यांचा आकृतीबंध निश्चित होत असतो (उदा.जसे विज्ञान शाखेचे दुस-या वर्षात २० मुलांची एक बॅच असते, तर तिस-या वर्षासाठी १५ मुलांची एक बॅच असते. असे प्रत्येक विषयासाठी वेगवेगळया बॅचेस असतात.) त्यामुळे सध्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने ऑनलाईन प्रस्ताव सादर करतांना ढोबळमानाने शिक्षक संख्यानमुद करता येईल. तसेच पुढील

मा.व्यवस्थापन समितीचे सभेत वरिष्ठ महाविद्यालयाकरिता आवश्यक असणारा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांचा आकृतीबंध तपशिलवार सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

४. **राष्ट्रीयकृत/शेडयुल बॅंकेमध्ये रक्कम रु.७,००,०००/- मात्रचे फिक्स डिपॉझिट (ठेव निधी) ठेवणे. तसेच ठेवलेला ठेव निधी विद्यापीठाच्या पुर्व परवानगी शिवाय न काढण्याबाबतचे सबंधीत राष्ट्रीयकृत बॅंकेचे व संस्थेचे संयुक्त आश्वासन पत्र विद्यापीठास सादर करणे.–** सदरबाबत लेखाशाखे मार्फत रक्कम रु.७,००,०००/- मात्रचे फिक्स डिपॉझिट राष्ट्रीयकृत/ शेडयुल बॅंकेमध्ये त्वरीत ठेवणेबाबत कार्यवाही करता येईल. तसेच सदरचे डिपॉझिट विद्यापीठाचे पुर्व परवानगी शिवाय न काढण्याबाबत सबंधीत बॅंकेचे व संस्थानचे आश्वासन पत्र विद्यापीठास सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

५. **महाविद्यालय सुरु करावयाच्या अभ्यासक्रमाचा तपशिल –** नवीन महाविद्यालय सुरु करणेकामी इरादापत्र मागतांना परिशिष्ट अ मधील अ.क्र.७ मध्ये महाविद्यालय सुरु करावयाच्या अभ्यासक्रमांचा तपशिल देणे बंधनकारक आहे, तरी नवीन महाविद्यालयामध्ये कला, वाणिज्य व विज्ञान शाखेचे कोणते विषय अध्यापनासाठी घ्यावेत, याबाबत निर्णय होणेस विनंती.

६. **जागा उपलब्ध असलेबाबतचे कागदपत्रे-** नवीन महाविद्यालय सुरु करणेकामी इरादापत्र मागतांना परिशिष्ट ब मधील अ.क्र.१३ (१)(ड) मध्ये नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी बृहत आराखडयामध्ये निश्चित केलेल्या बिंदुच्या ठिकाणी जागा उपलबध असल्यासंदर्भात किमान ३ एकर जागा संस्थेच्या नावावर असलेल्या सरकारी कागदपत्रांची प्रमाणित प्रत जोडणे बंधनकारक आहे, तरी याकामी संस्थानमार्फत शैक्षणिक संकुलासाठी शिर्डी नगर पंचायत हद्दीमध्ये सर्व्हे क्र.२१२/२१३ ही साडे पाच एकर जागा आरक्षित केलेली आहे. सदर जागेचे कागदपत्रे सादर करता येतील.

७. **मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अधिकार प्रदान करणेबाबत-** सदरचा ऑनलाईन अर्ज भरतांना महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्र.एनजीसी २०१७/(२९/१७)/ मशि-४, दि.१५ सप्टेंबर, २०१७ रोजीचे शासन निर्णयांमध्ये नमुद केलेल्या बाबींची पुर्तता करणेकामी काही बाबींवर तातडीने निर्णय होणे अपेक्षित आहे. तरी त्याबाबतचे अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान होणेबाबत निर्णय होणेस विनंती.

८. **वरिष्ठ महाविद्यालय सुरु करणेकामी आवश्यक अनुषंगिक खर्चास मान्यता मिळणे. –** यामध्ये ऑनलाईन फॉर्म भरतांना आवश्यक चलन भरणे (अंदाजे रु.३५,०००/-) तसेच विविध हमीपत्र देणेकामी रक्कम रु.१००/- मात्र स्टॅम्प पेपर आणणे. तसेच त्याअनुषंगिक खर्चाकामी लेखाशाखेमार्फत अंदाजे रक्कम रु.५०,०००/- मात्र पर्यंत ॲडव्हान्स घेऊन, सर्व कार्यवाही करता येईल, असे नम्र मत आहे.

तरी उपरोक्त नमुद अ.क्र.०१ ते ०८ बाबत निर्णय होऊन, कला, वाणिज्य व विज्ञान शाखेचे नवीन वरिष्ठ महाविद्यालय सुरु करणेकामी ऑनलाईन प्रस्ताव दाखल करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.८४६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, महाविद्यालयाचे नाव श्री साईबाबा कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय असे ठरविणेत आले. याकामी प्रस्तावीत इमारत/ जागा म्हणून तात्पुरत्या स्वरुपात साई धर्मशाळा येथील २ इमारती नमुद करणेत याव्यात. तसेच प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे व दि.१५.०९.२०१७ रोजीचे शासन निर्णयानुसार कार्यवाही करणेकामी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अधिकार प्रदान करणेत येऊन, वरीष्ठ महाविद्यालय सुरु करणेसाठी आवश्यक असलेल्या आकृतीबंधाबाबतचा सविस्तर प्रस्ताव पुढील सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले. त्याचप्रमाणे याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१७** **मौजे निमगांव को-हाळे येथील संस्थान मालकीचे गट नं. ८७, ८८ पै मधील क्षेत्र २४००० चौ.मी.जमिनीचे रेखांकन मंजूर करणेकामी सहाय्यक संचालक, नगर रचना, अहमदनगर यांना विकास शुल्क अदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ मधिल तरतूदः-** अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल,व्यवस्थापन

व प्रशासन करणे व खंड (ग) अन्वये भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे या प्रयोजनांसाठी विश्वस्तव्यवस्थेचा निधी समितीकडून खर्च करण्याची तरतुद आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयः-**

*१. मा. व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेत खालील प्रमाणे निर्णय क्र.७७१ संमत झालेला आहे.*

*"... यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रसाद लाडू निर्मितीकामी स्वतंत्र फुड प्रोसेसिंग युनिटचे बांधकाम करणेसाठी आर्किटेक्ट नेमणूकीकरीता वर्तमान पत्रातील जाहीर सुचनेद्वारे आर्किटेक्चरल सल्लागारांकडून ई – निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली."*

*२. मा. व्यवस्थापन समितीचे दि.२८/०४/२०१७ रोजीचे सभेत खालील प्रमाणे निर्णय क्र.३२२(३०) संमत झालेला आहे.*

*"... यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निमगांव – को-हाळे गट नं.८७,८८ मधील जागेत प्रसाद लाडू निर्मितीसाठी स्वतंत्र फुड प्रोसेसिंग युनिट उभारणेकरीता आर्किटेक्चरल सल्लागार नेमणूकीसाठी निम्नतम दरधारक यांचे दर स्विकारणेत येऊन, त्यांना नेमणूक पत्र देण्यात यावे, अशी उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली."*

**प्रस्तावनाः** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मालकीचे मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं.८७,८८ पै. मधील जागेत प्रसाद लाडू निर्मितीसाठी स्वतंत्र फुड प्रोसेसिंग युनिट उभारणेकामी इमारतीचे बांधकाम करणे प्रस्तावीत आहे. त्यासाठी सदर जमिनीचे रेखांकनास मंजुरी मिळणेकामी इकडील जा.नं.१२५९/२०१७ दि.०७/०६/२०१७ रोजीचे पत्रान्वये उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग शिर्डी यांचेकडे प्रस्ताव सादर करणेत आला होता. मा. सहाय्यक संचालक, नगर रचना यांनी त्यांचेकडील जा.नं.२०९१ दि.२१/०७/२०१७ रोजीचे पत्रान्वये उप विभागीय अधिकारी शिर्डी भाग शिर्डी यांना अग्रेषित केलेल्या पत्रान्वये प्रस्तावातील त्रुटींची पुर्तता करणेबाबत कळविले होते. याबाबत इकडील जा.नं.२८७३/२०१७ दि.२८/०९/२०१७ रोजीचे पत्रान्वये प्रस्तावातील त्रुटींची पुर्तता करुन अहवाल उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग शिर्डी यांचेकडे सादर केला होता. सदरहू अहवाल उपविभागीय अधिकारी यांचेमार्फत जा.नं.४७०/२०१७ दि.२९/०८/२०१७ रोजीचे पत्रान्वये सहाय्यक संचालक, यांचेकडे तांत्रिक छाननीसाठी पाठविणेत आला.

मा.सहाय्यक संचालक, नगर रचना, अ.नगर यांनी विकास परवानगी प्रकरणाची तांत्रिक दृष्ट्या छाननी केली असून, विहीत नियमाप्रमाणे ते योग्य आढळून आलेले आहे. या विकास परवानगीसाठी रु.३१,६८,०००/- इतके विकास शुल्क भरणे आवश्यक आहे. या विकास शुल्काचा भरणा केल्यानंतरच विकास परवानगी प्रकरणाची शिफारस संबंधीत महसूल विभागास करण्यात येईल. तसेच सदरची रक्कम नोटीस मिळाल्यापासून ३० दिवसांचे आत अदा न केल्यास त्यापुढील कालावधीसाठी प्रतिवर्ष १८% दराने दंडणीय व्याज वसूल केले जाईल असे कळविले आहे.

संस्थान मालकीचे मौजे निमगांव को-हाळे गट नं.८७, ८८ मधील जागेत प्रसाद लाडू निर्मितीसाठी स्वतंत्र फुड प्रोसेसिंग युनिट उभारणेकामी इमारतीचे बांधकाम करणेकामी आर्किटेक्ट सुशिल देशमुख यांचेमार्फत इमारतीचे बांधकाम आराखडे तयार करणेत येत आहेत. सदरचे आराखडयास बांधकाम परवानगीसाठी प्रस्ताव उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग शिर्डी यांचेकडे सादर करावा लागेल. तत्पुर्वी सदर रेखांकनाचे विकास परवानगीसाठी विकास शुल्क रु.३१,६८,०००/- मात्र भरावे लागेल.

**प्रस्तावः-** तरी वर नमूद केलेप्रमाणे मौजे निमगांव को-हाळे येथील संस्थान मालकीचे गट नं.८७,८८ क्षेत्र २४००० चौ.मी. जमिनीचे रेखांकन मंजूर करणेसाठी विकास शुल्क रु.३१,६८,०००/- मात्र सहाय्यक संचालक,नगर रचना, अहमदनगर यांना अदा करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८४७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे मौजे निमगांव को-हाळे येथील संस्थान मालकीचे गट नं.८७,८८ क्षेत्र २४००० चौ.मी. जमिनीचे रेखांकन मंजूर करणेसाठीसहाय्यक संचालक, नगर रचना, अहमदनगर यांना रु.३१,६८,०००/- मात्र विकास शुल्क आदा करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१८** **आजचे व्यवस्थापन समिती सभेमध्ये संस्थान व्यवस्थापनाच्या दृष्टीने मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळी खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.**

**निर्णय क्र.८४८** शासनामार्फत वेळोवेळी प्रसिध्द करणेत येणारे शासन निर्णय ई-मेलद्वारे सर्व समिती सदस्यांना माहितीसाठी पाठविणेत यावेत. (कार्यवाही- सर्व विभागप्रमुख)

---

**निर्णय क्र.८४९** दि.१३.१०.२०१७ रोजी पणजी, गोवा येथे होणाऱ्या पादुका दर्शन सोहळयाचे आयोजक, साईसेवा ट्रस्ट, गोवा प्रदेश यांनी समिती सदस्यांना अशी विनंती केली की, यापुर्वी सन- २००९ मध्ये गोवा येथील पादुका दर्शन सोहळयाच्या वेळेस दर्शनार्थींना प्रसाद रुपाने, लाडूप्रसाद व उदी पाकिटे दिली होती, त्याप्रमाणे याही वेळेस दर्शनासाठी येणाऱ्या साईभक्तांना प्रसाद रुपाने वाटप करणेसाठी दोन लाख बुंदीप्रसाद व दोन लाख उदीप्रसाद पाकिटे मिळावीत.

यावर चर्चा होऊन असे ठरले की, गोवा येथे होणाऱ्या पादुका दर्शन सोहळयाकरीता आयोजकांच्या मागणीप्रमाणे लाडूप्रसाद पाकिटांऐवजी, दिड लाख बुंदीप्रसाद पाकिटे, दिड लाख उदीप्रसाद पाकिटे व ५० हजार सुंठ साखर पाकिटे विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावीत. परंतु सदरहू प्रसाद पाकिटे शिर्डी येथून घेऊन जाणेची पुर्ण व्यवस्था आयोजकांनी करावी.

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग, मंदिर विभागप्रमुख)

---

वरील निर्णय क्र.७९२ ते ८४९ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर सायंकाळी ०५.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| श्रीमती रुबल अग्रवाल (भा.प्र.से.) | (सुरेश हावरे) |
| मुख्यकार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**